# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. १८/०६/२००९**

आज गुरुवार दि. १८/०६/२००९ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०१ दि. ०५/०६/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | नरेंद्र मेहता | महापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| ३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ५) | चंद्रकांत सिताराम वैती | विरोधी पक्षनेता |
| ६) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ७) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ८) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ९) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १२) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १३) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १४) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १७) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| १९) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २०) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २१) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २२) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २३) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २४) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २५) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २६) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २७) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २९) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३०) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३१) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३२) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३३) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३४) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३५) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३६) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३७) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३८) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३९) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ४०) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ४१) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४२) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |
| ४३) | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | सदस्य |
| ४४) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४५) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४६) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४७) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४८) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४९) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ५०) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५१) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ५२) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ५३) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५४) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५५) | प्रेरणा भाटकर | सदस्या |
| ५६) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५७) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५८) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५९) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ६०) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ६१) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६२) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६३) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६४) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६५) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६६) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६७) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६८) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६९) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ७०) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ७१) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ७२) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७३) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७४) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७५) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| ७८) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| २) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| ३) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| ४) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| २) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |

(राष्ट्रीय गीत वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.)

**मा. महापौर :-**

सचिवजी, आजच्या सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मा.पिठासीन अधिका-यांच्या परवानगीने बोलतो. या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा गुरुवार दि. १८/०६/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०१, दि. ०५/०६/२००९ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. ११ वाजुन ३० मिनिटे झालेली आहेत. श्री.ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचा प्रश्न आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, सध्या भाईंदरमध्ये ज्या धोकादायक बिल्डींग, एकंदर या शहरातील धोकादायक बिल्डींगचा विचार करुन आणि या महापालिकेमध्ये १९७० नंतर जे डेव्हलपमेंट झालेले आहे. बहुतांश बिल्डींग धोकादायक झालेली आहे. आणि महापालिकेचा कुठेही ट्रान्झीट कॅम्प नाही की, उद्या ही बिल्डींग पडली तर आपण त्यांना या हेतून आपण ही नियमावली तयार करुन या नियमावलीला महाराष्ट्र शासनाकडे पाठवले होते. आत्ता आपण सांगितल्याप्रमाणे २००६-०७ आणि परत २००७ ---- ३१/०५ ला आपण पत्र पाठवलेले आहे. पुन्हा १४/०३/०७ ला पत्र पाठवले. म्हणजे, दुसरे पत्रही पाठवून दोन वर्षे झालेली आहेत. पहिले पत्र पाठवले त्याला तीन वर्षे झाली. म्हणजे प्रस्ताव सादर केला आहे. आपण पत्र पाठवले आहे. महाराष्ट्र शासनाकडून आपल्याला याबाबत काही उत्तर नाही. विचाराधीन असले तरी शेवटी आपण शासनाकडे पाठपुरावा करतो की नाही ?

**मा. आयुक्त :-**

सेक्रेटरीकडून शिफारस घेवून मा. मुख्यमंत्री साहेबांकडे प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवलेला आहे. मंजुरी मिळेल अशी आशा आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपल्याला कसे माहिती पडले ?

**मा. आयुक्त :-**

मी स्वतः चौकशी केली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

चौकशी केली त्याचा काही पुरावा आपण आणला आहे का ?

**मा. आयुक्त :-**

पुरावा असे काही नसते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण हे ०३/०७ ला शेवटी जे पत्र दिलेले आहे. दोन वर्षे झाली. मा. मुख्यमंत्र्यांकडे कधी गेले असे आपण सांगता.

**मा. आयुक्त :-**

मी पंधरा दिवसांपुर्वी गेलो होतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याच्यामध्ये मा. मुख्यमंत्र्यांनी सही केली नाही. याचा अर्थ तो पहिले चार वर्षे पडून राहिलेला आहे. पुन्हा अजुन दोन-तीन वर्षे पडून राहिल.

**मा. आयुक्त :-**

साहेब, फायनल स्टेजला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आत्ता आपल्या इकडचे मा.पालकमंत्री मा. आमदार श्री.गणेश नाईकजी, इकडचे तीन मा.आमदार श्री. संजय केळकरजी आहेत, श्री.मोहिते सर आहेत असे विधानपरिषद, विधान सभेमध्ये बसणारे तीन-तीन आमदार. उद्या एक बिल्डींग पडली. यापूर्वी आपण कामकाजाची उपविधी तयार केली. ती महाराष्ट्र शासनाकडे पडलेली आहे. त्या उपविधीला अजुन कुठलीही मंजुरी मिळालेली नाही. तरी आपण त्या उपविधीचा उपयोग करत आहोत. त्या उपविधीच्या आधाराने आपण कामकाज करतो. मग आपण हा ठराव पाठवलेला आहे. की, या उपविधीमध्ये, ही जी नियमावली आहे, त्याच्यामध्ये फेरफार करा. मग याचे गांभीर्य आपण का घेत नाही. की, उद्या समजा एक बिल्डींग आहे, माझ्या वॉर्डमध्ये तीन बिल्डींग आहेत, द्वारकेश बिल्डींग आहे. उद्या पडेल की, आज पडेल ही परिस्थिती आहे. त्याला आपण काय पर्याय करणार आहात ?

**मा. आयुक्त :-**

याचे गांभीर्य ओळखूनच मी कमीत कमी दोन ते तीन वेळा भेटून आलो. असेम्बली चालू होत्या. चालू असेम्बलीमध्ये गडबडीत असल्यामुळे असेम्बली संपल्यानंतर करु असे सांगितलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, मला सचिवांनी पत्र लिहिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

सचिवांकडून शिफारस होवून मा. मुख्यमंत्री साहेबांकडे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे तुम्ही बोलता. महापालिकेला दोन वर्षानंतर कुठलेही पत्र नाही.

**मा. आयुक्त :-**

असे पत्र कळवत नाहीत. मंजुरीसाठी मा. मुख्यमंत्र्यांकडे पाठवले आहे असे कोणी म्हणत नाहीत. असे उत्तर कोणी देत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यापूर्वी शासनाकडे आपले तीन विषय गेलेले. एक इललिगल बांधकाम तोडण्यासाठी पोलीस बंदोबस्त मिळण्यासाठी. काल तर जी.आर. आलेला आहे. त्या जी.आर. मध्ये पूर्ण उल्लेख आहे. महापालिकेला सर्वांना इन्स्ट्रक्शन दिलेल्या आहेत की, तुम्ही ताबडतोब ठराव पाठवा. आम्ही तुम्हाला मंजुरी देवू. आपला ठराव जावून चार-पाच वर्षे झालेली आहेत. आपला एक या उपविधीचा ठराव केलेला आहे. तोही अजुन मंजूर होत नाही. तुम्ही आत्ता सांगता की, मी सचिवांकडे भेटून आलो. १४/०३/०७ दोन वर्षांच्या कारकीर्दीमध्ये आपले अधिकारी का गेले नाहीत ? किंवा गेले असतील तर कोणते पत्र लिहिलेले आहे ते तुम्ही मला सांगा.

**मा. आयुक्त :-**

मा. मुख्यमंत्र्यांना मर्यादा पडतात. या राजकिय बाबतीत पदाधिका-यांनी पाठपुरावा करायचा असतो. आम्ही पाठपुरावा केलेला आहे. आम्ही चौकशी केलेली आहे. आणि आम्ही चौकशी केल्यानंतर असेम्बली संपल्यानंतर काम करु असे सांगितलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही आत्ता बोलतात की, पदाधिका-यांनी त्याचा पाठपुरावा केला पाहिजे. आपल्या इकडे तीन आमदार आहेत. आणि श्री. डावखरे साहेब, जे विधानपरिषदेमध्ये मा. सभापती आहेत तेही महापालिकेच्या सदस्यांकडून निवडून गेलेले आहेत. अशा चार आमदारांना पदाधिका-यांनी पाठपुरावा केला पाहिजे. तर या लोकांना आपण पत्र पाठवले आहे काय ? आपले श्री. नाईक साहेब, दरवेळी जनता दरबार घेतात. श्री. संजय केळकरजी येतात. श्री. मोहिते सर येतात. श्री. डावखरे साहेब मा. सभापती आहेत. आपले सन्मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसेन साहेब इकडे आहेत. पाच-पाच आमदार असून आपल्या उपविधीला मंजुरीला सहा-सहा वर्षे लागतात. आणि ही एक भयानक परिस्थिती आहे. हा विषय, बाकीच्या वेळी आपण शाळेला परवानगी द्यायची. या उपविधीमध्येच फेरबदल आहेत. या उपविधीमध्ये आपण दवाखाना, शाळा, कॉलेज साठी भूखंडासाठी कमीत-कमी क्षेत्र निश्चित करणे. आज आपण अनेक शाळांना वाढीव क्षेत्र दिलेले आहे. कोणत्या आधारावर दिलेले आहे ?

**मा. आयुक्त :-**

शासनाच्या मंजुरीने वाढीव क्षेत्र. आमच्याकडे डी.सी. रुलमध्ये जे प्रोव्हीजन आहे. त्या प्रोव्हीजनप्रमाणे आम्ही परवानगी देतो. वाढीव क्षेत्रासाठी गव्हर्नमेंटकडे मंजूरी आणतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे आपल्या उपविधीच्या पुढे जावून ते मंजूरी आणतात असे म्हणणे आहे का ?

**मा. आयुक्त :-**

होय. आणतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग त्यांना ते मिळते. आपल्या प्रस्तावाला मा. मुख्यमंत्री किंवा का मिळत नाही ? मला पहिले उत्तर आपले इकडे पाच-पाच आमदार आहेत.

**मा. आयुक्त :-**

मिळत नाही असे तुम्हाला कसे म्हणता येईल. प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी शासनाकडे ठेवलेला आहे. आम्ही मा. मुख्यमंत्र्यांकडे पाठवलेले आहे असे गव्हर्नमेंट कधी कळवत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आत्ता माझा पहिला प्रश्न आहे की, आपण जे सांगितले की, पदाधिका-यांनी पाठपुरावा केला पाहिजे. आपले सहा पदाधिकारी आहेत.

**मा. आयुक्त :-**

वजन पडते. आम्ही पाठपुरावा करतो. आमचे बंधन आहे, आम्ही पगार घेतो, तो प्रश्न नाही. वजन पडते, तुम्हाला मर्यादेपेक्षा जास्त बोलता येते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण आपल्याकडून पदाधिका-यांना असे पत्र तरी गेले आहे काय ? आपले पाच पदाधिकारी आहेत. मा. आमदार मुझफ्फर हुसेन साहेब, मा. आमदार श्री. नाईक साहेब आहे, इकडचे आमचे मा. आमदार श्री. संजयजी केळकर आहेत, श्री. मोहिते सर आहेत.

**मा. आयुक्त :-**

आम्ही विचारल्यानंतर पाठपुरावा करतो असे सांगितले. असेम्बली झाल्यानंतर करुन घेवू म्हणून सांगितले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांना पत्र दिले आहे काय की, आम्ही उपविधी पाठविली आहे. याच्यातील गंभीर बाब आहे म्हणून तुम्ही मा. मुख्यमंत्र्यांकडे भेटून आमची ही जी नियमावली पाठवलेली आहे त्याला मंजुरी असे पत्र कोण्या आमदाराला पाठवले आहे काय ?

**मा. आयुक्त :-**

आम्ही त्यांना पत्र पाठवू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही हा विषय पेंन्डींग ठेवा.

**मा. आयुक्त :-**

आम्ही समक्ष सांगितलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल** :-

हे पाठवू म्हणजे काय? या विषयाला सहा वर्षे झाली. हा प्रश्न देवून दिड वर्ष झालेले आहे. तुम्हाला याचे गांभीर्य वाटत नाही.

**मा. आयुक्त :-**

गांभीर्य वाटले नसते तर तीन चार वेळा भेटून विचारुन आलो नसतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही आधी काय बोलले?

**मा. आयुक्त :-**

हे बघा, सहाय्यक संचालक, नगररचना. डेप्युटी डायरेक्टर नगररचना, डायरेक्टर नगररचना यांच्याकडून अहवाल आल्यानंतर सेक्रेटरी प्रस्ताव मा. मुख्यमंत्र्यांकडे पाठवतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही भेटून आले. तुम्ही सांगितले की, पदाधिका-यांचे वजन पडले असते पण पदाधिका-यांना कधी आपण सांगितले का ? आमचे हेच म्हणणे आहे.

**मा. आयुक्त :-**

माझी पहिली मिटींग आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उद्या इकडे एखादी बिल्डींग पडली. चार लोक दगावले. त्यावेळी हेच मा. आमदार, हेच मा. सभापती जे विधान परिषदेमध्ये बसलेले आहेत. त्यांना इकडे यावे लागेल. त्यावेळी तुम्ही काय सांगणार ? आत्ता तुम्ही सांगितले की, पदाधिका-यांचे वजन. पण पदाधिका-यांना माहितीच नाही.

**मा. आयुक्त :-**

पदाधिका-यांना कसे माहिती नाही ? सभागृहात मंजूर केले आहे. सन्मा. सभासदांनी पण मा. आमदारांना सांगायला पाहिजे. मा. आमदारांना प्रशासनानेच सांगितले पाहिजे असे काही नाही. नागरिकांची काळजी आपल्याला आहे. आपण पण सांगायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही असे सांगितले की, प्रत्येक जबाबदारी आमची आहे. मग प्रशासन त्या डिपार्टमेंटमध्ये कशाला बसले आहे.

**मा.आयुक्त :-**

प्रशासन पाठपुरावा करतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मला तुम्ही हे उत्तर द्या की, सहा-सहा आमदारांना तुमची उपविधी मंजूर होत नाही. तुम्ही पत्र पाठवले नाही. तुम्हाला गरज वाटली नाही.

**मा. आयुक्त :-**

आम्ही समक्ष भेटून सांगितले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही सांगितले.

**मा. आयुक्त :-**

दोन आमदारांना मी स्वतः सांगितले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमदारांची नावे सांगा.

**मा. आयुक्त :-**

मा. श्री. मुझफ्फर हुसेन आणि मा. श्री. डावखरे साहेब.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते काय बोलले ?

**मा. आयुक्त :-**

असेम्बली संपल्यानंतर करुन घेवू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही साहेब, तुमचे हे विधान खोटे आहे.

**मा. आयुक्त :-**

मी खोटे बोलणार. बोलायला मी होतो की, तुम्ही होते ?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी बोलायला होतो किंवा नव्हतो. ज्या गोष्टीला...

**मा. आयुक्त :-**

पण मी खोटे बोलतो हे कसे ठरणार ?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, या गोष्टीला कमेन्ट्स करु नका.

**मा. आयुक्त :-**

कमेन्ट्सचा प्रश्न नाही. पण मी आमदारांशी बोललो हे मी खोटे बोलत असेन. माझे मी खोटे करु का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी काय बोलतो की, या विषयाला सहा वर्षे झाली. आपण बाकीच्या उपविधीप्रमाणे काम करतो. कामकाजाची उपविधी मंजूर नसताना त्याचा आधार घेतो.

**मा. आयुक्त :-**

साहेब, मला असेम्बली संपल्यानंतर करु असे सांगितलेले आहे. त्यामुळे मी तुम्हाला सांगतो की, कालच असेम्बली संपलेली आहे. आपण पाठपुरावा करुन ते मंजूर करुन आणू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, फक्त दोन आमदारांना भेटून, त्या आमदारांना भेटले की नाही, जंगल मे मोर नाचा, किसने देखा ? यामध्ये आत्ता रुलिंग झाली पाहिजे. एकतर या क्षेत्राचे जे-जे आमदार आहेत. त्यांना सर्वांना या उपविधीबद्दल आणि अजून तीन प्रश्न आहेत. या शहरामध्ये अनधिकृत बांधकामाबद्दल आपण पोलिस बंदोबस्त मागितलेला आहे. सहा वर्षापूर्वी ठराव दिलेला आहे. तो आहे. अजून एक उपविधी आहे. अशा आपल्या तीन उपविधी महाराष्ट्र शासनाकडे गेलेल्या आहेत. एकाचा सुध्दा पाठपुरावा झालेला नाही. म्हणून आपण पहिला इकडे रुलिंग द्या की, सर्व आमदारांना ही फेरबदलाची उपविधी गेला पाहिजे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल जी, जेवढे आपले महत्वाचे विषय शासनाकडे प्रलंबित आहेत. जेवढे स्थानिक सन्मा. आमदार आहेत त्या सर्वांना आपण एक निवेदन पाठवू या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

किती दिवसात ?

**मा. महापौर :-**

चार दिवसात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, ही काळजी तुम्हाला घ्यायची आहे. जे रुलिंग करता त्या रुलिंगचा पाठपुरावा कोणीही अधिकारी करत नाही. चार दिवसामध्ये.....

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेबांनी चार दिवसात सर्वांना कळवा असे म्हटले आहे. आम्ही चार दिवसात कळवू. जे महत्वाचे विषय महाराष्ट्र शासनाकडे पेन्डींग आहेत ते आम्ही सर्व आमदारांना कळवू.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपल्या माहितीकरीता मी सांगतो श्री. टोपे साहेबांचा पाठपुरावा करुन आम्ही नगरविकास सचिवांपर्यंत आणलेली आहे. मी स्वतः त्याचा पाठपुरावा केलेला आहे. आणि जे नगरसचिव

आहेत. त्यांच्यापर्यंत आपली भाईंदरची जी नियमावली आहे ती मी आणून सोडलेली आहे. आत्ता त्याचा पाठपुरावा करण्याकरीता इतर कोणी जर त्याचे श्रेय घेत असेल तर आम्ही ते घेवून देणार नाही. आम्ही तुम्हाला आश्वासन देतो की, आम्ही एक महिन्याच्या आत आणून देवू. आमची पार्टी आणून देईल किंवा आम्ही स्वतः आणून देवू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

देर आए दुरुस्त आए. धन्यवाद.

**भगवती शर्मा :-**

जैसे आप सभी आमदारोंको सुचना देंगे वैसे ही यहा के खासदार को भी वह सुचना दि जाय।

**मा. महापौर :-**

ठिक आहे. सचिव साहेब, दुसरा विषय घ्या.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, एक मिनिट.

**मा. महापौर :-**

सन्मा.श्री.भोईर साहेब, त्याचां प्रश्न चालू आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्यांचाच प्रश्न आहे. आपल्या परवानगीने बोलतो. याच्यात त्यांनी जो "ब" चा प्रश्न विचारलेला आहे. आत्ता त्याचे उत्तर दिलेले आहे बघा. शेवटच्या दोन लाईन दिलेल्या आहेत, "शासनास सादर केलेल्या सुधारित विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. ३२ (७) नुसार जास्तीत जास्त २.५ चटई क्षेत्र मर्यादेत पुर्नबांधणी परवानगी देता येईल". म्हणजे आपण आत्ता देणार आहात का? की, मंजूर झाल्यानंतर?

**मा. महापौर :-**

मंजूर झाल्यानंतर.

**शशिकांत भोईर :-**

मग तसे लिहायला पाहिजे होते ना की, मंजूर झाल्यानंतर देण्यात येईल. म्हणजे आपण पण सभागृहाची दिशाभूल करता असे याच्यात सिध्द होते.

**मा. आयुक्त :-**

साहेब, उत्तरामध्ये बघा, "शासनास सादर केलेल्या सुधारित विकास नियंत्रण नियमावलीतील ३२ (७) अनुसार जास्तीत जास्त २.५ चटई क्षेत्र मर्यादेत बांधकाम परवानगी देता येईल". म्हणजे मंजूरीनंतर. वर काय म्हटले आहे की, प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, याच्यात पुढे तुम्ही मंजूरीनंतर असे लिहिलेलेच नाही. परवानगी देता येईल.

**मा. आयुक्त :-**

देता येईल, म्हणजे गव्हर्नमेंटच्या मंजूरी नंतरच ना.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही शब्द पालटता. तसे होत नाही. देता येईल म्हणजे तुम्ही आत्ता देणार आहात का ?

**मा. आयुक्त :-**

नाही. देता येईल म्हणजे शासनाच्या मंजूरीनंतर. वरचे उत्तर बघा. प्रस्ताव शासनास विचाराधीन आहे. काय विचाराधीन आहे ?

**शशिकांत भोईर :-**

शासनाकडे आहे, बरोबर आहे. परंतु, तुम्ही शासनाचे जे विचारले......

**मा. आयुक्त :-**

प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे. म्हणजे प्रस्ताव मंजूरीसाठी पाठवलेला आहे हे सभागृहाला ज्ञात आहे.

**शशिकांत भोईर :-**

ज्ञात असले तरी तुमचे उत्तर देताना मंजुरी नंतर .....

**मा. आयुक्त :-**

आणि सभागृहाने मंजूर केल्यानंतर मग दुस-या दिवसापासून द्यायला सुरू झाले असते. गव्हर्नमेंटची मंजूरी आवश्यक आहे हे सभागृहाला माहिती आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, त्या मंजुरीनंतर देण्यात येईल असे लिहायला पाहिजे होते.

**मा. महापौर :-**

सुधारुन घ्या. सन्मा.श्री.ओमप्रकाश अग्रवालजी आपका दुसरा प्रश्न.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पहिल्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे की, अठरा विकासांना खुलासा सादर करण्यास कळविले होते. तीन विकासकांनी खुलासा सादर केलेला आहे. सोबत यादी देत आहे. मग बाकीच्या पंधराचे काय ?

**मा. आयुक्त :-**

पाठपुरावा केल्यानंतर अठरा जणांनी असे पत्र दिलेले आहे की, पुर्णत्वाचा दाखला झाल्यानंतर आम्ही तुमच्या ताब्यात देवू असे कळवलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कोणी ?

**मा. आयुक्त :-**

अठरा जणांना पत्र पाठवले. तीन जणांनी उत्तरे दिली. बाकीचे पंधरा देत नव्हते. तर आम्ही तुमची परवानगी आणि पुर्णत्वाचा दाखला देणार नाही म्हटल्यानंतर त्यांनी पुर्णत्वाचा दाखला घेतेवेळी आम्ही तुमच्या ताब्यात देवू असे कळवलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कमिशनर साहेब, तुम्ही हे पत्र कधी दिलेल आहे ?

**मा. आयुक्त :-**

दि. ०९/०५/२००९. त्यामध्ये सगळ्यांनी पुर्णत्वाचा दाखला घेताना आम्ही गार्डन विकसीत करु असे त्यांनी कळवलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कोणी कळवले आहे?

**मा. आयुक्त :-**

सर्व बिल्डरने. अठरा जणांनी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, २१/११/२००८ ला मला एक उत्तर दिलेले आहे. त्यामध्ये जी आर.जी. विकसीत केलेली आहे. त्याच्यामध्ये अतिक्रमण झालेले आहे अशी मला नोंद केलेली आहे. त्या आर.जी. मध्ये अतिक्रमण झालेले आहे. अशा मिरा भाईंदर महापालिकेच्या मी त्यावेळी विचारलेल्या प्रश्नामध्ये शांतीनगर, कनाकिया, बृजभूमी अशा तीन लोकांची उत्तरे आलेली आहेत. त्याच्यामध्ये अतिक्रमण झालेले आहे. आर.जी. ही जागा कशासाठी आणि त्याचा उपयोग कोणी करायचा आणि कशा पध्दतीने करायचा आणि ज्या विकासकर्त्यांनी बिल्डींग बांधून गेलेले आहेत, त्या ठिकाणी नाहीत. माझ्याकडे रेकॉर्ड आहे. आत्ता तुम्ही सांगितले की, ते भोगवटा दाखला घेतल्याशिवाय आम्ही देणार नाहीत. ते इकडे नाहीतच. तुम्ही ज्यांना नोटीस पाठवली ते इकडे नाहीतच. हा भोगवटा दाखला कोण घेणार आहेत ?

**मा.आयुक्त :-**

जे गार्डन विकसीत केले जाते ते भोगवटा दाखला घेतल्यानंतरच विकसित करावे लागते. आम्ही भोगवटा दाखला देणार नाही. जोपर्यंत गार्डनचा विकास होणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण भाईंदरमध्ये आत्तापर्यंत किती लोकांनी भोगवटा दाखला घेतलेला आहे ? आपण एक प्रश्न मा.स्थायी समितीमध्ये पास झालेला आहे. जोपर्यंत भोगवटा दाखला घेत नाहीत. त्याला दंडनीय शुल्क आकारण्यात यावा हा ठराव झालेला आहे.

**मा. आयुक्त :-**

ठराव झालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यानंतर माझ्या माहितीप्रमाणे भोगवटा दाखला घेताना आपण एकही दंड स्विकारलेला नाही.

**मा. आयुक्त :-**

वसुल केलेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग आत्ता हे जे बिल्डर इकडे नाहीत. मला उत्तर दिले आहे की, याचे अतिक्रमण झालेले आहे. या अतिक्रमणला जबाबदार कोण? आणि बाकीचे जे भुखंड आहेत. आज मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये प्रत्येक संकुलामध्ये हजारो हेक्टर स्क्वेअर. फीट जागा ही आर.जी. साठी आहे. त्याला कोणी वारस नाही.

**मा. आयुक्त :-**

आर.जी. चे वारस सोसायटी होल्डर आणि विकासक आहेत. आर.जी. चे अतिक्रमण झाले असेल तर विकासकाने ते काढून गार्डन करायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आर.जी. डेव्हलप न करता अशा विकासकांना आपण भोगवटा दाखला दिलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

आत्ता आम्ही तपासल्याशिवाय देत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग प्रश्न पेन्डींग ठेवा. तपासा नंतर मला सांगा.

**मा. आयुक्त :-**

कोणाला दिले म्हणजे आपण गार्डन केल्याशिवाय किंवा प्लेग्राउन्ड केल्याशिवाय त्यांनी विकास केल्याशिवाय आम्ही पुर्णत्वाचा दाखला देत नाही. कोणाला दिला हे त्यांनी सांगायला पाहिजे. आम्ही कसे सांगणार ?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही सांगा नाही दिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

आम्ही दिलेले नाही. म्हणजे मी आल्यापासून गार्डन डेव्हलपमेंट किंवा आर.जी. डेव्हलपमेंट झाल्याशिवाय आम्ही पुर्णत्वाचा दाखला देत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, हा विषय तुम्ही आल्यापासूनचा नाही. हा विषय महापालिकेचा ज्या दिवसापासून लोकांनी डेव्हलपमेंट सुरु केली. त्या दिवसापासून आहे. तुम्ही आज आले, काल गेले परत कोणी आले. मी होतो तेव्हा, असे नाही. आर.जी. डेव्हलप न करता माझ्याकडे अतिक्रमण झालेले आहे. तुमचे असे पत्र आहे की, आर.जी. मध्ये अतिक्रमण झालेले आहे. या अतिक्रमणला जबाबदार कोण ?

**मा. आयुक्त :-**

आर.जी. मध्ये अतिक्रमण झाले असेल तर विकासकाला काढून डेव्हलप करायला लावू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही, असे उत्तर होत नाही. पहिले मला सांगा जबाबदार कोण ? ते डेव्हलप करण्याचा वेगळा विषय आहे. नंतरचा विषय आहे.

**मा. आयुक्त :-**

विकासक जबाबदार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विकासक कसा जबाबदार आहे ?

**मा. आयुक्त :-**

त्या आमच्या ताब्यात नाहीत. त्या सोसायटी होल्डरचे ज्या गार्डन किंवा प्ले ग्राउन्ड किंवा जी आर.जी. सोडलेली असेल. ती विकासक आणि सोसायटी यामधील आहे. विकासकाने सोसायटी होल्डर लोकांना विकास करुन द्यायचा आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विकासकाने सोसायटींना द्यायचे बरोबर आहे. दिलीच नाही आणि तुम्ही भोगवटा दाखला दिला आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही असे सांगा की, कुठले दिले आहेत ?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी का बोलू ? तुम्ही सांगा की, आम्ही दिला नाही.

**मा. आयुक्त :-**

आम्ही दिलेले नाहीत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कनाकिया बिल्डर आणि शांतीनगर डेव्हलपरला तुम्ही असे भोगवटा दाखले दिलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

शांतीनगर डेव्हलपर्सला दिलेले नाही. विकास करायला भाग पाडलेले आहे. आम्ही त्यांना सांगितलेले आहे की, जोपर्यंत विकास करणार नाही तोपर्यंत देणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, मेरे पास इनका उत्तर है। मोघम मे बोलकर सब चीज नहीं चलाउंगा।

**मा. आयुक्त :-**

मोघममध्ये मी कधी उत्तर देत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. लोंढे साहेबांनी बोलावे. माझ्याकडे आज पत्रही आहे. म्हणजे ज्या ठिकाणी आर.जी. मध्ये कन्स्ट्रक्शन झालेले आहे. मला महापालिकेने कळवलेले आहे. आणि आत्ता कळवलेले नाही. २१/११/२००८ ला कळवलेले आहे. त्यानंतर दोन-तीन पत्रं दिलेली आहेत. त्याचे कुठलेही उत्तर नाही. आज ती आर.जी. जागा

ही सोसायट्यांची आहे. सोसायटींनी ती डेव्हलप करुन द्यायला पाहिजे. सोसायट्यांना विकासकाने अशी कुठलीही जागा डेव्हलप करुन दिलेली नाही. एक नाही हे अशा बारा बिल्डरची यादी मी दिली होती. त्यांच्यातील फक्त तीन लोकांची तुम्हाला उत्तरे आली. त्याच्यामध्येही अतिक्रमण झालेले आहे. तुम्ही उत्तर दिले आहे, मी नाही. ज्या तीन लोकांचे उत्तर आहे. त्याच्यामध्ये तीनही लोकांनी आर.जी. मध्ये अतिक्रमण केलेले आहे, असे आपण पत्र दिलेले आहे. आणि बारा लोकांचे उत्तर प्राप्त झालेले नाही, असे आपण उत्तर दिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, महत्वाचा विषय असा आहे की, बिल्डर जे पॅम्प्लेट्स काढतात की, आम्ही इथे गार्डन बनवून देवू. तुम्ही गि-हाईकांना आकर्षित करतात. ते सोसायटीच्या मेंबरनी त्या बिल्डरवर, विकासकावर दबाव आणायला पाहिजे की, अगोदर हे गार्डन बनव.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापालिकेची काही जबाबदारी नाही ?

**मा. आयुक्त :-**

महापालिकेची जबाबदारी महापालिका पालन करते. परंतु, ज्या लोकांनी फ्लॅट्स घेतलेले आहेत. सोसायटी बनवलेली आहे त्या सोसायटीने सुध्दा विकासकावर दबाव आणायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, पहिली गोष्ट, पहिली जबाबदारी कोणाची आहे ?

**मा. आयुक्त :-**

आमची जबाबदारी आम्ही कुठे नाकारतो ? आम्ही पुर्णत्वाचा दाखला देणार नाही. जोपर्यंत आर.जी. चा विकास होत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ते बिल्डर त्या ठिकाणी नाहीत. तुम्हाला काय देणार ? त्या बिल्डींगमध्ये लोक राहायला आले आहेत.

**मा. आयुक्त :-**

त्या ठिकाणी बिल्डर नाहीत अशांची नावे सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी आपल्याला प्रश्न विचारला. तुम्ही मला प्रत्येक वेळी उत्तर विचारता.

**मा.आयुक्त :-**

प्रश्न विचारतो म्हणजे तिथे बिल्डर जागेवर नाही असे तुम्ही म्हणता, विकास कोण करणार ?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून तुमचे उत्तरही आले नाही. तुम्ही पंधरा बिल्डरचे उत्तर किती दिवसापूर्वी मागवले.

**मा.आयुक्त :-**

आमच्याकडे ज्या अठरा लोकांनी लिहून दिलेले आहे. त्यांचा विकास झाल्याशिवाय आम्ही पुर्णत्वाचा दाखला देणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही पत्र कधी पाठवले ? आणि तुम्हाला पंधरा लोकांचे उत्तर कधी आले आहे ?

**मा. आयुक्त :-**

तीन लोकांचे आले आणि नंतर पंधरा लोकांचे आले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हाला त्याची कॉपी द्या. मागवा ना. मी हा प्रश्न विचारला तेव्हा तुम्हाला तयारीत राहायला पाहिजे होते.

**मा. आयुक्त :-**

कुठले ?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या पंधरा लोकांची पोहोच आम्हाला आत्ता इकडे सभागृहात द्या. माझ्याकडे दुसरे पुरावे आहेत.

**मा. आयुक्त :-**

आम्ही तुम्हाला पत्राची झेरॉक्स देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझ्याकडे दुसरे पुरावे आहेत. तुम्ही हे दहा दिवसापूर्वी लिहून घेतलेले आहे. तुम्ही ०९/०५ ला हे बिल्डरकडून मागवून घेतलेले आहे. बिल्डरने दिले असते तर तुम्ही तोडावे अशी नोटीस दिली असती.

**मा. आयुक्त :-**

साहेब, आम्ही पुर्णत्वाचे दाखले अडवल्यानंतर ते लिहून द्यायला आले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही अधिका-यांची बाजू घेवू नका.

**मा. आयुक्त :-**

साहेब, मला अधिका-यांची बाजू घ्यायचे काय कारण आहे ?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही ज्या लोकांना नोटीस पाठवली. ०९/०२/२००८, आज पुर्ण तीन वर्षे झालेली आहेत. आणि तुम्ही आत्ता सांगता की, त्यांचे लेखी पत्र आलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

आम्ही बिल्डरचे पुर्णत्वाचे दाखले अडवलेले आहेत. आर.जी. विकास झाल्याशिवाय आम्ही पुर्णत्वाचे दाखले देणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, या प्रश्नाशी मी कुठेही सहमत......

**मा. महापौर :-**

मुझे आप बताईए की, आर.जी. विकसित नहीं हुआ वह प्रॉब्लेम है की, ओ.सी. नहीं लिया व प्रॉब्लेम है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहब, पहली बात तो महापालिका की क्या जबाबदारी है ? आर.जी. के बदले मे क्या जबाबदारी है?

**मा. महापौर :-**

बिल्डरने आर.जी. विकसित करनी चाहिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उसको कौन देखेगा ?

**मा. महापौर :-**

बिल्डरने भी देखना चाहिए और जब कॉर्पोरेशन के पास ओ.सी. लेने आते है तब देखना चाहिए या फिर मालुम पडेगा तो नोटीस देना चाहिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बरोबर है ? अपने क्षेत्रिय अधिकारी है। अतिक्रमण अधिकारी है।

**मा. महापौर :-**

अतिक्रमण अधिकारी वह काम देखते नहीं है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहब एक पत्र मेरे पास है। मैने कल दिया है, टि.डी.आर. के बारे में। ए.टी.पी. वालोने उत्तर क्या दिया की, जेव्हा टि.डी.आर. दिले त्यावेळी जागा रिकामी होती. आम्ही घेतल्यानंतर त्या ठिकाणी बांधकाम झाले असेल तर बांधकाम विभागाला विचारा. अतिक्रमण झाले असेल तर अतिक्रमण विभागाला विचारा. हे उत्तर ए.टी.पी. चे आहे. म्हणजे शेवटी यांनी ताब्यात घेतली तेव्हा रिकामी होती. आत्ता टि.डी.आर. घेतल्यानंतर ती जागा रिकामी आहे की नाही ते बांधकाम आणि अतिक्रमणनी बघायचे. मग आम्ही सभागृहामध्ये कोणाला विचारायचे ? आत्ता यांनी सांगितले की, आम्ही आर.जी. जागा सोडवली.

**मा. महापौर :-**

आपल्याकडे जी स्पेसिफीक यादी आहेत की, त्या आर.जी. डेव्हलप केलेल्या नाहीत आणि बिल्डरची नावे असतील तर ती द्या. मा.आयुक्त कारवाई करतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, एक वर्षापूर्वी उत्तर दिलेले आहे की, अतिक्रमण झालेले आहे. काय कार्यवाही केली तेच मी विचारतो आहे.

**मा. महापौर :-**

मा.आयुक्त साहेब, या प्रकारचे जे बिल्डर आत्ता जागेवर असतील. त्यांच्या ऑफीसेस, आत्ता जी नावे घेतली कनाकिया, शांती नगर ते सर्व जागेवरच आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा.महापौर साहब, आप इस विषय को क्लोज मत किजीए। जो लेटर दिया है की, अतिक्रमण हुआ। उसके उपर देड साल मे क्या कार्यवाही किया वह बताइए।

**मा. आयुक्त :-**

कोणत्या आर.जी. बद्दल ?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही उत्तर दिलेले आहे. त्याची तारीख मी तुम्हाला सांगतो. दि. २१/११२००८. तुमचे पत्र शोधा.

**मा. महापौर :-**

सन्मा. श्री. ओमप्रकाश अग्रवालजी अर्धा तास संपलेला आहे. तुमचा विषय पुढे जाईल.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुमच्या परवानगीने बोलते. आत्ता सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी गार्डन, मैदान यांचा विषय काढला...

**मा. महापौर :-**

तो आर.जी. चा विषय पेन्डींग आहे. पुढच्या मिटींगला होईल.

**नयना म्हात्रे :-**

माझा विषयच वेगळा आहे. साहेब, श्री. मनुभाई मेहता यांच्या मॉलसमोर आपले जे मैदान आहे. ते श्री. मनुभाई मेहता यांना विकत दिले की काय याची मला माहिती मिळाली तर बरे होईल. कारण त्याच्या ॲग्रीमेंटमध्ये स्पष्ट लिहिलेले आहे की, वर्षातून त्याला तीस दिवस द्यायचे आहे. आणि तो वर्षातून आठ महिने वापरतो. का ? आज एवढ्या मुलांच्या सुट्टया गेल्या. आणि याने त्याची खेळणी वगैरे लावली आहेत. खेळणी लावली ती लावली आणि तिकिटाचे पैसे घेतो. मग त्याच्यामध्ये मुलांना खेळायला नको ? त्याच्यावर तुम्ही काय कारवाई करणार आहात ? त्याचे ॲग्रीमेंट रद्द करणार आहात की, काय करणार आहात, ती माहिती मला मिळाली तर बरे होईल. कारण मी त्याच्यावर पत्रं दिली आहेत.

**मा. महापौर :-**

त्याच्यावर महापालिकेने भाडे घेतले असेल.

**नयना म्हात्रे :-**

पण त्याच्यावर लिहिले आहे की, त्याला एक महिनाच द्यायचे आहे. मग असा जर एखादा माणूस तुमच्याकडे भाड्याने मागायला आला तर तुम्ही ते देणार आहात का ?

**मा. आयुक्त :-**

मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृहाच्या मान्यतेने त्यांना ॲग्रीमेंट करुन दिलेले आहे. आणि वर्षातून तीस दिवस त्यांना वापरायला अलाउड आहे. त्याचे ते पंचेचाळीस लाख रुपये दरवर्षी भरतात. त्यामुळे तीस दिवस त्यांना वापरायला. बाकीचे सगळे दिवस पब्लीकला वापरायला फ्री आहे.

**नयना म्हात्रे :-**

पण साहेब, तुम्ही आत्ता जाउन बघा. त्याने कधीपासून त्याची खेळणी बसवून ठेवली आहेत.

**मा. आयुक्त :-**

आम्ही दररोज दिवस मोजतो.

**नयना म्हात्रे :-**

मग किती दिवस झाले.

**मा. आयुक्त :-**

तीस दिवसापेक्षा वर गेले की, आम्ही ते काढून टाकणार.

**नयना म्हात्रे :-**

तीस दिवसापेक्षा वर गेले, दोन महिने जास्त झाले.

**मा. आयुक्त :-**

असे नाही.

**नयना म्हात्रे :-**

साठ दिवस झाले.

**मा. आयुक्त :-**

असे नाही.

**नयना म्हात्रे :-**

असे नाही काय ? त्याच्यावर माझे पत्र आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही जरा ऐकून घ्या. की, ज्यावेळेला आपण जागा कोणाला तरी, तीस दिवस त्यांना अलाउड आहे. तीस दिवसांमध्ये त्यांना खेळणी लावयला दिली. खेळणी लावण्यासाठी चार-पाच दिवस, पाच-सहा दिवस जातातच. एखादे लग्न ठरले म्हणजे चार-पाच दिवस अगोदर ग्राउन्ड ताब्यात द्यावा लागतो. तो दिवस मोजायचे नसतात. आणि काढून टाकायचे दिवसपण मोजायचे नसतात. फक्त त्यांनी किती वापरले ते दिवसच मोजायचे असतात.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, त्या प्रकरणामध्ये अमेंडमेंट झाल्यानंतर....

**मा. आयुक्त :-**

तीस दिवस दिलेले आहेत. तीस दिवसामध्ये त्याचे जास्त झाले की, आम्ही काढून टाकू.

**मिलन म्हात्रे :-**

त्या प्रकरणात ॲग्रीमेंट झाल्यानंतर त्यांनी विकसीत करण्याचे प्रस्ताव सादर केले आहेत का? तुमच्याकडे दिड वर्ष प्रस्ताव आले नव्हते मग ॲग्रीमेंट फॉरफीट का केले नाही ? इकडून सुरुवात होते. तुम्ही ॲग्रीमेंट रद्द का केले नाही? तुमच्या ॲग्रीमेंटनुसार दिड महिन्यामध्ये त्यांनी तुम्हाला प्रस्ताव सादर करायचे आहेत.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, संबंधित प्रभाग अधिकारी आलेले आहेत. त्यांना विचारा किती दिवस झाले.

**मिलन म्हात्रे :-**

ॲग्रीमेंट कधीचे आहे ? त्याचे कंडीशन काय आहेत ? ते फॉरफीट का केले नाही ते सांगा.

**मा. महापौर :-**

या विषयावर आपल्याला बोलायचे असेल. मा.आयुक्त साहेबांना सन्मा.सदस्या सौ. नयना म्हात्रे मॅडम तुम्ही पत्र दिलेले आहे.

**नयना म्हात्रे :-**

ते उत्तर मला पटण्यासारख नाही.

**मा.महापौर :-**

तीस दिवसांच्या वर झाले असतील तर मा.आयुक्त तुम्हाला माहिती देतील.

**नयना म्हात्रे :-**

बांधल्यापासून ते वापरेपर्यंत तीस दिवस. त्याला बांधायला पंधरा दिवस लागतात आणि सोडायला पंधरा दिवस लागतात.

**मिलन म्हात्रे :-**

ॲग्रीमेंट फॉरफीट का केले नाही? मी तर इकडून बोलतो. टर्मव्यू कंडीशन नंतर राहिल्या. त्यांनी प्रकरण सादर केल्यानंतर तुम्ही ॲग्रीमेंट फॉरफीट का केले नाही ?

**मा. महापौर :-**

मा.आयुक्त साहेब, तुम्ही ती माहिती घ्या.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, असे चालत नाही. तिकडे मुलांना सुट्टया पडलेल्या आणि मुलांनी पैसे भरुन तिकडे खेळायला जावे का ?

**मा.महापौर :-**

योग्य ती कार्यवाही करतील.

**मिलन म्हात्रे :--**

त्यांचा ठराव स्टँडींगने कॅन्सल केलेला आहे.

**मा. महापौर :-**

माहिती घेवून योग्य ती कार्यवाही करतील.

**नयना म्हात्रे :-**

योग्य ती कार्यवाही म्हणजे ती ॲग्रीमेंट रद्द करणार आहात का ?

**मा. महापौर :-**

जे काही नियमात बसेल आणि ॲग्रीमेंटमध्ये असेल त्याप्रमाणे कार्यवाही करतील.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, महापालिकेने विकासकाला नोटीस काढलेली आहे ही बातमी खरी आहे का? मॅक्सस मॉलच्या समोरचे जे ग्राउन्ड त्याने जास्त वापरले आहे. त्याच्याबद्दल नोटीस काढलेली आहे ही बातमी खरी आहे का ?

**मा. आयुक्त :-**

आमची परवानगी घेवून किती दिवसाचा वापर केला.

**अनिल सावंत :-**

साहेब, चौदा दिवस जास्त झाले. तुम्ही व्यवस्थित माहिती घ्या.

**मा. महापौर :-**

ती माहिती घेवून तुम्हाला देण्यात येईल.

**मा. आयुक्त :-**

त्यांना विचारणा केली होती. विधी विभागामध्ये आणि नगररचना विभागामध्ये किती दिवस जास्त झाले ही विचारणा करायला पाठवलेले आहे. प्रत्यक्षात त्यांना विचारणा केली होती की, किती दिवस वापरले ? कारण त्यांनी फक्त महापालिकेला कळवायचे आहे. या तारखेपासून या तारखेपर्यंत मी तीस दिवसांमधील हे पंधरा दिवस वापरणार आहे असे कळवायचे असते.

**अनिल सावंत :-**

पण ही माहिती प्रभाग अधिका-यांना असते ना की, त्यांनी किती दिवस वापरले ?

**मा. आयुक्त :-**

प्रभाग अधिका-यांनी ते कळवलेले आहे.

**अनिल सावंत :-**

त्यांनी जास्त दिवस वापरले ही वस्तुस्थिती आहे.

**मा. आयुक्त :-**

वापरलेले म्हणजे सामान लावण्यासाठी आणि काढण्यासाठी जो कालावधी जातो ते धरायचे नाही.

**नयना म्हात्रे :-**

पण साहेब, त्याच्या ॲग्रीमेंटमध्ये तसे लिहलेले आहे.

**वंदना चक्रे :-**

मा. आयुक्त साहेब, मा. महापौर साहेब, मी सभागृहातील सर्व सन्मा. सदस्यांना सांगु इच्छिते की, असा विषय आहे की, हा रोज जनरल विषय तर होतोच. माझ्या वॉर्डमध्ये गेल्या पाउणे दोन वर्षापासून, मला असे वाटते निवडून आल्यानंतर चव्हाण बिल्डर यांच्या बिल्डींगबाबत मी सुरुवातीपासून पत्रव्यवहार केलेले आहेत. मा. आयुक्त साहेब, आपण नव्हते. आपल्याबद्दल आम्हाला गर्व वाटतो. आपण ऐकून घेण्यासारखा आणि सदस्यांनापण ऐकण्यासारखा विषय आहे. माझ्या वॉर्डमध्ये सुरुवातीपासून मी पत्रव्यवहार करुनसुध्दा नगरसेवकांच्या पत्रांना बरोबर उत्तर दिले जात नाही. उत्तरे बरोबर दिली नाहीत म्हणून माहितीच्या अधिकारात मागितले. तर तिथेही उत्तर दिले जात नाही. आम्ही असा विचार करतो की, अधिका-यांचा फक्त नमुना आहे. म्हणून आम्ही वर जात नाही. आम्हाला वर जायचे पण माहित आहे. परंतु मी आज कान खोलून अधिका-यांनी, सन्मा. सदस्यांनी आणि मा. आयुक्तांनी ऐकून घ्यायचे आहे की, चव्हाण बिल्डरची बिल्डींग इललिगल असताना आम्ही वारंवार कंम्प्लेंट केली, तक्रार केल्या, कोर्टात गेलो. त्यांच्यावर एमआरटीपी दाखल केल्या, असे पालिकेचे सांगणे आहे. त्याच्यातही दाखल केल्यानंतर महानगरपालिकेच्या लॉ अधिकारी कोर्टामध्ये जाउन भांडल्या आणि आपल्या विरोधामध्ये निकाल लागतो. म्हणजे असे का? एक बिल्डर इललिगल बिल्डींग बनवतो, बांधतो आणि त्याच्या फेव्हरमध्ये निकाल लागतो. महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि जे काही संबंधीत लॉ अधिकारी आहेत, ते काय करतात? कशामुळे असे होते? म्हणजे असा कायदा आहे का? किंवा जज एवढी मोठी हिम्मत करेल का? जजला पण काही भिती वाटत असेल की नाही. तर आपले लॉ अधिकारी, नगररचनाचे अधिकारी आणि काही कर्मचारी त्याच्यामध्ये सामील आहेत असा माझा आरोप आहे. यांच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि यांच्यावर कायदेशीर सक्ती केली पाहिजे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. मा. आयुक्त साहेब आपण माहिती घ्या. आणि नियमाप्रमाणे कार्यवाही करा.

**वंदना चक्रे :-**

असे म्हणू नका. तुम्ही रिवाईजसाठी दिलेले आहे. यासाठी मी म्हंटले की, सदस्य आणि तुम्ही ऐका. ते रिवाईज होउ देणार नाही. तुम्ही तर कायदा बदलत असाल तर तो विचार तुम्ही करु नका. म्हणजे बिल्डरने इललिगल बिल्डींग बनवायची, अधिका-यांनी साथ द्यायची आणि विधी अधिका-यांनी कोर्टामध्ये हरायचे. सत्ताधारी पार्टीचे मा. महापौर तुम्ही विचार करा. त्या वॉर्डची मी नगरसेविका आहे आणि आमच्यामुळे तुम्ही महापौर झालेले आहात आणि तुम्ही इतके मोठे काम करता. आम्हाला विचारतसुध्दा नाही. म्हणजे तुम्ही आमच्या वॉर्डमध्ये हे चुकीचे काम करता.

**मा. महापौर :-**

काय विचारायचे?

**वंदना चक्रे :-**

रिवाईजसाठी तुम्ही महापौर आहात. तुम्ही तुमचा महापौरांचा अधिकार असा वापरु नका. मा. आयुक्त साहेब, मी आपल्याला माझे पत्र दिलेले आहे ते रिवाईज झाले नाही हे सगळ्यांसाठी मी सर्व सदस्यांना आणि अधिका-यांना सांगते की, याच्यावर कारवाई झाली पाहिजे. हे नव्हे तर ओस्तवाल बिल्डरच्या तीन माळ्याची की, चार माळ्याची परमिनशन घेतलेली आहे. तीन-तीन माळे इललिगल गनवलेले आहेत. साहेब, याच्यावर कार्यवाही झालेली नाही. मी वारंवार सांगितलेले आहे. श्री. राजीव जाधव साहेबांना मी अनेकदा सांगितले. मा. महासभेतसुध्दा मी आवाज उठवलेला आहे. पण त्याच्यावर तेवढ्या पुरतीच कार्यवाही झाली. शेवटी श्री. राजीव जाधव अधिका-यांच्या फेव्हरमध्ये बोलायचे. तर मागच्या मा. महासभेमध्ये आपण येण्याच्या आदल्या दिवशी मी बोलली. मा. आयुक्त साहेब, आपण असे अधिका-यांच्या फेव्हरमध्ये बोलू नका. जर तुम्ही असे म्हणाल तर मी असे बोलेन की, हमारी माँगे पुरी करो। नही तो आयुक्त आयुक्त साहेब खुर्सी खाली करो। आम्हाला न्याय मिळालाच पाहिजे ही घोषणा मी दिली आणि अर्ध्या तासाने त्यांची बदलीची ऑर्डर आली. त्यांची वेळ तेवढी होती, ते गेले. आयुक्त येतात, जातात. आपण तिस-यांदा आलात. आपण चांगले काम केल्याची आम्हाला आपल्याबद्दल आपुलकी वाटते. परंतु, आज तुम्ही बिल्डींग तोडल्या याच्यावरसुध्दा कारवाई झाली पाहिजे.

कोणी-कोणी अधिका-यांनी याच्यावर कसे पत्रव्यवहार केले? उलटे सुलटे करुन त्याला रिवाईज करुन त्याला लिगल कसे करुन दिले? याची माहिती पर्ण शहानिशा आपण करावी आणि कारवाई करुन त्याची माहिती मला पुढच्या मा. महासभेत द्यावी किंवा मला आता त्याची उत्तर देखील पाहिजे. इथे बसलेले आहेत. विधी अधिका-यांनी बोलले की, इललिगल बिल्डींग बनवून झाल्यानंतर कोर्टात गेल्यावर का हरते? कशामुळे हरते? म्हणजे आपल्या बाई तिथे भांडतात की नाही? त्यादिवशी मी तुम्हाला पत्रसुध्दा दिलेले आहे आणि ओस्तवाल बिल्डरचेसुध्दा आणि ड्रीमलॅन्ड पार्कमध्ये राजश्री बिल्डर आहेत. त्यांचीसुध्दा बिल्डींग पूर्ण जमिनीपासून, मी सुरुवातीपासून केले पण काही झालेले नाही. किती भांडू? याच्यानंतर अशी बोलणार नाही. मा. महासभेत बोलणार नाही. आम्ही कायद्याने करणारच, कोर्टात जाणारच. त्याच्या अतिरिक्तसुध्दा सत्ताधारी पक्षात असताना महापालिकेच्या समोर हल्लाबोल मोर्चा काढणार, आंदोलन करणार, उपोषण करणार याची आपण नोंद घ्यावी. मला तुम्ही आत्ता उत्तर द्या. उत्तर का देत नाहीत?

**मा. महापौर :-**

तुम्हीच आता सांगितले की, मा. आयुक्त साहेबांनी पुढच्या मा. महासभेत उत्तर द्यावे. ते उत्तर देतील.

**वंदना चक्रे :-**

ते पण बोलली आणि आत्ताचे पण द्या म्हणून बोलली, दोन्ही बोलले. एकच बोलले नाही.

**मा. महापौर :-**

तुम्हाला ते माहिती घेउन पूर्ण उत्तर देतील.

**वंदना चक्रे :-**

माहिती घेउन का उत्तर देतील? तुम्ही त्यांना उत्तर का देउ देत नाहीत? त्याच्यामध्ये रिवाईससाठी तुम्ही सामील आहात म्हणून का?

**मा. महापौर :-**

मॅडम, काही आरोप करु नका.

**वंदना चक्रे :-**

आरोप नाही. मला माहिती आहे म्हणून बोलते. मी ठामपणे यासाठी बोलते की, मला माहिती आहे. मी आजपर्यंत खुप भांडले, खुप बोलले. पण याच्यापुढे मी हे सहन करणार नाही.

**मा. महापौर :-**

तुमच्याकडे पुरावे असतील तर द्या. याच्यापुढे तुम्हाला कार्यवाही करता येईल. उत्तर काय त्यामध्ये मी सामील असेन तर मा. आयुक्तांना निवेदन द्या ते माझ्यावर कार्यवाही करतील.

**वंदना चक्रे :-**

मी त्यांना निवेदन दिले आहे.

**मा. महापौर :-**

मी इन्व्हॉल्व असेन तर त्यांना पुरावे द्या. ते ते माझ्यावर पण कार्यवाही करतील.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, एक महत्वाचा विषय आहे. दुप्पट शास्तीबद्दल मा. आयुक्तांचा १० जुनचा एक आदेश आहे. तो आदेश माहितच आहे. आपण दिलेला त्याच्याबद्दल प्रशासनाचे थोड स्पष्टीकरण हवे होते. ज्या बिल्डींगने ऑक्युपेशन सर्टीफिकेट घेतलेले नाही अशा सगळ्यानांच त्या नागरीकांना दुप्पट शास्ती लावायची असा एक आदेश आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर महादेय, मा. आयुक्त साहेब, स्पष्टीकरण करण्याआधी थांबा. आजची सभा आपण किती कायदेशीर चालवत आहोत. आपला प्रश्नोत्तराचा वेळ संपलेला आहे. विधीवत सभेचे कामकाज सुरु करावे. प्रत्येकाला वाटेल प्रत्येकाने बोलावे. सगळ्यांचे पोटतिडकीने बोलणे आम्हाला कळते आणि शहराची एवढी चिंता सगळ्यांना आहे. परंतु तो विषय रितसर विषयपटलावर आणून त्याच्यावर चर्चा करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्तांनी आदेश काढलेले आहेत. या आदेशाची माहिती सभासदांना आता माहिती पडली आहे. त्याच्याबद्दल मा. आयुक्तांना, मा. महासभेत विचारले तर काही बिघडत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

नागरीकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यामध्ये नागरीक सापडणार आहेत. विकासकर्ता गेलेला आहे.

**मा. महापौर :-**

या विषयावर सभा संपल्यावर मा. आयुक्त दालनात बैठक घेउ तेव्हा खुलासा करु या.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, अतिशय महत्वाचे आहे. ब-याचशा इमारतींना बिल्डर इमारत बांधून जातो, ओसी घेत नाही. या आदेशाप्रमाणे......

**मा. महापौर :-**

पण त्याबद्दल सभेचा वेळ जातो. मिटींग संपल्यानंतर गटनेत्यांची बैठक घेउन आपण संपवू या.

**प्रशांत पालांडे :-**

महत्वाचा विषय आहे. पाच मिनिटे स्पष्टीकरणाला लागतील.

**मा. महापौर :-**

शेवटला घेउ या.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेसाठी दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी सुचक श्री. ओमप्रकाश अग्रवाल आणि अनुमोदन श्री. रामनारायण दुबे यांची आहे.

**वंदना चक्रे :-**

सचिव साहेब, दोन मिनिटे थांबा. माझा एक महत्वाचा विषय राहिला.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी वाचू द्या. नंतर बोला.

**वंदना चक्रे :-**

सचिव साहेब, दोन मिनिटे माझे ऐका. मा. महापौर साहेब ऐकून घ्या. तुमचाच विषय आहे. आपण मा. महापौर आहात. आम्ही सगळ्यांनी मिळून तुम्हाला महापौर बनवलेले आहे. आपल्याला मला सगळ्या सदस्यांच्या साक्षीने हे सांगायचे आहे. आपण आमच्या वॉर्डमध्ये येता आणि तिथे आल्यानंतर आम्हाला कळवत नाही. आल्यानंतर आमच्या वॉर्डमध्ये आम्ही ज्या नगरसेवक फंडातून काम केले. ते काम आपण दाखवता की, यह काम मै कर रहा हू, मै करके देता हू। दिशाभूल करता. मला हे सांगायचे आहे की, आपण असे का करता? आज आम्ही आमच्या तुमच्या एक-दोन मतांनी तुम्हाला महापौर केले. तुम्ही विसरलात का? तुम्हाला आमच्या वॉर्डमध्ये यायचे असेल तर आम्हाला बोलवा.

**मा. महापौर :-**

मला कुठल्याही वॉर्डमध्ये जायला कोणाची परवानगीची गरज नाही.

(सभागृहात गोंधळ)

**जयंत पाटील :-**

तुम्हाला त्या खुर्चीवर आम्ही बसवले आणि आता तुम्हाला त्या खुर्चीत बसणा-या नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये जावून तिकडे तुम्ही त्यांच्या कामामध्ये हस्तक्षेप करता.

(सभागृहात गोंधळ)

**जयंत पाटील :-**

तुम्हाला ज्यांनी खुर्चीवर बसवले आहे. त्यांच्या बरोबर गद्दारी करणार असाल तर त्याचे फळ तुम्हाला मिळेल.

**मा. महापौर :-**

यापूढे वॉर्डमध्ये जाताना संबंधीत नगरसेवकांना बरोबर घेउन जाता येईल.

(सभागृहात गोंधळ)

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आजच्या मिटींगचे विषय जर बाकी राहिले तर उद्या परत मिटींग लावणार आहात का?

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसून घ्या. श्री. रामनारायण दुबेजी आपकी लक्षवेधी है। दो लक्षवेधी आयी है। पहला लक्षवेधी स्कुल के बारे मे है। त्या स्कुलबद्दल बोला.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहब, मेरी भी लक्षवेधी स्कुल के बारे मे है वह भी इसमे क्लब किया जाए।

**वंदना चक्रे :-**

गली गली मे शोर है, महापौर चोर है। महापौरांचा धिक्कार असो, धिक्कार असो, धिक्कार असो त्यांचा निषेध करा. बीजेपी मध्ये जाणारा महापौर गद्दार महापौर आहे. हमारे दो वोट से महापौर बना। ऐसे महापौर का निषेध, धिक्कार क्या, खुर्सी से निचे उतरना चाहिए।

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

लक्षवेधीचे वाचन करतो.

**प्रति,**

**मा. सचिव साहेब,**

मिरा भाईंदर महानगरपालिका

भाईंदर.

**विषय :- अभिभावको को डोनेशन (रि एडमिशन) के नाम पर हो रही परेशानी के मामले मे दखल देने हेतु।**

महोदय,

मिरा भाईंदर मनपा क्षेत्र मे आये दिन शिक्षण अधिकारी व शिक्षण मंडल की लापरवाही से कुकुमुत्ते की तरह शैक्षणीक संस्थामे खुल रही हे, जो डोनेशन व (पुनःप्रवेश) के नाम पर अपनी जेबे भर रहे है, जबकी मनपा क्षेत्र मे रेहनेवाले प्रत्येक नागरीक से मिरा भाईंदर मनपा शिक्षण कर वसुल करती है, ऐसे मे शिक्षा के नाम पर पुरजोर वसुली कर रहे शिक्षा माफिया व मनपा शिक्षा मंडल की सभागृह मे चर्चा की जाय, दोषी मनपा अधिकारी व शिक्षण मंडल को मनपा सभागृह मे तलब कीया जाये, अभिभावको के उपर लगे अतिरिक्त अधिभार को कम कर लोगो को रियामत दि जाय, इस आर्थिक मंदी के दौर मे अगर इसी प्रकार शिक्षा माफिया वसुली जारी रखे तो हजारो छात्रो शैक्षणिक स्तर नरकीम बन जायेगा, विषय को गंभिरता से लेते हुये मनपा सभागृह मे शिक्षा के नाम पर हो रही इस प्रकार कायदेशीर वसुली को रोकने का प्रयास के साथ दोषीयो को दंडित करणे का कार्य करे तो मिरा भाईंदर की जनता आपको दुआ देंगी।

धन्यवाद !

**आपला कृपाभिलाषी,**

**(मदन सिंह)**
**नगरसेवक**

**वंदना चक्रे :-**

सचिव साहेब, जरा थांबा. या महापौरांचा जरा धिक्कार करु द्या.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, लक्षवेधी परत वाचा.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

सचिव साहेब, मॅडम बोलतात ते जरा ऐका. लक्षवेधी काय वाचता. एकंदरीत या सभागृहामध्ये जे चालले आहे ते लोकांना पहिले ऐकू द्या. लोक वृत्तपत्रांना ऐकून कंटाळले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, या सभागृहामध्ये जे चाललेले आहे. एकतर ज्या ज्या गोष्टी चुकीच्या सांगितल्या गेलेल्या आहेत ते प्रोसिडींगमधून उडवले पाहिजे.

**वंदना चक्रे :-**

आमच्या वॉर्डमध्ये येउन महापौरांनी ढवळाढवळ करु नये.

**जयंत पाटील :-**

अतिशय महत्वाचा विषय आहे. विधानसभेचे लोभ ब-याच जणांना लागलेले आहेत. त्यात एक आपले मा. महापौर आहेत. त्यांना १४५ मध्ये ज्या ज्या ठिकाणी अडचणी आहेत. इतक्या दहा वर्षामध्ये कधी दिसल्या नव्हत्या. विधानसभा क्षेत्र १४६ मध्ये ज्या अडचणी आहेत त्या त्यांना दिसत नाहीत. मला वाटते आपण त्यांना आमदार म्हणून बिनविरोध निवडून देउ. म्हणजे बाकीचे संकटे मिटतील. कारण यांच्याकडे आता एवढा पैसा झाला की, प्रत्येक सोसायटीमध्ये जाउन किती पाहिजेत. गेट लावायचा आहे, अमुक करायचे आहे, पाण्याची लाईन टाकायची आहे. पैसा कसा कमावला आहे ते आमचे श्री. चंद्रकांत वैती साहेबांना बरेच माहिती आहे. टी.डी.आर. सम्राट आहेत. मघाशी त्यांचे एक नगरसेवक श्री. ओमप्रकाश गारोडीया, त्यांचे अशासाठी म्हणतो की, त्यांनी बीजेपी मध्ये प्रवेश केला आहे, ते मघाशी जोरजोरात बोलत होते की, मा. आयुक्त साहेब खोटे बोलतात. अमुक करतात. ते कोणाचे नाव सांगायला तयार नाहीत आणि ह्या मा. महापौरांना पैसा कमावून दिला ते श्री. घेवारे त्यांचे नाव घ्यायची आवश्यकता वाटत नाही. श्री. घेवारेंच्या काळामध्ये ह्या सगळ्या गडबडी झालेल्या आहेत. टीडीआर घोटाळे, दिलेली प्रमाणपत्रं, सगळे घोटाळे श्री. घेवारेंच्या कालावधीमध्ये झालेले आहेत. त्याचा कोणी उल्लेख करत नाही. साहेब २००९ फेब्रुवारीमध्ये आले आणि त्यांच्या अगोदरची पत्रकं आहेत. एक पत्रक आत्ता माझ्याकडे आलेले आहे. मा. महापौरांच्या फोटोसकट आलेले आहे. याच्यामध्ये लिहले आहे, आता हा अधिकार मा. महापौरांना कोणी दिला ते जरा आपण बघू या. आप सभी चाल के निवासीयोकं लिए एक खुश खबर है। आता चाळीमध्ये वळलेले आहेत. आपके निवेदन को स्विकारकर आपकी पानी के समय की जो समय थी जिसमे आधी रात को किसी भी समय पर पानी आता था। जिस कारण आप

को आधी रात को जागकर पानी भरना पडता था। उसे अब दूर किया गया है। यांनी दूर केले आहे. महापालिकेमध्ये मा. आयुक्त नाहीत. पाण्याचे अधिकारी नाहीत. हे अधिकार मा. महापौरांना दिलेले आहेत. अतः आप रातभर आराम से सो सकते है। अब पानी आपको दिन मे सुबह ६.०० बजे से रात्री १०.०० बजे तक के बीच ही आएगा। आपका अपना नरेंद्र मेहता।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

लालू यादव भी फस गया था।

**भगवती शर्मा :-**

साहब वह आदेश आपने कब निकाला की, अब रात्री के अंदर पानी की पूर्ती नही की जाएगी? यह आदेश प्रशासनने कब निकाला यह बताइए। मा. आयुक्त साहेब, इसका उत्तर मै आपको बताता हू। जबसे अपनी पानी आपूर्ती की जाती है, जहा गावठन एरिया होता है, जहा झोपडपट्टी होती है, वहॉ पर शुरु से एक आदेश है की, आधी रात को पानी की पूर्ती नही की जाएगी। यह आदेश शुरु से है। लेकीन इन्होने यह अब से लिखा। इसका मतलब शासन ने अभी यह आदेश कब निकाला?

**मा. महापौर :-**

मेरे पास झोपडपट्टीवासी, मोतीनगर के सभी लोग आए थे की, हमारे यहा आधी रात को पानी आता है असे आपण ६.०० से १०.०० के बीच मे किया जाए।

**भगवती शर्मा :-**

आपने यहॉ अब से लिखा। इसका मतलब अब कोई आदेश हुआ है क्या?

**मा. महापौर :-**

उससे पहले उनको रात को आ रहा था।

**भगवती शर्मा :-**

जब खंडित होती है तो सबकी टाईम निकल जाती है। आप कोई एक के लिए विशेष टाईम नही कर सकते।

**मा. महापौर :-**

उनका कहना ऐसा है, भले चौतीस घंटे नही हमे अडतीस घंटे मे दो।

**भगवती शर्मा :-**

प्रशासन इसका जवाब दे।

**मा. महापौर :-**

मेरे पास उनका डेलिगेशन है की भले चौतीस घंटे के जगह अडतीस घंटे मे पानी दो। लेकीन दिन मे दो।

**भगवती शर्मा :-**

प्रशासन ने आदेश कब जारी किया है। आपने अपनी मर्जी से यह आदेश जारी किया है क्या? की पानी विभाग ने किया है या मा. आयुक्त साहबने किया है? पहले यह बताईए

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहब, यह जो पानी की समस्या है यह चैन होती है आप उसमे बदल नही कर सकते है। भले वह झोपडपट्टीवाला हो या बिल्डींग मे रहनेवाला हो। झोपडपट्टी के बाजू मे जो बिल्डींग हे उनको भी चैन बदली कर सकता है क्या? कौन बदली करेगा उस अधिकारी से पुछो। जैसा पानी आता है वैसा उनको छोडना पडता है। पर वहा से पहले से ही नियम है की, झोपडपट्टी वालोंको रात को पानी नही छोडना है।

**भगवती शर्मा :-**

यह शहर के अंदर दिशाभूल कर रहे है। अपने पद का दुरुपयोग कर रहे है। इसलीए शासन स्पष्टीकरन दे।

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहब, आपने पॅम्प्लेट निकाला वह अच्छा है। उसके उपर वैसी कारवाई होनी चाहिए। होगी तो पब्लिक अच्छा बोलेगी।

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, महापौर आपल्या दारात हा कार्यक्रम प्रशासनाचा आहे का? तुम्ही आयुक्तांनी किंवा महापालिकेने असा काही कार्यक्रम घेतला होता का? ‘‘महापौर आपल्या दारात’’ आठ ते वीस तारखेपर्यंत सर्व समस्या सोडवणार.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, हा कार्यक्रम प्रशासनाचा नाही. मा. महापौरांचे बीजेपीचे बोर्ड लागले. आठ ते वीस तारखेपर्यंत महापौर आपल्या दारात. त्या ठिकाणी त्यांनी एक मोबाईल नंबर दिलेला आहे. त्या मोबाईलवर फोन केल्यानंतर महापालिकेचे अधिकारी तो मोबाईल अटेंन्ड करतात आणि समस्या विचारतात. ही कोणती

पध्दत झाली? म्हणजे प्रशासन महापौरांसाठी आहे का? मी फोन केला होता. त्या अधिका-याचे नाव पण सांगु शकतो. त्यांनी सांगितले की, तुमच्या काय समस्या असतील त्या सांगा. मा. महापौर सोडवतात.

**मा. महापौर :-**

ज्यावेळी मी कार्यालयात असतो, एखाद्या मिटींगमध्ये असेन, कुठे असेन तर माझे पी.ए. फोन उचलतात.

**अनिल सावंत :-**

तुमचे पी.ए. प्रशासकीय कामासाठी आहेत. पक्षाच्या कामासाठी वापरु शकत नाही. त्याला महापालिका पगार देते. महापालिकेचा पी.ए. तुम्ही पक्षाच्या कामासाठी वापरु शकत नाहीत.

**मा. महापौर :-**

महापालिकेचे जेवढे पैसे मी वाचवले तेवढे कोणीही वाचवले नाहीत.

**अनिल सावंत :-**

ते पैसे वाचवून गेले कुठे?

**मा. महापौर :-**

महापालिकेचा बंगला नाही. महापालिकेची गाडी नाही.

**अनिल सावंत :-**

मला मा. आयुक्तांना उत्तर देउ द्या.

**मा. महापौर :-**

त्या कार्यक्रमाला जायला पण मी खाजगी गाडी वापरतो. महापालिकेची गाडी वापरत नाही.

**जयंत पाटील :-**

मला या प्रश्नाचे उत्तर पाहिजे. दि. १०/०६/२००९ रोजी भाईंदर (प.) येथील वॉर्ड क्र.१, गणेश देवल नगर इकडे जावून तुम्ही रात्री १०.०० वाजता टँकर नं. एमएच-०४, पीटी५५१५ आणि एमएमपी-४२४९ या दोन टँकरने तुम्ही त्या झोपडपट्टीत पाणी दिले. त्याच्यांवर उपकार केले. माझा प्रश्न असा आहे की, पाण्याचा प्रश्न त्या झोपडपट्टीचा आहे का? भाईंदर पूर्वेला नाही का? मिरारोडला नाही का? आणि मला या प्रश्नाचे उत्तर अधिका-यांनी द्यायचे आहे. पाण्याचे अधिकारी कुठे आहेत? आपण कोणत्या कारणास्तव तिकडे पाणी पुरवठा केला? तिकडे पुजा केली होती की, लग्न होते की, आणखीन काही विधी होता? मला सांगा की, त्या ठिकाणी नळाचे कनेक्शन आहेत की नाहीत? पाणी पुरवठा मोफत केला की, पैसे दिले? वरील प्रश्नांची उत्तरे मला श्री. बारकुंड यांच्याकडून पाहिजेत.

**मा. महापौर :-**

झोपडपट्टीमध्ये......

**जयंत पाटील :-**

तुमच्याकडून अपेक्षा नाही.

**मा. महापौर :-**

माझ्या आदेशावर दिले म्हणून तुम्हाला बोलतो. त्या झोपडपट्टीमधून वारंवार तक्रारी येत होत्या की, त्यांच्याकडे तीन दिवस झाले पाणी नाही. त्यांच्याकडे झोपडपट्टी असल्यामुळे स्टोरींग कॅपेसिटी काही नव्हती. त्यांना प्यायला पाणी नव्हते. म्हणून आपण दोन टँकर पाणी तिकडे पाठवले होते.

**भगवती शर्मा :-**

दस बजे टँकर दिया है और ११.०० बजे नल के पाणी की आपूर्ती की गयी है। रजिस्टर मे नोंद है की, उस एरिया मे ११.०० बजे पानी छोडा गया। फीर १०.०० बजे वहा पर दो टँकर, जिसकी कोई पावती नही फटी थी। किस आधार पर दिया गया है? प्रशासन इसका उत्त्तर दे।

**मा. महापौर :-**

लोगो को पीने के लिए पानी भेजा गया था।

**भगवती शर्मा :-**

मै मा. आयुक्त साहब से जवाब माँग रहा हू।

(सभागृहात गोंधळ)

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सगळ्या झोपडपट्ट्यांना पाणी पुरवठा करा. आम्ही कधीही हस्तक्षेप करणार नाही. तुम्ही एक दोन टँकर पाठवता ही चुकीची पध्दत आहे.

**कांचन पुजारी :-**

नगरसेविका जे लेटर लिहतात. आम्ही तुमच्या नावावर लिहतो. पाण्याचा जो काही प्रॉब्लेम आहे तो आम्ही तुम्हाला लिहतो. पण माझ्या वॉर्डमध्ये जाउन ६ इंचाचा पाईप टाकणार आणि मग तिकडचे लोक येउन आम्हाला बोलणार. म्हणजे आम्ही काही काम करत नाही का? आमचे श्री. मुझफ्फर हुसेन साहेब आहेत. आम्ही कोणाकडे का जायचे?

**जुबेर इनामदार :-**

फक्त १४५ मध्ये पाण्याचा त्रास आहे. १४६ मध्ये नाही का?

**प्रशांत पालांडे :-**

थोड्या वेळापूर्वी मला सभेत बोलायला वेळ दिला नव्हता. तुम्ही सभेचे विधीवत काम चालू करा. कारण मला पण तुम्ही वेळ दिला नव्हता. हवे असेल तर सभागृह संपतेवेळी तुम्ही चर्चा करा आणि आता सभेचे कामकाज सुरु करा.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, लक्षवेधी परत वाचा. मला ऐकायची आहे.

**भगवती शर्मा :-**

इसका प्रशासन उत्तर दिजीए।

**शरद पाटील :-**

जर ही चर्चा अशी चालत असेल तर श्री. प्रशांत पालांडे यांनी विचारलेला प्रश्न नागरीकांच्या हिताचा आहे आणि त्याचे उत्तर मिळाले पाहिजे.

**जयंत पाटील :-**

आम्हाला याचे उत्तर द्या. मी आपल्या नावाने पत्र पाठवलेले आहे.

**भगवती शर्मा :-**

इस पॅम्प्लेट का उत्तर चाहिए।

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, मग माझ्या पण प्रश्नाचे उत्तर आत्ताच द्या.

**जयंत पाटील :-**

एक अर्जंट मजेशीर विषय आहे. मा. महापौरांचे भाऊ  एका इमारतीमध्ये राहतात. त्यांना सेपरेट कनेक्शन दिलेले आहे. इमारतीमध्ये कधीही फ्लॅट धारकांना सेपरेट कनेक्शन देत नाहीत. काय चालले आहे? ही दादागीरी आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाला विचारा.

**जयंत पाटील :-**

आम्ही बसवतो त्याला उतरविण्याची ताकद आहे.

**हेलन गोविंद :-**

दोन वर्षामध्ये तुम्ही आमचे एक तरी काम केले का? सर्व सदस्यांचे एकतरी काम केले का? दोन वर्षे फुकट गेली. आत्ता तुम्हाला आमच्या प्रत्येकाच्या वॉर्डमध्ये कोणी अधिकार दिला? आम्ही सक्षम आहोत. आम्हाला न विचारता नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये गेलात तर ते आम्ही खपवून घेणार नाही. कारण दोन वर्ष आम्ही सतत तुमच्याकडे भांडत होतो.

**मा. महापौर :-**

यापुढे जाताना तुम्हाला बरोबर घेवून जाणार.

**हेलन गोविंद :-**

लोकांचे आम्हाला ऐकावे लागले आहे. तुम्ही आमची दोन वर्षे फुकट घालवली.

**बर्नट डिमेलो :-**

मा. महापौर साहेब, डेंग्युच्या रुग्णांना आपण मा. महापौर निधीतून जी रक्कम देतो तो निधी संबंधीत नगरसेवकाला बोलावून दिला पाहिजे......

**वंदना चक्रे :-**

हमारी माँगे पुरी करो नही तो खुर्सी खाली करो। ऐसा बोलने की जरुरत नही। यह गद्दार महापौर ने तो पहले ही खुर्सी खाली करना चाहिए। एक लेकर आया महापौर बनाया, अब बोलता है, तुम्हारी जरुरत नही। मै किधर भी जा सकता है।

**मा. महापौर :-**

त्यांना मी सांगितले होते की, संबंधीत व्यक्ती असेल त्यांना पाठवा. त्यांना चेक द्यायचा आहे.

**बर्नट डिमेलो :-**

कोणत्या विशिष्ट पार्टीच्या अध्यक्षांना सांगायला पाहिजे की, तुम्ही नगरसेवकांना बोलवायला पाहिजे?

**मा. महापौर :-**

आपण आतापर्यंत जेवढे चेक दिले, संबंधीतांना बोलावूनच दिलेले आहेत. माझ्याकडे जी प्रकरणे येतात त्याच्यामध्ये कुठल्याही नगरसेवकाचे दुसऱ्या वॉर्डमधले पण.......

**बर्नट डिमेलो :-**

माझा त्याच्याबद्दल वाद नाही. तुम्ही भारतीय जनता पार्टीच्या अध्यक्षांना सांगता. फोन करुन त्यांना बोलावता, भारतीय जनता पार्टीच्यावतीने.......

**मा. महापौर :-**

माझ्याकडे जेवढी प्रकरणे आहेत. एखादा तुमचा वॉर्ड असेल तरी दुस-याचे शिफारस पत्र असते. किती तरी अशी प्रकरणे आहेत. त्या वॉर्डमधीलच शिफारस पत्र असते अशातला भाग नाही. आणि ज्या पत्राप्रमाणे महिल्यापासून महापौर दालनात बोलावून चेक दिले त्याचप्रमाणे दिलेले आहेत आणि तुम्ही माहिती दिल्यावर तुम्हांला......

**बर्नट डिमेलो :-**

तुम्ही कोणत्या प्रकारे द्यायचा तो माझा वाद नाही. तुम्ही दालनामध्ये बोलवा. तुमच्या कार्यालयात बोलावून तुम्ही द्या. पण कोणत्या विशिष्ट एका अध्यक्षाला तुम्ही घरोघरी फोन करुन कळवता की, मा. महापौरांनी भारतीय जनता पार्टीचे......

**मा. महापौर :-**

त्यांनी कोणी सांगितले असेल तर ते चुकीचे आहे.

**बर्नट डिमेलो :-**

तुम्ही राजकारणात आहात. पार्टीत गेलात. आमदार व्हा. आम्हाला त्याचा विरोध नाही. तुम्ही जी खेळी करायला घेतली आहे ती चूकीची आहे.

**मा. महापौर :-**

तुम्हाला सुचना देउन, तुम्हाला विश्वासात घेउन तो चेक दिलेला आहे.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहब, पहले इसका जवाब प्रशासन दे। उसके पहले सभा शुरु नही होगी।

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहब, आपने पिछले रविवार को एक मिटींग लिया था। मुझे यह जवाब चाहिए की, आपने महापौर के हैसीयत से लिया था या पार्टी या आपके इंडिव्हीज्युअल व्यक्तीत्व के हिसाब से लिया था।

**मा. महापौर :-**

नरेंद्र मेहता हू तो महापौर लगना ही है ना।

**राजेंद्र जैन :-**

अगर महापौर के हैसीयत से लिया था तो उसमे प्रशासन आपके साथ है। अगर आपने पर्सनल कॅपेसिटी पर लिया था.......

**मा. महापौर :-**

मेरे पर्सनल कॅपेसिटीपर लिया था।

**चंद्रकांत वैती :-**

मा. आयुक्त साहेब, मा. महापौर साहेब, संपूर्ण सभागृहातील उपस्थित सर्व सन्मा. सदस्य, गेल्या दोन वर्षापासून महापालिकेचे कामकाज कसे चाललेले आहे त्याची सदस्यांना माहिती आहे. मी पहिला उठलो आणि सांगितले की, विधीवत काम करावे आणि आता श्री. प्रशांत पालांडे उठले आणि त्यांनी सांगितले की, त्या सुचनेचा मान राखला जावा किंवा मला बोलायला द्यावे. तर आपण निश्चितपणे बोलावे. मा. महापौर साहेब, सन्मा. सभागृहाच्या भावना लक्षात घ्या. कोणाचा न होण्याचा आपला स्वभाव आहे. मागच्या अडीच वर्षात आपण आजपर्यंत जनतेच्या हिताचा एकतरी कार्यक्रम राबवला का? आज अचानक तुम्हाला जाग आली. तुम्हाला थोडेसे तरी काही वाटले पाहिजे. खोटेच बोलायचे काय? या नगरसेवकांनी प्रत्येकांनी आपल्या घराकडे दुर्लक्ष केले पण लोकांचे हित पाहिले, जपले. त्यांच्यासाठी खटपटी केल्या. नगरसेवक निधीतून कामे झाली आहेत, त्याच्यावर तुम्ही डल्ला मारता. खोटे किती बोलायचे त्याला मर्यादा आहेत. मा. आयुक्त साहेब, श्री. अनिल सावंत साहेबांनी जो आरोप केला की, महापालिकेचा कर्मचारी जर यांच्यासाठी फोन अटेन्ड करत असेल तर त्या कर्मचा-याने त्यांच्याकडून आधी मुक्त व्हावे. नाहीतर त्याच्यावर कार्यवाही करा. महापालिकेच्या यंत्रणेचा वापर तुम्ही तुमच्या व्यक्तीगत स्वार्थासाठी करु नका. तुमच्या कारकिर्दीत तुम्ही टीडीआर व्यतिरिक्त दुसरे काही केलेच नाही. पत्राशेड लावायचा. इललिगल कन्स्ट्रक्शनच्या बाबतीत तुम्ही दोन मिटींग घेतल्या. काय साधले? तुम्ही तुमचे साधले. जनतेचे काय साधले? या गावाला काय मिळाले? या गावासाठी जे शिवार गार्डनचे टाउन पार्कचे रिझर्वेशन होते त्याचे भूमीपुजन सौ. निर्मला सावळे मॅडमनी महापौर असताना केले होते. त्याच्यात तुम्ही काही होउ दिले नाही. त्याच्यात अडचण केली ती तुम्ही केली. या शहरासाठी मंगल कार्यालय झाले असते, या शहरासाठी बोटींग क्लब झाला असता. या शहरासाठी एक चांगले गार्डन विकसित झाले असते. ते तुम्ही थांबवले. त्याच्यामध्ये तुम्ही जनतेच्या हितासाठी काय केले? आज नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये जाता. एका घरी जाउन काय पाण्याचा प्रश्न सोडवणार? आकाशातून लाईन टाकणार का? त्याच लाईनमधून पाणी जाणार आहे. आडातच नाही तर पोह-यात काय येणार? जे आहे तेवढेच येते. संपूर्ण सभागृहाला माहिती

आहे, सर्व अधिका-यांना माहिती आहे, आपले पाण्याचे तास ३० तासापेक्षा जास्तीचे आहेत. तुम्ही काय २४ तासात पाणी आणणार? आणि ते आणण्यासाठी तुम्ही स्वतः व्यक्तीशः काय प्रयत्न केले? प्रशासनाला जाब विचारतो. प्रशासनाने आपला वापर ह्यांच्या व्यक्तीगत कामाकरीता अजिबात करु देउ नये. आपण नाव बिल्डरांची घेतली. पण कशासाठी ह्या बिल्डरांना ताब्यात आणण्यासाठी नावे घेतली का? मग ह्या शहरात इललिगल बिल्डींग कमी आहेत का?ज्या इललिगल बिल्डींग आहेत त्या तोडायला गेल्यानंतर त्या थांबविण्याचे काम करणारे जे आहेत. त्यांच्यावर पहिली कार्यवाही झाली पाहिजे. ह्या सभागृहामध्ये पत्राशेड लावण्याचा विषय कोणी आणलेला? तो जनतेच्या हिताचा होता? तुम्ही तो कशाला आणला होता? मग तुम्हाला शहराची एवढी काळजी होती तर आजपर्यंत करायला पाहिजे होते. आपण चुक केली आहे. आज सुधारण्याची वेळ आली आहे. पण ओरडून चुक सुधारता येत नाही. ज्या ज्या चुकीच्या गोष्टी चालल्या आहेत. प्रशासनाच्या अधिका-यांचा जे दुरुपयोग चालला आहे तो थांबवा. कशासाठी? प्रत्येक नगरसेवक आपल्या परिसरातील लोकांच्या हितासाठी गोष्टी करतात. तिथे जाउन सांगतात तुम्हाला काय पाहिजे? गेट लावून देतो, कंपाउंड मारुन देतो, कलर लावून देतो. हे बघा. you can not fool all the people all the time you may fool some people for some time. लोक एवढे समजतात. मिरा भाईंदरचे लोक सुज्ञ आहेत. प्रत्येक ठिकाणी तुम्ही काहीतरी आधार घेउन पुढे जाल. दगा किसीका सगा नही, नही किया तो करके देख. सगळ्यांना दगा चालत नाही. मा. महापौर साहेब तुम्ही जे करता ते योग्य नाही. मा. आयुक्त साहेब, आपण तज्ञ आहात. आपल्या अधिका-यांना सांगा. याच्यापूर्वी एक आएएस अधिकारी आला. त्याच्यावर ह्यांनी ६२ आरोप केले. त्या ६२ आरोपात यांचे तीन दिवसात साध्य झाले. जनतेचे प्रश्न होते. सुटले कोणाचे, एकट्यांचेच. मग आता यांचे एकट्यांचे प्रश्न सुटतील. जे जे कर्मचारी संपर्कात असतील त्यांना सांगा. अन्यथा एवढ्या सभागृहाच्या रोषाला त्यांना सामोरे जावे लागेल.

**मिलन पाटील :-**

श्री. वैती साहेब, तुम्ही सांगितले नाही, ६२ आरोप केले. नंतर तीन दिवसात काय साध्य झाले, तर सर्व टीडीआर मोकळे झाले. श्री. जाधव साहेबांनी पटापट सह्या करुन दिल्या.

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहब, अभी मा. महापौर साहबने माना की, उन्होने जो भी वाउे किए थे वो महापौर के हैसीयत से पर्सनल पार्टी या अपने पर्सनल किए थे। जो भी पानी, गटर, सडके वादे किए है, मै ऐसी अपेक्षा करता हू की उन्हे वह अपनी व्यक्तीगत कॅपेसिटी पर पुरा करे। और प्रशासन का साथ नही ले। अगर नही इसका मतलब की, यह महापौर पद का दुरूपयोग कर रहे है। और अगर वह दुरूपयोग नही करते तो अपने जेब से सारे काम कराए। क्योंकी अगर मा. महापौर साहब वहापर नही थे तो इसका मतलब, प्रशासन भी नही है और नगरसेवक भी नही है। अगर आप बोलते है की, महापौर के हैसीयतसे था तो वहा पर अधिकारी भी होने चाहिए थे और नगरसेवक भी होने चाहिए थे। इसका मतलब आपने हमारा अपमान किया है। और जो वादे आपने बोले है वह आप नही करेंगे। प्रशासन करेंगे और उसका क्रेडीट आप लेना चालते है। तो आपने अगर इनामदारी है तो आपसे यह आशा है की, आप वह सब वादे अपने जेबसे पुरे करे।

**शानु गोहिल :-**

मा. आयुक्त साहेब, जेसल पार्क चौपाटी, संपूर्ण मिरा भाईंदर के लोग वहापर घुमने-फिरने के लिए आते है। सन्मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसेन साहब के फंड से जॉजींग और मेरे नगरसेवक फंड से वहापर जॉगर्स पार्क बन रहा है। वहा पर हमारे सन्मा. महापौर आकर लोगों को इकठ्ठा करते है। सब समाज के लोगो को इकठ्ठा करते है और लोगो को बताते है की, मे वहापर यह मेरे फंड से बना रहा हू। मै यह कर रहा हू, मै वो कर रहा हू। लोगों की दिशाभूल करते है । उसी तरह से प्रशासनने मुझे यह जवाब देना चाहिए की, आमदार फंड और नगरसेवक फंड वहा लगा है की, नही? मुझे इसका अब उत्तर चाहिए।

**मा. महापौर :-**

उनसे यह भी पुछीए की हमारा फंड लगा है की नही?

**शानु गोहिल :-**

हम मा. आयुक्त साहब से बात कर रहे है। मा. आयुक्त साहब मुझे खुलासा चाहिए की वहापर किसका फंड लगा है।

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, सगळ्या विषयांचा खुलासा करावा लागेल. मा. महापौर बोलले की, मी महापौर म्हणून तिकडे गेलो नव्हतो. त्यांनी त्या खुर्चीवरून उतरावे आणि कुठल्याही एरियात जावे. महापौर पद सोडून द्या आणि कुठेही फिरायला मोकळे आहात. तेवढी ताकद असेल तर महापौरांच्या राजीनामा आजच द्या.

**शानु गोहिल :-**

बीस साल से जेसल पार्कमे मै रह रही हू। भाजीवालो को हटाने के लिए बीस साल से हम कोशीश कर रहे है। यह आकर "चला मुरारी हिरो बनने"। मा. आयुक्त साहब, मैन आपसे बात किया था। भाजीवालो के लिए दुसरा अल्टरनेट ढुंढेंगे। आपने बोला था की, भाजी मार्केट बनाएंगे, फीर शिफ्ट करेंगे। यह आए,

अपने आप को ना जाने क्या समझ गए। दो दिन मे हिरो बन गए। फीर तीसरे दिन भाजीवालों को बिठा दिया। कहा गयी आपकी हिरोगीरी? आपसे ज्यादा जेसल पार्क के हित के लिए हम सोचने वाले है। बीस साल से जेसल पार्क मे रह रहे है। सुख मे, दुःख मे हमेशा बीस साल से हम है। उस वक्त आप कहा गए? देड साल से आप महापौर थे। हम इतने सक्षम है की, हम तीनो चारो वॉर्ड को देखते है। हमे आपकी जरूरत नही। आप घर मे बैठो। ऐसे महपौर की हमे जरूरत नही है।

(सभागृहात गोंधळ )

**जयंत पाटील :-**

मा. महापौरांच्या हॉस्पीटलचे उद्‌घाटन होते. त्यांनी हॉस्पीटल बांधावे. संपूर्ण स्टाफ महापालिकेचा वापरला गेला. पत्रके देण्यापासून पत्रके वाटण्यापर्यंत. हे काय चालले आहे? एकतर तुम्ही त्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करा. अदरवाईझ, मा. महापौरांनी याचा जवाब दिला पाहिजे. कर्मचारी वापरले की नाही? महापालिकेच्या महापौरांच्या दालनामध्ये पत्रके भरतात.

**मा. महापौर :-**

कुठलाही महापालिकेचा स्टाफ वापरला नाही. फक्त नगरसेवकांना .........

**जयंत पाटील :-**

खोटे बोलू नका, श्री. शिरवळकरांना इकडे बोलवा.

**मा. महापौर :-**

नगरसेवकांना पत्रिका द्यायला महापालिकेच्या स्टाफला सांगितलेले. कारण त्यांचा अपमान होऊ नये.

**जयंत पाटील :-**

तुमचे वैयक्तिक काम आहे. वैयक्तिक कामासाठी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचा वापर, त्यावेळी मी श्री. शिरवळकर यांना बोललो की, हे इकडे काय चालले आहे?

**मा. महापौर :-**

नगरसेवकांचा अपमान होईल. प्रत्येकाकडे पत्रिका गेली पाहिजे म्हणून......

**जयंत पाटील :-**

अपमानाचा भाग नाही. तुमच्या वैयक्तिक कामासाठी उद्या तुम्ही जर दुसरे लग्न केले तर त्यापण पत्रिका महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना द्यायला लावाल. हे काय चालले आहे?

**ओमप्रकाष अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, ही प्रथा आजची नाही. सर्व नगरसेवकांची लग्नाची पत्रिका आपल्या स्टाफचे लोकच वाटतात. ही प्रथा बंद झाली पाहिजे.

(सभागृहात गोंधळ )

**मा. महापौर :-**

यापुढे समस्त सभागृहाला खात्रीने सांगतो की, महापालिकेचे दालन असू द्या किंवा मोबाईल असू द्या किंवा फोन असू द्या किंवा गाडी असू द्या, घर असू द्या, मी हे वचनबध्द आहे की, यापुढे याचा गैरवापर होणार नाही. झाल्यावर मी राजीनामा देईन.

**जयंत पाटील :-**

मग आत्तापर्यंत चुका झाल्या त्या मान्य करा.

(सभागृहत गोंधळ)

**एस्.ए.खान :-**

मा. आयुक्त साहेब, ते जे "महापौर आपल्या दारी" हे बोर्ड लागलेले आहेत ते सगळे बोर्ड आजच्या आज काढून टाका. ते कशाला लावले आहेत?

**जुबेर इनामदार :-**

तो प्रशासकिय कार्यक्रम नाही. त्यांना सांगा त्यांच्या व्यक्तिगत नावाचा लावा.

**एस.ए.खान :-**

त्याची परवानगी घेतली का? काढून टाका. आत्ताच्या आत्ता आदेश द्या. मा. आयुक्त साहेब, मी तुम्हाला विचारतोय.

**मा. आयुक्त :-**

होर्डींग लावायचे पैसे भरून घेतलेले आहे.

**एस.ए.खान :-**

ते काढून टाका. आत्ता ते सांगतात की, राजीनामा देतो.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौर साहेब, आत्ता तुम्ही काहीतरी बोललात माझे थोडे लक्ष नव्हते. रिपीट कराल तर बरे होईल.

**मा. महापौर :-**

महापौरांच्या ज्या काही वस्तु असतील, गाडी असू द्या, फोन असू द्या, मोबाईल असू द्या, घर असू द्या, दालन असू द्या, कर्मचारी असू द्या, त्याचा कुठल्याही प्रकारचा गैरवापर
होणार नाही.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, आपण २६ जानेवारीला गुरूद्वाराजवळ गार्ड आणि प्लेगाऊन्डचे उद्‌घाटन आपल्या हस्ते केले त्यावेळेस मी आपल्याला त्या ठिकाणी लोकांच्या समोर सांगितले की, ईस्टमध्ये आजपर्यंत फार मोठा अन्याय झाला आहे. महानगरपालिकेकडून कुठलेही विकासकाम चांगल्या प्रकारे झालेले नाही. आज एवढी चांगली जागा आहे. त्या ठिकणी आपल्या हस्ते उद्‌घाटन झालेले आहे. आपण ईस्टचे मा. महापौर आहात. इथे पक्षपात काही नाही. मा. महापौर या नात्याने आपण त्या ठिकाणी चांगले काम करावे. आणि पुढे अडथळा येऊ नये. एकाच महिन्यामध्ये तुम्ही त्या ठिकाणी अडथळा आणला. तुम्ही त्या ठिकाणी कॉन्ट्रॅक्टरला सांगून दिवार बांधायचे काम बंद केले?

**मा. महापौर :-**

श्री. राजेश वेतोस्कर साहेबांना बोलवा. त्याच्यामध्ये चांगल्यासाठी निर्णय घेतलेला आहे.

**दिनेश नलावडे :-**

पण काम कशासाठी थांबवले? तुम्ही चार महिने काम थांबवले. पंधरा दिवसापूर्वी मी मोर्चा आणला . कमिशनर साहेबांना भेटलो. त्यावेळी काम चालू असते.

**मा. महापौर :-**

तुम्ही जे बोलता ते फक्त एक भिंत. ते पण शहराच्या हितासाठी की, एखादा माणूस सायकल घेऊन आला. तर ती सायकल त्याने कुठे ठेवावी आणि संबंधित नगरसेवकाला नंतर बोलावून, विश्वासात घेऊन ते काम केलेले आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, त्या ठिकाणी रस्ता सोडून १५ फुट जागा सोडली.

**राजेश वेतोसकर :-**

साहेब, आपण गाडी जाण्यासाठी थोडी जागा सोडलेली होती. तरी पण आपण पाच महिने काम थांबवले.

**दिनेश नलावडे :-**

त्या गुरुद्वारावाले  आणि सरदारजी तुम्हाला भेटले आणि ६०-६० फुट जागा सोडायला सांगता.

(सभागृहात गोंधळ )

**दिनेश नलावडे :-**

आपण पाच महिने काम थांबवले. या शहरामध्ये आपले योगदान काय? आज एवढी चर्चा करतात. कोणत्या वॉर्डमध्ये तुम्ही हस्तक्षेप केला नाही ते सांगा.

**मा. महापौर :-**

एक दिवसही काम थांबवले नाही. संबंधित नगरसेवकांना विचारा.

**दिनेश नलावडे :-**

महानगरपालिकेने याचा खुलासा करावा.

**राजेश वेतोसकर :-**

काम कशासाठी थांबवलेले याचा खुलासा करावा.

**दिनेश नलावडे :-**

आठ दिवसापूर्वी काम चालू होते.

**मा. महापौर :-**

ती एक भिंत सोडून बाकी काम झाले आहे?

**राजेश वेतोस्कर :-**

हो झालेले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

साहेब, जो टीडीआर दिलेला असतो. त्याने त्या फ्लॉटची लेव्हलींग करायची असते, कम्पाऊन्ड घालायचे असते. टीडीआर यांनीच विकत घेतला आहे. श्री. लक्ष्मण जंगम यांच्या वॉर्डमध्ये आम्ही सारखे नाले खोदायचे आणि यांनी जाऊन बंद करायचे. यांची सेव्हेन स्क्वेअर स्कुल आहे ती नाल्यावर आहे. मग स्वतःचे इललिगल कनस्ट्रक्शन दिसत नाही. तुम्ही जनतेचे हित साधायचे असेल तर स्वतःपासून सुरूवात करा आणि विश्वासघाताच्या गोष्टी करत असाल, विश्वासाच्या करत असाल तर आजपर्यंत तुम्ही कोणावर विश्वास ठेवला आणि कोणावर टिकवला?

**मा. महापौर :-**

कुठल्याही प्रकारची नाल्यावर स्कुल बांधलेली नाही.

**चंद्रकांत वैती :-**

या सभागृहाचा वापर तुम्ही स्वतःसाठी केला. पाउस नसताना लोकांच्या घरात पाणी जाईल त्याची तुम्ही व्यवस्था केली. किती वेळा नाले खोदले ते तुम्ही किती वेळा बंद केले? आणि तरीही लोकांची दिशाभूल करता? पाण्याच्या लाईन टाकायच्या म्हणून कष्ट करायचे कोणी आणि तुम्ही एखाद्या घरी जाउन सांगायचे की, मै इधर नया लाईन डाल रहा हू। काय कष्ट केले?

**मा. महापौर :-**

एवढी काळजी होती ना. ज्यावेळी स्कुल बांधला तेव्हा मी तुमच्याबरोबरच होतो......

(सभागृहात गोंधळ )

**चंद्रकांत वैती :-**

स्वतःच्या स्कुलमध्ये कमर्शिअल दुकाने आहेत ती आधी बंद करा.

**मा. महापौर :-**

तिकडे एकही कमर्शिअल दुकान नाही.

**चंद्रकांत वैती :-**

टीडीआर देखील घेतला. टीडीआर चौकशी तर आम्ही मागितलेली आहे. ते होऊनच जाईल.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहब, आज विषय चलाने का है की नही?

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहब, आपने यह माना की, मै आगे से इनका दुरूपयोग नही करूंगा। इसका मतलब आपने अपनी गलती मानी। हमे इसकी खुशी है। मै चार लाईन श्री. प्रफुल्ल पाटील साहब लहेजे मे बोलता हू। उसके बाद मे विचार करेंगे। धर्म निष्पालन का, जाती सामाजीक व्यवहार है। मनुष्य वोट का आधार है, और जाहीर राजनिती से इस देश का बंटाधार मत करो. आज मै आपको समझता हु बीस साल से भायंदर बहोत शांती से रह राहा है, भायंदर मे बिल्कुल शांती है, हर आदमी यहा पर अपने धर्म का आराम से पालन करता है, कोई लढाई-झगडा नही है, पर आपके महापौर बनने के बाद सुप्त वॉर चालु हो गयी. एक-देड लाख यहापर जैन,मारवाडी,गुजराथी है। और धीरे धीर समुपन हो रहा है। जब मनसे के तरफ से आंदोलन होता था तो लोक आक्रांत होते थे, भयानक होते थे. अब जैन का वातावरण बनाकर बाकी समुह आक्रांत हो गये दुध मे जैसे चिनी घुलती रेहती है, ऐसे हम लोक साफ पानी जैसे रेहते थे। अब आप उनको स्पेसीकेट कर रहे है। यह मामला राजनीती के लीए बहोत खतरनाक है। मे आपसे अपेक्षा करता हु की, आप जाती-वादी को राजनीती नही करेंगे. इस बार मे चेतावनी दे रहा हु की, यह राजनीती बहोत खतरनाक होगी, यह राजनीती करना आप जैसे समझदार आदमी के लीए अच्छा नही है।

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, आम्ही तुम्हाला सांगतो किती वेळा पासुन बोलु देत नाहीत ते एकदा बोलले आम्हाला एकदा दोन मिनिटे द्या.

**राजेंद्र जैन :-**

तिसरी बात श्री. वैती साहब ने टी.डी.आर का बात किया। आपका एक सर्वे नं. ७७ का केस चल रहा है। श्री. लोंढे साहाब से मैने डिसकस किया था। उसके अंदर १०/०१ पर लेटर डाला है। और श्रीम. चौधरी मॅडम ने आठ महिने पहिले का रेफरंन्स मांगा है की, कोर्ट मे केस पेंडिंग है। और उसमे लिखा गया है की, कोर्ट मे केस पेंडिंग नही है। मा. आयुक्त सहाब १०/०१ को लेटर दिया गया है, और छह महिने पहिले पुछा गया है की, कोर्ट मे कोई केस पेंडिंग हे के नही? डेफीनेटली नही है। इसके आधार पर टि.डी.आर दिया गया जब की कोर्ट मे केस पेंडिंग है। यह बात आप श्री. लोंढे साहब से पुछ सकते है। फाईल आपके पास ही आएगी क्लिअर कट अपने हिसाब से लिखापढी करके अगले आदमी को दर-दर कोर्ट की ठोकरे खाने को मजबुर कर दिया है।

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, सभागृहात एवढी चर्चा होते तर त्या दुप्पट शास्तीवर पण होऊ द्या.

**मा. महापौर :-**

याची लक्षवेधी होऊ द्या.

**रामनारायण दुबे :-**

मा. आयुक्त साहब, मिरारोड मे हमारे वॉर्ड मे एक हॉस्पीटल है। और मुझे माहिती अधिकार से मालुम हुआ था की, दो आमदार के फंड मे बना है और बाकी टोटल पैसा करीब साडेचार करोड महानगरपालिकाके खर्च से बना है. लेकिन वहापर पिछले कई वर्षो से केवल एक आमदार का फोटो लगता है. कमसेकम दुसरा

आमदार जो है मा. श्री. गणेश नाईक जी का करीब ३१-३२-३५ लाख रुपया उन्होने दिया है. तो महानगरपालिका का हॉस्पीटल, वहा पर दुसरे का, तीन आमदार है उनका निधी खर्च हुआ है।

**लक्ष्मण जंगम :-**

हा कुढला विषय आहे? यांना बोलायला परवानगी कशी दिली?

**रामनारायण दुबे :-**

किसी भी आमदार का निधी हो चाहे नगरसेवक निधी हि वह पैसा जनता का होता है किसी के पॅकेट का पैसा नही जाता ऐसे स्थिती मे जब महानगरपालिकेका हॉस्पीटल है। सबसे ज्यादा चार-साडेचार करोड तक महानगरपालिकेका खर्च हुआ है। तो मेरा आपसे निवेदन है की, वहा भी लोगो को भ्रमीत कीया जाता है और भ्रमीत करने के अलावा जीन लोगो को जानकारी होती है की, यह महानगरपालिकेका हॉस्पीटल है। आमदार का निधी बहोत थोडा है। फिर भी बोर्ड लगा हे तो उस आमदार के खिलाफ भी लोग बात करते है, तो अच्छा नही लगता मेरा आपसे निवेदन हे की........

**अनिल सावंत :-**

सन्मा. श्री. दुबे जी, आमदार के खिलाफ बात करते है वह सोचने की आपकी जरुरत नही है मा. महापौर साहेब, हे लक्षवेधीवर चालले आहे की, काय चालले आहे?

(सभागृहात गोंधळ)

**रामनारायण दुबे :-**

जो सही बात है वो सुनने मे आपको तकलीफ क्यो हो रही है?

(सभागृहात गोंधळ)

**रामनारायण दुबे :-**

महानगरपालिके का हॉस्पीटल है, महानगरपालिकेका बोर्ड लगाया जाए ताकी वहा की जनता भ्रमीत ना हो.

**मा. महापौर :-**

ठिक है, सन्मा. श्री. दुबे जी, आपके लक्षवेधी पर बोलीए.

**शशिकांत भोईर :-**

लक्षवेधी वाचु द्या.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी वाचलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

आम्ही बरोबर ऐकले नाही, लक्षवेधी वाचुन घ्या.

**जुबेर इनामदार :-**

लक्षवेधींचे वाचन करा.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण अधिकाऱ्यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात २३ शाळा अनधिकृत म्हणून घोषीत केलेल्या आहेत. व त्यांनी आपल्या आदेशामध्ये पालकांनी त्वरीत अशा अनधिकृत शाळांमुळे मुलांना काढून घेणे बाबत कळविले आहे. तसेच संचालकांना शाळा बंद करावी अन्यथा त्यांचेवर धारा क्र. ४२०, ४०६ (३४) मामला दर्ज करण्याचे आदेश फार्मावले आहे. त्यामुळे हजारो विद्यार्थ्याचे भविष्य धोक्यात आले आहे व पालकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या आदेशान्वये यापूर्वी अनेक अनधिकृत शाळा घोषीत केल्या जात होत्या. त्यापैकी अनेक शाळा आजही सुरळीतपणे सुरू आहेत. अशाप्रकारे प्रशासन मुलांची व पालकांची दिशाभुल करून अन्याय करत आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेची विकास नियंत्रण नियमावली दि. १५/०७/९७ व दि. १७/१०/२००० पासून अंमलात आलेली आहेत. सदर विकास योजनेत विविध सार्वजनिक उपक्रमासाठी ३८६ आरक्षणे प्रस्तावित असून "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदाने" या प्रयोजनाकरीता ७२ आरक्षणे प्रस्तावित आहेत. त्यापैकी ११ आरक्षणांना मंजूरी दिली असून करारनाम्याच्या अटीशर्तीत नमुद केल्याप्रमाणे १० टक्के जागा महापालिकेने शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश देण्याची जबाबदारी शिक्षण संस्थेची राहील.

प्रशासनाकडून याबाबत कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे गरजू विद्यार्थ्यांना अशा शाळांमध्ये प्रवेश मिळाला नाही व पर्यायी त्यांना अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घ्यावा लागला. खाजगी संस्थाना प्राथमिक शाळेसाठी दिलेली आरक्षणे विकासकर्त्यांनी महापालिकेच्या नियमावलीचे उल्लंघन करून त्याठिकाणी श्रीमंत लोकांची मुले शिकतील अशा पध्दतीच्या शाळा बांधल्या. विकासकर्ते अशा शाळांमधून करोडो रूपयांची कमाई करीत आहे. अश्या शिक्षण संस्थाना महापालिकेने मालमत्ता करात सुट देणे व इतर अनेक सवलती दिलेल्या आहेत.

आज मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या १० लाखाहून अधिक झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या ही वाढत आहे. अनधिकृत शाळांमधील विद्यार्थ्यांच्या भविष्यावर विपरीत परिणाम होणार

आहे. या शाळामधील विद्यार्थ्यांना महापालिकेस, मिळू शकणाऱ्या १० टक्के कोट्यातून प्रवेश देण्याबाबतची कार्यवाही होणे अपेक्षित आहे. असे असताना महानगरपालिका याकडे सतत जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहे. तसेच अनधिकृत शळांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या भवितव्याचा विचार करून खाजगी शाळांमधून समावून घेण्याची जबाबदारी महापालिकेची आहे.

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात महापालिकेने, आरक्षणामध्ये बांधलेल्या शाळांमध्ये डी.सी. रूल ॲड रेग्यूलेशन बी.एम.सी नं.९ एम.बी.एम.सी. ११ प्रमाणे १० टक्के जागा आरक्षणाचे महापालिकेच्या अधिकारात आहे. त्यानुसार गरजू मुलांची शिफारस आरक्षणामधील खाजगी शाळामध्ये करण्यात यावी.

तसेच या अनधिकृत शाळांना सतत पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणे व आरक्षणामधील बांधलेल्या शाळांमध्ये या अनधिकृत शाळांच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देणे यावर महासभेत लक्षवेधीच्या रूपाने चर्चा होणेस विनंती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या लक्षवेधीवर पहीला प्रशासनाने आपली बाजु मांडली त्याचे काय म्हणने आहे?

**नगरसचिव :-**

लक्षवेधीवर प्रशासनाचे उत्तराचे मी वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ क्षेत्रात सन २००९-१० या वर्षात केलेल्या पाहणीनुसार एकूण ३० शाळा (विविध माध्यमाच्या मिळून) शासनाची कोणतीही परवानगी न घेता प्रवेशाकरीता जाहिरात करीत असून सुरु असले बाबत प्रथम दर्शनी दिसून आल्याने सदर अनधिकृत सुरु असलेल्या शाळांना शाळा बंद करणेबाबत नोटीस देण्यात आल्या आहेत व सदर शाळांमध्ये प्रवेश न घेता अधिकृत शाळांमध्ये प्रेवश घेणे बाबत पालकांना वृत्तपत्रात जाहिरात देवून जाहिरातीद्वोर आवाहान करण्यात आले आहे.

मिरा भाईंदर शहर विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र. टपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६, युडी-१२, दि. १४/०५/९७ तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८, युडी-१२, दि. २५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून ती अनुक्रमे दि. १५/०७/९७ व दि. १७/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. सदर विकास योजनेत विविध सार्वजनिक ३८६ आरक्षणे प्रस्तावित असून **"प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान"** या प्रयोजनाकरीता ७२ आरक्षणे प्रस्तावित असून त्यापैकी ११ इतक्या आरक्षणांना मंजूरी दिलेली असून ५ आरक्षणे समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून पूर्ण झालेली आहेत. उर्वरीत प्रगतीपथावर आहेत. त्यानुसार तपशिल खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

ज्या अनधिकृत शाळांची यादी जाहिर करण्यात आलेली आहे त्या यादीतील बऱ्याच शाळांनी शासनाकडे ३ ते ४ वर्षापासून शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केलेला असून शासनाकडे सदर शाळांचे प्रस्ताव मंजूरीसाठी प्रलंबित आहेत.

| अ.क्र. | मौजे | स.क्र./हि.क्र. | आरक्षण क्र. प्रयोजन | विकासकर्त्याचे नांव | शाळा कॉलेजचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | घोडबंदर | ९७/१क, ९७/५, ९०/१ | अ.क्र. ३०६ (शाळा व खेळाचे मैदान | मे. यु.एस. ओस्तवाल एज्युकेशन सोसायटी | प्रगतीपथावर |
| २ | गोडदेव | ३३४/२,६,८, ३७५/२,३,६ | अ.क्र.२३७ (तांत्रिक माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) | मे. सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रकेशन प्रा.लि. | सेव्हन स्क्वेअर अेकॅडमी |
| ३ | काशी | ८७/४ | आ.क्र. ३६७ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) | मे. सेंट लॉरेन्स एज्युकेशन सोसायटी | मे. सेंट लॉरेन्स एज्युकेशन सोसायटी |
| ४ | भाईंदर | ४८३ पै., ६८४/५ (जुना) १०६ पै. १०८/५ (नविन) | अ.क्र. २१२-अे (शाळा विस्तार) | मे. फादर अवर लेडी ऑफ नाझरेथ चर्च | मे. होली क्रॉस कोन्व्हेन्ट स्कुल, भाईंदर (पूर्व) |
| ५ | भाईंदर | २२/३, ४४/३ | आ.क्र.८४ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) | दिलीप लालचंद पोरवाल | एस.एस. पोरवाल हायस्कुल |
| ६ | गोडदेव | ३१५/पै.(अ) ४७/१पै.(अ) | आ.क्र.२३४ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) | श्री. पवन बी. पुरोहित व श्री. अनिल आर. गोयल | प्रगतीपथावर |
| ७ | पेणकरपाडा | ५३पै., ५४पै. | आ.क्र.२०७ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) | मे. युनिक शांती डेव्हलपर्स | सेंट झेविअर हायस्कुल |
| ८ | नवघर | २२८/१३,१७, २३५/२ | आ.क्र.२२२ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) | मे. मनोज एस. पुरोहित | प्रगतीपथावर |
| ९ | नवघर | ३९५/१, ४१५पै., ४१५पै., ४१५पै., ४१९/९(जुना) १६८/१, ११९पै., ११९पै., ११९पै. | आ.क्र.२६६ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | कनकिया प्रॉपर्टीज प्रा.लि. | श्रीमती रमाबेन बाबुभाई कनकिया स्कुल |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १६९/९(नविन) | | | |
| १० | नवघर | २७०, २८७/१ | आ.क्र.२४७ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | मे. सेंट थॉमस मिशन सोसायटी | प्रगतीपथावर |
| ११ | गोडदेव | २२२/१,२,८,९,१०, ३२२/४,११,१२ | आ.क्र.२२० (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | मे. गुरुराज कन्स्ट्रक्शन | प्रगतीपथावर |

प्रशासनामध्ये संपर्क साधलेल्या पालकांच्या मुलांना प्रवेश देणे बाबत संबंधित शाळांना लेखी पत्र दिलेली आहेत व त्याप्रमाणे उपलब्ध जागेनुसार सदर संस्थेनी प्रवेश देवून सहकार्य केलेले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ क्षेत्रातील जाहिर केलेल्या अनधिकृत शाळांपैकी जवळजवळ सर्वच शाळांनी जोपर्यंत शासनाकडून मान्यता मिळत नाही. तोपर्यंत शाळा बंद करीत असले बाबत लेखी कळविले आहे. दि. ०८/०६/२००९ रोजी अनधिकृत शाळा चालकांची सभा आयोजित करुन संस्था चालकांना त्यांच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा तपशिल शिक्षण मंडळात सादर करुन शाळेच्या परीसरातील मान्यताप्राप्त शाळेतून सदर विद्यार्थ्यांची परिक्षा घेवून समायोजन करणे संदर्भात सुचना करण्यात आलेल्या आहेत. तसेच ज्या शाळांनी शिक्षण मंडळाशी पत्रव्यवहार करुन संपर्क साधला आहे अशा शाळासंदर्भात शिक्षण मंडळातून तातडीने विद्यार्थी समायोजनाबाबत पत्र देण्यात आलेले आहेत. अनधिकृत शाळेतील मुलांचे शैक्षणिक आयुष्य धोक्यात येवू नये म्हणून शासन नियमानुसार जाणीवपूर्वक तातडीने पाउल उचलण्यात आली आहेत.

ज्या शाळा नोटीस देवूनही यापुढे शासन नियमाचे पालन करीत नाहीत असे दिसून आल्यास त्यांच्यावर शासन नियमानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळा मार्फत गुन्हे दाखल करण्यात येतील.

**प्रशासन अधिकारी**
**शिक्षण मंडळ**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**चंद्रकांत वैती :-**

शाळा सुरू झाल्या. वास्तविक त्याची जाहिरात आपण स्थानिक वृत्तपत्रांमध्ये दयायला हवी होती. लोकांना कसे कळणार की, ही शाळा अनधिकृत आहे की अधिकृत आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, मेरी लक्षवेधी का उत्तर सिर्फ पढकर बताने से मुझे दे दिजीए। मा. महापौर साहेब, शिक्षणाबाबत जी लक्षवेधी दिलेली आहे. म्हणजे प्रशासन या शहरासाठी शिक्षणाबद्दल किती गंभीर आहे. हे या वर्तमानपत्रामध्ये आलेली बातमी आणि आत्ता दिलेले उत्तर, मा. महापौर साहेब, यापूर्वी श्री. शरद पाटील यांनी मा. महासभेत प्रश्न विचारला होता. आत्ता जो उल्लेख केलेला आहे. प्रश्न क्र. १६.

**मा. आयुक्त :-**

खबरे आज तक, राजसत्ता, शिवसह्याद्री, भायंदर सत्ता, दै.सामना, नवभारत, यशोभूमी, सकाळ, लोकमत, पुकार, फ्री प्रेस, जनरल, हिंदमाता, सत्ताप्रहरी, सुरज प्रकाश, हमारा महानगर, महाराष्ट्र बुलंद टाईम्स, जनादेश, वृत्तमानस, विरों की गर्जना, दै. सागर या सर्व पेपरमध्ये २२/०५/२००९ ला जाहिरात प्रसिध्दी करण्यास दिलेली आहे. म्हणजे मे महिन्यामध्ये.

**चंद्रकांत वैती :-**

तुम्ही जाहीरातीसाठी दिले आहे की, बातम्या दिल्या आहेत? आणि आपण त्यांच्यावर काय कार्यवाही केली?

**मा. आयुक्त :-**

त्यांना नोटीस दिल्या.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. आयुक्त महोदय, सर्वच जण पेपर वाचतात असे काही नाही. आपण शाळेच्या बाहेर महापालिकेव्दारे जर एक बोर्ड लावला तर मुलांचे जे पालक जातात. त्यांना वाचता येईल की, ही शाळा लिगल आहे की, इललिगल आहे. पेपर कोण वाचतो? भाईंदरला ठराविक लोकच पेपर वाचतात. मा. महापौर साहेब, ज्या इललिगल शाळा आहेत. त्या ठिकाणी आपल्या महापालिकेतर्फे फलक लावा. जेणेकरून आम्ही मध्ये ज्या इललिगल इमारती आहेत. त्याच्या संदर्भात पण आपल्याला सुचना केलेली होती. की, आपण त्या इमारतीच्या आवारामध्ये फ्रंन्ट साईडला आपण एक बोर्ड लावा की, सदर इमारत अनधिकृत आहे. म्हणजे जे लोक खरेदी करतात त्यांना कल्पना येईल की, ही इमारत इलगिल आहे. त्यांची फसगत होणार नाही. तसेच शाळेचे जे विद्यार्थी आहेत. पालक आहेत त्यांची फसगत होणार नाही म्हणून महानगरपालिकेतर्फे एक फलक लावा.

**मा. आयुक्त :-**

बोर्ड लावतो.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

पण हे बोर्ड कधीपर्यंत लागणार? मा. महापौर साहेब, मा. आयुक्त महोदय, हे बोर्ड कधीपर्यंत लागतील? म्हणजे तुमच्याकडून अपेक्षा करतो. कारण आत्ता शाळा चालू झालेल्या आहे. मुलांचे वर्ष फुकट जाईल. तर आपण लवकरात लवकर बोर्ड लावले तर निदान मुले त्या शाळेतून दुसऱ्या शाळेत तरी प्रवेश घेतील. त्यांचे वर्ष फुकट जाणार नाही. तर आपण बोर्ड कधीपर्यंत लावणार?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, माझी लक्षवेधी आहे. जरा बोलू दया. नंतर ज्यांना बोलायचे त्यांनी बोला.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

श्री. ओमप्रकाश गारोडिया, तो महत्वाचा प्रश्न आहे. ऐकून घ्या. विद्यार्थ्यांचा भविष्याचा प्रश्न आहे. त्या विषयावर चर्चा होणे गरजेचे आहे. तर आपण त्याचा जरा थोडक्यात...

**मा. महापौर :-**

पहिला त्यांना बोलू दया. नंतर खुलासा करतील.

**हेलन गोविंद :-**

मा. महापौर साहेब, मला बोलायचे आहे. आमची चौक चर्चची स्कुल आहे. आमच्या गावामध्ये इंग्लीश मिडीयमची स्कुल नसल्यामुळे आमच्या लोकांना उत्तन, भाईंदरला यावे लागते. छोटी-छोटी मुले आहेत. तर आमच्या जुन्या शाळेमध्ये ती शाळा सुरू केलेली आहे आणि आमचा प्रस्ताव मंत्रालयामध्ये आहे.

**एस्.एस्.खान :-**

मा. आयुक्त साहेब, आत्ता आपण जे सॉंगितले की, जाहिरात आलेली आहे पेपरमध्ये दिली आहे. पण अजूनपर्यंत आलेली नाही. फक्त थोडक्यात बातम्या आलेल्या आहेत. एकसुध्दा जाहिरात आलेली नाही. एकाही पेपरमध्ये छापून आलेली नाही. पेपर दाखवा की, कोणत्या पेपरमध्ये आलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, बातमी आहे की, गुन्हा दाखल करणार. गुन्हा दाखल केला आहे का? आणि त्या विद्यार्थ्यांचे काय? तेवढे विद्यार्थी आत्ता कुठे अकोमोडेट करणार?

**मा. आयुक्त :-**

ॲडमिशन सुरु झाल्यानंतर अनधिकृत असताना ॲडमिशन घेतले, मगच गुन्हा दाखल होतो. ॲडमिशन घेतलेले नाहीत तर गुन्हा दाखल करुन उपयोग नाही.

**जुबेर इनामदार :-**

शाळाच अनधिकृत आहे ना?

**मा. आयुक्त :-**

अनधिकृत शाळा आहे. ॲडमीशन घेतलेले बघून इतक्या जणांना ॲडमीशन दिले ते अनधिकृत आहे. मगच गुन्हा दाखल होतो. चालू वर्षी गुन्हा दाखल करायचा असेल तर काही ॲडमीशन केल्याचा पुरावा मिळाला की, गुन्हा दाखल करू.

**जुबेर इनामदार :-**

मागे केले त्याचे काही नाही?

**चंद्रकांत मोदी :-**

स्कुल भी चालू हो गया।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

शाळा हा एक धंदा झालेला आहे. आणि प्रत्येक जण कोणीही येतो आणि धंदा खोलून बसतो.

**अरूण कदम :-**

मा. आयुक्त साहेब, या अनधिकृत शाळा बऱ्याच वर्षापासून चालू आहेत. म्हणजे त्याच्यात ॲडमीशन झालेले आहेत. आम्ही गुन्हा दाखल करण्यासाठी शिक्षण मंडळाचे निवेदन दिलेले आहे. तर त्याच्यात तुम्ही त्वरीत गुन्हा दाखल....

**मा. आयुक्त :-**

गुन्हा दाखल करणार आहे.

**अरूण कदम :-**

एकतर तुम्ही त्वरीत गुन्हे दाखल करा. आणि शाळेच्या बाहेर बोर्ड लावा. अन्यथा मनसेतर्फे बोर्ड लावण्यात येईल आणि आंदोलन करण्यात येईल, याची दाखल कृपया प्रशासनाचे घ्यावी.

**मा. आयुक्त :-**

एकुण १६ पेपरमध्ये आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, ही शाळा गेल्या वर्षी अनधिकृत होती ना?

**मा. आयुक्त :-**

श्री. खान साहेब, स्थानिक सर्व पेपरमध्ये आणि राज्याच्या तीन पेपरमध्ये दिलेले आहे.

**एस्.ए.खान :-**

पण साहेब, तुम्ही मला एक पेपर दाखवला त्याच्यामध्ये वाचता येत नाही. दुसरा पेपर दाखवा की, त्याच्यामध्ये वाचता येते की नाही?

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, हा विषय चांगला आहे. गेल्या वर्षीही....

**मा. महापौर :-**

त्यांना बोलू दया. मग तुम्ही बोला.

**जुबेर इनामदार :-**

त्यांना बोलू दया. तेच नंतर बोलणार आहेत. तुमचे आहेत ते बोलतीलच. आम्हालाही बोलू दया. हा विषय पूर्ण शहराचा आहे ना? साहेब, शाळा गेल्यावर्षीही अनधिकृत होती. नंतर यावर्षी त्यांनी घोषित केली. पेपरमध्ये तशी बातमी दिली. मग आत्ता जी गेल्यावर्षी अनधिकृत होती. त्यांनी ॲडमीशन दिले असेल. त्या अनुषंगाने त्यांच्यावर गुन्हा दाखल केलेला आहे का ? आणि त्या मुलांना कुठे अकोमोडेट करता?

**मा. आयुक्त :-**

सर्व अनधिकृत शाळेवर गुन्हा दाखल केला जाईल.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, तुमचे अभिनंदन मात्र ज्या मुलांना शाळेमध्ये ॲडमीशन घेता येणार नाही त्यांना कुठे अकोमोडेट करणार?

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब मी खरे म्हणजे श्री. ओमप्रकाश गारोडिया यांचे अभिनंदन करतो. की, चांगली लक्षवेधी त्यांनी सभागृहामध्ये आणलेली आहे. भाईंदर (पूर्व), तलाव रोडला एस.एम.पब्लीक स्कुल नावाची शाळा आहे. कोणाची आहे ते मला माहिती नाही. कुठल्या पक्षाशी संबंधित आहे ते मला माहिती नाही. मी आपल्या शिक्षण विभागाला दि. ०२/०२/२००९ ला पत्र पाठवले. मला आज उत्तर आले आहे. काल संध्याकाळी माझ्या ऑफीसला आले. कारण आज मा. महासभा आहे म्हणून उत्तर, त्यांचे नाव श्री. सोनार आहे. त्यांना जरा पुढे बोलवा. त्या पब्लीक स्कुलचे उत्तर मला दुसऱ्या महिन्यात पाठवलेले आहे. आत्ता सहावा महिना चालू आहे. चार महिने ते निवडणुकीच्या कामामध्ये खुप बिझी होते. मला वाटते यांना निवडणुक आयुक्त वगैरे नेमले होते का? मला माहीती नाही. त्यांना याच्यामध्ये मला तसे उत्तर दिले आहे. आणि त्याच्यात त्यांनी काय लिहिले की, आठवी ते दहावी पर्यंत शाळा मान्यता आहे. ठिक आहे. पण मी एक माहिती घेतली, त्याच्यात मला काल माहिती मिळाली त्याच्यात ही शाळा अनधिकृत दाखवतो. इकडे ते म्हणतात की, शाळेला मान्यता आहे. नक्की काय प्रकार आहे?

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, गुन्हा दाखल केला याचा अर्थ एफआयआर केले असेल ना? त्या एफआयआर च्या कॉपीमध्ये कोणत्या शाळा आहेत त्यांची जरा नावे दया.

**मा. महापौर :-**

केले नाही. करणार आहेत.

**जुबेर इनामदार :-**

आत्ता साहेबांनी सांगितले की केले आहे.

**जयंत पाटील :-**

त्या शाळेबद्दल २००७ पासून एक माजी नगरसेविका तक्रार करते. म्हणजे एखादी शाळा अनधिकृत जाहिर करण्यासाठी, त्याच्यावर कार्यवाही करण्यासाठी आम्हाला किती कालावधी लागतो?

**एस. के. सोनार :-**

सनमा. सभागृह, एस.एम. पब्लिक स्कुल, नवघर क्रॉस रोड भाईंदर (पूर्व) तलाव रोड या इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेस शासनाची परवानगी आहे, मान्यता आहे.

**जयंत पाटील :-**

मान्यता कधी आली?

**एन्.के.सोनार :-**

०६/१०/२००८.

**मा. आयुक्त :-**

आणि २८/०८/२००८. साहेब, विषय असा आहे. प्राथमिक शाळेला परवानगी नाही. त्यामुळे अनधिकृत. आठवी ते दहावी परवानगी आहे. इंडेक्स नंबर आहे. त्यांनी प्राथमिकला अनधिकृत म्हटलेले आहे.

**जयंत पाटील :-**

मग ती शाळा तुम्ही कधी बंद करणार ?

**मा. आयुक्त :-**

आम्ही प्राथमिकवर कार्यवाही करू. पण माध्यमिकला त्यांना परवानगी आहे.

**जयंत पाटील :-**

मला काल पत्र आले. त्याच्यामध्ये ती शाळा अनधिकृत म्हणून दिलेले आहे.

**स्नेहा पांडे :-**

मा. आयुक्त साहब, यह इललिगल स्कुल सालो से चलते आ रहे है। तो इसके पहले इनपर क्या कार्यवाही हुई? इसी काल से तो इललिगल शुरु नही हुआ है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, मेरा लक्षवेधी है। मुझे बोलने मिलेगा की नही?

**स्नेहा पांडे :-**

हर साल इसी तरह लिस्ट निकलती है उनपर क्या कार्यवाही होती है?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, लक्षवेधी किसका है?

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, नंतर नियमावर बोट ठेवायचे आणि आत्ता आपण कसेही बोलायचे.

**जयंत पाटील :-**

२००७ साली एक नगरसेविकेने पत्र लिहिले आहे. श्री. सोनार साहेब कोणत्या अधिका-यामध्ये त्यांना शाळा चालवा म्हणून सांगत होते? त्यांची उत्तरे आहेत. त्यांनी पाठवलेले पत्र मी तुम्हाला वाचून दाखवते. तुम्ही म्हणता की, २००८ साली परवानगी दिलेली आहे. मी त्यांचेच पत्र वाचून दाखवतो.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी मदर तेरेसा प्रायमरी स्कुल टेक ओवर केली. आणि त्या नावावर चालवतात.

**जयंत पाटील :-**

तसे टेक ओवर करण्याचे अधिकार आहेत का? तसे आहे का की, ह्या शाळेची मान्यता त्या शाळेला? मग माझे नगरसेवक पद माझ्या भावाला देऊ का?

**मा. आयुक्त :-**

ते नाव त्यांनी तिथे बदलले आहे.

**जयंत पाटील :-**

मी सभागृह नेता आहे. मी भावाकडे ट्रान्सफर करतो. येऊन बसेल का इकडे? हा नियम आम्हाला दाखवा. हे ट्रान्सफर करण्याचा नियम कसा आहे ते आम्हाला दाखवा.

**मा. आयुक्त :-**

ट्रान्सफर नाही. संचालक मंडळ बदलतात.

**प्रफुल्ल पाटील :-**

मुळात श्री. जयंत पाटील यांचा विषय असा आहे की, एस.एम.पब्लिक स्कूल, इंग्रजी माध्यम, प्राथमिक विभाग ही शाळा अनधिकृतपणे चालू आहे. दरम्यानच्या काळामध्ये तो विषय असा आहे की, त्यांचा इंग्रजी माध्यमाचा प्राथमिक विभाग अनधिकृत आहे. आत्ता तुम्ही बघा, कुठलीही शाळा जर टेक ओवर करायची झाली तर तो प्रस्ताव उपसंचालकांना पाठवावा लागतो. आपल्या महानगरपालिकेचे ते अधिकार नाहीत. तुम्ही बघा आत्ता, ती जी मदर तेरेसाची संस्था आहे म्हणजे पॅरेंट बॉडी, जी धर्मदाय आयुक्तांच्या खाली रजिस्ट्रेशन झालेली, ही संस्था सगुणाबेन मेहता एज्युकेशन ट्रस्ट यांची आहे. यांनी तुम्हाला १५/०५ ला पत्र दिले. की, आम्ही या शाळेची परवानगी हस्तांतरीत करतो. शाळा नाही आणि लगेच १५/०५ ला तुमचा प्रशासन अधिका-यांनी पत्र दिले. बघा किती फास्ट काम आहे. नगरसेवकांनी पत्राचे उत्तर सहा महिन्यांनी घ्यायचे. ह्यांनी एका शाळेचा अर्ज घ्यायचा. त्याच दिवशी त्यांनी लगेच जिल्हापरिषद प्राथमिकला पत्र लिहिले की, ही शाळा हस्तांतरीत करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दया. हे प्रस्ताव आपण कसे काय सादर करतो? कुठल्याही शाळा ट्रान्सफरचे ट्रस्टी असो किंवा काही असु दया. तुम्ही लिहिताना परवानगी म्हणता. देताना तुम्ही ट्रस्टी करता तरीसुध्दा हे अधिकार प्रशासन अधिका-यांचे नाहीतच. किंवा हा प्रस्ताव पाठवण्याचेपण अधिकार तुमचे नाहीत. किंवा हा प्रस्ताव स्विकारण्याचे पण अधिकार तुमचे नाहीत. किंवा हा प्रस्ताव स्विकारण्याचेपण अधिकार तुमचे नाहीत. ज्या ट्रस्टीला शाळा पाहिजे, ज्या ट्रस्टीला शाळा दयायची आहे त्या दोघांनी हा प्रस्ताव उपसंचालकांकडे सादर करायला पाहिजे. उपसंचालक त्या दोघांचे कागदपत्र, ठराव. आत्ता तुम्ही मला सांगा की, मदर तेरेसा शाळा जर बंद झाली तर तिथले मिरारोडचे विद्यार्थी नवघरला येतील का?

**मा. महापौर :-**

मदर तेरेसा शाळाच चालू आहे. फक्त ट्रस्ट मंडळ त्या लोकांनी चेंज केले

**प्रफुल्ल पाटील :-**

शाळा सांगतो, ट्रस्ट नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही जे बोलता तेही बरोबर आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुमचा विषय असा आहे की, ही मदर तेरेसा शाळा ट्रान्सफर करतात. शाळा ट्रान्सफर करतात याचा अर्थ काय? टायटल विकले का? तुम्ही त्यांना मुले विकता ना? जे काही आपसात असेल ते ठरवून. एक मुलगा तुला देतो मला सहाशे रूपये दे. मग ती मिरा रोडची मुले इकडे नवघरला येणार का? बरं पालकांनी त्यांना इच्छा दिली की, शाळा ट्रान्सपर करायला हरकत नाही. पण एकीकडे तुम्ही शाळा ट्रान्सफर करत असताना ती शाळा नावासकट जशीच्या तशी ट्रान्सफर होते. पण ते अधिकार तुमचे नाहीत. त्याचा प्रस्तावसुध्दा पाठवला. प्रशासन अधिकारी साहेब, तुम्ही असे प्रस्ताव कसे काय सादर करता? तुम्ही त्यांचा प्रस्ताव पंधरा तारखेला घेतला. लगेच तुम्हीच तो माध्यमिक विभागाला सादर केला. ही काय तुमची पत्रं आहेत.

**श्री. सोनार :-**

प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तो पुढील कार्यवाहीसाठी वरीष्ठ कार्यालयाकडे पाठवला.

**प्रफुल्ल पाटील :-**

अजिबात नाही. मी तुम्हाला डिग्री कॉलेजचा प्रस्ताव देतो. तुम्ही पुढे कराल?

**श्री. सोनार :-**

प्राथमिकचा मी करेन.

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब, हे नवीन शाळा उघडण्याचे प्रस्ताव नाहीत. इव्हन शिक्षण अधिकारी, माध्यमिकला सुध्दा हे अधिकार नाहीत. तुम्ही ज्यांच्याकडे प्रस्ताव पाठवला त्यांना अधिकार आहेत का? जी बाब वरून आली असती ती खालून पुन्हा वर जाते. प्रशासन असे काय काम करते? उपसंचालकाला जर ते प्रकरण योग्य वाटले. त्यांनी कागदपत्रं, शेवटी शासन परवानगी देते. या शाळांची परवानगी महानगरपालिकेने दिलेली नाही, ही शासनाने दिलेली आहे. आणि शासनाने दिलेली परवानगी खरी आहे, खोटी आहे की, मदर तेरेसाने किंवा एस.एम.पब्लिक स्कुलने खोटे कागदपत्र सादर केले ते तुम्हाला कसे कळणार त्याची संपूर्ण प्रत उपसंचालक, मुंबई विभाग यांच्याकडे असणार? आणि म्हणून ते प्रस्ताव उपसंचालकाकडे सादर करावे लागतात. उपसंचालक नंतर तुमचे नाहरकत प्रमाणपत्र जर आवश्यक असेल तर मागेल आणि तुम्ही दिले तेव्हा शाळा ट्रान्सफर होईल. आणि शाळा ट्रान्सफर करताना मुले घ्यायची की, नावासकट मुले घ्यायची ह्या दोन्ही गोष्टी लागतात. या ठिकाणी असे म्हटले आहे की, मदर तेरेसा हे नाव आम्ही नंतर चेंज करू. म्हणून ही जी प्रस्तावाबाबतची पुर्तता आहे ती न करता यांनी ते तसेच पाठवले. म्हणजे आत्ता काय होणार, हा प्रस्ताव सॅंक्शन होणार नाही. मदर तेरेसा शाळा बंद होणार कारण ते म्हणतील की, आम्ही ऑलरेडी तुम्हाला हस्तांतरण करायला परवानगी दिली आहे. आणि इकडे त्या मुलांना रितसर घेता येणार नाही. हा टेक्नीकल आणि कायदेशीर प्रॉब्लेम आहे.

**स्नेहा पांडे :-**

मा. आयुक्त साहब, मैने प्रश्न पुछा था की, अब तक क्या कार्यवाही की गयी?

**मा. महापौर :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवालजी के बाद बोलिए।

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, लक्षवेधीमध्ये आपल्या शिक्षण अधिका-यांनी २३ शाळांना अनधिकृत म्हणून घोषित केलेले आहे. ते कधी घोषित केले आहे? आणि त्या कोणत्या बोर्डाच्या शाळा आहेत.

**मा. महापौर :-**

एस.एस.सी. बोर्ड.

**अनिल सावंत :-**

त्यांना सर्वांना नोटीस काढल्या आहेत? ज्यांना नोटीस काढूनसुध्दा शाळा चालू ठेवल्या त्यांच्यावर तुम्ही कायदेशीर कार्यवाही केली आहे का?

**मा. महापौर :-**

तोच गुन्हा आत्ता दाखल करणार.

**अनिल सावंत :-**

ते आत्ता. याच्यापूर्वीसुध्दा किती वेळा इथे विषय आला आहे.

**मा. महापौर :-**

आत्ताच नोटीस दिली. पूर्वी नोटीस दिलेली नव्हती.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, या ज्या २३ शाळा जागेत त्य महाराष्ट्र एस.एस.सी. बोर्डाच्या आहेत. दिल्ली बोर्डाच्या आहेत. दिल्ली बोर्डाच्या सीबीएससी आणि आयसीएससी ची सुध्दा ब-याच शाळांचे पिक निघालेले आहे. त्यांच्या बाबतीत काय कार्यवाही केली आहे? त्यामध्ये किती शाळा अधिकृत आहेत आणि किती अनधिकृत आहेत?

**मा. महापौर :-**

दोनच शाळा आहेत.

**अनिल सावंत :-**

सीबीएससी च्या किती शाळा आहेत? त्या अधिकृत आहेत का? आयसीएससी आणि सीबीएससी च्या बोर्डाच्या ज्या प्राथमिक शाळा आहेत त्या अधिकृत आहेत का?

**श्री. सोनार :-**

महाराष्ट्र शासनाने शाळा सुरू करण्यास एनओसी दिलेली आहे.

**अनिल सावंत :-**

महाराष्ट्र शासन एनओसी कशी देईल त्या दिल्ली बोर्डाच्या शाळा आहेत. मुळात त्या शाळा अनधिकृत आहेत ही व्याख्या तुम्ही कशी काय ठरवता?

**श्री. सोनार :-**

ज्यांना शासनाची परवानगी नाही.

**अनिल सावंत :-**

मग दिल्ली बोर्डाने या शाळांना परवानगी दिलेली आहे का? ती माहीती तुमच्याजवळ आहे का? माहिती नाहीतर नाही म्हणून सांगा.

**श्री. सोनार :-**

आमच्याकडे नाही.

**अनिल सावंत :-**

मग तुम्ही माहिती का घेतली नाही. तुम्ही या २३ शाळांवर कार्यवाही केली, त्यावेळी या दिल्ली बोर्डच्या शाळांवर कार्यवाही का केली नाही?

**श्री. सोनार :-**

माहिती घेऊन सांगतो.

**अनिल सावंत :-**

कोणाकडून माहिती घेणार?

**श्री. सोनार :-**

शाळांकडून माहिती घेतो.

**अनिल सावंत :-**

कधीपर्यंत माहिती घेणार? म्हणजे तुम्ही चोरांना विचारणार की, तुम्ही चोर आहात का?

**मा. महापौर :-**

उद्यापर्यंत माहिती देतील.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, ही माहिती घेऊन त्यांना दयायला सांगा. याच्यामध्ये मुलांचे नुकसान होणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, मला फक्त एवढेच सांगा की, त्या विद्यार्थ्यांना कुठे अकोमोडेट करणार?

**मा. महापौर :-**

त्यांचे होऊ दया. नंतर उत्तर देऊ.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता प्रशासनाने जे उत्तर दिलेले आहे. माझे दोन विषय होते. आत्ता सन्मा. सभागृह नेते. श्री. जयंत पाटील यांनी एका शाळेचा उल्लेख केला. त्यांनी नाव घेतले नाही. पण बहुतेक श्री. श्रीपत मोरे यांची शाळा आहे. त्यांना नाव घेण्यामध्ये काय अडचण आहे ते मला माहिती नाही.

**जयंत पाटील :-**

मला काहीच अडचण नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी कधीही कुठला विषय घेतो. तर हा कोणाचा आहे. हे कधी बघितलेले नाही. आत्ता या ज्या शाळा इललिगल घोषित केल्या आहेत. त्यामध्ये किती मुले आहेत? कुठल्या कुठल्या वर्गामध्ये किती किती मुले आहेत?

**मा. महापौर :-**

इललिगल है तो डिटेल कहा से आएगी?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उन्होंने २३ स्कुल का जायजा लिया है।

**प्रफुल्ल पाटील :-**

दरवर्षी त्या शाळा चालू आहेत. या वर्षी सुरू झालेल्या नाहीत ना? दरवर्षी त्या शाळा सुरू आहे. दरवर्षी ते परवानगी घ्यायचा प्रयत्न करत असतील. मग यांना त्यांच्याकडे रेकॉर्ड माहिती नाही की, किती शाळा आहेत? किती वर्ग आहेत? काय करायचे नाही म्हणून करायचे असेल तर गोष्ट वेगळी आहे. काही टेबलाखालून व्यवहार करायचे असतील. किंवा आतून काही बोलणी चालू आहेत. अनधिकृत शाळांच्या बाबतीत जर तुमचे धोरण तसे असेल तर तसे सौम्य ठेवा. कोणीही उघडा कोणीही शाळा काढा. तुम्हाला एक माहीती आहे का, शिक्षण अधिकारी साहेब, तुम्हीच दोन ॲडमिशनची शिफारस आमच्या शाळेला केलेली. ती मुले कुठल्या शाळेतली, अनधिकृत शाळेतली. मग अनधिकृत शाळेतील मुले जी दुस-या अधिकृत शाळेत जातात. त्यांना प्रवेश देता येतो का? म्हणजे ती मेहनत कोणी करायची? ज्या शाळेने त्यांना आतमध्ये घ्यायचे चौथीला असेल तर चौथीला घ्यायचे. तिसरीची परिक्षा घ्यायची. पेपर तपासायचे, निकाल तुमच्याकडे पाठवायचा, मग तुम्ही ते बाबा आजमच्या काळात त्या निकालावर उत्तर देणार की, हा सदरचा मुलगा व्यवस्थित तिसरी शिकलेला आहे. त्याला चौथीत घ्यायला हरकत नाही. मग सगळे कोणी करायचे? मान्यता प्राप्त शाळांनी. म्हणजे ज्यांनी प्रवेश दयायचा त्यांनी करायचे आणि त्यांनी अनधिकृत चालूच ठेवायच्या. अनधिकृत शाळा आजपासून चालू आहेत काय़ त्या अनेक वर्षापासून चालू आहेत. मग तुम्ही एकतर त्यांना काहीतरी अल्टीमेटम दया की, तुम्ही जूनमध्ये शाळा केल्यानंतर तीन महिन्यामध्ये जर परवानगी आणली नाही तर तुमच्यावर कारवाई करू. जर त्यांची परवानगी प्रलंबीत असेल तर तीन महिन्यात आणली नाही तर तुमच्यावर कारवाही करू आणि सर्व मुले इतर शाळेत पाठविण्याची तुम्ही व्यवस्था करा. विद्यार्थ्यांचे नुकसान कशाला. आत्ता जॅक ॲण्ड जील नावाची शाळा आहे. त्याला परवानगी आहे? ती जॅक ॲण्ड जील शाळा अधिकृत आहे का? त्या शाळेचे सन्मा. श्री. ओमप्रकाश अग्रवालजी, आम्ही असे कोणाला वैयक्तिक बाबत बोलत नाही. जे बोललो ते त्यांच्या शाळेबद्दल बोललो नाही. ह्यांनी जो अनधिकृतरित्या......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाव माहिती नाही आणि त्या परिसरामध्ये राहतात.

**प्रफुल्ल पाटील :-**

शाळा ट्रान्सफरचा जो प्रोसिजर आहे तो चुकीचा आहे. त्यांनी तो अवलंबला. कारण ट्रान्सफरींग ऑथोरिटी कोण आहे, उपसंचालक. तुम्ही उपसंचालकांकडे प्रस्ताव दयायचा आहे. तुमच्या सहीने ट्रान्सफर होणार आहेत का? तसेही अनधिकृतच्या बाबतीसुध्दा तुम्ही जर शासनाकडे शिफरस केली असेल तर त्यांना असे कळवा की, शासनाकडे शिफारस केलेली आहे. तीन महिन्यांच्या आत जर परवानगी आली नाही तर तुम्हाला शाळा बंद करावी लागेल. खरं म्हणजे त्यांच्या हमीपत्रातच तसे असते की, आम्हाला फायनल परवानगी मिळेपर्यंत आम्ही शाळा सुरू करणार नाही. तरी त्या सुरू आहेत. आत्ता तेवढे सगळे विद्यार्थी तुम्ही नेणार कुठे? तुम्ही काही करतच नाहीत. ती प्रक्रिया वर्षानुवर्षे चालूच आहे. गेल्यावर्षी दोनशे मुले होती, यावर्षी चारशे झाली, पुढच्या वर्षी सहाशे झाली. अशी ती वाढतच जाणार आहेत. आणि मग नंतर ती मुले सातवी-आठवीला गेल्यानंतर त्यांना दुस-या शाळेत कसे घेणार? पहिली दुसरीची गोष्ट वेगळी आहे. याच्यामध्ये विदयार्थ्यांचे नुकसान होते. कमीत कमी तुमच्या महानगरपालिकेच्या शाळांमध्ये तरी त्यांना घ्या. एवढ्या शाळा त्या पण ओस पडल्या आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पहिले मी विचारले, आपण २३ शाळा इललिगल घोषित केल्या. मुले किती?

**मा. महापौर :-**

ती फिगर आपल्याकडे आत्ता नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग तुम्ही जे हे उत्तर दिलेले आहे. त्या उत्तरामध्ये सांगितले आहे की, आम्ही संबंधित ज्या लिगल शाळा आहेत. त्यांच्या संचालकांना कळवले आहे की, त्यांना प्रवेश दया. पहिली गोष्ट तुमच्याकडे फिगरच नाही. की, कुठल्या वर्गातील किती किती मुले आहेत. दुसरा प्रश्न हा आहे की, शासनाकडे ३-४ वर्षापासून मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. आत्ता श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी सांगितले की, ३-४ महिने

ॲफिडेव्हीट करून आपण त्यांना देऊ शकतो. ३-४ वर्षापासून शासनाकडून मान्यता आली नाही की, त्यांनी मान्यता मागितलीच नाही.

**श्री. सोनार :-**

शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केलेले आहेत. परंतु, अजून प्रलंबित आहेत.

**जयंत पाटील :-**

शासनाकडे तुम्ही प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवले आहेत. याचा अर्थ त्यांनी तोपर्यंत शाळा चालवायची का? महापालिकेकडे आम्ही बांधकामाच्या परवानगीसाठी पत्र टाकले. महापालिकेने आम्हाला दिले नाही. तर आम्ही बांधकाम करतो का ?

**श्री. सोनार :-**

म्हणून आम्ही त्यांना नोटीस दिली आहे.

**जयंत पाटील :-**

तुमचे हे काय चाले आहे. चार-चार वर्षे शाळा चालतात. त्या विदयार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानाला जबाबदार कोण? आम्ही जबाबदार आहोत का? तुम्ही या महापालिकेत काय काम करता?

**श्री. सोनार :-**

आम्ही शक्यतो मुलांचे नुकसान होऊ देत नाही.

**जयंत पाटील :-**

अनधिकृत शाळेमध्ये शिकतात त्यांचे नुकसान होणार नाही? तुमच्यावर कार्यवाही करायला लावू का? तुम्ही स्वखुशीने इथून जा, झेपत नाही तर.

**श्री. सोनार :-**

आठ दिवसात आम्ही गुन्हा दाखल करणार आहोत. व्हेरीफिकेशन करून गुन्हे दाखल करणार आहोत.

**जयंत पाटील :-**

कधी? २००७ ला एका नगरसेविकने त्या शाळेबद्दल पत्र पाठवले आहे. गुन्हे करण्यासाठी किती कालावधी लागतो. हे गेले की, गुन्ह्याचे पाकीट तुमच्या खिशात आले. एक वर्ष लांबले. काय चालले आहे? शिक्षण हा विषय किती मोठा आहे. आणि दुर्देवाने तुम्ही इकडे आमच्या शिक्षणाचे अधिकारी आहात. तुम्हाला काही डिसीप्लेन नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, लक्षवेधी पूर्ण होणार की नाही?

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, परिस्थिती एवढी गंभीर आहे. कारण ३-३, ४-४ वर्षे झाली. जे बिचारे घरकाम करतात. त्या बायकांना काही माहीती नसते की ती अधिकृत आहे की, अनधिकृत आहे. आपला मुलग इंग्रजी शिकवा ही त्यांची इच्छा असते. म्हणून त्या शाळेमध्ये टाकतात. ती अधिकृत आहे की, अनधिकृत आहे हे तिला काय माहीत. त्यांच्यानंतर तिसरी चौथी झाल्यानंतर त्या मुलांना जर दुसऱ्या शाळेत जायचे असेल, त्यांच्याकडे चौथी पर्यंतच असते, दुसऱ्या शाळेत जायचे असेल तर आई-बाप ढाय-ढाय रडतात. मग आमच्या हातापाया पडतात. आमची अनुदानीत शाळा आहे. आम्ही घेऊ शकत नाही. परंतु ते बिचारे जातील तरी कुठे? आणि त्या लोकांवर एवढा अन्याय होतो ते त्यांना माहिती आहे. मी तर सांगतो त्यांच्यावर फौजदारी करा. फौजदारी केल्याशिवाय हे थांबणार नाही. नाहीतर या शाळा निघतच जातील आणि गरीब लोक त्याच्यामध्ये जात राहतील. त्यांना काय माहीती पडणार आहे. आणि हे पुढे जाऊन फार मोठे होईल. किती मुलांचे नुकसान होईल?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, अभी कमिशनर साहब नही है। मा. उपायुक्त (मुख्यालय) यहा पर बैठे है।

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर महोदय, याचे काही वेळापत्रक आहे की नाही? किती वेळ बोलणार आहे? ते दिवसभर बोलत बसतील.

**मा. महापौर :-**

त्यांना अजून बोलूच दिले नाही. बाकी सगळे बोलत होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, या लक्षवेधीचे जे उत्तर दिलेले आहे. ज्या ११ शाळा तुम्ही दाखवलेल्या आहेत. या ११ शाळांचे उत्तर मला १२/०६/२००८ ला दिले प्रगतीपथावर. आज एक वर्ष झालेले आहे. हे आरक्षण जे डेव्हलपमेंट करायला तुम्ही दिले दिड वर्षापूर्वी मला उत्तर दिलेले आहे की, बांधकाम प्रगतीपथावर. आज दिड वर्षानंतर पुन्हा तेच उत्तर येते की, प्रगतीपथावर. मग तुम्ही तरी जाऊन बघता का? शाळा चालू आहे की नाही? मा. महापौर साहब, यह शिक्षण का विषय है। यह साधा विषय नही है। अपने रिझर्व्हेशन की जगह पोरवाल बिल्डर के प्राथमिक शाळा की रिझर्व्हेशन थी। उसने ऐसी स्कुल बनाया और बाहरी बांधकाम लिया।

मा. महापौर साहब, मेरी बात गंभीर से सुनिए। दिड वर्षानंतर तुम्हाला माहिती नाही की, ती शाळा आहे की नाही? काम चालू आहे काय? सुरू झाली हे कोणाला माहिती नाही. एकच उत्तर, प्रगती पथावर. मा. महापौर साहब, आपको इस विषय का अगर गांभीर्य लगता है। इस शहर के एज्युकेशन का गांभीर्य लगता है। महानगरपालिका मे आज के दिन मे प्रायमरी स्कुल के टोटल ८५ रिझर्व्हेशन है। २५ स्कुल हायर सेकंडरी के है। आज उसमे से ११ आरक्षण आपने प्रायव्हेटवालों को दिए। आज वह प्रायव्हेट शाळा ए.सी.स्कुल खोला है। जहापर गरीब विद्यार्थियोंको प्रवेश मिलना चाहिए। उससे पहले भुखंड कराया और अब यह श्रीखंड कमा रहे है। आप मुझे यह बताइए, इन्होंने जो टिपणी दिया है। उसमे लिखा है की, हम इन बच्चो को प्रवेश दिलाने के लिए तातडीसे, क्या तातडी? आज शाळा सुरू झालेली आहे. तुमच्याकडे विद्यार्थ्यांची संख्या नाही. तुम्ही कुठल्याही शाळेला काही कळवले नाही की, ह्या १५ मुलांना तुम्ही शाळेत ॲडमिशन दया. या दहा मुलांना तुम्ही, तुमच्याकडे फिगरच नाही. म्हणजे लक्षवेधीचे उत्तर देताना कमिशनर साहेब पण उपस्थित होते. म्हणजे मोघम उत्तर. शिक्षण अधिकाऱ्याकडे किती विद्यार्थी आहेत ही फिगर नाही. आणि तुम्ही मला सभागृहामध्ये लक्षवेधीचे उत्तर देता? मा. महापौर साहब, क्या करने का है? मुझे लगता नही की, सभागृह को शिक्षणके बारे मे इतना गांभीर्य नही है। एटीपी डिपार्टमेंट के लोग बैठे है। ११ रिझर्व्हेशन स्कुलो के लिए दिया। १० टक्के रिझर्व्हेशन है। वह बोलते है की, हमारी जबाबदारी नही है। शिक्षण अधिकारी की जबाबदारी है। स्कुल बन रहा है की नही? कितना बना है, इनको मालूम नही है। स्कुल चालू है की नही यह अपने शिक्षण अधिकारी को मालूम नही है। यह क्या लगाया है? मा. महापौर साहब, अभी मा. आयुक्त साहब को बुलाइए। मा. आयुक्त साहब, इसमे कितने स्टुडन्ट है जिन्होंने इललिगला स्कुलमे प्रवेश लिया है? उन्होंने दिया है। मुझे एकदम ठोस उत्तर चाहिए। आज उनको इललिगल घोषित करके एक महिना हो गया। किसीपर गुन्हा दाखल नही हुआ।

**मा. महापौर :-**

मा. कमिशनर साहबने आपको आन्सर दिया है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, आपको मालूम है, इसी सभागृहमे श्री. अनिल सावंत उन्होंने लक्षवेधी लाया था। आज नवभारत मे न्युज है की, अपने यहा जो गेस्ट हाऊस है उनपर कार्यवाही करेंगे। एक गेस्ट हाऊस पर कार्यवाही नही हुई। यह सभागृहने एकमत से दिया था। नल कनेक्शन तोडने का, इलेक्ट्रीसिटी उसका क्या हुआ? आज इस लक्षवेधी मे प्रशासन को मालुम नही की, कितने बच्चे है? कौनसी क्लास के बच्चे है। आम्ही त्यांच्यावर तातडीची दखल घेतली आहे. काय दखल घेतली आहे? मा. महापौर साहब, यह प्रशासन, जैसे पहले श्री. जाधव साहब आए सिर्फ डायसे रूलिंग होता है। रूलिंग का काम नही होता है। और अगर इसी तरह चलना है तो मा. महासभा का कोई मतलब नही है। मा. महासभामे रूलिंग का कोई महत्व नही है। आप पहले बताईए, यह तो उनके पास फिगर ही नही है। स्टुडंट का फिगर नही है। कुछ नही है। इसके उपर बोलकर भी मतलब नही है। आज मा. महासभाने एकमतसे ठराव दिया, उस गेस्ट हाऊस पर कार्यवाही करने के लिए। क्या हुआ? इसका मतलब इस सभागृह मे आने का, चिल्लाने का। एकजण मा. महापौर को गाली देने का। एकजण किसी और को गाली देने का। यह काम करके शाम को चले जाने का। और हमारे अधिकारी तालिया बजाकर देखते है की, देखो हमने इनका नाच देखो। आज बच्चे का भविष्य है। मा. महापौर साहब, आप भी स्कुल चलाते है। मुझे इन बच्चो का, कितने दिन मे कितने बच्चे महानगरपालिकाने कहा पर प्रवेश दिलाये है ? यह सब दुसरी सभा के पहले आप उत्तर देंगे तो मै बैठता हू। नही तो मै यह सभा चलने नही दुंगा।

**अनिल सावंत :-**

बरोबर आहे. मा. महापौर साहेब, हा ज्वलंत विषय आहे. शहरातील मुलांच्या भवितव्याचा प्रश्न आहे.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही रूलिंग दया.

**मा. आयुक्त :-**

विदयार्थ्यांचे ॲडमिशन आणि त्यांच्याकडे ज्या सीटस् आहेत. त्या सीटची संख्या मागवून घेऊन प्रत्येक........

**मिलन पाटील :-**

ते नाही. तुम्ही सांगा की, आम्ही त्यांच्यावर फौजदारी कार्यवाही करू. तुम्ही रूलिंग दया. तुम्हीच हे काम करू शकता.

**मा. आयुक्त :-**

अनधिकृत शाळेवर फौजदारी गुन्हा तर दाखल करणारच. आणि जे दहा टक्के ॲडमिशन देणार नाहीत त्याच्यावरही करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, यामध्ये २३ शाळा इललिगल घोषीत केलेल्या आहेत. त्यांच्यातील मुलांची संख्या आणि त्या मुलांना प्रवेश देण्यासाठी आपण कटीबध्द आहोत. असे स्टेटमेंट मला आपल्याकडून पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

कुठल्याही परिस्थितीत आम्ही १० टक्के ॲडमिशन............

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दहा टक्क्यामध्ये झाले नाही तर बाकीची मुले कुठे जाणार? जर १० टक्के रिझर्व्हेशनमध्ये ती मुले बसली नाहीत. म्हणजे त्या मुलांनी कुठे जायचे?

**मा. आयुक्त :-**

त्या मुलांना महापालिका हद्दीमध्ये ॲडमिशन व्यतिरिक्त राहणार नाहीत याची व्यवस्था आम्ही करू.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, मा. श्री. ओमप्रकाश अग्रवाल जी यांनी जी लक्षवेधी मांडली त्याच्यामध्ये दोन मुद्दे आहेत. एक तर ज्या २३ शाळा तुम्ही अनधिकृत घोषित केल्या. त्यानंतर ही जी ७२ आरक्षणे आहेत. त्यापैकी फक्त ११ आरक्षणांना तुम्ही मंजुरी दिली आहे. बाकी आरक्षणांची काय परिस्थिती आहे.

**मा. महापौर :-**

अजून परवानगीसाठी आले नाहीत.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये मिरारोडसाठी एक आरक्षण आहे. ते तुम्ही बीओटी तत्वावर दिलेले आहे. मला वाटते त्याचा आरक्षण क्र. १९२ आहे. तो अपंगांच्या शाळेसाठी तुम्ही बीओटी तत्वावर दिलेला आहे. त्याला मला वाटते चार वर्षे झालेली आहेत. आज त्या ठिकाणी ओसवाल बिल्डरचा बोर्ड लागलेला आहे. वस्तुस्थिती काय आहे. तो बीओटी वर डेव्हलप करणार आहे की नाही? त्याच्याबरोबर काय ॲग्रीमेंट झालेले आहे? म्युनिसीपालीटीचे हॉस्पीटल बनते आहे. त्याच्या समोरचा भुखंड.

**मा. आयुक्त :-**

मुदतीत केले नाही म्हणून बीओटी तत्वावरचे कॅन्सल करू.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, त्या विकासकाला तुम्ही काय फाईन करणार आहात?

**मा. महापौर :-**

आपण ते कॅन्सल करणार.

**अनिल सावंत :-**

तुम्ही ॲग्रीमेंट बनवून तीन वर्षे गेली.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, त्याने चार वर्षे घालवली.

**अनिल सावंत :-**

त्याच्यावर काय कार्यवाही करणार आहात.

**मा. महापौर :-**

ॲग्रीमेंट बघून क्लॉजप्रमाणे कार्यवाही करू.

**जुबेर इनामदार :-**

त्याने नुकसान केले. त्याच्यावर कार्यवाही झालीच पाहिजे.

**स्नेहा पांडे :-**

मा. आयुक्त साहब, मैने प्रश्न पुछा था की, इसके पहले भी दोन-तीन साल से लगातार इस तरह की इललिगल लिस्ट निकल रही है। तो उसपर क्या कारवाई किया था? अगर पहले ही कार्यवाही हुयी होती तो आज यह दिन नही आता था। उनपर क्या कार्यवाही हुयी है।

**मा. महापौर :-**

हुई नही इसलिए अब करेंगे।

**स्नेहा पांडे :-**

हर साल सिर्फ लिस्ट निकाल कर क्या मतलब।

**मा. महापौर :-**

चार दिन के अंदर मा. आयुक्त साहब कार्यवाही करेंगे।

**स्नेहा पांडे :-**

इस साल क्या करनेवाले है।

**मा. महापौर :-**

नियम के हिसाब से उनपर गुन्हा दाखल किया जाएगा।

**स्नेहा पांडे :-**

वह स्कुल के मालिकों पर। बच्चो का क्या होगा?

**मा. महापौर :-**

वही बताया। जो जो स्कुल मे १० टक्के अव्हेलेबल है वहा पर अकोमोडेट करेंगे। बचेंगे उसका कमिशनर साहब कुछ-ना-कुछ रास्ता निकालेंगे।

**स्नेहा पांडे :-**

सभी बच्चों को अॅडमीशन मिलेगा ।

**मा. महापौर ;-**

वही बता रहे है। जहा पर अपना १० टक्के रिझर्व्ह है वहा पर करेंगे। बाकी का कुछ-ना-कुछ उसका रास्ता निकालेंगे।

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहब मेरी भी लक्षवेधी है की, आज मिरा भाईंदर मे जो प्रायव्हेट स्कुल है। बच्चे पढते है वह डोनेशन से परेशान है। डोनेशन छोड दिजीए। अब पुरी जनता ऐसे समझकर चलती है की, डोनेशन एक सिस्टम बन चुका है। लेकिन डोनेशन के बावजुद भी बच्चों को हर साल रिअॅडमिशन फीज देना पडता है। और वह रिअॅडमीशन फीज तीन से चार हजार हो गयी है। बच्चा चौथी से पाचवी मे जाएगा, आठवी से नौंवी मे जाएगा। हर साल रिअॅडमीशन फीज देना पडता है।

**मा. महापौर :-**

इस साल गव्हर्नमेंट ने निर्णय लिया और एक समिती बनायी है। आज के बाद जब भी फीज बढानी होगी, कुछ चेंजेस करना होगा तो गव्हर्नमेंट की परमिशन लेकर ही करना होगा।

**मदन उदितनारायण सिंह :-**

लेकिन जो लोग परमिशन नही लेते है। बिना परमिशन कर रहे है उनपर क्या ।

**मा. महापौर :-**

वो जीआर अभी आया है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो इसका इम्प्लीमेंन्टेशन किया जाए।

**मा. महापौर :-**

यह समिती है। किसीने फिज बढाने के पहले गव्हर्नमेंट की परमिशन लेने की है। और फिर बढाया जाए।

**मदन उदितनारायण सिंह :-**

और जो परमिशन नही लेगा उसके उपर क्या कार्यवाही की जाएगी?

**मा. महापौर :-**

नियम के हिसाब से कार्यवाही होगी। यह अगले साल के लिए है। इस साल के लिए नही है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

लेकिन इस साल वो लोग मनमानी फीज कुछ भी ले सकते है क्या?

**मा. महापौर :-**

नियम अभी बना है। उनका जीआर अभी आया है। समिती अब बनायी गयी है। इसका कोई प्रुफ दे दीजीए। उनपर भी केस दाखल करेंगे।

**मदन उदितनारायण सिंह :-**

डोनेशन लेते है और इस साल रिअॅडमीशन फीज लेते है। हर स्कुलवाले रिअॅडमिशन फीज लेते है। अभी समजो अपनी महापालिका के बच्चे है। महापालिका का स्कुल सातवी तक है। आठवी से वह प्रायव्हेट मे जायेंगे। तो जिस मॉ-बाप ने पहली से सातवी तक अपने बच्चे के इसपर एक रूपया खर्च नही किया है। वह प्रायव्हेट स्कुल मे आठवी मे जाएगा। तो पहले ही दिन उसको दस हजार खर्च करना पडेगा तो वो कहा से लाएगा? इसके लिए आपके पास कायदा-कानून कुछ है क्या? ऐसा कुछ नियम बनाया जाए की, जो महापालिका के बच्चे आठवी मे जाते है। उनसे डोनेशन और रिअॅडमिशन फीज नही लिया जाए।

**मा. आयुक्त :-**

इसलिए हमने ११ परमिशन दे दिए है। इसमे जो १० टक्के हर एक स्कुल मे है। उस १० टक्के मे सब बैठते है। नही बैठे तो सब स्कुल वालों को बुलाकर अकोमोडेशन करने के लिए बोल देंगे।

**मदन उदितनारायण सिंह :-**

एक सर्क्युलर दिया जाए, महापालिका के जितने भी बच्चे सातवी पास करके आठवी मे जाऐंगे। उनको कही भी डोनेशन नही देना पडे।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही याची जाहिरात काढा, सातवीनंतर पास झालेल्या मुलांनी आयुक्तांशी संपर्क साधावा. कोणाला माहिती नाही की, कुठल्या शाळांना परमिशन आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. आयुक्त महोदय, प्रत्येक शाळेमध्ये असे पाहण्यात आलेले आहे की, ज्यावेळेला मुले, त्यांचे पालक प्रवेश घेण्यासाठी शाळेत जातात. तो प्रवेश फॉर्म घेण्यासाठी २००-४००-५००- रूपये अशी आकारणी केली जाते. ती योग्य आहे का? शाळा असे घेऊ शकतात का याचे जरा उत्तर दयावे.

**मा. महापौर :-**

यासाठी शासनाने आत्ता समिती नेमलेली आहे. यापुढे कोणालाही कुठल्याही प्रकारची फीज घ्यायची किंवा फीजमध्ये वाढ करायची असेल किंवा अन्य पैशांमध्ये काही बदल करायचा असेल.....

**चंद्रकांत म्हात्रे :-**

पण आत्ता काय? आत्ता फॉर्म घेतल्याशिवाय, पैसे भरा, फॉर्म घ्या, नंतर ॲडमिशन मिळेल.

**मा. महापौर :-**

समिती आत्ता गठित केली.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

याच्यासाठी आपण काही कायदा केलेला आहे का?

**मा. महापौर :-**

आत्ता केला आहे. यापुढे असे होणार नाही.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आम्हाला त्याची प्रत मिळेल का?

**मा. महापौर :-**

देतो.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

सर्व नगरसेवकांना प्रत दया. म्हणजे आम्हालाही समजू शकेल.

**प्रशांत पालांडे :-**

भाईंदर पश्चिमेला ९० फुट रोडवर जी शाळा आहे तीला आपण वाढीव बांधकामाची परवानगी दिली आहे, काही तरी तीन माळे. त्या शाळेमध्ये आपली उर्वरित मुले अकोमोडेट होतील का?

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेबांनी तेच सांगितले. १० टक्के मध्ये जेवढे अकोमोडेट होतील ते पहिले करू या. उरलेले बाकीमध्ये करू या.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, इललिगलची यादी जरा झेरॉक्स मारू दया.

**मा. महापौर :-**

सर्वांना दयायला सांगतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, अभिनंदनाचा ठराव आहे. अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाला डिग्री फार्मासी, डिग्री इंजिनिअरिंग, पोस्ट ग्रॅज्युएशन, डिग्री मास्टर, इ.एन.डिग्नेस, ॲण्ड मिनी स्टेशन्स, मास्टर इन कम्प्युटर ॲप्लीकेशन या तांत्रिक कॉलेजना केंद्र शासनाने परवानगी दिलेली आहे. त्याबद्दल अभिनव संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रफुल्ल पाटील यांचे हार्दिक अभिनंदन मांडतो. तसेच श्री. प्रफुल्ल पाटील यांच्या स्वतःच्या ग्लोबल ट्रस्टला मिलीटरी स्कुल व एंजल सोसायटीला पायलट प्रशिक्षण कॉलेजची परवानगी मिळालेली आहे. त्याबद्दलही त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्याचा ठराव मांडत आहे. त्याचप्रमाणे आपल्या लोकसभा निवडणुकीमध्ये आपल्या १० ठाणे लोकसभा मतदार संघातून आघाडीचे उमेदवार डॉ. संजीवजी नाईक यांची बहुमताने निवड झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडतो.

**उमा पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ०१ :-**

अभिनव शेतकरी शिक्षण संस्थेला डिग्री इन फार्मसी, डिग्री इन इंजिनिअरींग, पोस्ट ग्रॅज्युएशन, डिग्री व मास्टर इन बिझीनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर इन कॉम्प्युटर ॲप्लीकेशन या तांत्रिक कॉलेजना केंद्रशासनाकडून परवानगी प्राप्त झालेली आहे. त्याबद्दल व अभिनव शेतकरी शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रफुल्ल काशिनाथ पाटील यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे श्री. प्रफुल्ल काशिनाथ पाटील यांच्या ग्लोबल ट्रस्टला मिलेट्री स्कुल व ॲंजल सोसायटीला पायलट प्रशिक्षण कॉलेजची परवानगी मिळाली आहे. त्याबद्दल ही त्यांचे मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे अभिनंदनाचा ठराव मांडत आहे. तसेच

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांचे उमेदवार डॉ. संजिव गणेश नाईक हे ठाणे लोकसभा मतदारसंघातुन प्रचंड मताधिक्याने खासदार म्हणून निवडून आलेले आहेत. त्याबद्दल त्यांचे मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर.** **अनुमोदन :- श्रीम. उमा पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**राजु भोईर :-**

पालघर लोकसभा मतदार संघातून बहुजन विकास आघाडीचे उमेदवार श्री. बळीराम जाधव बहुमताने निवडून आल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**मोहन जाधव :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ०२ :-**

बहुजन विकास आघाडी यांचे उमेदवार श्री. बळीराम जाधव हे वसई – पालघर लोकसभा मतदारसंघातुन प्रचंड मताधिक्याने खासदार म्हणून निवडून आलेले आहेत. त्याबद्दल त्यांचे मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. राजु भोईर** **अनुमोदन :- श्री. मोहन जाधव**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

जेवणाची सुट्टी जाहीर करत आहे.

(लंच टाईम दु. २.०० वा.)

**नगरसचिव :-**

जेवणानंतर सभेच्या कामकाजाला सुरूवात होत आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, त्या लक्षवेधीवर निर्णय झाला? मला वाटते तुम्ही जो आत्ता निर्णय दिला आहे. ते तुम्हीच दिलेल्या निर्णयाला ती विरूध्द स्टेटमेंट येत आहे. मागच्या वेळी जेव्हा डिस्कशन झाले होते. त्यावेळी तुम्ही असे सांगितले होते की, ज्या शाळांना परमिशन दिलेली आहे. त्या शाळांमध्ये १० टक्के सीट रिझर्व्हेशन महापालिकेसाठी, आणि ज्या शाळा आरक्षणांवर आहेत. त्या ठिकाणी १०+१० =२०% हे प्रोसिडींग काढून बघा. तुम्ही दिलेले स्टेटमेंट आहे.

**मा. महापौर :-**

आपण असे म्हटले होते की, आरक्षणामध्ये ज्या जागा डेव्हलप झालेल्या आहेत.

**अनिल सावंत :-**

टाऊन प्लानिंगने त्यांना शाळेसाठी परमिशन दिले.

**मा. महापौर :-**

रिपीट करतो. जी काही आरक्षणे असतील आणि आरक्षणामध्ये स्कुल बांधले गेले आहेत. त्याच्यामध्ये महापालिकेचे १० टक्के ॲडमिशन असावे. दुसरा विषय असा होतो, ज्याला टॅक्स सवलत.

**अनिल सावंत :-**

टॅक्स सवलतीच्या वेळेला तो विषय डिस्कस झालेला.

**मा. महापौर :-**

५० टक्के सवलत देताना त्याच्याकडून १० टक्के वेगळे घ्यायचे असे ठरले होते.

**अनिल सावंत :-**

तुम्ही २० टक्के केले होते.

**मा. महापौर :-**

जो सवलत घेईल त्यांनाच, पण मी आत्ता विचारले तर ते बोलतात की, अजून कोणी सवलत घेतली नाही.

**अनिल सावंत :-**

आत्ता याच्यानंतर ज्या २३ शाळांवर आपण कार्यवाही करणार आहोत.

**मा. महापौर :-**

गुन्हा दाखल करणार.

**अनिल सावंत :-**

अधिक दिल्ली बोर्डच्या शाळा.

**मा. महापौर :-**

जेवढ्या इललिगल शाळा आहेत. दिल्ली बोला, इंटरनॅशनल बोला किंवा काही बोला.

**अनिल सावंत :-**

त्याची माहिती जरा सर्व सदस्यांना मिळावी. जेणेकरून त्या संपूर्ण एरियामध्ये ती माहिती पोहोचली जाईल.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, महत्वाचा विषय होता. तो विषय पंधरा मिनिटात होईल.

**मा. महापौर :-**

प्रोसिडींग होऊ दया.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब तुमच्या परवानगीने बोलते. सहा महिन्यापासून त्या कातकऱ्यांना......

**मा. महापौर :-**

तो विषय आहे. नंतर बोला.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०१, दि. १०/१०/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**आसिफ शेख :-**

पान नं. ४१ वर आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण नियम २००८. ते संपूर्ण जे यादीमध्ये दिले आहे. त्यामध्ये पान क्र. ०७. नामनिर्देशनाव्दारे करावयाच्या नियुक्तीसाठी कर्मचारी निवड समितीची रचना खालीलप्रमाणे असेल. त्यामध्ये एक दुरूस्ती अशी आहे की, शासनाचा जीआर आहे. मी सन्मा. आयुक्त महोदयांना दिलेला आहे. त्यानुसार अल्पसंख्यांक उमेदवाराचापण त्यामध्ये समावेश असावा. त्याप्रमाणे ती दुरूस्ती करून घ्यावी. आणि तसेच पान नं. ०८ वर आपण एक म्हटले आहे. चार मध्ये, पदोन्नतीने नेमणुकीकरीता कार्यपध्दती. त्या कार्यपध्दतीमध्ये अ, ब आणि क. 'क' मध्ये एक दुरूस्ती अशी आहे की, ज्यांच्याविरूध्द विभागीय चौकशी चालू आहे व जो निलंबीत आहे. त्यांचीही नावे जेष्ठता अनुक्रमाने यादीत येत असल्यास अशी यादीतून वगळण्यात येऊ नयेत. ते येऊ नये मला वाटते चुकीने झाले असेल किंवा कम्प्युटर मिस्टेक झाले असेल. तर वगळण्यात यावे अशी दुरूस्ती करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपल्या सेवाशर्तीचे या इतिवृतांमध्येच आहे ना? याच्यामध्ये मला ते सुचवायचे होते. श्रेणी-०१, उद्यान सेवा......

**मा. महापौर :-**

दुरूस्ती असेल तर सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

दुरूस्ती म्हणजे शासनाकडे सेवाशर्ती ऑलरेडी पाठवलेली आहे.

**मा. महापौर :-**

पेज नंबर काय आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

पेज नंबर ५०, उदयान विभाग.

**मा. महापौर :-**

५० नंबरवर कोणता पॅरेग्राफ?

**प्रेमनाथ पाटील :-**

५३ बघा. त्याच्यामध्ये आपल्याकडे मान्यताप्राप्त कृषी विदयापीठ, फुले, शेती, प्रांगण, उदयान पदविका कृषी व्यवसाय व व्यवस्थापन पदविका, भाजीपाला उत्पादन पदविका परिक्षा उत्तीर्ण पाहिजे असे दिलेले आहे. पण शासनाकडून आलेले आहे की, मान्यताप्राप्त कृषी विदयापिठाची बी.एससी. हॉर्टीकल्चर, ॲग्रीकल्चर, बॉटनी, फॉरेस्टीक पदवी मान्यताप्राप्त विद्यापिठाचा वनस्पतीशास्त्रातील पदवी उत्तीर्ण पाहिजे. म्हणजे याच्यामध्ये भाजीपाल्याचे काय? भाजीपाला पिकवायचा आहे का?

**मर्लिन डिसा :-**

उसके अंदर भाजीपाला क्यो लिखा है?

**प्रेमनाथ पाटील :-**

भाजीपाला म्हणजे काय आहे? म्हणजे आपल्या मिरा भाईंदरमध्ये भाजीपाल्याचे करणार आहेत का?

**मा. महापौर :-**

शासनाने ते दिले होते. आपण हा ठराव केला. हा परत गव्हर्नमेंटलाच मंजुरीला जाईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

गव्हर्नमेंटला जाणार. पण शासन मग त्यांच्या हिशोबाने करणार की आपण आपले...

**मा. महापौर :-**

आपण आपल्या हिशोबाने मा. महासभेने केलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

पण त्याच्यामध्ये ही एक अट टाकून घ्या.

**मा. महापौर :-**

मा. महासभेने आपल्याला पाहिजे त्याप्रमाणे ठराव करून दिलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

पण आत्ता हे विद्यापीठाची बी.एससी. हॉर्टीकल्चर मागितलेला आणि याच्यामध्ये फक्त भाजीपाला पदविका डिप्लोमा पाहिजे. म्हणजे आत्ता एस.एस.सी. पास वाल्यांना....

**मा. महापौर :-**

ऑलरेडी रिसॉलेशन झालेला आहे आणि शासनाला मंजुरीसाठी जाईल. त्याच्यामध्ये काही दुरूस्ती असेल तर आपण सांगा. आत्ता काही बदल करता येणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग याच्यामध्ये अट टाका.

**मा. महापौर :-**

टाकता येणार नाही. ठराव ऑलरेडी केलेला आहे.

**अनिल सावंत :-**

पण आपण ठरवलेले वेगळे आहे आणि आम्हाला दिलेले आहे ते वेगळे आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

**मा. महापौर :-**

हा ठरावाचाच भाग आहे ना?

**अनिल सावंत :-**

आपण जो ठराव केला होता. त्याच्यामध्ये बी.एससी.हॉर्टीकल्चरची पदविका पाहिजे आहे. हा तुमच्या प्रोसीडींगमध्ये चेंज कसा झाला?

**प्रेमनाथ पाटील :-**

याच्यामध्ये बदल केलेला आहे.

**मा. महापौर :-**

शासनाने जे दिलेले. त्यानंतर आपण  बदल करून सेवशर्ती नियम आपल्याप्रमाणे बनवले.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये त्यांनी ५३ नंबरला चेंजेस केले. आपला जो महासभेचा ठराव झाला त्याच्याप्रमाणे तो नाही. आपण ठराव केला होता तो मान्यताप्राप्त कृषी विदयापिठाची बी.एसी.हॉर्टीकल्चरची, ॲग्रीकल्चर, बॉटनी फॉरेस्ट पदवी.

**प्रेमनाथ पाटील :-**

अनुभव पण सात वर्षाचा सांगितला होता. याच्यामध्ये तीन वर्षे लिहिला आहे.

**अनिल सावंत :-**

आपण हा ठराव दिला होता. प्रोसीडींग देतेवेळी प्रशासनाने याच्यामध्ये काहीतरी गोंधळ केलेला आहे.

**मा. महापौर :-**

तिघांच्याही सह्या आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तीनही याच्यामध्ये तसेच केले आहे. उपवृक्षसंवर्धन आणि सहा. वृक्षसंवर्धन या तीनही मध्ये चेंजेस केलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, प्रत्यक्षात जो ठराव झाला. त्या ठरावाप्रमाणे ज्या दुरूस्त्या झाल्या. ते गव्हर्नमेंटकडे मंजुरीसाठी पाठवले आहे. आणि मा. महासभेने केलेल्या ठरावाप्रमाणेच ते आहे. प्रशासन बदल

करू शकत नाही. आणि गव्हर्नमेंटला वाटले की, त्यामध्ये चेंज करून मंजुर करावे तर चेंज करून मंजुर करतील.

**जयंत पाटील** :-

दि. १०/१०/२००८ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**मा. महापौर :-**

दुसरा विषय घ्या.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलतो. मा. महापौर साहेब, प्रत्येक वेळेला मी पण बोललो आहे आणि सन्मा. सभागृह ही बोललेले आहे. इतिवृत्तांत मंजुर करतो. इतिवृत्तांतमध्ये ठराव झालेले अहोत. त्याच्यावर अंमलबजावणी करताना कधी दिसले नाहीतच. ठराव केल्यानंतर अंमलबजावणी होत नाही. मी कितीदा तरी मा. महासभेत ना फेरिवाला झोनचे, रस्त्यावर वाहने उभी असतात त्याबद्दल बोललो. परंतु, त्याच्यावर कधीच अंमलबजावणी होत नाही. का? प्रभाग अधिकारी त्याच्यामध्ये मिळालेले असतात का? आपण जो बाजार लिलाव देतो त्याच्याशी संबंधीत असतात का? का उचलत नाही? आज आमचा बी.पी.रोड एवढा कन्झस्टेड आहे की, शाळेच्या बसेस वगैरे सुरू झाल्यानंतर खारीगावच्या नाक्यावरून जरी आपल्याला स्टेशनला जायचे असेल तरी १० मिनिटे लागतात. रिक्शाने तर जाऊच शकत नाही. मग तिकडे ना-फेरिवाला झोन असूनसुध्दा तिकडे फेरिवाले बसतात. आणि बाजार लिलावाला अटीशर्तीमध्ये नमुद नसताना तो वसुली पण करतो आणि आपला फुटपाथपण क्लिअर नसतो. मग आम्ही हे ठराव करून काय फायदा? जर आज इतिवृत्ताला मंजुरी दिली. त्याच्यावर अंमलबजावणी कधी होणार? त्याच्यामध्ये ना-फेरिवाला क्षेत्रामधील वाहनांबद्दल आलेले आहे. गोल्डन नेस्ट पासून फाटकापर्यंत टेम्पो स्टॅन्ड अगोदर उचलेला होता. परत तिकडे पिवळा पट्टा लागल्यानंतर लाईनने वाहने लागू लागली. म्हणजे तो रस्ता आपण वाहनांसाठी बनवला पण पार्किंगसाठी बनवला नाही हे निश्चित आहे. मग आपण त्याच्यावर काय करणार? त्याचप्रमाणे आपला नवघर -फाटक रोड आहे. त्याच्यावर ब-याच गाड्या पार्किंगसाठी उभ्या राहिलेल्या असतात. त्यांच्या फॅक्टरी आतमध्ये असतात. परंतु पार्किंगसाठी रस्त्यावर उभ्या राहिल्याने तिथेपण रस्त कंजस्टेड होतो. तसाच केबिन रोड अरूंद आहे. तिथेही ट्रान्सपोर्टवाल्यांच्या गाड्या नेहमी उभ्या राहिलेल्या असतात. आणि ट्रान्सपोर्टवाले नेहमी गर्दीच्या वेळेलाच तिकडे आपला माल उतरण्यासाठी येतात. त्याच्यावर कधी कार्यवाही करणार? याचा जरा खुलासा केला तर बरे होईल. आणि मी प्रत्येक वेळी ज्यावेळी प्रभाग अधिका-यांशी संपर्क केला त्यावेळी आमच्याजवळ मनुष्यबळ नाही. आणि ते फेरी मारताना पण ना-फेरिवाला क्षेत्रात तीन वाजता फेरी मारतील. नंतर त्यांना उचलायला येणारच नाहीत की त्यांचे ठरलेले आहे, रक्कम पोहोचली आहे असा अर्थ आम्ही धरू का? कृपया याचा खुलासा करावा आणि त्याच्यावर लवकर अंमलबजावणी व्हावी . मा. आयुक्त साहेब, आपल्याकडे ब-याच आशा आहेत की, या मिरा भाईंदरला आपण जरा सुधारा. कारण तीच रेकॉर्ड वाजवण्यापेक्षा आणि पावतीपण वीस रूपयांची तीस रूपये घेतात.

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, या संदर्भातच माझा दुसरा प्रश्न आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरसुध्दा फेरिवाले बसायला सुरूवात झालेली आहे. आपण म्हणतो की, जे मिरा भाईंदरचे नाक आहे. जिथून आपले अधिकारी रोज येतात, रोज जातात. तरीसुध्दा या रोडवर फेरिवाले बसतात. चायनिजचे स्टॉल आहेत. फ्लायओव्हर उतरल्यानंतर सगळ्या आईस्क्रिमच्या गाड्या आहेत. निधी हॉटेलच्या बाजूला सगळ्या फेरिवाल्यांच्या गाड्या आहेत. ते उचलणे आपल्यासाठी प्राथमिक नाही का? आणि काय कोणी तक्रार केल्यानंतरच उचलण्यासारखे आहे असे नाही ना? तुम्हाला दिसते. अधिकारी रोज तिथून येत असतात. तो रोड खाली करायला पाहिजे की नाही? आत्ता मिरा भाईंदरमध्ये अशी परिस्थिती आहे की, जिथे तुम्ही रोड बांधला तर फेरिवाले पहिले बसायला सुरूवात होतात. मग ते तक्रार केल्यानंतरच उचलायला पाहिजे का? याचाही खुलासा करा.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, मी दोन वर्षापासून या सभागृहामध्ये बोंबलते की, भाईंदर सेकंडरीपासून सगळे फेरिवाल बसतात. त्याच्यामध्ये आपल्या महापालिकेच्या बस चालतात. त्यानंतर आपली शाळा सुटते. बरीचशी वाहने चालतात. साहेब, याच्यामध्ये कोणाचा काही अपघात झाला तर त्याला जबाबदार कोण?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मंडेमार्केट परत आत्ता जोरात चालू आहे. स्टेशनवरून जे लोक येतात. त्यांना जबाबदारी जागा मिळत नाही. इतके फेरिवाले बसलेले असतात की, विचारून सोय नाही. तो सोमवार बाजार पुन्हा एकदा जरा बंद करायला लावा.

**मर्लिन डिसा :-**

ना-फेरिवाला झोनमे बार-बार लेटर देने के बाद भी फेरिवाले बैठे रहते है। हमारे अधिकारी कुछ करते नही है।

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, पुनम सागरमध्ये १०० फुट रोडवर संध्याकाळच्या वेळेला एक बाजू फेरिवाल्यांनी पुर्ण ब्लॉक केलेली असते. म्हणजे त्या ठिकाणी गाडी येऊच शकत नाही. तसेच मिरारोड स्टेशन जवळ पूर्ण झालेले आहेत.

**मा. महापौर :-**

आपण जे बोलता त्या ठिकाणी अशा प्रकारच्या कार्यवाहीला जेव्हा आम्ही जातो, ज्यावेळी अधिकारी कार्यवाहीला जातात. ते गोणी, टोकरी घेऊन येतात. बाकी कार्यवाही करत नाहीत. आत्ता मी कार्यवाही केली तर तुमच्या नगरसेवकांनी सांगितले की, हिरोगीरी कशाला? आता यात करायचे ते मला नक्की समजत नाही. अधिका-यांचे म्हणणे होते की साहेब, आम्ही जातो. तिकडे २५-३० लोक असतात. दादागिरी करतात आणि आपल्याला दरवेळी डे-टू-डे पोलीस दल भेटत नाही. आणि ज्यावेळी आम्ही हार्ड ॲण्ड फास्ट कार्यवाही करतो त्यावेळी अशा प्रकारची भुमिका येते.

**अनिल सावंत :-**

अशी लोकप्रतिनिधींची नावे जाहीर करा. ना-फेरिवाला क्षेत्रामध्ये जर फेरिवाले बसत असतील आणि पालिका कार्यवाही करत असेल आणि लोकप्रतिनीधी त्यांना विरोध करत असतील तर त्यांची नावे जाहिर करा.

**मा. महापौर :-**

आत्ताच श्रीम. शानु गोहिल मॅडम बोलल्या.

**अनिल सावंत :-**

आत्ता त्या नाहीत. म्हणजे त्या विषयावर बोलणे बरोबर नाही.

**मा. महापौर :-**

मी त्यांना आरोप करत नाही. माझे मत असे होते की, ना-फेरिवाला क्षेत्र होते, ज्यावेळी तक्रार आली. आणि याप्रकारे तक्रार केली की, फक्त टोकरी उचलून घेऊन जातात. काही कार्यवाही करतच नाहीत. म्हणून मी बोललो की, मी स्वतः येतो त्यावेळी कार्यवाही केली. त्यानंतर बराचसा विरोध झाला. लेडीज मिटींग घेतली....

**अनिल सावंत :-**

तुम्ही गेलात म्हणून प्रॉब्लेम झाला. मा. आयुक्तांना पाठवायला पाहिजे होते. तुम्ही गेलात म्हणून त्याला पॉलीटीकल रंग आला.

**मा. महापौर :-**

त्यावेळी मा. आयुक्त जागेवर नव्हते. त्यामुळे मी गेलो होतो.

**अनिल सावंत :-**

त्यांचे कोणीतरी सबॉर्डिनेट असतील ना?

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण या बाजारवाल्यांच्या बाबतीत अटीशर्ती मध्ये या आदिवासींकडून पैसे घ्यायचे नाहीत. असा एक नियम आहे. तरीसुध्दा आपल्या महापालिकेच्या समोर दर रविवारी शेवळे घेऊन येतात. छोटे छोटे जंगली पालक घेउन येतात आणि आंबे पडलेले असतात ते घेउन येतात. असे शंभर-एक रूपयांचे जेमतेम घेऊन येत असतील. त्यांच्याकडून हे लोक वीस रूपये वसूल करतात. एका वेळेला मी पैसे घेऊन पोलिस स्टेशनलासुध्दा दिलेले. तरीसुध्दा ती कार्यवाही होत नाही. साहेब, यांच्यावर तुम्ही कार्यवाही करा, आदिवासींच्या बाबतीत......

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, सोमवार बाजार मिरारोड स्टेशन आणि पुनम सागर, १०० फीट.

**दिप्ती भट :-**

सेक्टर-४ आणि २, त्याच्यामध्ये भऱपूर बसतात. सर्व सोसायटीचे लेटरपण आले आहेत. मी तुम्हाला दिले आहे. फोटोग्राफ्स पण दिले आहेत. सगळे झाले आहे आणि ठरावपण पास झालेला की, बंद होणार तरी ते बंद झाले नाही. आणि वीस रूपयांऐवजी जे शंभर रूपये पण घेतात पन्नास रूपये पण घेतात म्हणजे पावती कोण बनवतो? आपण बनवतो? त्याचे नंबर आपण नोट करतो का? म्हणजे कुठल्या पध्दतीने आपण त्यांना देतो? म्हणजे नाफेरिवाला क्षेत्रामध्ये ते कुठेपण लावू शकतात? दादागिरी करू शकतात? आम्ही त्यांना बोलायला जातो तर ते आम्हाला पण ओरडतात. म्हणजे जर तुमच्याने होत नाही तर तुम्ही पोलिस बंदोबस्त घ्या आण करा. आपण असे बोलणार की, आमच्याशी होणार नाही. आम्हाला हे करतात. मग काय फायदा? आपल्याला घाबरत नाही तर नगरपालिका कसली?

**मा. आयुक्त :-**

कोण म्हटले की, घाबरत नाही?

**दिप्ती भट :-**

म्हणजे ती माणसे उठून जायला पाहिजेत ती कुठे जातात? उलट ते आपल्यला दादागिरी दाखवतात. यांना विचारा. मागे श्रीम. प्रेरणा भाटकर यांच्याकडे एक प्रकरण पण झाले. पोलिस आले आणि गेले. त्याने चायनिजची गाडी महानगरपालिकेच्या गाडीमध्ये होती ती उतरवून परत त्या ठिकाणावर ठेवली. आणि आपली माणसे पळून गेली. हे प्रकरण पोलिस स्टेशनमध्येपण झाले. पण त्याचे काही नाही.

**मा. आयुक्त :-**

या आठ दिवसांमध्ये ज्या ज्या भागातील नो-हॉकर्स, नो-पार्किंगमध्ये जे लोक बसतात ते संपूर्ण हटवले जाईल आणि पुन्हा बसू दिले जाणार नाही. मी ट्राफीक पीएसआय बोलवले होते. नो-पार्किगमध्ये असलेल्या गाड्या उचलायला त्यांना टोईंग व्हॅन दिलेली आहे. ट्राफीक कंट्रोल करायचे काम ट्राफीकवाल्यांनी करायचे आहे. त्यांना टोईंगव्हॅन आणि कर्मचारी दिलेले आहेत. आणि जे फेरिवाले क्षेत्र नाही त्या ठिकाणी जे फेरिवाले बसत असतील ते साहित्यानिशी उचलून आणून तिथे बसू दिले जाणार नाहीत. आणि आदिवासींच्या बाबतीत पहिल्यांदा आदिवासींचे आयडेंटीकार्ड दिले जाईल. आणि त्यांच्या आयडेंटी कार्ड वरून त्यांच्याकडून वसुल करू नये असे आदेश काढले जातील.

**रामनारायण दुबे :-**

टोईंगवाले को कौनसे तारीख ये टेंडर दिया गया है?

**मा. आयुक्त :-**

ट्राफीक इन्स्पेक्टर को दिया है।

**रामनारायण दुबे :-**

कभी ये दिया गया है? कितना महिना, कितना दिन हुआ है?

**मा. आयुक्त :-**

एक महिना झाला.

**रामनारायण दुबे :-**

मेरे कार्यालय के सामने ट्रक खडा रहता है। उधर आनेजाने के लिए बच्चो को, बस को तकलीफ हो रहा है। उसके लिए कोई भी जबाबदार है। मै छह महिनेसे इन्क्वायरी कर रहा हू।तो कोई ऑफीसर को मालूम ही नही की, यह अनधिकृत मे आता है की बांधकाम मे आता है। टोचन किसमे आता है?

**मा. आयुक्त :-**

ट्राफीक इन्स्पेक्टर के पास नो-पार्किंग मे गाडीया खडी कर रहे है तो उनको निकालनेके लिए टोईंग व्हॅन और स्टाफ दिया है। उनकी जिम्मेदारी है। उनको समझाया। उनका मिटींग लिया।

**रामनारायण दुबे :-**

कमिशनर साहब, आज तक उन्होने एक भी गाडी उठाया है क्या?

**एस्.ए.खान :-**

साहेब ते ट्राफीकवाले कुठे बसतात?

**मा. आयुक्त :-**

त्यांचे ऑफीस आहे.

**एस्.ए.खान :-**

कुठे आहे?

**रामनारायण दुबे :-**

साहब, उन्होंने कौनसा गाडी उठाया? उस गाडी का नंबर बताइए।

**जुबेर इनामदार :-**

त्यांचे म्हणणे आहे की, आम्हाला टोईंग व्हॅन उपलब्ध नाही.

**मा. आयुक्त :-**

त्यांची जबाबदारी आहे. आम्ही टोईंग व्हॅन देऊन मदत करतो आहे.

**रामनारायण दुबे :-**

साहेब, टोचनवाली गाडी का नंबर क्या है।

**मा. आयुक्त :-**

टोईंगवाल्यांचे नाही. ती गाडी ट्राफीक पोलिसांकडे आहे. आपण मदत करतो. गाड्यांची व्यवस्था त्यांनी बघायची आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

कार्यवाही कुठे होते?

**मा. आयुक्त :-**

आमच्याकडे जसे कार्यवाही होत नाही, असेच होते. तसे ट्राफीकवाल्यांकडेपण विचारणा करा की, तुम्हाला इथे कशासाठी नेमले आहे.

**एस्.ए.खान :-**

ते काशिमीराला आहे काय?

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही आदिवासींना दयाल तर स्थानिक नगरसेवक...

**मा. आयुक्त :-**

ते आयडेंन्टी कार्ड घेऊन, सही करून देतो.

**मिलन पाटील :-**

स्थानिक नगरसेवकांचा दाखला दया.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

काशिमिरासाठी टोईंग वाहन दिले आहे का?

**दिपक खांबीत :-**

आपण त्यांना दर मंजुर करून दिले आहेत.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, आज आपण फेरिवाले उचलतो. महानगरपालिकने ठराव केलेला आहे. साहेब, आज नवघर रोडला, छोटासा रोड आहे, दोन्ही बाजूने फेरिवाले बसलेले आहेत. आणि दोन्ही बाजूने आपण जे फुटपाथ बनवलेले आहेत. त्या फुटपाथवर सर्व दुकानवाले सामानवाले, चहावाले, पानवाले सगळे टपऱ्या लावून बसले आहेत. तर लोकांना......

**मा. आयुक्त :-**

फेरिवाल्यांबाबत आठ दिवसात कार्यवाही होईल हे प्रत्येकाला उत्तर दयायचे नाही. आम्ही आठ दिवसामध्ये सगळे मोकळे करू.

**रामनारायण दुबे :-**

टोचन गाडी नंबर दिजीए।

**मा. महापौर :-**

आपको बाद मे देता हूॅं।

**रामनारायण दुबे :-**

तकलीफ होगा तो किसको कॉन्टॅक्ट करते का? गाडी उठाने के लिए कम्प्लेन्ट करना है तो किसको कम्प्लेंट करने का?

**मा. महापौर :-**

ट्राफिकवालोंको।

**रामनारायण दुबे :-**

ट्राफीकवालोंका नंबर दिजीए।

**मा. महापौर :-**

बाद मे आपको देता हूॅं।

**दिनेश नलावडे :-**

मा. आयुक्त साहेब, माझा प्रश्न फेरिवाल्यांबद्दल नाही. जे फुटपाथवर सामान ठेवतात. त्यांच्यावर काय कार्यवाही करणार आहात?

**जुबेर इनामदार :-**

टोईंग व्हॅन कोणाकडे आहे? महापालिकेने त्यांना टोईंग व्हॅन दिली आहे का?

**मा. आयुक्त :-**

महापालिकेने टोईंग व्हॅन भाड्याने घेउन ट्राफीक इन्स्पेक्टरला दिलेली आहे. ते म्हणाले की, आम्हाला गाड्या उचलायला टोईंग व्हॅन नाही. मी भाड्याने घेउन दिले.

**जुबेर इनामदार :-**

आपण दिलेली आहे का?

**मा. आयुक्त :-**

आपण मदत करतो. त्यांची जबाबदारी आहे.

**जुबेर इनामदार :-**

कदाचित महापालिकेने काय केले असेल. आर.टी.ओ किंवा ट्राफीकवाल्यांचे स्पष्ट मत असे आहे की, आमच्याकडे महापालिकेने टोईंग व्हॅन उपलब्ध करून दिलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

पंधरा दिवसांपूर्वी माझी मिटींग झाली. टोईंग व्हॅनचे कॉन्ट्रक्टर आणि त्यांना जोडून दिले. त्यांच्याकडे टोईंग व्हॅन पाठवलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

आपण टोईंग व्हॅनचा ठेका दिलेला आहे का?

**मा. आयुक्त :-**

होय दिला आहे.

**जुबेर इनामदार :-**

किती तारखेपासून दिला आहे.

**रामनारायण दुबे :-**

मा. महापौर साहब, कमिशनर साहब, बोल रहे थे की, देकर एक महिना हुआ। अब १५ दिन पर आ गए।

**मा. महापौर :-**

ज्यावेळी आम्ही मा. आयुक्त साहेबांच्या अगोदर बैठक घेतली होती. त्यावेळी त्यांचे असे म्हणणे होते की, आमच्याकडे आमच्या डिपार्टमेंटने टोईंग व्हॅन दिलेलीच नाही. म्हणून आम्हाला कार्यवाही करता येत नाही. मग श्री. जाधव साहेबांनी आणि आम्ही सर्व गटनेत्यांनी निर्णय घेतला की, कमीत कमी आम्ही टोईंग व्हॅन देऊ. तुम्ही कार्यवाही सुरू करा. आत्ता त्यानंतर प्रॉब्लेम आला की, याचे किती पैसे घ्यायचे? टोईंग व्हॅनचे किती आणि त्यांचे उचलायचे किती ? तो एक इश्यु माझ्या माहितीप्रमाणे पेन्डींग होता की, महापालिकेला त्यांना किती अमाउन्ट दयायचे. पर टोईंग व्हॅनचे भाडे दयायला पाहिजे. एखाद्याचे जर गाडीचे तीनशे रूपये घेतले तर महापालिकेला १०० देणार, दिडशे देणार, पन्नास देणार? कारण ते टोईंग व्हॅन आमचे काम नाही. आरटीओ ऑफीसचे काम आहे. जर त्यांनी भाड्यावर घेतली असतील तर त्यांना पैसे भरावे लागले असते. आपण दिल्याप्रमाणे त्यांनी पर गाडी आपल्याला पैसे दयायचे. माझ्या माहितीप्रमाणे, तो इश्यु पेन्डींग असावा.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे साहेब, याचा अर्थ तोच झाला की, निर्णय घेण्यात आलेला नाही.

**मा. महापौर :-**

तो निर्णय झाला म्हणूच टोईंग व्हॅन घेऊन दिले.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, महापालिकेला त्याचे पैसे परत येणार आहेत की, नाहीत? तुमचे म्हणणे बरोबर आहे. उचलेल्या गाडीच्या मागे जी दंडवसुली केली जाईल. त्याचा निम्मा पैसा महापालिकेला आणि निम्मा ट्राफीकला जातो. ही पध्दत आहे. त्या विषयाबद्दल निर्णय झाला आहे का? त्यांना ही त्याची माहिती नाही आणि त्यांचे स्पष्ट मत आहे की, आमच्याकडे गाडी नाही.

**मा. महापौर :-**

पैसे १०० टक्के त्यांनाच जातात पण आपण त्यांना टोईंग पुरवलेली आहे म्हणून त्यांनी आपल्याला पैसे दयायला पाहिजे. परत त्यांना बोलवा आणि...

**जुबेर इनामदार :-**

विषय संपवायचा आहे. कारण शहराकरिता ही गरजेची बाब आहे.

**मा. महापौर :-**

साहेब, हॉकर्स बरोबर हेही विषय संपवा.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, दुकानवाले फुटपाथवर सामान ठेवतात त्यांच्याबद्दल काय निर्णय घेणार आहात? ठेकेवाले त्यांच्याकडूनही पैसे घेतात. आणि सगळ्या फुटपाथवर दुकानवाले सामान ठेवून लोकांना चालायला मिळत नाही.

**मा. आयुक्त :-**

जो ठेकेदार जास्त रक्कम घेईल त्याच्यावर कार्यवाही केली जाईल.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, टेम्पो स्टॅन्ड बद्दल, टेम्पो, ट्रक टेम्पो स्टँडला लागलेले आहेत ते काढणार ना?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आपण एवढा मोठा महाराष्ट्र शासनाच्या जी.आर. चा बंच नगरसेवकांना दिलेला आहे. मी आधीपण बोललो की, एवढा बंच पाठवतात. त्यामध्ये काही महत्वाचे विषय असतात. यामध्ये तीन महत्वाचे विषय आहेत. कोणी वाचले की नाही हे मला माहिती नाही. एक कर आकारणीमध्ये आगाऊ रक्कम दिल्यावर महापालिकेला त्याला सुट देता येते.

**मा. महापौर :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवालजी, यह जी.आर. विषय महत्वका विषय है। इसपर आखीर मे चर्चा करेंगे।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

होता नही है। जो जो अधिकारी पैसा मिलता है वह सभागृह मे बरोबर आता है। पब्लीक का नही आता है।

**मा. महापौर :-**

विषय के बाद चर्चा करते है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यह टॅक्स का है। लोगो को रिबेट देने का जीआर है । वह विषय इधर नही आता है ।

**प्रकरण क्र. ०१ :-**

दि. १०/१०/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०३ :-**

दि. १०/१०/२००८ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

काही अधिकारी आले आहेत. ते आपल्याला मार्गदर्शन करणार आहेत.

**नगरसचिव :-**

मी विषयाचे वाचन करतो. प्रकरण क्र. ०२, केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत परिवहन सेवेकरिता २५० बस खरेदी करणे करिता येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत व अनुदानाकरिता सदर प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे अग्रेसीत करणेबाबत. (दि. २२/०५/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. ०५)

**जयंत पाटील :-**

केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. कार्यक्रम अंतर्गत....

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सभागृह नेते साहेब, मी फक्त एक सेकंद बोलते मी मागच्या वेळेला पण विषय बोलेले. पुन्हा-पुन्हा बोलते. कोणाला पटते की नाही ते बघा. आपण कशासाठी या विषयपत्रिका आणि महासभा चालवायच्या? मागचे इम्प्लीमेंन्टेशन काय झाले ते मला सांगा ना. ह्या निवडणुका होऊन तुम्ही महापौर झालात त्याला या सप्टेंबरमध्ये दोन वर्षे होत आहेत. तुमच्या महापालिकेची महिला बालकल्याण समिती नाही. तुमच्या कोणत्याही वैधानिक समित्या नाहीत. तुमच्या प्रभाग समित्या नाहीत. तुमचे होणारे विषय त्यांचे पुढे काय वाटोळे होते त्याचा कुठेही लेखाजोखा नाही. या मा. महासभा का करायच्या? माझा सगळ्या सभागृहाला प्रश्न आहे की, महासभा का करायच्या? फक्त इथे येऊन ओरडायचे, गोंधळ घालायचा. पालिका कर्मचाऱ्यांनी आपली छानपैकी मजा बघायची. एक वेळचा नास्ता घ्यायचा, जेवण घ्यायचे आणि आपण निघून जायचे याचे पुढे काय? तुम्ही याचे उत्तर दया आणि मग पुढे चालवा. त्याशिवाय ठराव मांडायचा नाही. ठिक आहे, प्रभाग समित्या आणि महिला बालकल्याण समित्या आमच्या गोंधळामध्ये गेल्या. आत्ता तोही गोंधळ संपलेला दिसतो. मी सर्व पक्षांच्या नेत्यांना असे आवाहन करेन की, ह्या शहराचा विकास साधायचा असेल तर सगळे गोंधळ आजच इथे मिटवा. निदान त्या समित्यांचा तरी मार्ग मोकळा करून दया. राहता राहिला, मा. महापौर म्हणून तुमचा प्रश्न. तुमच्या कालखंडामध्ये जेवढे विषय झाले, सगळ्या समित्यांशी विषय होता बार मालकांचा. मिरा भाईंदरला लॉज आणि बार पाच-पाच मिनिटांच्या अंतरावर आहेत. त्याच्यासाठी केवढा मोठा गदरोळ. मला वाटते श्री. अनिल सावंत यांनी लक्षवेधी पण आणलेली. आणि हा विषय सतत गाजत होता. मग आम्ही त्याची कमिटी स्थापन करू. मग तीचा अहवाल. त्या अहवालाचे काय झाले? तो अहवाल कोणासमोर आला? त्याचे कनेक्शन तोडू, त्याचे लाईट तोडू, काय करू. त्याच काळामध्ये फ्लायओव्हर जवळ नवीन लॉज ओपन झाली.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपल्या महापालिकेमध्ये दोन आयुक्त येऊन गेले. पण आत्ता मला वाटते श्री. शिवमुर्ती नाईक साहेब, आपल्याकडे आले तर सगळ्या कमिटी लवकरात लवकर बनतील.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, मागच्या वेळेला आपण केले होते. आम्ही अकार्यक्षम अधिकारी चेंज करण्याचे ठराव केले होते. आपला ठराव करून आज चार महिने झाले, आजसुध्दा श्री. इरकर याच्यावर कार्यवाही होत नाही. आणि जे अधिकारी अकार्यक्षम आहेत त्यांवर सुध्दा आम्ही ठराव केलेले आहेत. त्या ठरावांची अजून अंमलबजावणी होत नाही. प्रशासन करते काय? साहेब, तुम्ही याच्यावर पुन्हा लक्ष घातले? तुम्हाला आत्ता एक दोन महिने झाले. आम्ही काहीच बोलू शकत नाही. तर तुम्ही याच्यावर कार्यवाही करू शकता. श्री. इरकर काही कामाचा नसताना त्याच्यावर मा. महासभेने केलेले आहे. सर्वांनुमते झालेले आहे. तो त्या लायकीचा माणूस नाही तरी सुध्दा आज तो माणूस त्या पदावर बसलेला आहे.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, ७ जानेवारीला मी लॉजींग बोर्डींगवर लक्षवेधी आमली होती. संपूर्ण सभागृहाने त्याला एकमुखी मान्यता देऊन ह्या शहरातील जे लॉजींग बोर्डींग आहेत त्यांच्यावर कडक कार्यवाही करा. असा निर्णय झाला होता. मा. महापौर, आपण सांगितले होते की, पुढच्या सभेमध्ये मी रितसर विषय आणतो. ती वेळ अजूनपर्यंत आली नाही. तुमची यांच्यावर कार्यवाही करायची मनस्थिती नाही का?

**मा. महापौर :-**

पुर्ण मनस्थिती आहे.

**अनिल सावंत :-**

मग तुम्ही विषय का आणला नाही? विषयपत्रिकेवर विषय का आणला नाही.

**मा. महापौर :-**

त्यांनतर आचारसंहिता लागली हे आपल्यालाही माहिती आहे.

**अनिल सावंत :-**

मी ०७ जानेवारीला विषय आणला. आचारसंहिता कधी लागली?

**मा. महापौर :-**

त्यानंतर बजेटची मिटींग झाली.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपल्या केबिनमध्ये एस.पी. आलेले. त्यांच्यासोबत तुमची मिटींग झालेली. तेव्हा तुम्ही सांगितले की, त्यांचे नळकनेक्शन काढणार, आतल्या भिंती तोडणार .....

**मा. महापौर :-**

नळ कनेक्शन कट केलेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यानंतर आपण सांगितलेले की, त्यांच्या भिंती तोडायच्या. त्यांच्यावर काय कार्यवाही झाली?

**अनिल सावंत :-**

एकाही लॉजींग बोर्डींग मालकावर केस दाखल करण्यात आली नाही. कोणाचे नळ कनेक्शन तोडण्यात आले नाही. रिलायन्सवाल्यानांसुध्दा कळविण्यात आलेले नाही. शहरातली एकही लॉजींग बोर्डींग तुमच्या टाऊन प्लानिंगप्रमाणे नाही. हे तुम्हाला मान्य आहे. तरीसुध्दा त्यांच्यावर कार्यवाही होत नाही याचे कारण काय? शहराला लॉजींग बोर्डींगचा फार मोठा कलंक लागलेला आहे. आणि ज्यावेळी मा. महापौरांनी हा विषय घेतला त्यानंतर परवाना दयायचे सोडून दया, ताबडतोब फ्लायओव्हरच्या बाजूला लॉजींग बोर्डींगचे हॉटेल झाले. ते विदाऊट परमिशन चालवतात. काही कंट्रोल नाही. २०-२०, ३०-३० वर्षे लॉजींग बोर्डींग चालले आहे. महापालिकेचा कोणताही परवाना घेतलेला नाही. कोणताही टॅक्स दिलेला नाही. मा. महापौर, हा विषय तुम्ही पुढच्या मा. महासभेमध्ये रितसर विषयपत्रिकेवर घेणार आहात का?

**मा. महापौर :-**

त्यांना कार्यवाहीबद्दल बोलू दया.

**मा. आयुक्त :-**

एकुण परमिट रूम आणि बिअर बार मध्ये २२ अनधिकृत म्हणून घोषित केलेले आहेत. ज्यावेळेला माझ्यासमोर यादी आली. त्यावेळेला वेस्टचे ग्रामपंचायत काळापासून असलेलेल लिस्टमध्ये नाव आहे. ग्रामपंचायतीच्या काळातील बिल्डींग, ग्रामपंचायत काळातील परमिशन, आपण त्यांच्यावर कार्यवाही केली आणि आपल्यावर फौजदारी झाली तर? त्यामुळे २२ पैकी किती ग्रामपंचायत काळातील आहेत ते मायनस करावे लागतील. आपण निव्वळ कार्यवाही करायची. शासन त्याला परवानगी देते. तुम्हाला परमिट रूम आणि बिअर बार नको असेल तर लायसन्स दयायची पध्दत बंद करा म्हणून शासनाकडे ठराव करून पाठवावा. जे ग्रामपंचायतीपासून नाहीत त्यांच्यावर हे जे फेरिवाले आहेत. त्यांच्याबरोबर ही सुध्दा कार्यवाही करू. मात्र जे नियमाप्रमाणे नाहीत. त्यांच्याविरूध्द कार्यवाही करू आणि मा. महासभेला कळवू. पंधरा दिवसामध्ये त्याची कार्यवाही होईल.

**मा. महापौर :-**

एक्साईज मिनिस्टरला मी पत्रपण दिले होते की, आपण या प्रकारची कुठलीही परवानगी देताना महापालिकेला विश्वासात घ्या. कारण अनेक बिल्डींगमध्ये नंतर फ्लॅटमध्ये बार चालू होतात. त्यांनतर महापालिकेचे नुकसान होते आणि गुंडागर्दी प्रकरण वाढते. मला तिकडून उत्तर आले की, त्यांना परवानगी दयायला तुम्हाला विचारण्याची गरजच नाही.

**अनिल सावंत :-**

लॉजींग बोर्डींगला परमिशन कोण देते? एक्साईज डिपार्टमेंट थोडेच देते ?

**मा. महापौर :-**

आपण एनओसी देत नाही. तिकडे परस्पर लायसन्स मिळते.

**अनिल सावंत :-**

लॉजींग बोर्डींगला एक्साईज डिपार्टमेंट परवानगी देते का?

**मा. महापौर :-**

त्याच्यामध्ये पण बार असतात.

**अनिल सावंत :-**

लॉजींग बोर्डींगला एक्साईजची परमिशन लागत नाही.

**मा. महापौर :-**

पण जे लॉजींग बोर्डींग आहेत. त्याच्यामध्ये ८० टक्के मध्ये एक्साईज लायसन्स आहेत.

**अनिल सावंत :-**

पण जो प्लान अप्रुव्ह झाला आहे. त्याच्याप्रमाणे ते बांधकाम नाही.

**मा. आयुक्त :-**

जो महापालिका वॉर्ड आहे. त्या महापालिका वॉर्डमध्ये ५० टक्के पेक्षा जास्त महिलांना दुकान आणि परमिटरूम नको असेल तर ग्रामपंचायतीच्या काळात ठराव करून ते बंद करतात. तसे काहीतरी धोरण अवलंबा आणि महिलांना सांगा. त्या वॉर्डमध्ये नको असेल तर जास्त मते पडली तर गव्हर्नमेंट बंद करते.

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, आपण ग्रामपंचायत काळातील बोलतात. नगरपरिषद आणि महानगरपालिकेत होतात त्याचे काय?

**मा. आयुक्त :-**

गव्हर्नमेंटच बंद करते. त्या वॉर्डमधील महिलांचे मतदान घेते. ५० टक्के पेक्षा जास्त महिलांना जर ते नको असेल तर आपोआप परमिट रूम आणि बिअरबार बंद होतात. तो नियम आहे. तुम्ही मागणी करा. त्या मागणीप्रमणे ते येतात आणि मतदान घेतात. आणि जर ५० टक्के पेक्षा जास्त मतदान झाले की ते परमीट रूम आणि बिअर बार बंद करतात. लायसन्स रद्द होतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, हे बिअरबार आणि परमिट रूमचे झाले. आमचा लॉजिंग बोर्डींगचा विषय आहे की, आपण रेसीडेन्शीअलगमध्ये लॉजिंग बोर्डींगला परमिशन देता का?

**मा. आयुक्त :-**

परमिट रूम बंद झाल्यानंतर ते आपोआप कमी होतील.

**अनिल सावंत :-**

तुम्ही लॉजींग बोर्डींगवर कार्यवाही करणार आहात का ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

रेसिडेन्शीयलमध्ये पण लॉजींग-बोर्डींग चालते.

**मा. आयुक्त :-**

परमिट रूम आणि बिअरबार बार मेठ्या प्रमाणात झाले तरच जास्त लॉजींग चालतात. त्यामुळे ते बंद पडतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण काय करणार?

**मा. आयुक्त :-**

अगोदर परमिट रूम आणि बिअरबार काढून टाकायचे केले की आपोआप लॉजींग बोर्डींग कमी करतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

बी.पी. रोडवर वेश्याव्यवसाय करणाऱ्या.....

**मा. आयुक्त :-**

ते पोलिसांचे काम आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ते चालेल का?

**मा. आयुक्त :-**

ते पोलिसांनी बघायचे आहे. ते आमच्याकडे येत नाही. आमच्याकडे फक्त बांधकाम परवानगी बरोबर आहे का? पाण्याची व्यवस्था नीट केली आहे का? स्वच्छता व्यवस्थित आहे की नाही? परमीट रूम देण्याची बरोबर व्यवस्था केली आहे की नाही एवढेच आहे. आमचे बांधकामाशी कन्सर्न आहे. आत ॲक्टीव्हीटी चालतात ते पोलिसांकडे आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्हाला तेच म्हणायचे आहे की, रेसिडेन्शीअलमध्ये लॉजींग बोर्डींगला परमिशन कशी देता येईल?

**मा. आयुक्त :-**

सगळीकडे रेसीडेन्शीअलमध्ये बांधकाम परवानगीप्रमाणे बांधकाम केले असेल तर त्यांना नो-ऑब्जेक्शन सर्टीफिकेट देणे आमच्यावर बंधनकारक आहे. डेव्हलपमेंट प्लानच्या रेसीडेन्शीअल झोनमध्ये असेल आणि त्यांनी परवानगीप्रमाणे बांधकाम केले असेल तर नाहरकत दाखला देणे आमच्यावर बंधनकारक आहे. कधी-कधी नाहरकत दाखला लागत पण नाही.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही मागचे इतिवृत्तांत जसे देता. पण तुम्हाला सांगते की, तो तुम्ही महापौर बनल्याच्या पहिल्या मा. महासभेपासूनचा सगळा इतिवृत्तांत आला पाहिजे की, त्याच्यामध्ये तुमची काय प्रगती झाली. ठिक आहे, तुम्हाला दोन वर्षाचा एकदम देता येणार नाही. टप्पे टप्पे करा. पहिल्या चार महासभा घ्या. त्याच्या नंतरच्या दुसऱ्या महासभेला आणखीन पुढच्या चार महासभा घ्या. पण तुम्ही पहिल्या प्रत्येक विषयाच्या ब्योरा आम्हाला दिला पाहिजे. की, तुम्ही त्या विषयाचे काय केले. ही माझी सुचना आहे आणि दुसरी सांगते. सकाळ पासून श्री. नाईक साहेबांची ही पहिलीच सभा आहे. पण सकाळ पासून मी जे ऐकले, तर बऱ्याच लोकांच्या तोंडून असे निघाले की, श्री. नाईक साहेब आपण आलात. आपल्याकडून आमच्या ह्या अपेक्षा आहेत. किंवा त्या अपेक्षा आहेत. मी आत्ता दोन मुद्दे काढले की, आमच्या प्रभाग समित्या अपूर्ण आहेत किंवा झाल्याच नाहीत. महिला बालकल्याणसारखी अतिशय महत्वाची समिती आमची बाकी आहे. आणखीन बऱ्याचशा समित्या आहेत. ज्याच्यामध्ये दोन वर्षामध्ये आमच्याकडे कधी जागतिक महिला दिन आले ते आम्हाला माहिती नाही. सावित्रीबाई फुले जयंती कधी आली हे आम्हाला माहिती नाही. आमची महापालिका या पटलांवरच्या विषयांखेरीज एकही विधायक कार्यक्रम राबवू शकलेली नाही. मला या महासभेची अत्यंत कीव करावीशी वाटते कि, याच्यापलिकडे आम्हाला दुसरे कोणते विषय माहिती नाहीत. आमच्या महापालिकेतर्फे एकही विधायक कार्यक्रम आम्ही इथल्या नागरिकांना देऊ शकत नाही. कारण आमच्या समित्या फॉर्म नाहीत. आत्ता मी मुळ मुद्दयावर येते की, श्री. नाईक साहेब आले आहेत म्हणून फार फार अपेक्षा आहेत. मी म्हणेन आत्ता तुम्ही तुमचे आयुक्त पद थोडेसे बाजूला ठेवा आणि थोडासा राजकिय इंटरेस्ट पण घ्या. की, जेणेकरून या सगळ्यांना एकत्र बसवा. मी असे म्हणेन की, तुम्ही आत्ता गुरू व्हा. सगळ्यांना एकत्र बसवा, चहा पाजा आणि मिटवून टाका. पण या शहराचे काय करता येईल याबाबत पुढाकार घ्या.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, याचप्रमाणे शिक्षण मंडळ सुध्दा अजून स्थापन झालेले नाही. परिवहन समिती सदस्य, त्यांची पण नेमणुक झालेली नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, या सर्व समित्या महिल्या बालकल्याण समिती शिक्षण मंडळ समिती हे सगळे राजकिय विषय आहेत. ही माझ्या अखत्यारितील बाब नाही. तरीदेखील सर्व महिलांना एकत्र बसवून त्यांचे-त्यांचे कार्यक्रम करण्यासाठी आम्ही प्रोत्साहन देऊ.

**प्रभात पाटील :-**

आम्ही असे म्हणत नाही की, महिलांचे कार्यक्रम होत नाहीत म्हणून मी बोलत नाही. आपल्या कमिटी फॉर्म नसल्यामुळे बरेचशे, आत्ता बघा तुमची....

**मा. महापौर :-**

पण प्रत्येक समितीमध्ये स्टे ऑर्डर आहे.

**प्रभात पाटील :-**

मी त्यांच्याकडून काय अपेक्षा करते की, जे तुम्हाला जमले नाही. जे आमच्या राजकिय नेत्यांना जमले नाही. त्यांनी पुढाकार घ्यावा.

**मा. आयुक्त :-**

प्रयत्न करू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आत्ता साहेबांनी सांगितले की, शासनाला ठराव पाठवला तर बिअर बारचे लायसन्स पण नाही देणार किंवा श्री. नवल बजाज यांची मिटींग झाली ते बहुतेक साहेबांना माहिती नसेल. आपण गटनेते आणि डीएसपी श्री. नवल बजाज यांची मिटींग झाली. त्या बैठकीमध्ये श्री. नवल बजाज यांनी सांगितले होते की, मी ॲक्शन घेतो. त्यापेक्षा महापालिका त्याच्या दुप्पट ॲक्शन घेऊ शकते. आणि श्री. नवल बजाज यांनी इकडे बारा प्रकरणे पाठवली, त्यांनी ॲक्शन घेतलेली. पण महापालिकेने त्या ॲक्शनवर एकही ॲक्शन घेतलेली नाही. म्हणजे ज्या डिपार्टमेंटचा अधिकार नसताना पोलिस खाते तिकडे रेड घालतो, म्हणजे तिकडे परवाना नाही. इललिगल गेस्ट हाऊस चालते. तिकडे पाण्याचे कनेक्शन इललिगल आहे. म्हणजे तीही अखत्याशी महापालिका करू शकत नाही का? त्या दिवशी तोच ठराव झाला.

**मा. महापौर :-**

साहेब, गटनेत्यांची बैठक झालेली, त्यांच्या पाण्याचे कनेक्शन कट करा. त्यांना लाईट कापण्यासाठी रिलायन्सला पत्र दयावे. आणि काही लोकांनी मुळ इमारतीमध्ये प्लानच्या अतिरिक्त चेंजेस केले असतील, म्हणजे रेसीडेन्स बिल्डींग असेल आणि कमर्शिअल आहे. तर आतले जे बांधकाम आहे. ते तुम्ही काढा. जे प्लानमध्ये चेंजेस आहेत ते तुम्हाला करता येईल. तेवढे करून घ्यावे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०२, केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत परिवहन सेवेकरिता २५० बस खरेदी करणे करिता येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत व अनुदानाकरिता सदर प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे अग्रेसीत करणेबाबत. (दि. २२/०५/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. ०५)

**जयंत पाटील :-**

केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमाअंतर्गत शहरी भागातील पायाभूत सुविधा करीता प्रकल्पांना केंद्र व राज्य शासनामार्फत अनुदान देण्यात येते. या योजनेअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका सुद्धा नागरी संकुलनासमवेत समाविष्ट करण्यात आलेले आहे. केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमाअंतर्गत न्यु दिल्ली येथे झालेल्या बैठकीमध्ये शहरी दळणवळण "अर्बन ट्रान्सपोर्ट" या सदराखाली पब्लिक ट्रान्सपोर्ट करीता बसेस घेण्याचा प्रस्ताव अनुदानास प्राप्त ठरवू शकतो. या चर्चेच्या अनुषंगाने मिरा भाईंदर परिवहन सेवेकरिता एकूण २५० बसेस खरेदी करण्याचा प्रस्ताव व त्याप्रमाणे सविस्तर अहवाल केंद्र सरकारकडे सादर करणे संयुक्तिक ठरणार आहे. सरासरी एक बस खरेदी करण्याकरिता रू. २५ लक्ष (प्रत्यक्ष बस खरेदी करतेवेळीचे बाजार मुल्यानुसार होणारी रक्कम) खर्च येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सुमारे रू. २५ लक्ष इतकी आदारभूत किंमत घेवून एकूण २५० बसेस खरेदी करण्याकरिता रू. ६२.५० कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे. याबाबत केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत अनुदानाकरिता सविस्तर तांत्रिक तपशिलासह प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करून त्यांचेमार्फत सविस्तर अहवाल तयार करण्यात येईल. तद्नंतर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय समन्वय संस्था एम.एम.आर.डी.ए. यांच्यामार्फत राज्य शासनास सादर करता येईल. राज्य शासनाच्या सुकाणू समितीच्या मंजुरी नंतर सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय सी.एस. ॲन्ड एम.एस. यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येईल. केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यास सुमारे ५० टक्के अनुदान प्राप्त होवू शकेल. (केंद्र शासनाचे ३५ टक्के व राज्य शासनाचे १५ टक्के)

सबब प्रशासनातर्फे तांत्रिक व कायदेशीर बाबी तपासले असता योग्य असल्याचे गृहीत धरून मिरा भाईंदर शहराकरिता परिवहन सेवेसाठी एकूण २५० बसेस खरेदी करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमाअंतर्गत मंजुरीसाठी पाठविण्यात व त्यासाठी येणारा खर्च रू. ६२.५० कोटी रक्कमेस प्रशासकिय मंजुरी देण्यात येत आहे.

मनपाच्या चालू अर्थसंकल्पात रू. २.४० कोटीची तरतुद अ अंदाज अंदाज पत्रकातुन हस्तांततरण या लेखाशिर्षाखाली केलेली आहे. या लेखाशिर्षातुन JNNURM कार्यक्रमाअंतर्गत बसेस खरेदी करणेकरीता सल्लागार नेमून सल्लागार फी (सेवा कर वगळून) रक्कम रू. ४० लक्ष उपमुख्य लेखाशिर्षाखाली पुर्नविनियोजन करण्यात यावी. व सल्लागार फी रू. ४० लक्ष (सेवा कर वगळून) देणेस ही सभा वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी मे. आयुक्त आणि अर्बन मास ट्रांझिट कंपनी लि. यांच्या सोबत केलेल्या करारनाम्यास देखील ही सभा मंजुरी देत आहे.

केंद्र शासनाच्या JNNURM च्या सर्वसाधारण चौकटीप्रमाणे अनुदान देताना केंद्र शासनाकडून अशी अपेक्षा केलेली असते की शहर स्तरावर काही सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यात यावा. बस खरेदीसाठी अनुदान देताना केंद्र शासनाने खालील मुद्दयांकरिता सुधारणा कार्यक्रम प्रामुख्याने सुचवला आहे.

अ) शहराची पार्कींग पॉलिसी, तसेच जाहिरात विषयक धोरण बनवणे.

ब) परिवहन सेवेत Inteligent Transport System (IST) समाविष्ट करणे

क) भाड्यामध्ये सुसूत्रता आणणे.

ड) अन्य अनशांगिक सुधारणा.

केंद्र शासनाला सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) पाठवताना, ज्यामध्ये अशा सुधारणांबाबतची शहराची भुमिका कळवणे आवश्यक आहे. याबाबतचे तपशिल बऱ्याच अंशी प्रशासकिय स्वरूपाचे असल्याने ही महासभा याबाबत आवश्यकतेनुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना देत आहे.

सद्यस्थितीत केंद्रशासनाची योजना ३० जुन २००९ पर्यंतच उपलब्ध आहे. केंद्रशासनाला प्रस्ताव पाठविण्याआधी MMRDA व राज्य शासनाची सहमती प्राप्त करून घेणे आवश्यक ठरेल. या योजनेबाबत मंजुरी देण्यासाठी केंद्र शासनाने गठीत केलेल्या समितीची आगामी बैठक दि. २६ जुन २००९ रोजी आहे. सदर बैठकीत मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाचा प्रस्ताव येण्यासाठी तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे. त्यामुळे इतिवृत्त मंजुरीची वाट न पाहता प्रशासनाने त्वरेने पुढील कार्यवाही करणेकरिता, ही सभा या ठरावाद्वारे मंजुरी देत आहे.

**मर्लिन डिसा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

आपण जे मनपा फंड म्हटलेले आहे ते परिवहन फंड म्हणावे लागेल. कारण मनपाकडे तो हेडच नाही. परिवहनसाठी आपण जे काही ठेवले आहे त्यातून दयावे लागेल. आपण मनपा म्हंटले तर ते हेडच नाही. मग आपल्याला रिॲप्रोप्रीएशन करावे लागेल.

**जयंत पाटील :-**

मगाशी सन्मा. नगरसेविका श्री. प्रभातताई पाटील ह्यांनी काही गोष्टी सांगितल्या. कोणी सांगितले की चहा प्यायला. आम्ही चहाची अपेक्षा करत नाही. आम्ही जेवणाची अपेक्षा करतो. चांगले झणझणीत जेवण ठेवा. त्या ठिकाणी सगळे प्रश्न मिटतील. आणि ते मिटविण्यासाठी आपण पुढाकार घ्या. आम्ही आपल्या सोबत आहोत.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, याच्याबद्दल बोलायचे होते. आपण २५० बसेस प्रपोज करतो आहे. तर २५० बसेस धावण्यासाठी आपल्या शहरात तेवढी जागा आहे का? हा पहिला मुद्दा. दुसरे असे बीएसटी ला एमएमआरडीए चे क्षेत्र आहे. तिथे बसेस चालविण्याची परवानगी मिळाली आहे. तशा प्रकारची परवानगी आपल्या परिवहनला मिळालेली आहे का? ह्याचेपण थोडेसे स्पष्टीकरण हवे आहे. एमएमआरडीए च्या रीजनमध्ये बसेस चालवायला आपल्याला परवानगी आहे का? तशी नसेल तर २५० बसेस आपण या शहरात कशा चालवणार?

**मा. आयुक्त :-**

२५० ची मागणी केलेली आहे. २५० च मिळणार असे नाही.

**प्रशांत पालांडे :-**

कमी मिळतील. समजा शंभर बसेस मिळाल्या.

**मा. आयुक्त :-**

कारण ३५० बसेस ठाण्याने मागितल्या त्यांना २०० मिळाल्या. ऑलरेडी त्यांच्याकडे ३५० बसेस आहेत. त्यांना २०० मिळाले. मुंबईने १६०० मागितले त्यांना १००० मिळाले. नवी मुंबईने ८०० मागितले होते. त्यांना २०० मिळाले. आपण २५० मागितले तर आपल्या १००-१५० मिळतील.

**प्रशांत पालांडे :-**

पण १००-१५० तरी चालवायला आपला ८० स्क्वेअर कि.मी. एरिया आहे. त्याच्यामध्ये आपण एवढ्या बसेस चालवू शकतो का?

**मा. आयुक्त :-**

आपण बाहेर पाठविण्याचीपण परवानगी मागू. कारण संपूर्ण खर्च...

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब, २००५ पासून मी पण परिवहनमध्ये आहे. तेव्हा पासून आपण परवानगीसाठी मागे लागलो आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, दोन मिनिटे ऐकून घ्या महापालिकेला या जून अखेर पर्यंत प्रस्ताव सबमिट करायचा आहे. महाराष्ट्रासाठी २६०० बसेस मंजुर केलेल्या आहेत. या महिना अखेरपर्यंत आपण प्रस्ताव तरी सबमिट केला नाही. तर मग काहीच मिळणार नाही. यामधील ५० टक्के महापालिकेचे आणि ५० टक्के त्यांचे आहेत. ५० टक्के मध्ये ती रक्कम आपण घ्यायची आहे. आणि आपल्या मालकीचे होईल. आपण रॉयल्टींवर बसेस चालवायला देता येईल आणि २५० मिळणार नाहीत शंभरच मिळतील.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, माझे असे म्हणणे आहे की, आपल्याला एमएमआरडीए क्षेत्रामध्ये परवानगी मिळालेली आहे का? की, आपण फक्त मिरा भाईंदर क्षेत्रासाठीच विचार करतो.

**मा. आयुक्त :-**

साहेब, एमएमआरडीए कडूनच गव्हर्नमेंटकडे जाणार.

**प्रशांत पालांडे :-**

बसेस चालवायला रूटला परवानगी........

**मा. आयुक्त :-**

चालवायला पण तेच आहेत. त्यांच्या संमतीनेच आपण पाठवतो आहे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, मला श्री. विजय पाटील साहेबांना दुसरा प्रश्न असा विचारायचा आहे की, जी ४० लाख सल्लागार फी आहे. ती देण्याची तेवढी तरतुद तुमच्यकडे आहे का?

**मा. आयुक्त :-**

सल्लागार फी सुध्दा सेंट्रल गव्हर्नमेंटकडून मिळणार आहे. आणि आपल्याला ३५ कोटी अनुदान मिळत असताना ४० लाखाची फी देणार कुठून? ते सुध्दा तेच देणार आहेत. त्यामुळे प्रश्न उद्‌भवणार नाही. आपल्याला फक्त हा प्रस्ताव पाठवेपर्यंत ॲडव्हान्स दयावा लागेल. ॲडव्हान्सचे टप्पे ठरलेले आहेत. पहिले सेंट्रल गव्हर्नमेंटकडे सबमिट झाल्यानंतर १० टक्के, नंतर १५ टक्के, नंतर २० टक्के आणि मंजुर झाल्यानंतर राहिलेले ४० टक्के असे टप्पे ठरले आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

बसेस कशा चालवायच्या त्याबद्दल....

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, या बसेस आपण चालवणार की, ठेक्यावर देणार?

**मा. आयुक्त :-**

सुरूवातीला कन्डक्टर, ड्रायव्हर डिझेल पेट्रोल त्यांचे. महापालिकेला काय रॉयल्टी देणार यावर टेंडर काढायचे? महापालिका एक रूपया खर्च करणार नाही. याऊलट आम्हाला उत्पन्न किती देणार यावर टेंडर निघणार. महापालिकेला आत्ता जवळ-जवळ साडेआठ-नऊ कोटी खर्च होतात. आणि उत्पन्न काही मिळत नाही. नुकसानात आहे. त्यामुळे त्यांना चालवायला दयायचे आणि तिकिटांचे दर मात्र मा. महासभेने बंधन घालून दयायचे आहे.

**संजय पांगे :-**

मा. पिठासीन अधिकारी साहेब, मला हा गोषवारा वाचल्यानंतर तीन शंका उपस्थित झाल्या आहेत. त्या तीन शंकांची मी जरा विचारणा करतो. त्या तीन शंकांची मी जरा विचारणा करतो. त्या गोषवाऱ्यामध्ये आपण असे म्हटले आहे. केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यू.आर.एम. कार्यक्रम अंतर्गत अनुदानाकरिता तसेच सविस्तर तांत्रिक प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता तज्ञ सल्लागार यांची मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.०१, ०४/०५/०२ अन्वये नेमणुक झालेली आहे. लगेच २०/०५/०९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ०९ जे.एन.एन.यू.आर.एम. कार्यक्रम अंतर्गत परिवहन सेवेसाठी २५० बसेस खरेदी करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या कार्यक्रमा अंतर्गत मंजुरीसाठी पाठविण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास ६२.५० कोटी यासाठी आपण मा. स्थायी समितीची मंजुरी घेतलेली आहे. मला एकच विचारायचे आहे की, आपले प्रशासन आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मा. स्थायी समितीसमोर मागवू शकते काय?

**मा. आयुक्त :-**

जून अखेरपर्यंत या परिवहन सेवेची मुदत संपणार आहे. हा प्रकल्प २६ जूनपूर्वी सेंट्रल गव्हर्नमेंटकडे पाठवायला पाहिजे. त्यामुळे सल्लागार नेमण्याची जी कार्यवाही आहे. ते सेंट्रल गव्हर्नमेंटने जीआर काढून जे ठरवून दिलेले आहे.

**संजय पांगे :-**

आपण ६२ कोटी ५० लाख रूपयांची आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मा. स्थायी समितीसमोर मागितली आहे. ती तुम्ही आजही मागू शकले असते.

**मा. आयुक्त :-**

स्टॅंडीग कमिटीमध्ये आपण फक्त सल्लागार नेमणुकीचा विषय शासनाच्या जीआर प्रमाणे घेतला. त्यामध्ये ती अमाऊन्ट टाकली पण आर्थिक व प्रशासकीयसाठी आम्ही इथेच आलो आहे.

**संजय पांगे :-**

पण तुम्ही असे म्हटले आहे की, मंजुरीसाठी पाठविण्यास व त्यासाठी येणारा खर्च ६२.५० कोटी तसेच सल्लागार फी रूपये चाळीस...

**मा. आयुक्त :-**

सल्लागार फीसाठी आम्ही स्टॅंडींग कमिटीपुढे गेलो होतो.

**संजय पांगे :-**

याच्यासाठी पण गेलात असे इथे म्हटले आहे.

**मा. आयुक्त :-**

काय?

**संजय पांगे :-**

कार्यक्रमाअंतर्गत मंजुरीसाठी पाठविण्यास व त्यासाठी येणारा खर्च ६२.५० कोटी रूपये. असे दोन्ही म्हटलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

६२ कोटी ५० लाख रूपयांची स्कीम बनवायला. डीपीआर बनविण्यासाठी ४० लाख रूपये खर्च येणार आहे.

**संजय पांगे :-**

असे नाही. त्यात ''तसेच'' म्हटले आहे.

**मा. आयुक्त :-**

''तसेच'' शब्द चुकीचा आहे.

**संजय पांगे :-**

दुसरा विषय असा आहे. सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात आपण तरतुदच केली नाही. जर अर्थसंकल्पातच तरतुद नसेल तर आर्थिक व प्रशासकिय मान्यता आपण कशी देऊ शकतो?

**मा. आयुक्त :-**

कशाची?

**संजय पांगे :-**

६२.५० कोटीची.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला आर्थिक प्रशासकिय मंजुरी म्हणजे तुम्ही सेंट्रल गव्हर्नमेंटला दिल्यानंतर खर्च करू म्हणून दाखवायला. परिवहन सेवेचा जो हेड आत्ता चालू आहे, त्यांना अनुदान देण्यासाठी असेल किंवा खर्च करण्यासाठी, त्या हेडखाली जमा होणार.

**संजय पांगे :-**

मा. स्थायी समितीमध्ये जे दोन्ही ठराव झाले त्यामध्ये असे म्हटले आहे की, आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, ते आर्थिक व प्रशासकिय मंजुरी एस्टीमेटेड कॉस्ट ६२ कोटी ५० लाख. परंतु त्याचा बनविण्याचा खर्च ४० लाख.

**संजय पांगे :-**

पण आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यात यावी असे आपण म्हटले आहे...

**मा. आयुक्त :-**

आर्थिक व प्रशासकिय मंजुरासाठी आम्ही इथे आलो आहे. तो डीपीआर बनविण्याचा खर्च ४० लाखासाठी आम्ही स्टॅडींगपुढे गेलो.

**संजय पांगे :-**

साहेब, जर बजेटला तरतुद नसेल तर आपल्याला आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देता येत नाही.

**मा. आयुक्त :-**

आर्थिक व प्रशासकिय मंजुरी म्हणजे काही टेंडर काढणार नाही. फक्त प्रस्ताव पाठवायला. आर्थिक व प्रशासकिय हा श्ब्द वापरतात म्हणून वापरतात. प्रत्यक्षात ते डीपीआर...

**संजय पांगे :-**

मा. स्थायी समितीच्या दोन्ही ठरावामध्ये तसे म्हटलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

डीपीआर बनवून केंद्र शासनाकडे पाठवायचे आहे.

**संजय पांगे :-**

साहेब, जे दोन्ही ठराव झाले आहेत. त्या दोन्ही ठरावामध्ये काय म्हटले आहे ते जरा बघा.

**प्रफुल्ल पाटील :-**

परिवहन खात्याला आत्ता शिल्लक बजेट किती आहे?

**मा. आयुक्त :-**

२ कोटी ४० लाख.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग २ कोटी ४० लाखामध्ये सब हेडमध्ये ते ४० लाख ट्रान्सफर करा. आणि फक्त आर्थिक व प्रशासकिय मंजुरी ४० लाखाचीच घ्यायची आणि ६२ लाखाची प्रशासकिय मंजुरी घ्यायची

**मा. आयुक्त :-**

प्रशासकिय मंजुरी स्कीम पाठवायला.

**प्रफुल्ल पाटील :-**

आणि आर्थिक व प्रशासकिय ४० लाखाची. ते पण याच ठरावामध्ये सब हेडमध्ये ४० लाख ट्रान्सफर करावे असे घ्या. द्याट इझ कॉल द रिप्रोरिएशन्स.

**संजय पांगे :-**

साहेब, तिसरा विषय असा आहे. अर्थसंकल्पामध्ये तरतुद नव्हती. आणि मा. स्थायी समिती व मा. परिवहन समितीचीही त्याला मान्यता नसताना आपण जे दहा टक्के चार लाख रूपये आगाऊ रक्कम दिली. ती कशासाठी दिली? कोणाला विचारून दिलेली आहे.?

**मा. आयुक्त :-**

स्टॅंडींग कमिटीचा ठराव झाला.

**संजय पांगे :-**

त्याच्यामध्ये १० टक्के आगाऊ देण्यात यावे असे म्हटलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

होय.

**संजय पांगे :-**

बघा.

**मा. आयुक्त :-**

आगाऊ दयावे असे त्यांनी म्हणायला नको. आपले ॲग्रीमेंट नेमणुकीला मान्यता मिळाल्यानंतर त्यांच्या अटीशर्तीप्रमाणे १० टक्के देतो.

**संजय पांगे :-**

१० टक्के आगाऊ देण्यासाठी मा. स्थायी समितीची आणि मा. परिवहन समितीची मंजुरीच नाही.

**मा. आयुक्त :-**

मंजुरीची जरूरी नाही.

**संजय पांगे :-**

मंजुरीची जरूरी नाही. तरीही देता येते.

**मा. आयुक्त :-**

होय. चाळीस लाखाला मंजुरी घेतली म्हणजे त्यांचे टप्पे ठरलेले आहेत.

**संजय पांगे :-**

असे कसे? तुम्ही मा. स्थायी समितीची तरी मंजुरी घ्यायला पाहिजे होते की, १० टक्के आगाऊ देत आहोत.

**मा. आयुक्त :-**

पेमेन्ट करायला मंजुरीची आवश्यकता नाही. एकदा आर्थिक व प्रशासकिय मंजुरीसाठी विषय आला की संपले.

**संजय पांगे :-**

आजपर्यंत असे कधीच झाले नाही. प्रत्येक वेळेला १० टक्के किंवा ५० टक्के आगाऊ रक्कम देण्यात यावी असे ठराव झालेले आहेत. याच्यामध्ये असा कुठेही ठराव झालेला नाही.

**मा. आयुक्त :-**

त्यांची नेमणुक झाल्यानंतर कराराप्रमाणे दिलेले आहेत.

**संजय पांगे :-**

ठिक आहे. या ठरावाला माझा विरोध नोंदवा.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्हाला ठरावात तशी दुरूस्ती करावी लागेल. की, ६२ कोटीला प्रशासकीय मंजुरी देत आहोत आणि तुमच्या परिवहनच्या कोणत्या शिर्षाखाली तुम्ही बोलतात की, दोन कोटी रूपये आहेत? उपमुख्य लेखाशिर्षाखाली ४० लाख रूपये वर्ग करण्यात यावेत. असे घेऊन मग त्याला आर्थिक व प्रशासकिय मंजुरी दया असे त्याच्यामध्ये म्हणा.

**बर्नट डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब, परिवहन खात्यामध्ये आपण बससाठी जीपीआरएस सिस्टम लागू करावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आज मा. स्थायी समितीचा एक ठराव, आणि २५० बसेस खरेदी असे आपण दोन्ही विषय मिळून आणलेले आहेत, बरोबर आहे. श्री. संजय पांगे यांनी जो प्रश्न विचारला, आर्थिक व प्रशासकिय मंजुरी, एकतर तुम्ही ४० लाखाचा मंजुरी देता. ४० लाख आपण त्याला जी फी देणार आहे.

त्यामध्ये आपण काय-काय मागणी करणार आहे? आपल्याला काय-काय पाहिजे? त्याची काही नोट पुटअप त्याला दिली आहे का? आत्ता तुम्ही २५० बसेस मागवणार. समजा १५० बसेस दिल्या. ठाणे महापालिकेला या पध्दतीने बस आल्या होत्या. आणि बस आल्यानंतर जो जुना ठेकेदार होता. त्याने स्टे आणला की, माझा ठेका १० वर्षापर्यंत आहे. मी माझ्या बसेस हटवणार नाही. ही कल्पना सल्लागारांना दिली आहे का? उद्या आपला ठेकेदार गेला नाही आणि त्याने सांगितले की, माझा अजून पाच वर्षे करार आहे. मग काय करणार?

**मा. आयुक्त :-**

त्या ॲग्रीमेंटप्रमाणे एक महिना अगोदर त्यांनी आम्हाला नोटीस दयायची. नाहीतर आम्ही त्यांना दयायची. ही प्रोव्हीजन आहे. तर सेंट्रल गव्हर्नमेंटची मंजुरी मिळाल्यानंतर आम्ही त्यांना नोटीस देऊ.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, करारामध्ये असे नाही.

**मा. आयुक्त :-**

आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी सांगतो, बघा. करारामध्ये असा कुठेही उल्लेख नाही.

**मा. आयुक्त :-**

ॲग्रीमेंटमध्ये क्लॉज आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. विजय पाटील साहेब, त्याची कॉपी दया.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आत्तापर्यंत आपल्याला नऊ कोटी रूपये लॉस आहे. या उत्तनला, चौकला जे जातात. ते आदिवासी बसमध्ये जातात. वीस-वीस लोक बसमध्ये फुकट जातात. ते गरीब तिकीट घेत नाहीत. आणि त्यांना कोण तिकीट देत नाहीत. आणि आपले अधिकारी तिकीट चेकरला कोणी नाहीत. नऊ कोटीचे पुढे जाऊन ते बारा कोटीवर जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. विजय पाटील साहेब, पान क्रमांक सांगा.

**राजेंद्र जैन :-**

कमिशनर साहब, इसमे आपने लिखा हुआ है की, मुंबई महानगपालिका और जहा जहा पर यह घोषीत की गयी है। और आपने कॉन्ट्रॅक्ट निश्चित किया है। तो हम यह जाना चाहते की, ४० लाख की रक्कम १ टक्के जगह आपने कम करवाया है। ४० लाख की रक्कम नक्की करने का आधार क्या था? यह फीगर यहा पर कैसे आयी? यह हम जाना चाहते है।

**प्रकरण क्र. ०२ :-**

केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत परिवहन सेवेकरिता २५० बस खरेदी करणे करिता येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत व अनुदानाकरिता सदर प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे अग्रेसीत करणेबाबत. (दि. २२/०५/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. ०५)

**ठराव क्र. ०४ :-**

केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमाअंतर्गत शहरी भागातील पायाभूत सुविधा करीता प्रकल्पांना केंद्र व राज्य शासनामार्फत अनुदान देण्यात येते. या योजनेअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका सुद्धा नागरी संकुलनासमवेत समाविष्ट करण्यात आलेले आहे. केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमाअंतर्गत न्यु दिल्ली येथे झालेल्या बैठकीमध्ये शहरी दळणवळण "अर्बन ट्रान्सपोर्ट" या सदराखाली पब्लिक ट्रान्सपोर्ट करीता बसेस घेण्याचा प्रस्ताव अनुदानास प्राप्त ठरवू शकतो. या चर्चेच्या अनुषंगाने मिरा भाईंदर परिवहन सेवेकरिता एकूण २५० बसेस खरेदी करण्याचा प्रस्ताव व त्याप्रमाणे सविस्तर अहवाल केंद्र सरकारकडे सादर करणे संयुक्तिक ठरणार आहे. सरासरी एक बस खरेदी करण्याकरिता रू. २५ लक्ष (प्रत्यक्ष बस खरेदी करतेवेळीचे बाजार मुल्यानुसार होणारी रक्कम) खर्च येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सुमारे रू. २५ लक्ष इतकी आदारभूत किंमत घेवून एकूण २५० बसेस खरेदी करण्याकरिता रू. ६२.५० कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे. याबाबत केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत अनुदानाकरिता सविस्तर तांत्रिक तपशिलासह प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करून त्यांचेमार्फत सविस्तर अहवाल तयार करण्यात येईल. तद्नंतर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय समन्वय संस्था एम.एम.आर.डी.ए. यांच्यामार्फत राज्य शासनास सादर करता येईल. राज्य शासनाच्या सुकाणू समितीच्या मंजुरी नंतर सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय सी.एस. ॲन्ड एम.एस. यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येईल. केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यास सुमारे ५० टक्के अनुदान प्राप्त होवू शकेल. (केंद्र शासनाचे ३५ टक्के व राज्य शासनाचे १५ टक्के)

सबब प्रशासनातर्फे तांत्रिक व कायदेशीर बाबी तपासले असता योग्य असल्याचे गृहीत धरून मिरा भाईंदर शहराकरिता परिवहन सेवेसाठी एकूण २५० बसेस खरेदी करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमाअंतर्गत मंजुरीसाठी पाठविण्यात व त्यासाठी येणारा खर्च रू. ६२.५० कोटी रक्कमेस प्रशासकिय मंजुरी देण्यात येत आहे.

मनपाच्या चालू अर्थसंकल्पात रू. २.४० कोटीची तरतुद अ अंदाज अंदाज पत्रकातुन हस्तांततरण या लेखाशिर्षाखाली केलेली आहे. या लेखाशिर्षातुन JNNURM कार्यक्रमाअंतर्गत बसेस खरेदी करणेकरीता सल्लागार नेमून सल्लागार फी (सेवा कर वगळून) रक्कम रू. ४० लक्ष उपमुख्य लेखाशिर्षाखाली पुर्नविनियोजन करण्यात यावी. व सल्लागार फी रू. ४० लक्ष (सेवा कर वगळून) देणेस ही सभा वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी मे. आयुक्त आणि अर्बन मास ट्रांझिट कंपनी लि. यांच्या सोबत केलेल्या करारनाम्यास देखील ही सभा मंजुरी देत आहे.

केंद्र शासनाच्या JNNURM च्या सर्वसाधारण चौकटीप्रमाणे अनुदान देताना केंद्र शासनाकडून अशी अपेक्षा केलेली असते की शहर स्तरावर काही सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यात यावा. बस खरेदीसाठी अनुदान देताना केंद्र शासनाने खालील मुद्दयांकरिता सुधारणा कार्यक्रम प्रामुख्याने सुचवला आहे.

अ) शहराची पार्कींग पॉलिसी, तसेच जाहिरात विषयक धोरण बनवणे.
ब) परिवहन सेवेत Inteligent Transport System (IST) समाविष्ट करणे
क) भाड्यामध्ये सुसूत्रता आणणे.
ड) अन्य अनशांगिक सुधारणा.

केंद्र शासनाला सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) पाठवताना, ज्यामध्ये अशा सुधारणांबाबतची शहराची भुमिका कळवणे आवश्यक आहे. याबाबतचे तपशिल ब-याच अंशी प्रशासकिय स्वरूपाचे असल्याने ही महासभा याबाबत आवश्यकतेनुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना देत आहे.

सद्यस्थितीत केंद्रशासनाची योजना ३० जुन २००९ पर्यंतच उपलब्ध आहे. केंद्रशासनाला प्रस्ताव पाठविण्याआधी MMRDA व राज्य शासनाची सहमती प्राप्त करून घेणे आवश्यक ठरेल. या योजनेबाबत मंजुरी देण्यासाठी केंद्र शासनाने गठीत केलेल्या समितीची आगामी बैठक दि. २६ जुन २००९ रोजी आहे. सदर बैठकीत मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाचा प्रस्ताव येण्यासाठी तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे. त्यामुळे इतिवृत्त मंजुरीची वाट न पाहता प्रशासनाने त्वरेने पुढील कार्यवाही करणेकरिता, ही सभा या ठरावाद्वारे मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्रीम. मर्लिन डिसा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०३, संगणकचालक व लघुलेखक यांचेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

**जयंत पाटील :-**

संगणक चालक व लघुलेखक यांच्याबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला आहे. संगणक चालविण्यासाठी प्रशिक्षित व अनुभवी......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. विजय पाटील साहेब, पान क्रमांक सांगा.

**नयना म्हात्रे :-**

त्यांना किती महिन्यांची मुदत वाढवून दयायची आहे?

**मा. महापौर :-**

तुम्हाला ॲग्रीमेंटची झेरॉक्स देतो.

**विजय पाटील :-**

तुम्हाला ॲग्रीमेंटची झेरॉक्स देतो आणि त्याच्यावर अंडरलाईन करून देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एक महिन्याची नोटीस कोणत्या पेजवर आहे?

**विजय पाटील :-**

पान क्रमांक ४२. कोणत्याही वादाच्या वेळी महानगरपालिका आयुक्त, एमबीएमटी किंवा त्यांनी अधिकृत केलेले कोणतेही अधिकारी यांचा निर्णय ठेकेदार यांच्यावर बंधनकारक राहील. एमबीएमटी चे अधिकारी आणि ठेकेदारात कोणताही वाद झाला. किंवा या करारातील अटी आणि शर्तीबाबत किंवा दंड आणि येणे रकमेबाबत कोणताही वाद झाला तर तो वाद आयुक्त किंवा त्यांनी नियुक्त केलेले अधिकारी यांच्याकडे लवाद म्हणून सुपूर्द करतील आणि सदर ठेकेदार हे त्यांना एक वाद नियुक्त करतील. आणि दोन्ही वाद यांनी दिलेला निर्णय दोन्ही पक्षकारांना बंधनकारक राहील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे कुठेही एक महिन्याचा उल्लेख नाही. लवाद नेमतील लवादाचा निर्णय मानावा लागेल. एक महिन्यामध्ये नोटीस देण्यात येईल, असे कुठे लिहिले आहे? तुम्ही बोलतात की, लवाद नेमणार आहेत. एका महिन्याचा उल्लेख तिकडे कुठे झाला. मा. महापौर साहेब, आपको एक बात बोलता हू। यह सभागृह मे इस तरह से गलत बात करेंगे तो नही चलेगी। आप लोग मिसगाईड करते है।

**संजय पांगे :-**

मा. महापौर साहेब, करारनामा मराठीत झाला की, इंग्लीशमध्ये झाला?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब तुम्हाला सांगतो. इकडे हे सगळे खोटे चाललेले आहे. साहेब, आपण या सभागृहाला या पध्दतीने खोटी माहीती देत असाल हे असे नाही. मा. महापौर साहेब, एक कॉपी नाही तीन कॉपी आहेत. सभागृहाला खोटी माहिती दिली हे बरोबर आहे की तुम्हाला हे मान्य नाही? साहेब, लवाद नेमणे आणि एका महिन्याची नोटीस देणे यात फार फरक आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, कुठल्याही व्यक्तीला दोघांच्या मध्ये वाद उपस्थित झाल्यानंतर तिथे लवादच येतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही सांगितले की, एका महिन्याची नोटीस दिल्यानंतर त्याला आपण टर्मिनेट करू शकतो. साहेब, तुम्ही चुकलेले आहात. त्याची गोष्ट मान्य केलेली आहे. तुम्ही सांगा की, चुकलेलो आहे.

**(सभागृहात गोंधळ )**

**राजेंद्र जैन :-**

मेरा बहोत सिधा सवाल है की, आपने ४० लाख फी नक्की किया। उसका मुझे आधार चाहिए।

**मा. महापौर :-**

उसका एव्हरेज निकाला गया है।

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहब बतायेंगे। क्योंकी इसमे लिखा है की, मा. आयुक्त साहब ने चर्चा करके बात किया है।

**विजय पाटील:-**

गव्हर्नमेंट ऑफ इंडिया का एक लेटर है। जो प्रिंसीपल सेक्रेटरी ऑफ अर्बन डेव्हलपमेंट, ऑल टाईप्स, उनको एक लेटर दिया है। उसमे ऐसा मेन्शन है की, comprehensive mobality plan integration of land use & transport plan,comprehensive traffic & transoportation studies, for any efficiency require for state & UT may consider engenging M/s. U.M.T.C. for providing the necessary consultancy in this field.

**राजेंद्र जैन :-**

It was not an binding now we have given 40 Lacs Rupees. For technical assistance. If this 40 lacs is not more than enough यह जानना है। आपने ४० लाखका माना है। तो आप इस फीगर तक कैसे आए वही हमको चाहीए।

**विजय पाटील :-**

आगे है। The cost of the preparation of DPR shall also be reimburse as per the guidline for reimbersins the cost of DPR. Under JNNURAM subject to action 1% normally & will be extension justification upto maximum of 2% of overall project cost.

**राजेंद्र जैन :-**

मै यह बोल रहा था की, यह १ टक्के नॉरमली लिखा गया है। मगर मा. आयुक्त साहबने उससे भी कम किया है। अच्छी बात है। लेकिन जो एक्झाम्पल दिया है, मुंबई नगरपालिका या दुसरे नगरपालिका का, मेरे बोलने का मतलब यह था, मिरा भाईंदर जो मेन क्राऊडेट एरिया है। वह बहोत छोटे मे सिमटा हुआ है। और जो बडा एरिया फैला है वह थिनली पॉप्युलेटेड एरिया है। दॅट इझ पॉप्युलेटेड. तो इसमे इतनी रक्कम की जरूरत नही थी । क्योंकी जो मेन एरिया है उसके अंदर इतनी फ्रीक्वेन्सी और टायमिंग नही लगेगी। और

जो बाहर का एरिया है, उसके अंदर कम लगेगी। टेक्नीकल असीस्टंट यहा पर कम लगनेवाली है। इसलिए यह अमाऊन्ट और भी कम हो सकता था। यह मेरे बोलने का मतलब है।

**मा. आयुक्त :-**

आपका कहना बराबर है। लेकीन अब क्या फेझीशन है, टेंडर निकालकर, टेंडर बुलाकर उनको देना है। तो जुन एन्ड हो जायेगा। और थाने महापालिका, नवी मुंबई महापालिका और बॉम्बे कॉर्पोरेशने टेंडर निकाला नही। बिना टेंडर उनको बुलाकर उनको दे दिया। और १ टक्के पर दे दिया। हमारी कितनी बसेस सँक्शन होनेवाली यह मालुम नही है। लेकीन डीपीआर २५० का ही बनाया है।

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहब, मै आपकी बात समझ गया।

**मा. आयुक्त :-**

यह फी भी जो उनको पेमेंट करेंगे वह ग्रान्टीनेट मिलनेवाला है।

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहब, मेरी बात सुनिए। मै यह बोल रहा हू की, हमने साडे बासष्ट कोटी का १ टक्का पकडकर ६२ लाख पकडा। फीर २० लाख कम किया। ६२ कोटी कब पकडा जब हम यह माने की, २५० बस मिल जायेगी। अब आपने क्या बोला की, २५० की जगह १०० बसही आएगी। इस शहर के लिए १०० बस लेनेवाले है। १० बस का आपको कितना देना चाहिए, १० लाख। १० लाख अगर आपने कम करवाया है। तो और भी कम होना चाहिए। हम जो पकड रहे है पुरे पकड रहे है।

**मा. आयुक्त :-**

जितना हम इधर पेमेंन्ट करेंगे, सँक्शन होगा। समझो हम एस्टीमेटेड कॉस्ट और उन्होने जो डीपीआर बनाया, वह ४० लाख का डीपीआर बनाया। सॅन्क्शन कितना होता है। यह मालूम नही। लेकिन सॅन्क्शन करने के लिए वही जायेंगे और सॅन्क्शन करके लायेंगे। वह सब पकड कर सेंट्रल गव्हर्नमेंटसे कितना सँक्शनन होगा मालूम नही है। ज्यादा होगा तो ४० देगे। कम हो गया तो उतना ही देंगे। वह सेंट्रल से मिलनेवाला है।

**मा. महापौर :-**

वह ४० लाख रूपया गव्हर्नमेंट देनेवाले है, हम नही देनेवाले। हम ५० देंगे तो ५० वापस देंगे।

**राजेंद्र जैन :-**

अल्टीमेटली आप टेक्नीकल असिस्टंन्स का कितना देने वाले है?

**मा. महापौर :-**

टेक्नीकल असिस्टंटका पुरा पैसा सेंट्रल गव्हर्नमेंट देनेवाले है।

**राजेंद्र जैन :-**

कितना?

**मा. महापौर :-**

पुरा मतलब जो लगेगा वो।

**राजेंद्र जैन :-**

अभी आपने ४० लाख स्विकार किया है.......

**मा. महापौर :-**

४० लाख पुरा देगी।

**राजेंद्र जैन :-**

मै यही बोल रहा हू की, ४० लाख ज्यादा है।

**मा. आयुक्त :-**

गव्हर्नमेंट से पैसा लाने का डीपीआर बनाना है। तो सेंट्रल गव्हर्नमेंट स्टे गव्हर्नमेंट, जिन्होंने वर्किंग किया है। उसको ही देकर फायदा। हमने टेंडर निकालकर गाँववालोंको दे दिया तो वो सँक्शन करके लानेवाला है? अब नवी मुंबई, ठाणे और बॉम्बे का उन्होने सँक्शन करके लाया। १६०० बसेस उन्होने मांगा था, १००० मंजुर करके लाया। ठाणेने ४५० बसेस मांगा था, २०० मंजूर करके लाया। और नवी मुंबईने ५०० मांगा था, २०० मंजुर करके लाया। जितना मंजुर करके लाते है वह देखे बगैर फी देखते बैठेगे तो बसेस छोड देंगे?

**राजेंद्र जैन :-**

मै यही बोल रहा हू। ५०० मांगा २०० आया....

**मा. आयुक्त :-**

कितने मंजुर होनेवाले है यह हमे मालूम नही। हम २५० मांगेगे. बाकी लोगो ने भी उतनाही मांगा। लेकीन डीपीआर १६०० का बनाया है।

**राजेंद्र जैन :-**

आप ४० पुरा दे रहे है। आपने २५० बस का ६२ कोटी का १ टक्का आपने ६२ लाख पकडा। जो आपने २५० बस पकड ली. ६२.५० करोड का खर्च पकड लिया। १ टक्का ६२.५० लाख पकड लिया। और काम करवा के ४० पर लेकर आ गए। अब अगर हम इस २५० का जो अनुमानीत खर्च है, इसको अगर १०० बस पर रखेंगे तो आपका यह खर्च १०० X १% .....

**मा. महापौर :-**

१०० मांगेगे तो ५० बस ही देंगे।

**मा. आयुक्त :-**

उन्होने जी डीपीआर बनाया, २५० मिले तो ही ४०, देढसौ मिले तो भी ४०। और इनके मुताबीक हम १०० मांगे तो वे ५० मंजुर करेंगे। इसलिए हम. ज्यादा डीपीआर बनाने के लिए बोले थे।

**राजेंद्र जैन :-**

अल्टीमेटली सीटी की रिक्वायरमेंट उतनी नही रहेगी। हमने ज्यादा मांगी है। उसका १ टक्का हम ज्यादा दे रहे है। मेरे कहनेका मतलब यह है।

**मा. आयुक्त :-**

मंजुरी के उपर फी नही रहती। प्रोजेक्ट बनाने पर फी रहती है।

**राजेंद्र जैन :-**

मै सुझाव देता हू, २५० के २०० करेंगे तो भी खर्च बचेगा। जितना चाहिए उतना रिपोर्ट आयेगा।

**मा. महापौर :-**

ऐसा नही होता है और पुरा पैसा वापस मिलनेवाला है।

ओमप्रकाश अग्रवाल :-

मा. महापौर साहेब, श्री. विजय पाटील साहेब, तुम्ही मला एक सांगा आपला करारनामा मराठीमध्ये आहे की इंग्लीशमध्ये आहे? आणि दुसरे, तुम्ही आत्ता बोललात की, करारनाम्यामध्ये एक महिन्याचे टर्मिनेट आहे. असा उल्लेख केलेला आहे. तुम्ही सभागृहाला खोटी माहिती दिलेली आहे की नाही?

**मा. महापौर :-**

बस आनेतक वैसे भी उनका टाईम पुरा हो जाएगा।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहब, यह सभागृह का सवाल है। आज हमको, इधर झुठा रिपोर्टींग किया। ॲग्रीमेंट मराठीमध्ये आहे की, इंग्लीशमध्ये आहे ते मला सांगा.

**विजय पाटील :-**

मुळ ॲग्रीमेंट इंग्रजीमध्ये आहे. त्याचे मराठी वर्जन मी सभागृहाला वाचून दाखवलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग इंग्लीसमध्ये काय लिहिले आहे ते जरा वाचा.

**विजय पाटील :-**

४१ नंबर वाचतो. In case of any dispute. Decision of the Municipal Commissioner, MBMC or any officer due authorised by him in this behalf shall be final & binding all on the contractor. In the event of dispute or disagreent between MBMT, the officer of the MBMT & contractor of they will dispute regarding terms & condition of the agreement, pentties & fine Amount due etc. The matter will be refer to the commissioner or any authorized by him as the orbitrater & one orbitrater will be authorized by the contractor. The decision given by both arbitraters shall be binded on both parties.

**संजय पांगे :-**

जर डिस्प्युट झाले तर ना? जर डिस्प्युटरच झाले नाही तर काय करणार?

**मा. महापौर :-**

जो ॲग्रीमेंट बन गया वो बन गया है। विषय संपवा. आत्ता ठराव करा. त्याचा आणि याचा काय संबंध?

**संजय पांगे :-**

त्याने कायद्याप्रमाणे सर्व व्यवस्थित केले. मग डिस्प्युट होईलच कसे?

**मा. महापौर :-**

आत्ता आपण जो निर्णय घेतला, ठराव केला. त्याचा आणि याचा काय संबंध ते मला सांगा.

(सभागृहात गोंधळ )

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, उन्होने सभागृह को गलत बातमी दिया है। उनको माफी मांगने के बोलिए।

**मा. महापौर :-**

उसमे एटसेटरा कॉलम लिखा है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, आपका भी अधिकारीयोंका बाजू लेना है तो लिजिए।

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहब, मेरा यह बोलना है की, जब ॲग्रीमेंट पर डिस्प्युट नही हुआ। यही बात है ना। लेकीन जब आप नयी बस मांगेंगे और बोलेंगे की, आप डिसकंटीन्यु करो। तो डिस्प्युट तो हो गया।

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर साहेब, याच्यामध्ये तुम्ही आर्बिटेशनच्या बाबतीत असा कसा क्लॉज टाकला? आर्बिटेशन शाल बी ऑलवेस ऑफ ऑड नंबर. नॉट इव्हन नंबर. आर्बिटेशन ॲक्टप्रमाणे तुम्हाला तीन संख्या पाहिजे, पाच पाहिजे. तिकडे दोनच कशी आली? आर्बिटेशन ॲक्टप्रमाणे तुम्हाला थर्ड ऑथोरिटी. म्हणजे सोडवायला तुम्हाला ऑड कमिटीच पाहिजे. म्हणजे कमिशनर हे अर्बिट्रेशनचे मेन राहतील. आणि जर तुम्हाला जे.एन.एन.यु.आर.एम. खाली विशिष्ट विभागाची नेमणुक तिकडे केलेली असेल तर तिथले डेप्युटी सेक्रेटरी किंवा जॉईन्ट सेक्रेटरी, कोणीही तुमच्यापेक्षा खालच्या दर्जाचे एक अधिकारी शासनाचे ठेवा. आणि एक जी पार्टी कॉन्ट्रॅक्टर राहिल, त्या कॉन्ट्रॅक्टर कोणीही रिप्रेझेन्टेटिव्ह ठेवा. तुम्ही असे रेक्टीफीकेशन करा ना.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**विजय पाटील :-**

मा. महापौर साहेब, याच्यामध्ये आमचा थोडासा कम्युनिकेशन गॅप आणि स्पील ऑफ टंग झाले. तर मी सभागृहाची माफी मागतो.

**आसिफ शेख :-**

विषय क्र. ०३

**मा. महापौर :-**

वाचलेला आहे.

**आसिफ शेख :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला आहे. संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृत्तांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवशकता असल्याने मा. महासभा दि. २०/०६/२००६, ठराव क्र. २९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकेमार्फत त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दि. ०९/०१/२००८ रोजीच्या मा. महासभेत लघुलेखक व संगणक चालक यांचेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे असा विषय चर्चेस आला असता सर्व संगणक चालक व लघुलेखक यांची शैक्षणिक पात्रता व कामाची क्षमता याची माहिति घेणेसाठी एक समिती गठित करण्यात येवून त्यांचेमार्फत तसेच संगणक विषयी तज्ञ व्यक्तींमार्फत संगणक चालक व लघुलेखक यांची शैक्षणिक पात्रता व संगणक विषयीचे ज्ञान तपासून मा. महासभेपुढे अहवाल सादर करण्यात आला होता. या अहवालानुसार संगणक चालक व लघुलेखक यांना ११ महिन्यांची मुतदवाढ देण्यात आली होती. सदर मुदत दि. ३१/०५/२००९ रोजी संपलेली आहे. अस्थायी आस्थापनेवरील संगणक चालक व लघुलेखक ह्यांच्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात रु. ४० लाख इतकी तरतुद केलेली आहे.

महानगरपालिकेतील नागरी सुविधा केंद्र तसेच सर्व विभागातील संगणकावरील कामाची व्यापता पाहता संगणक चालक रु ५,०००/- प्रती महिना (२६ दिवसांकरीता) व लघुलेखक रु. ६,५००/- प्रती महिना (२६ दिवसांकरीता) या मानधनावर नेमणूक करण्यास ही सभा मंजुरी देत आहे. महानगरपालिकेने संगणक चालक व लघुलेखक यांच्या नेमणूकीबाबत पुढील कार्यवाही करावी. तसेच संगणक चालक व लघुलेखक ह्यांच्या पदनिर्मितीचा प्रस्ताव नव्याने शासनाकडे मंजुरीस्तव रितसर फेरसादर करुन शासनाकडे त्याचा पाठपुरावा करावा.

**एस्.ए.खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आत्ता या मुलांना कायम करावे असा ठराव वाचला गेला. ते कर्मचारी वेळेवर कामाला येत नाहीत. किती किती दिवस घरी बसलेले असतात. तरीसुध्दा त्यांची हजेरी लिहिली जाते. आणि दुसरी गोष्ट आपले जे कितीतरी कर्मचारी वारलेले आहेत. त्यांच्या मुलांना कामावर घ्यायचे नाही? त्याच्या बायकांना कामावर नाही घ्यायचे? पहिला त्यांचा विचार केला जातो का? या ठरावाला माझा विरोध आहे. तसे मी तुम्हाला माझे लेखी पत्र पण देईन.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, आपण असे कायमस्वरूपी घेऊ शकतो का? प्रशासनाला स्पष्टीकरण दयायला सांगा.

**मा. आयुक्त :-**

घेऊ शकत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

घेऊ शकत नाही तर मग ठरावाला काय अर्थ राहतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, ऐसा ठराव तिसरी बार हुआ है। एक तो उनको आप सही तरीके से जवाब दिजीए की, हम लोग आपको ठेका पध्दतीसे रखेंगे। अब कल से उनका पगार बंद हो जाएगा उसका जबाबदार कौन है? कोणत्या व्यक्तीला तुम्ही मोगम ठेवू नका. चार महिने पगार घेतला नाही. त्यांना आशा आहे की, परमनन्ट होऊ. पण साहेबांनी सांगितले की, शक्य नाही. मग त्यांना आशेवर कशाला ठेवता? प्रशासनाने क्लीअर करावे. साहेब, नंतर तुम्ही काही पाठवणार की, ह्या नियमाखाली हा ठराव चुकीचा आहे. तो रद्द करा. याच्यापेक्षा आत्ताच सांगा की, हे चुकीचे आहे.

**मा. आयुक्त :-**

आम्ही विषय दिलेला नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विषय दिलेला नाही. पण आपण बोलू शकता की, हे चुकीचे होते.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सांगतात की, आपला विषय नाही. तर आपली भुमिका स्पष्ट झाली तर चांगले होईल. आपली भुमिका स्पष्ट करा. नाहीतर पुन्हा एकदा, मी सकाळी म्हटल्याप्रमाणे, ठराव होईल. आणि त्याचे पुढे काय होणार? हा विषय विषयपटलावर आहे म्हणून तुम्हीसुद्धा काहीतरी डोक्यात घेऊन इथे आलेले असणार. मग प्रशासनाची त्याच्या मागची काही कायदेशीर भुमिकापण असेल ना?

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, ठरावामध्ये काही चुक असेल काही असेल, तो वेगळा विषय आहे. पण हे जे संगणक चालक आहेत. हे आपल्या प्रत्येक विभागामध्ये आहेत. म्हणजे मा. महापौरांच्या केबिनपासून मा. स्थायी समिती कक्ष, सभागृहनेता कक्ष, ऑडीट विभाग, आरोग्य विभाग, वैद्यकिय विभाग, मा. उपमहापौर दालन, नासुके, कर विभाग, प्रभाग क्र. ३, मंत्रालय आपला एक संगणक चालक मंत्रालयामध्ये सुध्दा आहे. श्री. मयेकर नावाचा मुलगा. मा. आयुक्त साहेब दालन, आपल्या दालनातसुध्दा आहे. आणि यांना जर आपण न्याय दिला नाही तर मोठ्या गोंधळाची परिस्थिती मिरा भाईंदर महापालिकेत निर्माण होईल. तेव्हा आत्ता केलेल्या ठरावात वेगळी काही सुचना असेल. आपले जे मत असेल ते आपण व्यक्त करू शकता. साहेब, ०९/११/२००६ रोजी याच विषयावर महाराष्ट्र शासनाचे एक पत्र मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या नावावर आले होते. विषय, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर संगणक चालक, लघुलेखक नेमणेबाबत. त्यात आपण जे पत्र पाठवले होते त्या पत्राचा संदर्भ दिलेला आहे. उपरोक्त विषयावरील संदर्भांकित पत्रानुसार मला असे कळविण्याचे निर्देश आहेत की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५१, ५३, ५४ येथील तरतुदी स्वयंस्पष्ट  आहेत. त्यानुसार वर्ग क्र. ०३ व ०४ पदांवरील नियुक्त्यांबाबत मा. आयुक्त सक्षम आहेत. तसेच महानगरपालिकेतील कामे योग्य रितीने पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था उपाययोजना करण्याकरीता आऊट सोर्सींगच्या माध्यमातून काम कशा प्रकारे करून घ्यावे?  मानधनावर कंत्राटी पध्दतीने कशा प्रकारे नियुक्ती करावी. याबाबत मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी निर्णय घेणे आवश्यक आहे.

**प्रभात पाटील :-**

त्याचप्रमाणे २९ नोव्हेंबर २००१ चे एक पत्रक आहे. शासनाचा १९ नोव्हेंबर २००१ चा जीआर आहे त्यांनी असे म्हटले आहे की, सर्व महानगरपालिकांच्या आयुक्तांना हे पत्र आहे, मुंबई आणि नाशिक वगळून. त्यांनी असे म्हटले आहे की, नाशिक महापालिकेने त्यांच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील पदे एकत्रित वेतनावर भरण्याची येजना शासनास मान्यतेसाठी सादर केली होती. सदर योजनेस शासनाने मान्यता दिलेली आहे. शासन निर्णयाची प्रत आपल्या अवलोकनार्थ सोबत जोडलेली आहे. राज्यातील सर्व महानगरपालिकांचा एकंदरीत वाढलेला आस्थापना खर्च विचारात घेता, नाशिक महानगरपालिकेच्या धर्तीवर आणखीन आपल्या महानगरपालिकेची विविध पदे एकत्रित वेतनावर भरणेबाबत प्रयत्न करावा असे आपणांस सुचित करण्यात येत आहे. असा सुध्दा जी.आर. आहे. फक्त मुंबई आणि नाशिक वगळून.

**आसिफ शेख :-**

त्या जी.आर.ची कॉपी साहेबांना द्या.

**प्रभात पाटील :-**

म्हणूनच मी म्हटले की, आपली भुमिका काय आहे? तुमच्याही काही अडचणी असतील तर ते सगळ्यांसमोर आल्या पाहिजेत.

**मा. आयुक्त :-**

पद मंजुर असल्याशिवाय आणि रितसर भरल्याशिवाय ते कायम होणार नाही. पद मंजुरीसाठी पाठवले होते. आत्ताचा आपला खर्च जास्त असल्यामुळे पद मंजुरी मिळालेली नाही. आणि जरी पद मंजुरी मिळाली तरी शासनाच्या ज्या रितसर पध्दती आहेत. त्या पध्दतीप्रमाणेच भरती करावी लागेल. आत्ता ठोक पध्दतीने घ्यायचे आणि नंतर त्यांना कायम करायचे हा प्रश्न येणार नाही.

**प्रभात पाटील :-**

हा एकत्रित वेतनाचा प्रश्न आहे.

**मा. आयुक्त :-**

ह्यांना कायम करायचे असा जर ठराव झाला तर मग ४५१ खाली पाठवावा लागेल. कारण पद नसताना कायम कसे होणार? श्री. पाटील साहेबांनी जे पूर्वीचे वाचले आणि नंतरचे सहा महिन्यापर्यंत आयुक्तांना अधिकार आहेत. सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी स्थायी समिती. आणि मा. स्थायी समितीची सहा महिन्याची मुदत, एक वर्षाची दोघांची मिळून संपली, मा. आयुक्तांचे सहा महिने, मा. स्थायी समितीचे सहा महिने बाकीचे सगळे मा. महासभेकडे आहे. मा. महासभा किती वर्षापर्यंत मुदतवाढ देऊ शकेल?

**जयंत पाटील :-**

आत्ता मा. महासभेतच विषय आहे ना?

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेत मुदतवाढीचा विषय आहे. किती वेळा मुदतवाढ देणार?

**आसिफ शेख :-**

आत्ता मुदतवाढीचा प्रश्न उद्‌भवू नये म्हणून......

**मा. आयुक्त :-**

उक्त सहा महिन्याची कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही.

**मा. महापौर :-**

सभागृहाला विनंती आहे. त्यांना आपण एक वर्षांची मुदत वाढ देऊ.

**आसिफ शेख :-**

आत्ता आपण कायमस्वरूपी ठराव मांडलेला आहे. त्याच्यानंतर सन्मा. आयुक्तांनी सदरचा ठराव पुढील कार्यवाहीसाठी पाठवायचा आहे. आत्ता मा. आयुक्तांनी जर अशीच भुमिका घेतली की, त्या ४५१ खाली विखंडीत करायची. ती भुमिका योग्य राहणार आहे. या संदर्भात आम्ही जो ठराव केलेला आहे. त्यामध्ये आम्ही म्हटलेले आहे......

**मा. आयुक्त :-**

कुठल्याही कर्मचाऱ्याला कायम करायचे म्हटले की, ते पद मंजुर असावे लागते. पद मंजुर नसताना त्या पदावर कायम करा असा ठराव झाला, अंमलबजावणी केली तर शासन मला विचारणार की, अंमलबजावणी कशी केली? आणि तुम्ही पद नसताना कायम करा म्हणणार ते कुठल्या आधाराने? कुठल्या पदावर कायम करणार?

**आसिफ शेख :-**

ठरावात म्हटले आहे की, पुढील कार्यवाही करा. तर पुढील कार्यवाही करा म्हणजे काय करा ते आपल्याला माहिती आहे की काय करायचे.

**मा. आयुक्त :-**

पाठवलेले. शासनाने नामंजुर केलेले माहिती असताना देखील ते पदावर कायम करा असे म्हणतात. एकदा पाठवून ते नामंजुर होऊन आलेले आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महासभा सक्षम आहे. मा. महासभेने आपला निर्णय घेतलेला आहे. आणि शासनाने या संदर्भात विचार विनीमय करावा.

**मा. आयुक्त :-**

आत्ता बोललेले शब्द त्यामध्ये लिहा की, मा. महासभा सक्षम आहे. कोणी नामंजुर करू शकणार नाही. त्या पदावर कायम करावे असे शासनाला डायरेक्शन द्या.

**आसिफ शेख :-**

शासनाला डायरेक्शन नाही दयायचे. आपण शासनाकडे पाठवा. आम्ही म्हटले आहे की, महापालिका सक्षम आहे.

**मा. महापौर :-**

श्री. आसिफ शेख जी आपण जे पहिले पाठवले होते ते शासनाने ऑलरेडी नामंजुर केलेले आहे. मग आत्ता परत पाठवायचे का?

**आसिफ शेख :-**

असे किती प्रस्ताव पाठवलेले आहेत. आपला प्रभाग समितीची ठराव अजून झालेला नाही. तसाच पेन्डींग आहे. एकदा सांगितले की,.....

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, हे जे कर्मचारी कम्प्युटर सेक्शनला काम करतात ते प्रत्येक डिपार्टमेंटमध्ये आहेत. आणि त्यांचा प्रश्न म्हणजे मुदतवाढ देणे. एक तर महिन्याने हा प्रश्न आलेला आहे. गेल्या महिन्यापासून त्यांचे पगारपण थांबलेले आहेत. तुमच्या मनामध्ये काय योजना आहेत की, त्या कर्मचा-यांना कुठे ॲडजस्ट करायचे की, काय करायचे? काय करता येईल?

**मा. आयुक्त :-**

माझ्या मनामध्ये काहीच नाही.

**अनिल सावंत :-**

मग त्यांना असेच विदाऊट पगार कामावर ठेवायचे? त्यांच्याकडून पगाराशिवाय काम करू घेणार का?

**मा. आयुक्त :-**

तुम्ही काय केल्यानंतर मग काय करायचे ते मी ठरवणार आहे. त्याबाबत अगोदरच मी काही ठरवणार नाही.

**अनिल सावंत :-**

त्यांच्या हिताचा कोणता निर्णय घेता येईल ते तुम्ही सांगा.

**मा. आयुक्त :-**

मी गोषवारा दिलेला नाही? मग तुम्ही ठरवल्यानंतर मी निर्णय घेणार आहे.

**अनिल सावंत :-**

त्यांच्या हिताचा निर्णय घ्या.

**जयंत पाटील :-**

साहेब, आपले मत मांडायला काही हरकत नाही. आपले कायदेशीर काय मत आहे ते आम्हाला सांगा.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला जे ॲक्च्युली आवश्यक आहे. आणि कोणाकोणाला ज्या टेबलावर बसलेले आहेत ते काम येते. प्रत्यक्षात सगळ्यांनाच काम येते असे नाही. काही मेजोरिटी लोकांना काम येत नाही. काही लोक फक्त हजेरी देऊन घरी बसतात. महापालिकेला जे अत्यावश्यक आहेत. त्यांचे घेऊ आणि ठेका पध्दतीने ठेवू. सही करून घरी बसणारे आणि काम न येणा-यांना घेणार नाही.

**मा. महापौर :-**

साहेब कॉन्ट्रॅक्टवर घेतल्यावर परत आपण देणार पाच हजार, त्यांना मिळणार साडे तीन हजार. हा ही एक मुद्दा आहे. त्यापेक्षा मानधनावरच घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

मला जरा मांडू दया. खरे म्हणजे बघा किती आश्चर्य वाटते, बाकी सगळ्या विषयांवर सभागृहातील लोक कसे बोलतात. आपण त्याला थोडेसे मस्का पॉलिसी बोलतो. आत्तापर्यंत जेवढे विषय आले, आत्ता श्री. नाईक साहेब आले आहेत. आत्ता आपले काम होणारच. आणि श्री. नाईक साहेब खरोखरच चांगले काम करतात, तुमची ही दुसरी मिटींग आहे, सगळेच लोक तसे बोलतात. ह्या विषयावर असे का बोलत नाहीत ते माहिती नाही की, साहेब त्याच्यामध्ये नक्कीच मदत करतील. किंवा पूर्वी असे केले होते. पुर्वीच्या मा. आयुक्तांनी असे केले होते. त्याच्यामध्ये हे मा. आयुक्त भर घालतील. म्हणून पूर्वी काय केले ते जरा सांगू का? पूर्वीच्या मा. आयुक्तांनी किंवा पूर्वीच्या सगळ्या मा. महापौरांनी त्यांच्या पूर्वीच्या लोकांनी वेळोवेळी सगळ्या कर्मचा-यांना न्याय दिला आहे. काही लोकांना त्यांच्याबद्दल वैयक्तीक काही असेल तर मला माहीती नाही. पण सभागृहातील सर्व मेजोरिटीला असे वाटते की, त्या लोकांना नोकरी मिळाली पाहिजे. जी नोकरी आहे ती राहिली पाहिजे, या उद्दीष्टानेच प्रत्येक वेळी, वेळोवेळी आपण ठराव केले. आत्तासुध्दा सेवाप्रवेश नियमांचा जो आकृतीबंध आला होता. त्याच्यातसुध्दा आपण ती पदे, तो संगणकचालकांचा संवंग टाकलेला आहे. तर पूर्वी जे प्रस्ताव पाठवले. त्या प्रस्तावावर शासनाचे एक असे पत्र आले की, संगणक चालक, लघुलेखकांची पदे निर्माण करण्याबाबत आपले प्रस्ताव मान्य करता येत नाही. संगणकचालकांचे काम मंजुर पदांवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांमार्फत किंवा बाह्य मार्गाने (Through out sourcing) करून घेणे अपेक्षित आहे. तरी याबाबत महानगरपालिकेने आवश्यक तो निर्णय घ्यावा. आत्ता विषय असा आहे की, आम्हाला संगणकचालकांची गरज आहे. म्हणून आम्ही हा प्रस्ताव पाठवला की नाही? म्हणजे सभागृहाने आज जरी ताकद लावून सांगितले की, त्यांना परमन्ट करा. पण जोपर्यंत प्रशासनाला पटत नाही. तोपर्यंत ते करणार

नाहीत. परमनन्ट करण्याची रित आहे. मी असे सांगत नाही की, मा. आयुक्त साहेबांनी ताबडतोब ऑर्डर काढा. पण सभागृहाला गरजेचे वाटले म्हणून हा प्रस्ताव पाठवला नव्हता. सभागृहाने ठरवले की, संगणक चालकांची पदे निर्माण करावीत. कशासाठी, तर जे संगणक चालक आत्ता आहेत ते घेता येतील. नवीनपण घेता येतील. शांती नगरच्या पाणी पुरवठा योजनेचे उदाहरण तुम्हाला देतो. ०५ एमएलडी पाण्याची योजना आपल्या महानगरपालिकेने ताब्यात घेतली. मागच्या आयुक्तांनी, मी तुम्हाला बोललो ना की, कोणी पणत्या लावल्या, कोणी दिवे लावले, कोणी टयुबलाईट लावल्या तर कोणी हायमार्सचे दिवे लावले असतील. आत्ता याच्यावरून तुम्ही मागचा शोध घ्या की, त्या पाच एम.एल.डी. मध्ये तुम्ही ७५ लोक कामावर घेतले. ह्या सभागृहाने ती लाजलज्जा मला माहिती नाही, कोण अधिकारी तेही मला माहिती नाही. पण पाच एमएलडी स्कीमवर ७०-७५ लोक कधी असतात का? वैयक्तिक घरामध्ये नोकरी करणारेसुध्दा याच्यामध्ये लागले. मग हे सभागृह जर अख्खे पापी आहे. तर मग प्रशासनात काम करणारे अधिकारी निष्पाप आहेत का? ते पुण्यवान आहेत का? दुसरी गोष्ट सांगतो. मी पोटतिडकीने बोलतो. तुमच्यासाठी, शासनासाठी हे नाही. जी गोष्ट चालली ती नियमाने चालावी. याच्यासाठी मी बोलतो. मला जे जवळचे आहेत, लाड आहे म्हणून नाही. मग त्यावेळी आमचेच सभागृहातील काही सदस्य, माझ्या घरातील याला ठेवा. त्या योजनेमध्ये जे लोक आले आहेत त्यांची हिस्टरी बघा की, त्यांनी पाणी पुरवठ्यामध्ये, त्या शांतीस्टार बिल्डरचे मागचे मस्टर बघा. की, त्यांनी तिकडे किती वर्षे काम केलेले? ७०-७५ लोक इथे परमनन्ट झाले. दुसरा विषय साहेब तुम्हाला सांगतो. या सभागृहामध्ये बालवाडी अंगणवाडीतील शिक्षिका, त्यांना आपल्या शिक्षण सेवेमध्ये म्हणजे प्राथमिक विभागात वर्ग करून घेण्यासाठी प्रस्ताव आणला. आम्ही लोकांनी सत्तावीस कर्मचाऱ्यांच्या नावासकट, असे का बोलतो, प्रत्यक्ष काय अमुक-अमुक, तमुक-तमुक, हौश्या गवशा, नवशा, हमऱ्या, तुमऱ्या, डमऱ्या अशी नावे लिहिली. आणि हे सत्तावीस लोक शिक्षक म्हणून यांना परमनन्ट स्वरूपात कामावर रूजू करून घ्यावे. मग लगेच काय झाले, आमचे प्रशासन किती हुशार आहे ते बघा. जेव्हा तुम्ही आत्ता सांगितले तसे त्यांनी नाही सांगितले, अंगणवाडीचे शिक्षक महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कसे काय येऊ शकतात? मग त्यांचा पदनिर्मितीचा प्रस्ताव तयार झाला. सत्तावीस लोक भरायचे आहे. ठरावाचा काय आधार घेतला तर मा. महासभेने ठराव केला आहे की, सत्तावीस शिक्षक घ्यायचे आहेत. आकड्यांचा आधार घेतला. सत्तावीस पदे मंजुर करून आणली. आणि मग काय केले? त्यांना माहिती आहे की, पदे मंजुर झाली की, आरक्षण लागले. मग जे आरक्षणामध्ये बसतात. ते आपआपल्या अधिकाऱ्यांनी आणून भरले. म्हणजे सत्तावीस लोकांना शिक्षक म्हणून परमनन्ट करा. ते लोक वर्षानुवर्षे काम करतात. दहा-बारा-पंधरा वर्षे, जे किती असेल ते त्यांना न्याय देण्यासाठी तो ठराव केला होता. मग ते सत्तावीस लोक न घेता त्याच्यातील नऊ लोक घरी बसवले आणि जे नऊ त्यांच्यामध्ये आपल्या अधिकाऱ्यांचे नातलग. श्री. संख्ये यांना जरा बोलवा त्याच्या बायकोला त्याने कसे घेतले? म्हणजे हे काय करतात? मग आम्ही कोणाला न्याय द्यायचा? आम्ही इथे न्याय देण्यासाठी बसलो आहोत. आम्ही कोणाचे काही घेऊन खाल्ले आहेत? का संगणक चालकांनी पाचशे, हजार, पाच हजार रूपये काढून दिले मग ते अधिकाऱ्यांचे सगळे नऊ लोक आतमध्ये आले.

**हेलन गोविंद :-**

किती वर्षे झाली आमच्या लोकांवर अन्याय होतो. बाहेरचे वरून पेट्या घालून इथे भरतात. आमच्या स्थानिक लोकांना काही प्राधान्य आहे का? आम्हाला याचा काही फायदाच नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

नेमणुकीबाबतचे सगळे अधिकारी, तरतुदी सगळा विचार करून तुम्ही नेमणुका करा आणि तुम्ही करता. आमचा काही विरोध नाही. आज जे सांगितले जाते की, या संगणक चालकांना नोकरी देणार नाही. बरोबर आहे, तुम्ही देणार नाही. तुम्ही सांगणार की, तुम्हाला कुठल्या पदावर ठेवू? साहेब, आपला एक प्रयत्न फसला संगणक चालकांना आपण पदनिर्मितीचा प्रस्ताव मंजुर झाला नाही. म्हणून लगेच आपल्या विभागाने का केले ते बघा. गंमत बघा. एका पेपरामध्ये ०७ जानेवारी २००७ ला गपचूप एक जाहीर नोटीस काढली. आणि त्याच्यामध्ये काय म्हटले आहे. पुन्हा मा. महासभेचा ठराव क्रमांक अमुक अमुक अन्वये मानधनावर खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. लघुलेख-०४, संगणक चालक-८७. ही जाहीर नोटीस कोणी काढायला सांगितली? मा. महासभेने तर असा ठराव नव्हता केलेला की, जाहिर नोटीस काढून घ्या. मा. महासभेने असा ठराव केला होता की, हे संगणक चालक आहेत. ह्यांना कामावर परमनन्ट कसे करता येईल या दृष्टीने तुम्ही कार्यवाही करा. तसा तुम्ही प्रस्ताव पाठवला. मग जर प्रस्ताव असा नामंजुर होऊन येतो आणि जेव्हा शासन असे सांगते की, आऊटसोर्सिंगने करा. तेव्हा तो विषय मा. महासभेला न कळवता, न आणता डायरेक्ट जाहिर नोटीस निघाली. साहेब जाहीर नोटीस ०७ जानेवारी रविवारी निघाली. आणि शनिवारी म्हणजे ०६ जानेवारीला मुलाखतीसाठी जे उमेदवार येतात त्यांच्या फाईल तयार. मागासवर्गीयांचे सर्टिफिकेटपण तयार. कारण ८७ आणि ०४, एक्यान्नव. ९१ जागामध्ये तुम्ही जास्तीत जास्त ५२ टक्क्यापर्यंत, ४८ टक्क्यांपर्यंत आरक्षण घेऊ शकता. म्हणजे तुमचे तेवढे लोक नावासकट तयार. आणि मग हे नाटक केले कोणी? त्याच्यानंतर अजून एक दुसरी जाहीर नोटीस निघाली. मी तीन दिवस बाहेरगावी होतो. रात्री उशिरा आलो. मला प्रकरणाची जास्त माहिती, माहिती सगळी आहे कारण मला कागदपत्र एकत्रित करता आली नाहीत. दुसरी जाहिर नोटीस

काढली बघा. मिरा भाईंदर महानगरपालिकेतील संगणक विभाग व सचिव विभागाकरिता मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहेत. अनुसुचित जाती-०७, अनुसुचित जमाती-२०, विशेष मागास प्रवर्ग-०२, भटक्या जमाती-१०, इतर मागास वर्ग-०८, सर्वसाधारण-४३, नव्वद. मग जर प्रशासनाचे असे मत असेल की, नियमाप्रमाणे आपल्याला ही पदे मंजुर झालेली नाहीत. म्हणजे यांना आम्ही ठेवू शकत नाही. मग तुम्हाला जर मानधनावर अशा प्रकारच्या नेमणुका करायच्या होत्या. तर मग तुमच्या त्याच आदेशात असे म्हटले आहे की, संगणक चालक म्हणून काम करित असलेल्या लोकांना याबद्दल महापालिकेने निर्णय घ्यावा. असे त्या ऑर्डरमध्ये आहे. आऊटसोर्सिंग करावे किंवा संगणक चालक म्हणून काम करित असलेल्या लोकांचा विचार करावा. मग तेव्हा मानधनावर घेण्याबाबत तुम्ही या लोकांचा विचार का केला नाही? म्हणजे There is a certainaction going on. Behind the curtain. काहीतरी मोठा एकत्रित डील करून इतकी पदे भरायची आणि अशा पध्दतीने ॲडजस्टमेंट करायची. ज्या नऊ बालवाडी शिक्षिका आल्या त्यांची तुम्ही रितसर चौकशी करा. मी डीपीसी च्या कामाबाबत बोलणार नाही. ती कमिटी गठित झाली आहे. ती कामे कशी होतात? किती लोक मागच्या दरवाजाने आले, परमनन्ट झाले हे मी बोलणार नाही. आजच्या घडीला जे लोक काम करतात. त्या लोकांना न्याय दिला पाहिजे. जे करत नाहीत त्यांना तुम्ही निलंबीत केले. बरे वाटले. अगदी चांगले वाटले की, त्यांना खरोखर निलंबीत केले पाहिजे. मग त्यावेळी हा प्रश्न निघाला की, यातील अर्धे लोक अप्रशिक्षित आहेत. यातील अर्धे लोक गैरहजर राहतात. यातील अर्ध्या लोकांना संगणकचालकांचे कामच येत नाही. मग त्यावेळी मा. महासभेने एक कमिटी नेमली. आणि त्या कमिटीमध्ये काही भरणा केला. त्याविषयी थोडे वादपण झाले. कलम ३०(२) नुसार कमिटी नेमली होती. त्यामुळे ती कायदेशीर होती, विधीवत होती. त्याचा त्यांनी रिपोर्ट दयायचा होता. त्या रिपोर्टमध्ये मला वाटते चार लोक सोडून बाकीचे बरोबर आहेत असा रिपोर्ट आला. त्यावेळी तो सगळा रिपोर्ट आला आणि मग तसे झाले की, हे लोक त्या कामासाठी बरोबर आहेत. हा तो रिपोर्ट आहे. त्यांना गुण मिळाले ते पण दिले आहेत. टायपिंगला किती, टेक्नीकल किती, टोटल किती, रिमार्क किती, वगैरे सगळी लिस्ट आहे. म्हणजे आजच्या दृष्टीने आम्ही जेएनएनयुआरएम च्या एका भुयारी गटार योजनेचे काम चालू करतो. आत्ता २५० बसेस आणायचे आणखीन एक काम चालू करतो. एकीकडे अजून २०० एमएलडी चा प्रस्ताव, ज्याच्यामध्ये तुमचा सिंहाचा वाटा सुरूवातीपासन असेल अशी आम्हाला अपेक्षापण आहे. आणि तुम्ही ते कराल. ती २०० एमएलडी पाणी पुरवठ्याची योजना येते. सगळ्याच बुट तत्वावर चालणार नाहीत. किंवा बीओटी वर चालणार नाहीत. मग त्याच्यासाठीसुध्दा संगणक लागतातच ना? आणि आज अशी परिस्थिती आहे की, खरोखरच हे टाकाऊ किंवा ज्यादा लोक, अतिरिक्त लोक आहेत काय़ त्या डिपार्टमेंटने तो रिपोर्ट दयायला पाहिजे. तुमचे संगणक विभागाचे जे मुख्य आहेत त्यांनी सांगायला पाहिजे की, हे लोक टाकाऊ आहेत. किंवा हे टाकाऊ नसले तर हे शिकाऊ आहेत. हे शिकाऊ नाहीत तर हे टिकाऊ आहेत. तर मग टिकवायचे तर ठेवायचे की नाही हा रिपोर्ट तर त्यांनी दयायला पाहिजे. मग हा रिपोर्ट कुठेतरी मिळाला होता. म्हणून तर दोनदा ह्या जाहीर नोटीस काढल्या होत्या ना. की, तुम्हाला एवढे संगणक चालक पाहिजेत? आणि मग ऑल ऑफ करटन आत्ता या लोकांना घरी बसवून आम्ही नवीन लोक घेणार का? ठरावात करताना चुका झाल्या असतील. कारण कायद्याची आणि भरती करायची ही प्रोसेस ही माहिती नाही. एक ठरावात मी थोडीशी दुरूस्ती करतो. की, ह्या कर्मचाऱ्यांचा पदनिर्मितीची प्रस्ताव पुन्हा शासनाकडे सादर करावा. तोपर्यंत यांना मानधन, जसे आत्ता मागे मिळत होते तसे मानधन, जसे आत्ता ते नऊ लोक, ज्या बालवाडी शिक्षिका, त्या प्रायमरीमध्ये गेल्या नाहीत. नगरपालिका शाळांमध्ये वर्ग झाल्या नाहीत. त्यांना आपण मानधन वाढवले. त्यांना ३९००/- रूपये मानधन केले. तर तोपर्यंत यांना मानधनावर ठेवावे आणि मध्यंतरीच्या काळामध्ये आपण हा रिपोर्ट पाठवावा. तरी साहेब, आपल्यालाही कल्पना येईल. मला वाटते याच्यामध्ये तुम्हाला पर्सनल आयडेन्टीटी केलेली बरी पडेल म्हणजे श्री. जयंत पाटील, श्री. खान साहेब, श्रीम. प्रभात पाटील मॅडम हे लोक खरोखर चांगले आहेत की नाही हे तुमच्यासमोर येतील. तेव्हा तुम्हाला कळेलच. मधल्या काळात तुम्ही हेही बघा. जरी या लोकांनी त्यांची गुणवत्ता बघण्यासाठी जी कमिटी नेमली होती. त्या कमिटीने जरी चुकीचा किंवा खोटा रिपोर्ट किंवा कोणालातरी जवळ करून किंवा फेवर करून दिला असेल तर तुम्हालाही तसे लक्षात येईल. तुम्ही तुमची यंत्रणा राबवा आणि तोपर्यंत या लोकांना जे मानधन ५०००/- आणि ३०००/- वर जी रक्कम आहे त्याप्रमाणे चालू ठेवा. म्हणजे तुर्त आम्हाला लगेच कमी. आणि साहेब, तुम्हाला दुसरी गोष्ट सांगतो. माझा तरी असा नॉलेज आहे की, टॅक्स डिपार्टमेंटचे काम या लोकांव्यतिरिक्त आमचे कुठलेही जुने स्थायी कर्मचारी मी स्थायी हा शब्द वापरतो, स्थायी कर्मचारी करत नाहीत. तुम्हाला स्पष्ट सांगतो. हे लोक जर नसले तर तुमची टॅक्सेशनसिस्टम कम्प्लीट कोलमडून पडेल. पाहिजे तर तुम्ही त्या संगणक विभागाच्या लोकांना विचारा. माझी सभागृहाला ही विनंती आहे की, ह्या दुरूस्तीला मंजुरी द्या. आणि तुम्हाला, खरे म्हणजे मी मा. महापौरांना विनंती करण्याची गरज नाही. कारण मा. महापौरांनी त्याची काळजी घ्यायला पाहिजे, असा माझा विचार आहे. पण तुम्हाला विनंती करतो की, जसा ज्या लोकांचा काहीही संबंध नाही. माझ्या गोठ्यामध्ये म्हैस धुणारी, दुध काढणारी व्यक्ती जर शांतीनगरच्या पाणीपुरवठा योजनेमध्ये जाऊन नाव घालून ती जर या महानगरपालिकेमध्ये परमन्ट होऊ शकते. तर ही तर बिचारी तुमच्याच गोठ्यामध्ये

राबणारी गुरे आहेत. तर तुम्ही ठरवा त्यांना कसे हाकायचे? त्यांना थोडासा चारा तरी द्या. जास्त नका देऊ. जास्त पोट भरू नका. तुमच्याकडे माझी ही वैयक्तीक विनंती आहे. धन्यवाद.

**हेलन गोविंद :-**

श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, खरोखर तुमचे अभिनंदन करतो. कारण मा. आयुक्त साहेबांना हे माहिती नव्हते. तुम्ही स्पष्टीकरण दिले त्याबद्दल तुम्हाला धन्यवाद देतो.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या. हा ठराव दुरूस्तीसह मंजुर.

**प्रकरण क्र. ०३:-**

संगणकचालक व लघुलेखक यांचेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ०५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला आहे. संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृत्तांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवशकता असल्याने मा. महासभा दि. २०/०६/२००६, ठराव क्र. २९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकेमार्फत त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दि. ०९/०१/२००८ रोजीच्या मा. महासभेत लघुलेखक व संगणक चालक यांचेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे असा विषय चर्चेस आला असता सर्व संगणक चालक व लघुलेखक यांची शैक्षणिक पात्रता व कामाची क्षमता याची माहिती घेणेसाठी एक समिती गठित करण्यात येवून त्यांचेमार्फत तसेच संगणक विषयी तज्ञ व्यक्तींमार्फत संगणक चालक व लघुलेखक यांची शैक्षणिक पात्रता व संगणक विषयीचे ज्ञान तपासून मा. महासभेपुढे अहवाल सादर करण्यात आला होता. या अहवालानुसार संगणक चालक व लघुलेखक यांना ११ महिन्यांची मुतदवाढ देण्यात आली होती. सदर मुदत दि. ३१/०५/२००९ रोजी संपलेली आहे. अस्थायी आस्थापनेवरील संगणक चालक व लघुलेखक ह्यांच्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात रु. ४० लाख इतकी तरतुद केलेली आहे.

महानगरपालिकेतील नागरी सुविधा केंद्र तसेच सर्व विभागातील संगणकावरील कामाची व्यापता पाहता संगणक चालक रु ५,०००/- प्रती महिना (२६ दिवसांकरीता) व लघुलेखक रु. ६,५००/- प्रती महिना (२६ दिवसांकरीता) या मानधनावर नेमणूक करण्यास ही सभा मंजुरी देत आहे. महानगरपालिकेने संगणक चालक व लघुलेखक यांच्या नेमणूकीबाबत पुढील कार्यवाही करावी. तसेच संगणक चालक व लघुलेखक ह्यांच्या पदनिर्मितीचा प्रस्ताव नव्याने शासनाकडे मंजुरीस्तव रितसर फेरसादर करुन शासनाकडे त्याचा पाठपुरावा करावा.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील** **अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४, दि. ०६/०४/२००९ रोजी मौजे-नवघर स.नं. २१८ (जुना), १९४ (नवीन) हि.नं. ९, भाईंदर (पूर्व) येथे तोडत असलेल्या इमारतीत झालेल्या अपघातात निधन झालेल्या व्यक्तिंच्या कुटूंबियांना आर्थिक सहाय्य मिळणेबाबत. तसेच दोन पत्रकाराची आहे. त्यांनादेखील मानधनाचा विचार करावा. श्री. बाबुराव राजभर, तसेच श्री. हरेश बारी आणि श्री. मालपानी. यांना आर्थिक मदत. तसेच पत्रकार श्री. अनिल खेडेकर यांचा पत्नीचा पाय अपघातात गमावला गेला आह. त्यांना पाय बसविण्यास आर्थिक मदत. तसेच महापालिकेच्या संडासाच्या टाकूत पडून श्री. बाबुराव राजभर यांचे निधन झाले. त्यांना आर्थिक मदत. तसेच पत्रकार श्री. हरेस बारी यांच्या मुलीला व पत्रकार श्री. मालपानी यांना आर्थिक मदत देणे.

**मा. महापौर :-**

विषय असा आहे. या विषयासोबत पत्रकार संघातून पत्र आले आहे. श्री. अनिल खेडेकर यांच्या मिसेसचा पाय ॲक्सीडंन्टमध्ये कापला होता. तर त्यांना दुसरा पाय लावायचा त्यासाठी त्यांनी मदत मागितलेली आहे. आणि पत्रकार श्री. मालपानी यांची बायपास किंवा एंजोप्लास्ट करायची आहे. त्यासाठी मदत मागितलेली आहे. आणि तिसरे गणेश देवल नगरमध्ये मा. आयुक्तांनी मंजुर केलेले आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर निधीमधून द्यावे.

**मा. महापौर :-**

महापौर निधीमधून किंवा कुठून मंजुरी द्यावी. आणि दुसरे एक महापालिकेच्या सेफ्टी टँकरमध्ये पडून अजून एक मयत झाले होते. मा. आयुक्तांकडे तो प्रस्ताव आला होता. मा. आयुक्तांनी सादर केलेला आहे. त्याबद्दल निर्णय घ्यावा.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, आपण पत्रकारांना देतो. पण जे आजी, माजी नगरसेवक असतील. तेही आजारी असतात. सर्वच मध्यवर्गीय आहेत, किंवा श्रीमंत आहेत किंवा गरीब आहेत असे नाही. सर्व क्षेत्रातील आहेत. मग त्यांना तुम्ही काय करणार? जर कधी नगरसेवकांनी डिमांड केली. गरीब परिस्थिती असेल तर त्यांनापण तुम्ही देणार का?

**मा. महापौर :-**

माझ्याकडे निवेदन आलेले आहे. सभागृहापुढे मांडलेले आहे. सभागृहाने निर्णय घ्यावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण महापौर निधी शिवाय कसे देणार? महापालिका फंडातून आपण कसे देणार? देऊ शकतो?

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, मिरा भाईंदर क्षेत्रातील इतर नागरिकांनीही जर अशी डिमांड केली की, आम्हाला बायपास करायची आहे किंवा पाय गेला आहे तो दुरूस्त करायचा आहे. तर आपण निधी देणार का? याबद्दल आपण खुलासा करावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेबांनी जी टिपणी दिलेली आहे. सदर प्रकरणी प्रत्येक मृताच्या नातेवाईकांना किमान दोन लाख रूपये आर्थिक सहाय्य मिळण्यास विनंती अर्ज केलेला आहे. मा. आयुक्त साहेब, इललिगल बांधकाम बांधणाऱ्याला आणि त्याला जमिनदोस्त करणाऱ्याला सर्व पैसे त्या इललिगल बांधकाम करणाऱ्याकडून वसूल करणे हे नियमात आहे. हे जे दोन लाख रूपये तुम्ही देणार आहात. मला इकडे ऑडीटर असतील त्यांनी खुलासा करावा की, कुठल्या हेडमधून देणार आहेत? म्हणजे उद्या ऑडीट रिपोर्ट, एक तर महापालिकेला अधिकार आहे. तर तो नियम सांगा की, या नियमाखाली मा. महासभेमध्ये हा अधिकार आहे. मा. महापौर फंडातून दयायचे आहे. मा. महापौरांनी इकडे उल्लेख करावा. मा. महापौर फंडातून दोन लाख नाही तीन लाख दिले तर काही चुक नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर फंडातूनच द्यायचे आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही हे प्रशासकियमधून देणार आहात की, कोणत्या हेडमधून देणार आहात. आणि दिले तर हा नियम बरोबर आहे. कुठल्या नियमाखाली देता ते जरा सांगा.

**श्रीप्रकाश जिलेदार :-**

मा. महापौर साहेब, मा. महापौर फंड मे कितना पैसा जमा है?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर साहेब, खेळाडूंना २५-२५ लाख रूपये दिलेले आहेत. पाच-पाच लाख दिलेले आहेत. मग जे मयत झाले. त्यांना द्यायला काही हरकत नाही.

**मा. महापौर :-**

विषय तो नाही. जिथपर्यंत मला माहिती आहे. मा. आयुक्तांची टिपणी अशी होती, ती मी आत्ता वाचतो की, महापालिका फंडातून द्यावे. असा विषय होता. आत्ता त्यांचे म्हणणे आहे की, फंडातून देता येईल की, नाही तो विषय होईल. मा. आयुक्तांचे म्हणणे आहे की, महापौर फंडातून द्या. तो निर्णय करायचा आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर निधी कशासाठी द्यायची हे नियम आपण केलेले आहेत. त्याच्यात थोडी सुधारणा करावी लागेल.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर साहेब, जे मेले त्यांना कोणाच्या फंडातून काय द्यायचे ते द्या. पण माझी सभागृहाला एक विनंती आहे की, जे काही देत असाल तो डी.डी. किंवा चेक त्या मुलांच्या नावावर द्या.

**एस्.ए.खान :-**

मा. आयुक्त साहेब, ज्याने ही इललिगल बिल्डींग बांधली होती. त्याच्याविरूध्द तुम्ही काय कार्यवाही केली?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, बिल्डरने जी बिल्डींग बांधली. त्या बिल्डींगला नगरचनाने परमिशन दिलेली का? जर परमिशन दिलेली नसेल तर त्यावेळी अतिक्रमणवाल्यांनी काय केले?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तेव्हाचा क्षेत्रिय अधिकारी कोण होता? अतिक्रमण अधिकारी कोण होता.

**एस्.ए.खान :-**

अतिक्रमण अधिकारी कोण होते? बांधायला परवानगी कोणी दिली?

**नयना म्हात्रे :-**

अतिक्रमणचे अधिकारी कोण होते? त्यांच्यावर तुम्ही काय कार्यवाही करणार आहात? नगरचचनाने परमिशन दिली असेल तर त्या अधिका-यावर तुम्ही काय कार्यवाही करणार आहात?

**मा. आयुक्त :-**

अनधिकृत बांधायला कोण परवानगी देतात का?

**एस्.ए.खान :-**

पूर्ण अनधिकृत होती ? लिगल काहीच नव्हते? त्याच्यामध्ये नियंत्रण कोणाचे होते?

**नयना म्हात्रे :-**

त्यावेळी क्षेत्रिय अधिकारी कोण होते?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यावेळेला क्षेत्रिय अधिकारी नव्हते?

**मा. आयुक्त :-**

होते. अनधिकृत बांधा म्हणून सांगितले नव्हते.

**मदन उदितनारायण सिंह :-**

पण जेव्हा त्या बिल्डींगचा अनुशेष निर्माण होत होता. तेव्हा आपले अधिकारी काय करत होते. ते बघण्याची जबाबदारी सगळ्यांची होती.

**मा. आयुक्त :-**

सगळ्यांना माहिती अहे की, अनधिकृत बांधकाम कसे उभे राहतात? उभे राहिल्यानंतर तोडल्यानंतर स्टे आणतात. स्टे आणल्यानंतर बांधकाम चढत असते. हे सगळे कोर्टाला पण माहिती आहे. तुम्हाला माहिती आहे. मलाही माहिती आहे.

(सभागृहात गोंधळ )

**मदन उदितनारायण सिंह :-**

त्या अधिका-यांवर कार्यवाही करा. ते अधिकारी असताना अतिक्रमण होते.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी  अतिक्रमण बांधले. स्टे आणला. ते उठवून तोडलेले आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

बांधल्यानंतर स्टे आणला.

**मा. आयुक्त :-**

बांधत असताना स्टे आणला.

**मदन उदितनारायण सिंह :-**

बांधत असताना आपले अधिकारी काय करत हाते?

**मा. आयुक्त :-**

बांधत असताना दोन वेळा ते तोडले होते.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, शहरात अजुनही बरीच अतिक्रमणे आहेत.

**मा. आयुक्त :-**

२४ तास कर्मचारी तिथे बसून राहत नाही आणि एकच बांधकाम नाही. त्यांच्याकडे मोठे एरिया आहेत. जसजसे बेकायदेशीर बांधकाम होतात. तसतसे तोडतात. कोर्टातून स्टे आणतात आणि बांधतात.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपला जीआर काय म्हणतो? आपला शासन आदेश काय म्हणतो? याला कोण जबाबदार आहे? अतिक्रमण होते त्याला जबाबदार कोण?

**मा. आयुक्त :-**

ते सगळे प्रभाग अधिकारी आहेत, क्लार्क आहे, मुकादम आहे, सॅनेटरी इन्स्पेक्टर आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

जे जबाबदार आहेत त्यांना निलंबीत करा.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्याला याबाबतीत कमी माहिती आहे.

**नयना म्हात्रे :-**

त्यांच्यावर काहीतरी कार्यवाही झाली पाहिजे की नाही?

**जयंत पाटील :-**

आपल्याला ह्या बिल्डींगच्या बाबतीत कमी माहिती आहे. कारण आपण त्या काळामध्ये नव्हते. मुळात ही बिल्डींग माझ्या प्रभागात येते. त्यादिवशी आपण होतात. ही बिल्डींग पाडण्यासाठी अगोदरच्या स्थायी समितीत, म्हणजे या कालावधीच्या अगोदरच्या श्री. शशिकांत भोईर, मी, श्री. रतन पाटील, आम्ही मा. स्थायी समितीमध्ये ठराव मांडला. आम्हाला सांगितले गेले की, तिकडे कर्मचारी पाठवले आहेत. बिल्डींग तोडली जाणार. हा विषय दोन-अडीज वर्षापूर्वीचा. त्याच्यानंतर आम्ही तिघेजण तिकडे प्रत्यक्ष बघायला गेलो. एका गाडीत बसलो. तोडणे राहीले बाजूला, काम जोरात चालू आहे. विटांचे बांधकाम चालू आहे. म्हणजे इकडचे अधिकारी आम्हाला मा. स्थायी समितीमध्ये थापा मारतात. आम्ही तिथून एका अधिकाऱ्याला फोन केला की, तुम्ही आम्हाला तिकडे प्रॉमीस केले, तर आम्ही आत्ता तिकडे येतो. आले, थोडेसे त्याला आपण गालावर कशी थापटी मारावी ते भिंतीवर थापट्या मारत होते. आणि मुर्ख बनवले गेले. त्या काळामध्ये जर ही बिल्डींग तोडली गेली असती. तर आपले हे पैसे वाचले असते काही झाले नसते. म्हणजे ही चुक त्या काळातील प्रशासनाची आहे. म्हणजे त्याने स्टे आणला तो नंतरचा भाग आहे. अशा तऱ्हेने संरक्षण दिले गेले. तिकडे खुप मोठा व्यवहार झाला. माझ्याशी एका माध्यमातून बोलणी चालू होती. त्यांना ते जमले नाही. आणि म्हणून हा अपघात झाला. दुर्दैवाने त्या काळामध्ये आपण आलात. आणि हे गंडांतर आपल्यावर आले. आपला हेतू वाईट नव्हता. ती गटारावर बिल्डींग होती. ती बिल्डींग तुटणे गरजेचे होते. तोडण्यामध्ये काही चुका झाल्या असतील. अपघात घडला. अपघात मुद्दाम कोणी केलेला नाही, हे आम्हाला मान्य आहे. आत्ता त्या ठराव मांडतील. आपल्या महापौर निधीतून.

**मा. महापौर :-**

श्री. प्रफुल्ल पाटील यांचे तेच म्हणणे होते की, मा. महापौर फंडातून द्यायचे असेल तर तो विषय रितसर त्या ॲंगलने आला पाहिजे. आत्ता तो महापालिका फंडांतून आला आहे. म्हणजे जनरली महापौर फंडातून पैसे, मी एखाद्या वेळी सचिवांकडे पाठवतो. सचिव ते ऑडीटरकडे पाठवतात...

**जयंत पाटील :-**

ठरावामध्ये महापौर निधीतून करा.

**मा. महापौर :-**

माझे काही म्हणणे नाही. माझे फक्त एवढेच म्हणणे आहे की, आपण ऑडीटरला विचारू. त्यांनी ॲक्सेप्ट केले पाहिजे.

**जयंत पाटील :-**

ठराव पास करून घ्या.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, चिंधीचोर सारखे पैसे देऊ नका.

**प्रभात पाटील :-**

लेखापरिक्षकांचे मत घ्या. पण पैसा ना महानगरपालिकेच्या फंडातून द्यायचा, ना महापौर निधीतून द्यायचा. जे अधिकारी जबाबदार आहेत. त्यांच्याकडून द्यायचा. ही सवय लागेल. त्यांनी अनधिकृत करायचे तिकडे कोणी मरायचे, त्यांचे जीव जायचे. त्यांचे संसार उघड्यावर पडायचे आणि आपण त्यांना पैसा पुरवत राहायचे.

**मा. आयुक्त :-**

हा अपघात आहे. ते मरावेत म्हणून तोडायला गेलो नाही. अकस्मात पडले आहे.

**प्रभात पाटील :-**

आम्ही मान्य करतो की, तुम्ही चांगले करायला गेलात. आम्ही तुमचे अभिनंदन करतो. जे तेव्हा झाले नाही ते तुम्ही केले. पण ही जी शिक्षा आहे ही इथल्या प्रशासनाला मिळालीच पाहिजे कारण हे एकच प्रकरण नाही. अख्खे मिरा भाईंदर अनधिकृत आहे. जगाच्या नकाशावर कोणते शहर असे नसेल की, मिरा भाईंदर इतके खराब नाव आहे. म्हणून पैसे त्यांच्याकडून वसुल करा. त्यांच्या फंडातून द्या. जितका काळ ते पदावर होते. त्यांच्या पगारातून ते पैसे कापा.

**मा. महापौर :-**

त्यांना शिक्षा द्या. त्यांच्याकडून पैसे वसुल करा. पण यांना वंचित ठेवू नका.

**प्रभात पाटील :-**

ह्यांना द्यायचे. त्यांच्याकडूनच वसूल करून द्या.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, दोनच माणसे मेली आहेत. त्यांना दोघांना दहा-दहा लाख रूपये तरी देऊन टाका. तो त्यांच्या आयुष्याचा प्रश्न आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब, जो मृत व्यक्ती है, उनको पैसा मिलना चाहिए। लेकिन अपने अधिकारी क्या कर रहे है। आपको भी मालूम है की, मिरारोडका एक प्रकरण मै ०६ महिने से आपके पास लाया हू। उसका अब तक कुछ नही हो रहा है। और लोग जितना कम्प्लेंट करते है, अधिकारी उतना बिनधास्त काम करते है। इसका मतलब क्या है? यह कहा तक जाकर रूकेगा? १५४ मिरारोड का। मै स्टॅंडींग बोला, आपके पास भी लाया। अब तक उसका कुछ नही हुआ। ऐसा क्यो? हमने स्टॅंडींग मे विषय लाया लेकिन अब तक कुछ नही हो रहा है। मतलब हम लोग ऐसे चिल्लाते रहे और अधिकारी माल खाते रहे क्या?

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, आत्ता हे पैसे कुठल्या फंडातून द्यायचे हा खल अख्ख्या सभागृहात चालला आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब १५४ की वह बिल्डींग लिगल है या इललिगल? जो मै ६ महिनसे कम्प्लेंट कर रहा हू। कोई कार्यवाही नही हो रही है। आप बोल दिजीए की, वह लिगल है या इललिगल है?

**मा. आयुक्त :-**

१५४ इललिगल है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

उसे अब तक तोडा गया की नही?

**मा. आयुक्त :-**

कोर्टमे जवाब देकर आये। कोर्ट का ऑर्डर आने के बाद कार्यवाही करेंगे।

**मदन उदितनारायण सिंह :-**

उसमे अब तक क्यो नही किया गया?

**मा. आयुक्त :-**

अब तक कोर्ट मे स्टे था।

**मदन उदितनारायण सिंह :-**

कोर्ट मे स्टे उस बांधकाम के लिए नही है।वह स्टे दुसरे बांधकाम के लिए है।

**मा. आयुक्त :-**

दुसरे बांधकाम के लिए थे। लेकिन १५४ मे जवाब दर्ज करवाया और उनको पुछा की, कोर्ट मे केस होते हुए भी आप तोडने के लिए गडबड क्यो कर रहे है?

**मदन उदितनारायण सिंह :-**

अगर स्टे है तो तोडने क्यो गये है?

**मा. आयुक्त :-**

कोर्ट ने जो बोला आप को बता देंगे।

(सभागृहात गोंधळ)

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

मा. आयुक्त साब, कम्प्लेंट करते करते सात माले की बिल्डींग बन गयी। म्युनिसीपालटी तोडने गयी थी तो कोर्ट उधर बैठा था क्या?

**वंदना चक्रे :-**

मा. आयुक्त साहेब, हे दोन सदस्य जे बोलले ते करा. श्री. गणेश पाटील आणि श्री. निशांत जाधव हे दोन्ही अधिकारी मिरारोड मध्ये काहीच करत नाहीत हे मी वारंवार सांगते. हे सांगता सांगता श्री. घेवारे वारे घेत गेले. श्री. राजीव जाधव साहेब गेले, तेही वारे घेत गेले. आत्ता तुमच्या काळात तरी असे होऊ देऊ नका. ही आपल्याला माझी कळकळीची विनंती आहे. वारंवार सांगते की, या दोन अधिका-यांना निलंबीत करा. त्यांच्यावर मिरारोडची बरीचशी प्रकरणे आहेत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब, मुझे तो ऐसा लग रहा है की, अधिकारी आपकी सुनते नही है। क्योंकी आपके आदेश देने के बावजूद काम नही हो रहा है।

**मा. आयुक्त :-**

ऐसा आप समझ लो।

**मदन उदितनारायण सिंह :-**

हम लोग समझ ले। मतलब आपका इससे कुछ लेना देना नही है? आपने मेरे सामने आदेश दिया था। इस आदेश की कार्यवाही नही हुई है। अगर ऐसा ही है हम लोग सभा का त्याग करते है। जब आपको काम ही नही करना है हम चिल्लाते रहे। आप बोल रहे है की, समझ लो।

**मा. आयुक्त :-**

टोटल इललिगल सब जगह है। पोलिस बंदोबस्त लेना पडता है। पोलिस बंदोबस्त के लिए हम हर रोज एक लेटर देते है। जीस दिन पोलीस बंदोबस्त मिलता है, इस दिन तोडने के लिए जाते है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

साहब, उस दिन साईट पर सबलोग तोडने के लिए गये थे ना? आठ दिन पहले तोडने गये थे।

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. १० जूनला कारवाई करायला अधिकारी गेले होते. कारवाई सुरू केली होती. आणि त्या कारवाई संदर्भात न्यायालयात जे प्रकरण प्रलंबित आहे. मी दुसऱ्या एका केसच्या संदर्भात साक्षीसाठी कोर्टामध्ये उपस्थित झालो असता त्याच कोर्टासमोर हे प्रकऱण आलेले होते. आणि मा. कोर्ट महोद्यांनी आम्हाला या शब्दात विचारले की, तुम्हाला तोडायची एवढी घाई का झालेली आहे? तुम्हाला आदेशाची वाट बघता येत नाही का? कोर्टासमोर प्रकरण पडलेले आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

घाई म्हणजे, लोगो का इसमे पैसा फस रहा है ।

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त) :-**

मा. कोर्टाने त्या दिवशी जे आदेश दिलेले आहेत. त्याच्या आदेशाच्या प्रती...

**मदन उदितनारायण सिंह :-**

महानगरपालिका मे विधी विभाग और वकील क्यों रखे गये है?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त) :-**

त्या आदेशाच्या सर्टीफाईड कॉपी काढण्याबद्दल मी वकीलांना बोललेलो आहे.

**श्रीप्रकाश जिलेदार :-**

दो माला भी नही बना खा तब कम्प्लेंट किया था। उधर सात माले का बिल्डींग तैयार हुआ है।

**मा. महापौर :-**

उसमे कोर्ट का स्टे था।

**मदन उदितनारायण सिंह :-**

स्टे दुसरे बांधकाम पर था। इस बांधकाम पर स्टे नही था। मेरे पास लेटर है।

**मा. महापौर** :-

आज है ना?

**मदन उदितनारायण सिंह :-**

आज है की नही यह पता नही। छह महिने पहले नही था। तब से क्या कर रहे है?

**मा. महापौर :-**

आज है?

**मदन उदितनारायण सिंह :-**

हमे मालूम नही।

**मा. महापौर :-**

अगर नही होगा तो कल कार्यवाही करेंगे।

**मदन उदितनारायण सिंह :-**

छह महिने पहिले कार्यवाही क्यों नही हुआी थी। उस समय वह बन रही थी। बनी भी नही थी। आज उस बिल्डींग मे जीन लोगो ने पैसा दिया है । वह पैसा फस गया। उनका पैसा महानगरपालिका वापस करेगी क्या?

**मा. महापौर :-**

अब क्या करना चाहिए?

**मदन उदितनारायण सिंह :-**

इललिगल है तो उसको तोड दिजीए। दिवटे साहब बोल रहे है की, कारवाई किया। क्या कारवाई किया यह इनसे पुछीए।

**रामनारायण दुबे :-**

बार बार कम्प्लेंट करने के बाद भी जो प्रभाग अधिकारी काम नही करता है उनके उपर कार्यवाही की जाए।

**मदन उदितनारायण सिंह :-**

हम लोग चिल्लाते रहे और कुछ नही। यह लोग जो तोडने गये थे। ए.सी. का हॉल बनाकर आये की बिल्डर उसमे ए.सी. फीट कर ले। और कुछ नही किया। और आयुक्त साहब बोलते है की, ऐसा ही समझो मतलब हम लोग चिल्लाते रहे और वह समझते रहे।

**वंदना चक्रे :-**

मा. आयुक्त साहेब, आपली ही दुसरी सभा आहे. पहिल्या सभेत पहिला विषय आल्यानंतर आपले अभिनंदन केले. मोठ्या प्रमाणावर सगळ्या पध्दतीने तुमचे खूप चांगले स्वागत केले. आल्यापासून आपण चांगले काम करत आहात. माझा विषय त्या दिवशीपण आला होता. श्री. गणेश पाटील यांचा विषय त्या दिवशीपण आला होता. आपण म्हटले होती की, आठ दिवसानंतर....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, इललिगल बांधकाम यह आज का विषय नही है। लेकिन अब जो नये नये जी.आर. आ रहे है। इललिगल बांधकाम पर तीनपट टॅक्स। अब समजो आपने इललिगल बिल्डींग नही तोडा, ठिक है मान लिया नही तोडना है, स्टे वगैरे है। वह बनने के बाद आप शुअरिटी देते हो की, उसपर तीन गुना टॅक्स नही लगायेंगे? बोलने का मतलब क्या है की, किसी की भावना समजो। मा. आयुक्त साहब, आपने नोटीस निकाला है। आपने यह तक नोटीस निकाला है की, जो विकासकर्ता यहा से चला गया है....

**मा. महापौर :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवालजी, विषय महापौर निधी से मदत करने का है। इललिगल बांधकाम का कहा निकाल रहे है?

**मदन उदितनारायण सिंह :-**

महापौर निधी से मदत करो। लेकीन इसपर चर्चा कब होगी?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही मला वेळ दिला आहे. मला बोलायला अवधी देणार की नाही?

**मा. महापौर :-**

आपण बोला.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण हे जे प्रकरण क्र. ०४ दिले आहे. या प्रकरण क्र. ०४ मध्ये अतिक्रमण उपायुक्तांचे काय ओपीनियन आहे? कारण आत्ता ही सगळी बोंबाबोंब चालली आहे. आमचे उपायुक्त जवळ जवळ एक वर्षभर सारखे सुट्टीवर आहेत. त्यांना या महापालिकेमध्ये जर काम करायचे नसेल, अतिक्रमणचे उपायुक्त आहेत. तुम्हाला उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. तुमचा वरचा पॅरेग्राफ ते सांगतो. आणि तुमच्या अतिक्रमणच्या महत्वाच्या पदावर असलेले उपायुक्त श्री. दिवटे ह्यांना सभागृहात ठराव झालेला आहे. याच सत्ताधा-यांनी दोन उपायुक्तांचे निलंबीत करण्याचे ठराव केले. अजूनपर्यंत एकही बोलत नाही आणि अतिक्रमणाबद्दल सगळी बोंबाबोंब चालली आहे. मा. आयुक्तांच्या वतीने उपायुक्त श्री. दिवटे हे काम करतात. सदर इमारत पाडायला आपण गेलात. त्याच्या अगोदर उपायुक्त श्री. दिवटे यांचे काय ओपीनिअन होते हे याच्यात नमुद केलेले नाही. मुद्दा क्र. ०२, नगररचना विभागामध्ये स्ट्रक्चरल इंजिनिअर म्हणून जी व्यक्ती आहे त्या स्ट्रक्चरल इंजिनिअरने आपल्याला असे ओपिनिअन दिले होते का की, ही इमारत ह्या साईटने खेचा तर ती पडेल किंवा ही या पध्दतीने पाडली पाहिजे, म्हणजे दुर्घटना होणार नाही? ह्या दोन महत्वाच्या बाबी तुमच्या प्रस्तावामध्ये नाहीत. उपायुक्त श्री. दिवटे यांनी खुलासा करावा की, त्यांना मिरा भाईंदर महापालिकेत राहायचे आहे की नाही? कारण आम्ही जेव्हा जातो, वर्ष झाले, माझ्या माहितीच्या अधिकाराची अजून दोन तीन प्रकरणे पेन्डींग आहेत. त्याला वेळ मिळत नाही. आणि आपण सभागृहामध्ये झालेले ठराव याच्यावर तुम्हाला पत्रही दिले आहे की, या दोन उपायुक्तांवर आपण निर्णय घ्यावा. सभागृहाने मंजुर केलेल्या ठरावाचा आदर करा. सभागृहाने ठरवले आहे की, या दोघांना निलंबीत करा. याच्यावर कारवाई का होत नाही हे आम्हाला पाहिजे. आम्ही फक्त पत्र देऊन गप्प बसतो. आज ही इमारत कोसळली. दोन जण मृत्यू पावले. पण आज या शहरामध्ये अशा शेकडो इमारती आहेत की, ज्यांचे आत्ता फक्त सांगाडे उरलेले आहेत आणि मेन रस्त्यावर त्या इमारती आहेत. ह्या इमारती कोसळताना जर पदवासीय इनजई झाले आणि काही नागरिक चेंदामेंदा होऊन मेले. माझ्या वॉर्डच्या समोरचा एक नागरिक अशाच बिल्डींगखाली मेला होता. त्याच्यावर काय झाले? तो बिचारा आंबे विकणारा भैय्या तिकडे मेला. आणि ती दुर्घटना बघायला आपले सगळे अधिकारी, पदाधिकारी, फायरब्रिगेडचे लोक आणि आपले मा. महापौर पण गेले होते. तेव्हा तीन स्लॅब लटकत होते. या इमारतींचा कोण सर्व्हे करणार आहे का. की, पावसाळ्यापूर्वी प्रत्यक्ष कोसळणा-या इमारती किती? तो जो तुमचा स्ट्रक्चरल इंजिनिअर ठेवला आहे त्याला ते ज्ञान आहे का? आणि जर त्याला ते ज्ञान असते तर त्याने क्रमवार, किंवा वॉर्डवाईज की, वॉर्ड नंबर एकमध्ये दहा बिल्डींग आहेत. वॉर्ड नं. २ मध्ये तीन बिल्डींग आहेत. बिल्डींगसकट त्याने सांगितले पाहिजे की, हे स्ट्रक्टर दोन वर्षामध्ये कोसळणार. आत्ता आर्किटेक्टकडे जो व्हॅल्युअर असतो तो त्या स्ट्रक्चरचे चेकिंग करून मग व्हॅल्युअर करतो की, ही बिल्डींग ह्या किंमतीची आहे आणि ही अशी कोसळणार आहे. या बाबतीतले काही नॉलेज आपल्याकडे आहे का? आत्ता एका बिल्डींगने आपल्याला ही टेस्ट केस दिली आहे. फक्त दोन मेले आहेत. काही बिल्डींग रस्त्यावर आहे. एक रेडरोज म्हणून बिल्डींग आहे. त्याच्याखाली मोठा बसस्टॉप आहे. परिवहनाचा, एस.टी.चा सगळे आहे. आज त्या बिल्डींगची बाल्कनी तीनवेळा कोसळली खाली बसस्टॉप आहे आज बसस्टॉपमध्ये अननोन माणसे असतात. मी दुकानदार आहे. मला माहिती आहे की, वरचे

कोसळणार आहे. मी थोडे प्रिकॉशन घेतो. पण रेडरोज या बिल्डींगची बाल्कनी तीन वेळा कोसळली. आपले नशीब चांगले की, कुठली जिवीतहानी झाली नाही. श्री. शशिकांत शहा साहेब, जे माजी नगरसेवक आहेत. त्यांच्या इमारतीची मेन रोडवरच्या दोन बाल्कनी रस्त्यावर कोसळल्या. हे अपघात झाले आपण बालबाल वाचलेले आहोत जिवीतहानी झाली नाही. ती मेनरोडची बाल्कनी रात्री साडे दहा वाजता कोसळली म्हणजे सगळे फुटपाथवर कोसळले गेले तिकडे जिवीतहानी झाली नाही हे तुमचे नशीब. हे दोन जे मेले आहेत. ही टेस्ट केस आहे. याच सभागृहामध्ये एक-एका खेळाडूंना तीन-तीन वेळा मदत दिली आहे. तेव्हा एवढा खल झाला नाही. पन्नास-पन्नास हजाराची पारितोषीके दिली. मी कुठल्या खेळाडूच्या विरोधात नाही. पण एखाद्या कोणाचे तरी ठराविक असे आलेले प्रपोजल लवकर पास करा. म्हणून सभागृहाने मोठ्या मनाने पास केले, आज आपल्या अधिका-यांच्या पण काही चुका आहेत. प्रशासनाने माझे भाषण झाल्यानंतर याचे जरा क्लेरिफीकेशन द्यावे. तुमचे स्ट्रक्चरल इंजिनिअर काय करत होते? त्यांचे ओपिनिअन याच्यात का आले नाही? तुमचे जे श्री. दिवटे आहेत, लोकशाही आहे, त्यांना जर काम करायचे नसेल तर त्यांनी आज सभागृहातून जावे. ते जातही नाहीत, सोडतही नाहीत. हे त्या वांझोट्या परिवारासारखे झाले आहे. घटस्फोटही घ्यायचा नाही आणि संसारही करायचा नाही. कुंकवाचा नवरा असतो. पण तो काहीच कामाचा नाही. आणि बायकोही काही कामाची नाही. प्रकार तो आहे. संसारच चालत नाही. आज ही व्यक्ती गैरहजर का? आणि प्रशासन गप्प का आहे? सरकारमध्ये असा कुठला अधिकारी किंवा मंत्री बसला आहे, जो त्या अधिका-याला वाचवतो. सभागृहाला हे आज कळू द्या. आज एक वर्ष आम्ही हे नाटक बघतो आहे. नालेसफाईचे काम चालू आहे. आमच्याकडे मिठी नदीबाबत मा. हायकोर्टाचे बरेचसे ऑडर्स आहेत. माझ्या वॉर्डमधली नाल्यातील अतिक्रमणे अजूनपर्यंत निघालेली नाहीत. अतिक्रमण ताडोयला गेल्यावर उपायुक्त नसतात. उपायुक्त हे आयुक्तांच्या वरचे नाहीत. आज पत्रावर पत्र देऊन, सभागृहामध्ये ठराव होऊनसुध्दा याच्यावर कार्यवाही का होत नाही? याचे उत्तर या सभेत आत्ता आम्हाला पाहिजे. याशिवाय पुढचा विषय आम्ही चालू देणार नाही. क्लेरिफीकेशन द्या की, स्ट्रक्चरल इंजिनिअर कोण आहेत आणि त्यांनी काय केले?

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, हा विषय आलेला आहे. ठरावसुध्दा पास होईल. ज्या मयत व्यक्ती आहेत. त्यांच्या कुटूंबियांना मदत मिळाली पाहिजे हे अगदी बरोबर आहे. पण तो जो ठेकेदार त्यावेळी होता. त्याची आणि महापालिकेची काय ॲग्रीमेंट झाली होती. जेसीबी चा जो ठेकेदार होता. त्यांची काही ॲग्रीमेंट झाली असेल. त्या ॲग्रीमेंटमध्ये ठेकेदाराने जे ऑपरेटर होते त्यांचा इन्शुरन्स काढला होता का?

**मा. महापौर :-**

तो त्यांचा पार्ट होता.

**अनिल सावंत :-**

त्यांचा पार्ट असला तरी महापालिकेच्या ठेक्यावर जे ठेकेदार काम करतात त्यांचे जे एम्प्लॉइज आहेत त्यांचा इन्श्युरन्स त्या ठेकेदारने काढावा, काढून ठेवावा ही महापालिकेची जबाबदारी आहे. त्याने इन्श्युरन्स काढला होता का? त्या ठेकेदाने त्यांच्या कुटूंबियांना किती कम्पेन्सेशन दिले? त्याची काही चौकशी झाली का? ज्या पध्दतीने ती बिल्डींग तोडण्यात आली.. जे.सी.बी. लावून ती बिल्डींग तोडण्यात आली. कोणी रस्त्यावर चालणा-या वाटसरूने सुध्दा सांगितले होते की, इकडे अपघात होणारच आहे. कशाप्रकारे जेसी पुढून घुसवले गेले आणि त्याचे पिलर कट केले, आणि बिल्डींग कोसळली, आणि त्याच्यामध्ये मला एक आश्चर्य वाटते की, जे मयत झाले. श्रीम. वैशाली प्र. जाधव आणि श्री. अशोक यादव यांच्या फॅमिलीमधले आहेत. त्या जे.सी.बी. मध्ये जे दोघेजण गाडले गेले ही खरोखर दुदैवाची गेष्ट आहे. यांच्याजवळून महापालिकेला दोन पत्र प्राप्त झाली. त्या पत्रामधील एक वाक्य आहे की, मनपा अतिक्रमण विभागातील अधिकारी, कर्मचारी यांचे विरूध्द या अपघाता संदर्भात माझी कोणतीही तक्रार नाही. हे वाक्य ती अडाणी बाई लिहू शकते का? म्हणजे अतिक्रमण विभागातील अधिका-यांनी आपली साईड सेफ केली. ही पत्र दिलेली आहेत बघा. त्याच्यामध्ये प्रकरण क्रमांक, त्याच्यानंतर ही वाक्यरचनासुध्दा सेम आहे. हे पत्रसुध्दा महापालिकेमध्ये टाईप झालेले आहे. त्यांचे फक्त अंगठे लावले गेले आहेत. म्हणजे अधिका-यांनी आपली साईड सेफ करायची. आणि महापालिकेने कम्पेन्सेशन द्यावे. पण जबाबदार अधिकारी आहेत. त्यांना कोणती शिक्षा देणार आहात? माझे तर असे मत आहे की, जे अधिकारी याला जबाबदार आहेत त्यांच्यावर तुम्ही सदोष मनुष्यवधाचा गुन्हा का दाखल केला नाहीत? आणखीन मोठा अपघात झाला असता आणि पोलीस स्टेशनला याच्याबाबतीत काय कार्यवाही, काय एफआयआर तुम्ही फाईल केले? याची माहिती मा. आयुक्तांनी द्यावी.

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब, या विषयावरच बोलायचे आहे. ही जी इललिगल बिल्डींग होती. ती बिल्डींग तोडण्यापूर्वी विधी विभागाचा काय अभिप्राय होता? म्हणजे त्या इमारतीवर जो कोर्टाचा स्टे होता तो त्यावेळी उठला होता का? जरा मॅडम तुम्ही त्याच्याबद्दल माहिती द्या. आपण अतिक्रमणचे उपायुक्त श्री. दिवटे साहेबांना त्या संदर्भात जे पत्र दिले. त्याचे वाचन तुम्ही सभागृहासमोर करा. मा. महापौर साहेब, त्या मयत

झालेल्या व्यक्तींना मदत मिळावी याच्या विरोधात आपण नाही. पण विधी विभागाचा तोडण्यापूर्वी एक्झॅक्ट अभिप्राय काय होता तो जरा त्यांना वाचन करून दाखवू द्या.

**मा. महापौर :-**

त्यांचा अभिप्राय असा होता की, कोर्टाने स्टे दिला होता. महापालिकेने आपले म्हणणे दाखल करावे तिथपर्यंत स्टे होता. महापालिकेने स्टे दाखल केल्यानंतर त्यांना कारवाई करायला......

**प्रशांत पालंडे :-**

साहेब, त्याचे वाचन करू द्या. त्यांनी उपायुक्तांना जो अभिप्राय दिलेला आहे. त्याचे वाचन त्यांनी करावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मला वाटते श्री. प्रशांत पालांडे यांनी हा विषय इतका सिरिअस घेतला आहे. हा विषय जर बाहेर आला तर इथे वेगळे रामायण, महाभारत घडेल. श्री. प्रशांत पालांडे साहेब, मी महापौरांनापण विनंती करतो की, या प्रकरणासाठी विशेष सभा लावा. आत्ता सभागृहाचा मूड वेगळा होईल. कारण त्या कोर्टबाजीच्या सगळ्या शे-यामध्ये काय काय दडले आहे, माझ्या टोपीखाली दडलंय काय, अशा त्या आहेत. तुर्त मदतीचा विषय पूर्ण करा. तुम्हाला माहिती असेल तर तुम्ही तरी सभागृहाला पुढच्या मिटींगमध्ये सांगा की, ॲक्च्युअली कायदेशीर बाबी काय-काय होत्या? आत्ता या विषयापुरते खोलात जायचे नाही. पण मला आणखीन एक महत्वाचा विषय असा वाटला की, तुमचे त्या ठेकेदाराबरोबर कॉन्ट्रॅक्ट होते. वर्क ऑर्डर देताना तुम्ही तेरा नंबरच्या कॉलममध्ये म्हटले आहे की, नालेसफाईचे काम करताना जेसीबी मशीन, पोकलन मशीन, बोटीसह पोकलन मशीन मार्फत काम करताना अपघात झाल्यास किंवा कोणत्याही त-हेची जिवीत व वित्तहानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी निवीदा कारावर राहिल. हे आशापूरा कन्स्ट्रक्शन कंपनीला दिलेले आहे. विषयात असे म्हटले आहे की, आवश्यकतेप्रमाणे प्रभाग अधिका-यांना अनधिकृत बांधकाम, अतिक्रमण हटविणेसाठी जेसीबी, पोकलन मशीनचा पुरवठा. म्हणजे अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी जेसीबी मशीनचा पुरवठा करण्याची ही वर्क ऑर्डर आहे आणि या वर्क ऑर्डरमध्ये ही अट आहे. मग कॉन्ट्रॅक्टरचे काय म्हणणे आहे? जसे श्री. सावंत साहेबांनी बोलले की, एकाच ढाच्यामध्ये ते पण नगरपालिकेच्या कर्मचा-याला सेफ करण्यासाठी अर्ज तयार करून घेऊन त्यांची सही घेतली आहे. असा त्यांचा आक्षेप आहे. तो पण प्रथमदर्शनी मला पण पटतो. मग या ठिकाणी त्या ठेकेदारावर या कर्मचा-यांनी, नगरपालिकेच्या अधिका-यांनी दबाव का आणला नाही की, तु या वर्क ऑर्डर मध्येच ही अट आहे. आणि तू हे पैसे भरायला पाहिजे. म्हणजे एखाद्या माणसाच्या शरीराचा भाव दोन लाख रूपये होते. की, २५ लाख रूपये होतो हे मला माहिती नाही. तो माणूस कुठे बसला आहे आणि त्याचा भाव कोण ठरवतो त्याच्यावर अवलंबून आहे. म्हणजे कधी-कधी अशी किव पण करावीशी वाटते की, एक माणूस मेला तर दोन लाख रूपये दिले तरी चालतात. माणसाचा जीव किती अनमोल आहे बघा. आजारी पडले तर माणूस पाच लाख रूपये खर्च करतो. हार्ट सर्जरी झाली तरी अडीज-तीन लाख, चार लाख खर्च करतो. ही सुदृढ माणसे मेली. त्यांचा जीव अनमोल होता की, त्याचे मुल्य दो लाख रूपये धरायचे? मग त्या ठेकेदाराची जबाबदारी काय? त्याची कोणी ठरवली नाही का? मग त्या ठेकेदाराला नोटीस मारली नाही का? किंवा त्या ठेकेदाराशी वाटाघाटी करून, तू किती देणार आहेस? ठिक आहे. महानगरपालिकेची प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष जबाबदारी किंवा चुक असेल असे गृहीत धरून मा. आयुक्त साहेबांनी एक टिप्पणी दिली. मा. आयुक्त साहेबांनी स्वतःचे मत म्हटलेले नाही. मा. आयुक्त साहेबांनी त्यांचे आलेले निवेदन मा. महासभेपुढे ठेवले आहे. गोषवा-यामध्ये मा. आयुक्त साहेबांचे स्वतःचे मत नाही. त्यांनी तरी स्वतः वैयक्तिक माणुसकीच्या दृष्टीकोनातुनसुध्दा बोलावे आणि कायदेशीर सुध्दा बोलावे. कायदेशीर बोलायला गेले तर आम्ही काही देणे लागत नाही. माणुसकीच्या दृष्टीकोनातून बोलायला गेले. तर आम्हाला बरेच काही द्यायला पाहिजे. म्हणून नगरपालिकेची अप्रत्यक्षरित्या चुक आहे असे धरून आपण हे देत असलो तर ठिक आहे. पण कॉन्ट्रॅक्टरची डायरेक्ट चुक आहे. त्याला कॉन्ट्रॅक्टर किती पैसे देणार?

**मा. आयुक्त :-**

त्यांच्याकडून द्यायला लावले.

**प्रफुल्ल पाटील :-**

किती लावले?

**मा. आयुक्त :-**

ती अमाऊन्ट माहीती नाही. ठेकेदाराने दिलेले अहोत.

**प्रफुल्ल पाटीस :-**

किती रक्कम दिलेली आहे?

**मा. महापौर :-**

साहेबांना रक्कम माहीती नाही.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, त्या ठरावामध्ये असे करा की, महानगरपालिका जेवढी देईल तेवढी रक्कम ठेकेदाराने त्यांच्या कुटूंबियांना द्यावी. महापालिकेने दोन-दोन लाख दिले तर ठेकेदाराने दोन-दोन लाख द्यावेत.

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहब, सहानुभूतीपूर्वक जो रकम दि जाती है। वह हमेशा मे दावे से कम होती है। सहानुभूती की, रकम अगर हम दो लाख डिसाईड करते है तो कॉन्ट्रॅक्टर को या तो सरकारी नियमो का जो उल्लंघन किया है, जो श्री. पाटील साहब ने बोला, जो लगना चाहिए या जो कार्यवाही होनी चाहिए। और अगर महानगरपालिका दो लाख तय करती है तो ठेकेदार को कम से कम दस लाख होना चाहिए। क्योंकी सहानुभूतीपूर्वक दी गयी रक्कम हमेशा कम होती है।

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण आत्ता असे धरू या. जसे जर एखादा मोठा ॲक्सीडंन्ट होतो तर कोर्ट त्या ड्रायव्हरती किंवा त्या मालकावर केस करते. मग कोर्ट जी नुकसान भरपाईची किंमत आहे ती माणूस मेला त्याच्यावरून देत नाही. तो ड्रायव्हर किंवा मालक याची भरण्याची क्षमता किती होती आणि जर तो माणूस जिवंत राहिला असता. तर तो सध्या जर कामावर होता आणि त्याला शंभर रूपये पगार होता. तर त्याचे काम करण्याचे ४५ वर्षे, रिटायर एज ५५ पर्यंत धरून गुणिले महिने, गुणिले दिवस, गुणिले शंभर रूपये किंवा दोनशे रूपये पगार. एवढे पैसे त्याने कमवले असते. त्याच्या आयुष्याची तेवढी नुकसान भरपाईची किंमत ठरवली जाते. आत्ता या ठिकाणी देणाऱ्याची पण शक्ती काय आहे तीही ठरवायला पाहिजे. आणि समजा आम्ही महानगरपालिकेने जर कोणी अधिकाऱ्याने किंवा पुढाऱ्याने पुढे येऊन त्या कॉन्ट्रॅक्टरला पकडले आणि सांगितले की, डॉक्टर साहेबांनी म्हटले तू दहा लाख दे तर ते कॉन्ट्रॅक्टरने मानले पाहिजे. आणि साहेब, त्याहीपेक्षा मला फार आश्चर्य वाटले. म्हणजे सभागृहातील सर्व नगरसेवकांनी ऐका. तिथे बिल्डींग पाडल्यानंतर जे मटेरिअल मिळाले. त्या मटेरिअलचे काय झाले? साहेब, तुम्हाला मी दाव्याने सांगतो की, बिल्डींग पाडल्यानंतर, श्री. जयंत पाटील साहेब, महत्वाचा विषय आहे. कारण ती बिल्डींग त्यांच्या वॉर्डमध्ये आहे तशी माझ्यापण वॉर्डच्या कोनावर आहे. उत्तर-पश्चिम असे आम्ही दोघेजण तिकडे आहोत. जागेवर अठरा लाख रूपयांचे लोखंड जेसीबी वाल्याने विकले. आत्ता तुम्ही सांगा त्याला अठरा लाखाचे लोखंड लागले होते का? आपले इंजिनिअर दहा मिनिटात कॅल्क्युलेशन करून देतील. कारण ते पन्नास आणि दोनशे कोटीचे बजेट तयार करतात. मग जर ती प्रॉपर्टी पाडण्याची, अनधिकृत प्रॉपर्टी पाडण्याची जबाबदारी जर जेसीबी वाल्यावर किंवा कॉन्ट्रॅक्टरवर असेल आणि पाडल्यानंतर त्याची विल्हेवाट लावण्याची किंवा ती विकण्याची जबाबदारी जर त्याच्यावर असेल आणि जर त्याच्यावर मालकी होत असेल तर भंगारमधून मिळालेले अठरा लाख रूपये माझ्या माहितीप्रमाणे कमीच आहेत. जर तुम्ही ग्राऊन्ड प्लस थ्रीच्या इमारतीचे टोटल स्टील काढले, आज बाजारत स्टीलच्या नव्या भावाचा आणि जुन्या भावाचा फरक फक्त ३० टक्के आहे. नवीन घ्यायला गेलात तर १०० रूपये किलो असेल, जुने घ्यायला गेलात तर ७० रूपये किलो असणार. मग त्या कॉन्ट्रॅक्टरने इतका पैसा मिळवला. तो कुठे गेला? परत तुमच्याकडून तर पाडण्याचे चार्जेस घेतोय म्हणून त्याला सक्ती लावा. तुमच्याकडे लगेच कॉस्टींग मिळेल की, त्या सर्व बिल्डींगला किती टन लोखंड लागले. लोखंड तर विकू शकतो. इव्हन भरणीलासुध्दा माती जाते. ती सोडून द्या. अशा परिस्थितीत कॉन्ट्रॅक्टर एकही रूपया देत नाही, दिलेले नाहीत. आम्ही फक्त दोन लाख रूपये देण्याची व्यवस्था करतो. माझे असे म्हणणे आहे की, जर त्याने अठरा लाख रूपये लोखंड विकले आहे. तर लोखंडाची खरोखर किंमत किती आहे? ती काढा. ती रक्कम त्याच्या बिलातून वसुल करा आणि ते ॲडीशनल नगरपालिकेमार्फत त्याला द्या. कारण ते मटेरिअल तुमचे होते. जर त्याचे झाले तर त्याने डायरेक्ट द्यायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, हे पैशांचे हिशोब झाले. कामाच्या आणि जबाबदारीच्या हिशोबाचे काय? आपला स्ट्रक्चरल इंजिनिअर काय करत होता? आपले मा. आयुक्त कुठे आहेत? श्री. दिवटे साहेब, काय करत होते? रजेवर का होते?

**मा. महापौर :-**

बिल्डींग पाडल्यानंतर कॉन्ट्रॅक्टरने किंवा आपण ते काढलेले नाही. त्या बिल्डरनेच ते सगळे साफ करून दिलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

बिल्डर तर गायबच होता ना?

**मा. महापौर :-**

त्याच्या माणसांनी, स्टाफने. आपल्याकडून नाही केलेले.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्याचा स्टाफच कुठे आहे? आत्ता त्या बिल्डरची हिस्ट्री आम्ही सांगायची का?

**मा. महापौर :-**

त्यांनी कोणाला नेमले असेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्या बिल्डरची हिस्ट्री तुम्हाला आत्ता सांगू का? आजच्या तारखेला त्या बिल्डरकडे इंद्रलोकमध्ये पाणी पुरवठ्याच्या एक इंचाच्या लाईन देण्याच्या ३० ऑर्डर तयार आहेत. त्याच्यावर हळदी कुंकू कधी टाकता? नारळ फोडायला कधी येता ते मला सांगा.

**प्रभात पाटील :-**

रोज संध्याकाळी इंद्रलोकमध्ये जा. तुम्हाला आजही रोज कनेक्शन लागताना दिसतील. जा रस्ते राजरोस फुटलेले आहेत की, नाही ते बघा.

**मिलन म्हात्रे :-**

त्या बिल्डरचे गेल्या पाच-सहा वर्षाचे साथीदारपण शोधावे लागतील.

**प्रभात पाटील :-**

आजही तुम्हाला सांगते. तो बिल्डर चौथ्या माळ्यावर रोज असतो. आजही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, त्याचे साथीदारपण शोधायला लागतील पार्टनर वगैरे कोणकोण आहेत? बरेचसे पदाधिकारीपण निघतील.

**प्रभात पाटील :-**

इंद्रलोकचे सगळे रस्ते शोधा. तुम्हाला कनेक्शनसाठी रोज एक फुटलेला दिसेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुमचे प्लंबर ते कनेक्शन लावायला जात नाहीत. एक वाया वाया दलाल आमच्याकडे आला. तुमचे साहेबांचे चांगले आहे. तुम्ही जरा ही आर्डर लावून द्या. मी म्हटले या ऑर्डर आणल्या कोणी? म्हणजे काय करायचे, तुम्ही आम्ही सकाळपासून, दहा वाजल्यापासून आम्ही तुम्हाला बोलायचे. तुम्ही जबरदस्तीने ऐकून घ्यायचे. अधिकारी तुमचे नाहीत असेपण आम्ही तुम्हाला म्हणायचे, ऐकत नाहीत असे ही म्हणायचे. आणि शेवटी निघते काय, भलतेच. महानगरपालिका जशी एखादी सॅन्क्शनींग ऑथोरिटी आहे किंवा काम करणारी आहे. तशा पॅरेलल संघटना इकडे काम करत आहेत. तुम्हाला सगळे वेळेवर , जागेवर सगळे मिळेल. मग पाण्याच्या कनेक्शनपासून ते रोडपर्यंत सगळे मिळेल. असाच इंद्रलोकचा रस्ता केला. दोन कोटी सत्तर लाख रूपये खर्च केले.

**प्रभात पाटील :-**

माझ्या घराच्या समोर कनेक्शन लागले. साहेबांना मी हे प्रकरण बोललेली आहे. ज्या बिल्डींगला टॅक्सेशन झालेले नाही. आणि मग एखादा दलाल येतो. एखाद्या नेत्याचे नाव सांगत येतो. आणखीन कोणतरी येते, मा. महापौरांचे नाव सांगत येते, एक्झाम्पल सांगते, प्रभात ताईंनी गप्प बसावे म्हणून. ही कामे तुमचे अधिकारी करतात. आजही तुम्हाला सांगते, इंद्रलोकला तुम्ही रोज फेरफटका मारा. तुम्हाला रस्ता फुटलेला नाही दिसला तर मी सांगेन ते हरेन. राजरोस कनेक्शन चालू आहेत. तुमचा पालिकेचा एक माणूस ऑथोराईज आहे, आणि मग बाकी कुठचे आहेत हे मला माहिती नाही. पण तो संध्याकाळी सात नंतर तुम्हाला तिथे दिसणारच.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, मी जे विचारले त्याचा जरा आम्हाला खुलासा करा. ठराव झाले आहेत की नाही? ठरावावर अंमलबजावणी का नाही? माझे पत्र आहे. माझ्या पत्रावर उत्तर नाही. ठराव विखंडीत करायला पाठवला आहे का? हमेशा बिल्डींग तोडने के बाद मा. उपायुक्त वहापर आये है।

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, ते पत्र आले आहे का ते जरा श्री. दिवटे साहेबांना विचारा.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलते. महोदय, उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय जागेवर असलेल्या बांधकामा संदर्भात वादी श्री. सतिश तुकाराम कदम यांनी मा. न्यायालय, ठाणे येथे मनपाने बांधकाम तोडू नये म्हणून वरील दावा क्रमांक स्पेशल सिव्हील सूट ४७/२००७ दाखल करून प्रकरण न्यायप्रविष्ट केले आहे. सदर जागेतील बांधकामा संदर्भात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमचे कलम २०७(१) व (२) अन्वये तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमचे कलम ५४ अन्वये दि. १८ जानेवारी २००७ रोजी नोटीस बजाविण्यात आली होती. सदर नोटीसच्या अनुषंगाने सदर व्यक्तीस योग्य ती सुनावणी देऊन दि. २१ फेब्रुवारी २००७ रोजी वरील जागेवरील बांधकाम अनधिकृत घोषित करून सदरचे बांधकाम तोडून टाकणेस तत्कालीन मा. आयुक्तांनी आदेश पारित केले आहे. दि. १६ जुलै २००७ रोजी मा. न्यायालय, ठाणे यांनी वरील वादी यांची निशाणी क्र. ०५ चा अर्ज फेटाळून लावल्याने वादी यांनी मा. जिल्हा न्यायालय, ठाणे येथे एनसीए क्रमांक ११३/२००७ दाखल केले. त्यावेळी मा. न्यायालयास जिल्हा

न्यायालयाने मनपाचा से दाखल होईपर्यंत दोन्ही पक्षकारास जैसे थे आदेश दिले. होते. संदर्भिय पत्र क्र. ०३ अन्वये इकडील विभागाने सदर बाबतची सद्यस्थिती माहिती ॲड. अनुराधा आपटे यांच्याकडून अपेक्षिली असता, त्यांनी संदर्भिय पत्र क्र. ०१ अन्वये मा. जिल्हा न्यायाधिश श्री. लालसाड यांनी वरील अपिलात दि. १८ जानेवारी २००७ रोजी मनपाने स्टे दाखल करेपर्यंत दोन्ही पक्षकारास जैसे थे आदेश दिले आहेत. तद्नंतर मनपा अभियोक्ता श्रीम. अनुराधा आपटे यांनी दि. ०५ जानेवारी २००८ रोजी मनपाच्या वतीने प्रोसिड दाखल करून वरून दाव्यातील लेखी कथन वरील अपिलात मनपाच्या वतीने स्टे म्हणून मान्य केल्यामुळे दि. ०१/०८/२००७ रोजी दिलेले जैसे थे आदेश संपुष्टात आल्याने सद्यास्थितीत वरील अपिलात मनपा विरूध्द कोणतेही प्रतिबंधक आदेश नसून सदर अपिलाची सुनावणी दि. ११ जून २००९ या तारखेला असल्याचे इकडील विभागास कळविले आहे. तरी मनपा अभियोक्ता श्रीम. अनुराधा आपटे यांच्या संदर्भिय पत्र क्र. ०३ अन्वये वरील दाव्यात किंवा अपिलात मनपाविरूध्द कोणतेही प्रतिबंधक आदेश असल्याचे दिसून येत नाही. तरी तत्कालीन मा. आयुक्त यांनी दि. २१ फेब्रुवारी २००७ रोजी वरील अनधिकृत बांधकामा संदर्भात पारित केलेल्या आदेशानुसार वरील जागेवरील अनधिकृत बांधकाम तोडण्यात योग्य होईल.

**प्रशांत पालांडे :-**

मॅडम मला एक सांगा की, सरकारी वकील आपटे यांनी तुम्हाला एक्झॅक्ट काय सांगितले?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

त्यांचे पत्र वाचून दाखवते. The above mentionsed matter is before Dist – Judge Shri Walchale. In the said matter the Hon'ble Court was pleased to pass the following order on 1.8.07 at Exh.6.

<u>ORDER</u>

'Parties to maintain status quo till filling say by the Respondent.'

Thereafter the respondent filed an purshis at Exh.12 on 5.4.08 adopting w.s. in paper book from page 39 to 48 as say to application u/sec.39 Rule 1 & 2 of C.P.C. field by the Defendant corpn. The matter is now fixed on 11.6.2009 for hearing. This is the position as on today.

The information is given as per queries made by your department.

Thanking yoi,

Yours Sincerely

(A. R. Apte)
Advocate

**प्रशांत पालांडे :-**

मॅडम मला एक सांगा की, हे जे पत्र मिळाले. म्हणजे स्टे देतो किंवा स्टे उठवतो कोण? जज उठवतात ना? की, आपले सरकारी वकील उठवतात? स्टे उठवण्याबाबत काही जजमेंट तुमच्याकडे आलेले आहे का?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

त्याच्यामध्ये जो स्टे दिला होता टील फायलिंग से ऑफ दि कॉर्पोरेशन.

**प्रशांत पालांडे :-**

तुमच्याकडे त्यावेळेला कोर्टाचे तसे जजमेंट होते का?

**सई वडके :-**

त्याच्यामध्ये आपल्याला जे समन्स आले. समन्सवर कोर्टाची ऑर्डर आहे.

**प्रशांत पालांडे :-**

स्टे उठवला म्हणून कोर्टाची ऑर्डर आहे?

**सई वडके :-**

नाही. टिल फायलिंग से स्टे आहे म्हणून.

**प्रशांत पालांडे :-**

तसे म्हणायचे नाही. जजमेंट कोण देते? सरकारी वकील देतात की कोर्ट देते?

**सई वडके :-**

जजमेंट नसते. हे ॲड इंटरीम रिलीफ कोर्ट ग्रॅन्ट करते.

**प्रशांत पालांडे :-**

स्टे आहे म्हणून तुम्हाला कोर्टाने कळवलेले आहे.

**सई वडके :-**

पहिल्या तारखेला आपल्याला जो समन्स येतो. त्या समन्सवर कोर्टाने कळवले होते की, टिल फायलिंग से ऑफ दी डिफेडेन्ट कॉर्पोरेशन. ॲझ इंटरिम रिलीफ. म्हणजे स्टे दिलेला आहे.

**प्रशांत पालांडे :-**

तिथे स्टे उठवला असे तुम्हाला कोर्टाने कळवले आहे का?

**मा. आयुक्त :-**

ते कळवण्याची आवश्यकता नाही. आपण से दाखल करेपर्यंत स्टेटस्को मेन्टेन केला आहे.

**प्रशांत पालांडे :-**

आपला अर्ज गेल्यानतर तो आपोआप........

**मा. आयुक्त :-**

तो आपोआप निल झाला. महापालिकेने से दाखल करेपर्यंत स्टेटस्को मेन्टेन करायला सांगितला आहे. महापालिकेने स्टे दाखल केल्यानंतर से आपोआप निल झाला.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या मुद्दयाचा जरा खुलासा करा. त्या इमारतीच्या बाबतीत.....

**प्रशांत पालांडे :-**

माझे थोडे बाकी आहे. मा. महापौर साहेब, त्या मॅडमनी श्री. दिवटे साहेबांना त्या संदर्भात कुठले पत्र दिलेले आहे?

**मा. महापौर :-**

जे पहिले वाटले तेच.

**प्रशांत पालांडे :-**

ते श्री. दिवटे साहेबांना दिलेले पत्र होते? त्याच्याप्रमाणे मग श्री. दिवटे साहेबांनी कार्यवाही केली?

**मा. महापौर :-**

होय.

**प्रशांत पालांडे :-**

त्यात काही इमारत पाडण्याचे मॅन्युअल्स असतात. ते श्री. दिवटे साहेबांनी फॉलो केलेले का?

**मिलन म्हात्रे :-**

पहले क्लेरिफीकेशन आने दिजीए। पहले ठराव मत पढो।

**प्रशांत पालांडे :-**

अजून एक माहिती हवी होती की, आपण या संदर्भात महाराष्ट्र शासनाला जो अहवाल दिलेला आहे. त्याच्यामध्ये ती इमारत धोकादायक आहे असे काही आपण दिले आहे का?

**मा. महापौर :-**

धोकादायक कुठे, ती इललिगल होती.

**प्रशांत पालांडे :-**

ती इमारत धोकादायक आणि इललिगल होती म्हणून महाराष्ट्र शासनाला आपण तसा अहवाल पाठवलेला आहे का?

**मा. महापौर :-**

इललिगल होती.

**प्रशांत पालांडे :-**

आपण तसा अहवाल पाठवला आहे का?

**प्रफुल्ल पाटील :-**

श्री. प्रशांत पालांडे यांनी बरेचसे प्रश्न विचारले. कायद्याच्या जाचक गोष्टीमधून आपली महानगरपालिका अजून मॅच्युअर झाली नाही. स्पष्ट आहे, श्रीम. आपटे मॅडमनी काय लिहिले आहे? आपण काय केले आहे. श्रीम. वडके मॅडम, मला फक्त एवढेच सांगा. Does it mean that filing a process cause for an cancellation or recalling of the earlier order? In what position the persis has been file?& what is the persis?

**सई वडके :-**

ठाणे कोर्टामध्ये एक प्रोसीजर आहे की, आपण जे ॲप्लीकेशन दाखल करतो त्याला परसिस म्हणतात. त्याला कोर्ट फी वगैरे लावावे लागत नाही. आणि परसिस दाखल करून हे आपल्या विरूध्द अपील दाखल केले होते. आपल्या बाजूने निर्णय लागला होता म्हणून त्यामुळे खालच्या कोर्टामध्ये जे डब्ल्युएस दाखल केले होते. तेच डब्ल्युएस या परसिसद्वारे आपण ॲडॉप्ट केले आहे. त्यामुळे That is amount toward the say to the appeal file by the apealant.

**प्रफुल्ल पाटील :-**

बरोबर आहे. म्हणजे एखादी गोष्ट वादीने कोर्टामध्ये केलेली आहे. एखादे डॉक्युमेंट फाईल केले. कोर्ट चालू आहे. कोर्टाची हेअरिंग चालू आहे. आर्ग्युमेंट चालू आहे. वादीने एखादे डॉक्युमेंट कोर्टापुढे सबमीट केलेले आहे. पूर्वी खालच्या कोर्टात किंवा वरच्या कोर्टात प्रतिवादी ते जर मान्य करत असेल तर ते मान्य करण्यासाठी परसीस फाईल केले जातात. आणि म्हणून तुम्ही असे म्हटले ते बरोबर म्हटले की, डब्ल्युएस फाईल केले होते. ते खालच्या कोर्टात जे डब्ल्युएस फाईल केले होते तेच डब्ल्युएस आम्हाला मान्य आहे. पण वॉट दि ऑर्डर दॅन? देअर इझ नो........ हे बघा परसिस फाईल झाल्यानंतर कोर्टाने ऑर्डर दिले आहे का? ther is no specific orcerof the court deciding the final.. हे बघा, जो वादी होता तो तुमच्या एक्झीक्वीट

फाईलच्या ऑर्डरवर वरच्या कार्टात गेला होता. He has file the MCA against misslenious civil application. एक्झीक्वीट फाईलवरच्या मुद्यावरतीच तो स्टे होता. अदर पॉइन्टस अॅण्डअदर केसेस रिमेन्स दि सेम. असे असताना फाईलवरच्या मुद्यावर तो वरच्या कोर्टात गेला. वरच्या कोर्टाने जेव्हा तुम्हाला स्टेटस्को दिला. दोन्ही पक्षांनी आहे ती परिस्थिती ठेवावी. मग एक्झीक्वीट फाईलवरटा डिसीजन झालेला. तो त्यांनी फायनल केला का? तो करायला पाहिजे ना. खालचा डब्ल्युएस फाईल केला तोच तुम्ही वर केला. म्हणजे खालच्या कोर्टात तुम्ही जे मांडले तेच तुम्ही वरच्या कार्टात मांडले. मग वरच्या कोर्टाने मान्य केले का? मग वरच्या कोर्टाने तशी ऑर्डर केली का? मग ते अॅडव्होकेट म्हणूच कसे शकतात? मॅडम टेक प्रॉपर डिसीजन मी याच्या खोलात जात नाही. तुम्ही काही गोष्टी करत असाल. कदाचित माझे नॉलेज कमी आहे. मला माहिती नाही. पण अनेक ठिकाणी माझ्या स्वतःच्या केसेसमध्ये परसीस फाईल झालेल्या आहेत बऱ्याचशा प्रॉपर्टी मॅटर मध्ये. Persis doesn't meant that you are giving the final altimation की, हे झाले हे बरोबर ्आहे. परसीस काय, खालचे डब्ल्युएस वर आले. त्याने नवीन डब्ल्युएस फाईल केले असेल. त्याने ऑलरेडी अॅप्लीकेशन फाईल केलेलेच होते. त्याचेही खालचे डब्ल्युएस असेल. दोघांचे पुन्हा तुमचे आज आर्ग्युमेंट व्हायला पाहिजेत. आर्ग्युमेंट झाल्यानंतर खालच्या ऑर्डरची एक्झीक्वीट फाईलवरची खालच्या कोर्टाची ऑर्डर वरच्या कोर्टाने कायम करायला पाहिजे. आणि कायम करण्याची ऑर्डर तुम्हाला वरच्या कोर्टाने दिलेली नाही. That what, big mistake we have done. Now let us admit it. मी आत्तापर्यंत बोलत नव्हतो. पण आत्ता त्यांनी बोलल्याप्रमाणे सगळ्या सभागृहामुढे हा विषय आला. आत्ता आपल्याला हे अॅडमीट करायला पाहिजे की, आपल्या काही चुका, त्रुटी राहतात. याचेच कारण असे झाले की, अजूनपर्यंत पोलिस स्टेशनला कुठलाही गुन्हा दाखल झाला नाही.

**सई वडके :-**

मी उत्तर देते.

**प्रफुल्ल पाटील :-**

बरोबर आहे. मग गुन्हा दाखल का झाला नाही हे पण मला सांगा. मनुष्यवधाचा गुम्हा दाखल व्हायला पाहिजे होता की नाही? मग तो कोणावर व्हायला पाहिजे होता? मग तो का झाला नाही? आणि उद्या याच्यावर कुठला तारांकित प्रश्न झाला तर त्याच्यावर उत्तर कोण देणार? जबाबदार कोण? या सगल्या प्रश्नांची उत्तरे आम्हाला द्या.

**सई वडके :-**

दाव्यामध्ये दोन प्रकार असतात. एम मेन सूट दाखल केला जातो. आणि त्याच्यासोबत इंटरीम रिलीफ मिळावा म्हणून एक इन्जन्कशन अॅप्लीकेशन दाखल केले जाते. ते इन्जन्क्शन अॅप्लीकेशन आधी डिसाईड होते आणि दावा नंतर म्हणजे इविडन्स होऊन, त्याच्यामध्ये  आर्ग्युमेंटस् होऊन फायनल जजमेंट होते. तर याच्यामध्ये असे जे इन्जक्शन अॅप्लीकेशन वादीने दाखल केले होते. की, कायदेशीर प्रक्रिया केल्याशिवाय महापालिकेने सदरचे बांधकाम तोडू नये. तर हे इन्जक्शन अॅप्लीकेशनमध्ये जेव्हा जेव्हा तारखा पडतात. वादीने प्रत्येक तारखेला अॅडइंटरीम रिलीफ मिळण्यासाठी अर्ज करावा लागतो. आणि मा. न्यायालयाने तसे आदेश दिले आहेत. कधी कधी न्यायालय असेही आदेश देतात की, पुढील दावा संपेपर्यंत किंवा निशाणी पाचचा निर्णय होईपर्यंत स्टे दिला जाईल. कधी कधी न्यायालय असेही आदेश देतात. पण बऱ्याच वेळा जे अॅड इंटरीम रिलीफ म्हणजे तात्पुरता स्टे मिळण्यासाठी प्रत्येक तारखेला वादीला अर्ज करावा लागतो. आणि न्यायालय त्याच्यावर आदेश पारित करतात. पहिल्या तारखेला जो स्टे दिलेला असतो तो एक्स्टेन केला जातो. या अपिलामध्ये त्यांनी असा कुठल्याही प्रकारचा अर्ज केला नाही. त्यामुळे तो स्टे व्हॅकेट झाला असे वकीलांनी कळवले आणि आपण कारवाई केलेली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आत्ता तुम्ही हा जो मुद्दा बोललात तो एकदम परफेक्ट आहे. मत तो वकीलाच्या लेटरमध्ये का आला नाही? मग ते वाक्य त्यांनी का म्हटले नाही की, त्या वादीने कुठल्याबी प्रकारचे एक्सटेन्शन मागितले नाही. ज्याच्यामुळे हा स्टे ऑटोमेटीक व्हेकेट झाला. दॅट इझ दि ओरिजनल ग्राऊंड की, त्यांनी ओरिजनल जो प्लेटींग आहेत त्याने प्रत्येक वेळी स्टेस्कोवर एक्स्टेंशन मागितले नाही आणि म्हणून तो स्टे ऑटोमेटीक व्हेकेट झाला. is the ground then why did not he mention. That the plentiff has never demanded the extension of the stelasco order. तुम्ही आत्ता तोंडी सांगता. मॅ्डम तुम्हाला आत्ता दुसरे एक उदाहरण देतो. तुम्ही राजेश किंवा राजश्री म्हात्रे म्हणून एक अॅडव्होकेट अपॉईंट केले. माझी स्वतःच्या केसमध्ये एक ऑर्डर झालेली आहे. एक्झीबी-५ वरचीच ऑर्डर आहे. तुम्ही मला त्यी कॉपीपण दिली. त्या वकिलाने तुम्हाला ऑफीशिअली त्या ऑर्डरची कॉपी पाठवली आहे. कोर्टाची ऑर्ड़र वाचा. आणि त्या वकिलांनी तुम्हाला दिलेल्या ऑर्डरची कॉपी वाचा. साहेब, तुम्हाला मी प्रत्यक्ष दाखवले आणि तुम्हाला ते पटलेपण. म्हणजे आमचे वकील काय काम करतात बघा. त्यांनी वर ऑर्डरमध्ये त्यांनी जे प्रेअर मागितलेले ते प्रेअर त्यांनी ऑर्डरमध्ये टाकल्या. म्हणजे कदाचित मा. आयुक्त साहेबांकडे किंवा तुमच्या अतिक्रमण विभागाकडे किंवा अनधिकृत विभागाकडे त्या ऑर्डरची कॉपी गेली असती. तर त्यांनी त्याचा भलताच अर्थ लावला असता. ऑर्डरमध्ये कोर्टाची जी

स्पेसीफीक ऑर्डर आहे. त्या ऑर्डरचेच मुद्दे टाकायला पाहिजे ना? आणि जर त्यांना त्याचे रिसायकल म्हणायचे होते. रिसायकल म्हणजे केसची बॅकग्राऊन्ड जर टाकायती होती तर त्या वकिलांनी तुम्हाला असे रिपोर्टींग करायाला पाहिजे होते की, अनुक नावाच्या वादीने अमुक नावाच्या प्रतिवादी विरूध्द अशा अशा कामासाठी, अशा अशा कारणासाठी कोर्टामध्ये अपील फाईल केले होते. आणि त्याचे असे असे मागितले होते. परंतु प्रत्यक्ष कोर्टाने अशी ऑर्डर केलेली आहे. पण त्याने तसे न देता तुम्हाला डायरेक्ट असे म्हटले की, कोर्टाचे आदेश खालीप्रमाणे आहेत आणि रिसायकलमध्ये जे प्रेअर क्लॉजमध्ये वादीने म्हटले होते ते कॉलम त्यांनी तुमच्या ऑर्डरमध्ये टाकले म्हणजे काही व्हेरीफाय होऊ शकते. म्हणून तुमच्या पॅनलवर जे ॲडव्होकेट आहेत. त्यांना एकतर स्ट्रीक्ट इन्स्ट्रक्शन द्या की, हे वेळोवेळी द्या. जर अशा चुकांमुळे जर एखादा माणूस, मलसा मला माहिती नाही, प्रशासनाला हा विषय कोणीतरी सांगितला असेल म्हणून त्यांनी मांडले नाहीत किंवा आणखीन कोणी मांडू नये अशीही माझी इच्छा आहे. कारण पालिका कुठे अडचणीत येता कामा नये अशा मताचे आम्ही आहोत. पण जे काही असेल ते कोर्टाच्या ऑर्डर बघितल्याशिवाय आपण करू नका.

**राजेंद्र जैन :-**

श्रीम. वडके मॅडम, आपने जो जवाब दिये है, उसके अंदर दो बाते बोली है.......

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, राज्य सरकारला आपण या संदर्भात जो अहवाल पाठवला. त्याची एक प्रत उपलब्ध करून द्या. दुसरीगोष्ट या संदर्भामध्ये जिल्हाधिका-यांना एक स्वतंत्र समिती नेमायला सांगितली ही माहिती खरी आहे का?

**मा. महापौर :-**

इललिगल बांधकामाबद्दल?

**प्रशांत पालांडे :-**

नाही, या पर्टीक्युलर प्रकरणाबद्दल.

**मा. महापौर :-**

स्टेट गव्हर्नमेंटने पूर्ण प्रकरणाची चौकशी करून माहिती पाठवा म्हणून माहिती मागितली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

आपण महाराष्ट्र शासनाला पाठवलेल्या अहवालाची मला एक प्रत द्या.

**मिलन म्हात्रे :-**

मगाशी विधी अधिका-यांबरोबर जे वादविवाद झाले. त्याच्यामध्ये अशी एक सुचना आहे की, आपण जेव्हा एखाद्या वकीलांकडून पत्र घेतो. तेव्हा एक ऑपरेटीव्ह ऑर्डरचा एक प्रकार असतो. तुम्हाला तात्काळ संध्याकाळी टाइपराइटरवर टाईप करून सही करून तिथला तिथे दिली जाते. ती ऑपरेटीव्ह ऑर्डर हे लोक का घेत नाहीत?कारण वकीलांनी सांगीतले की, बिल्डींग तोडा म्हणून तोडली आणि उद्या समजा ऑर्डर झाली नाही तर तुम्ही अडकाल. आपल्या विधीअधिका-यांनी संध्याकाळपर्यंत थांबून ऑपरेटीव्ह ऑर्डर ही घेतलीच पाहिजे. साहेब मी पहिला नगरसेवक कोर्टातून झालो. संध्याकाळी साडेपाच वाजता मी ऑपरेटीव्ह ऑर्डर घेऊन आलो आहे.

(सभागृहात गोंधळ )

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मौजे नवघर, स.नं. २१८ (जुना), १९४(नविन) हि.नं. ९ भाईंदर (पु.) (इंद्रलोक भागात) मिरा-भाईंदर मनपाच्या सांडपाणी वाहुन नेणा-या मुख्य नाल्यावर श्री. सतिश तुकाराम कदम, रा. शितलनगर, मिरारोड (पु.) यांनी तळ अ ३ मजले अनधिकृत इमारत उभी केली होती.

कायदेशीर तरतुदी पुर्ण करुन दि. ३१/०३/२००९ रोजी अभियोक्ता सौ. अनुराधा आपटे व विधी अधिकारी यांनी दिलेल्या कायदेशीर अभिप्रायानुसार दि. ०६/०४/२००९ रोजी मिरारोड पोलिस स्टेशन येथुन योग्य तो पोलिस बंदोबस्त घेवुन मनपाचे अधिकारी व कर्मचारी तसेच बांधकाम पाडण्यासाठी मे. आशापुरा कंस्ट्रक्शन कंपनी कडुन तीन जे.सी.बी. १) एम.एच. -०४.५२४२ २)एम.एच.-०४.डी.टी.४३२ ३)एम.एच.-०४. व्हि.५१५० निविदेच्या करारनामा व दि. ३१/०३/२००९ च्या कार्यादेश प्रमाणे मागविण्यांत आलेले होते. सदर जे.सी.बी. मशिन ड्रायव्हर १) श्री. प्रदिप हरिभाऊ जाधव, रा. काशिमिरा २) श्री. सरवण उर्फ बबलु अशोक यादव रा. काशिमिरा व ३) श्री. शानु पुंडलिक नाईकवाडी, रा. काशिमिरा असे होते.

सदर इमारत पुर्व सुचना मिळण्यापुर्वीच स. ११.३० वाजताचे सुमारास सदर इमारत अचानक क्षणार्धात कोसळल्याने दुर्घटना घडली त्यात जे.सी.बी. ड्रायव्हर म्हणुन काम करीत असलेले १) एम.एच. -०४.५२४२ २)एम.एच.-०४.डी.टी.४३२, श्री. प्रदिप हरिभाऊ जाधव, श्री. सरवण उर्फ बबलु अशोक यादव रा. काशिमिरा रा. काशिमिरा हे ढिगा-याखाली अडकल्याने जागीच मयत झाले आहे. सदर प्रकरणी प्रत्येक मृतांच्या नातेवाईक यांना २ लाख रु. महानगरपालिका व ठेकेदाराकडून २ लाख रु. महानगरपालिकेने घेवून सदर आर्थिक सहाय्य त्यांच्या मुलांच्या नावाने मुदत ठेवीमध्ये सज्ञान होईपर्यंत ठेवावे असा मी ठराव मांडत आहे.

तसेच मा. महासभेत मा. पत्रकार श्री. अनिल खेडेकर यांना रु ५० हजार., श्री. बाबुराय श्रीसंपत राजभर यांना रु. १ लाख व मा. पत्रकार श्री. श्यामसुंदर मालपानी यांच्या मागणीनुसार रु. १ लाख मंजुर करण्यात येत आहेत.

**हरिश्चंद्र म्हात्रे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, या ठरावाला भारतीय जनता पक्षाचा विरोध आहे. यामध्ये आमची सुचना आहे. एक तर सुचना मान्य करा नाहीतर आमचा विरोध आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

या ठरावाला भारतीय जनता पक्षाने जो विरोध केला आहे. तो विरोधसुध्दा नोंदवून घ्यावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यामध्ये आपल्या ऑडीटरनी आणि मा. आयुक्त साहेबांनी कुठलाही निर्णय दिलेला नाही. भविष्यकाळामध्ये जर या दोन लाखावर ऑडीट रिपोर्टवर आक्षेप आला तर त्याला भारतीय जनता पक्ष जबाबदार राहणार नाही. अशी सुचना जर तुम्ही मान्य करत असाल तर आमची तयारी आहे. नाहीतर आम्ही भारतीय जनता पक्षाचे सर्व नगरसेवक या ठरावाला विरोध करतो.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेबस माझी एक सुचना आहे. दोन पत्रकारांनी आपल्याकडे अर्ज केले आहेत. आणि एक मा. आयुक्त साहेबांकडे आले आहे. त्याचा पण सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात यावा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर साहेबांकडे आलेल्या पत्रांचा याच्यामध्ये समावेश करावा.

**मिलन म्हात्रे :-**

जे काही नक्की केले आहे तेवढी रक्कम द्यावी.

**मा. महापौर :-**

आणि सेफ्टी टॅकमध्ये एक मुलगा मयत झाला त्याचे काय?

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला तुम्ही दोन लाख दिलेले होते. तुमच्या हातून वितरण झाले आहे.

**जुबेर इनामदार :-**

सेफ्टी टॅंक कोणाची होती?

**मा. महापौर :-**

महापालिकेची.

**जुबेर इनामदार :-**

बांधली कोणी?

**मा. महापौर :-**

महापालिकेने.

**जुबेर इनामदार :-**

ठेकेदार असेल ना? आपले इंजिनिअर बांधायला जात नाहीत.

**मा. महापौर :-**

ठेकेदार नाही. जुनी टाकी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, पुढचा विषय वाचण्याअगोदर आपली क्लीअरींग झाले नाही.

**मा. महापौर :-**

आपल्याला ते नंतर माहिती देतील. पुढचा विषय होऊ द्या.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, ठरावाचे वाचन करायचे नाही. पहिला प्रशासनाकडून खुलासा हवा आहे. उपायुक्तांना निलंबीत करण्याचे ठराव झाले असूनसुध्दा प्रशासनाने त्याच्यावर कारवाई का केली नाही? एखादा प्युन असता तर त्याला दुसऱ्या दिवशी घरी बसवले असते. आणि क्लार्कला बसवता. माझे स्वतःचे पत्र आहे. सहा महिने झाले. ठराव पास झालेला जवळ जवळ पाच सहा महिने व्हायला आले. सदर आयुक्त दरवेळेला गैरहजर असतात. खुलासा करा.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, महापालिकेकडे स्ट्रक्चरल इंजिनिअर नसतात. आणि महापालिकेने ती इमारत दोन वेळा तोडली होती. त्यानंतर त्यांनी स्टे आणून बांधकाम पूर्ण केले. खालच्या कोर्टात आपल्या बाजूने निकाल लागला. वरच्या कोर्टात त्यांनी अपील दाखल केले. अपीलामध्ये त्यांनी स्टे घेतला. स्टे असा दिला

होता की, महापालिकेने स्टे दाखल करेपर्यंत स्टे राहील. आम्ही स्टे दाखल केला. दाखल केल्यानंतर स्टे एक्सटेंन्ड झाला नाही. म्हणून आम्ही ती इमारत तोडली आणि हा अपघात आहे. दोन वेळा तोडूनही स्टे घेऊन त्यांनी पूर्ण बांधकाम केले होते आणि अपघात आहे. त्यामध्ये कोणाचा दोष नाही. कोणाला मारण्यासाठी आम्ही गेलो नव्हतो. रितसर बेकायदेशीर बांधकाम तोडायला गेलो होतो.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, दुसरा विषय घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

माझा मुद्दा असा आहे की, भाईंदरमध्ये अशा शंभर इमारती आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, भारतीय जनता पक्षाचे चार नगरसेवक आम्ही मागणी करतो की, एकतर मतदान घ्या. नाहीतर आमचा सर्वांचा विरोध लिहा.

**मा. आयुक्त :-**

म्हणजे मनुष्यवधाचा गुन्हा कर्मचाऱ्यांवर दाखल करून बेकायदेशीर बांधकाम तोडू नये. आतापर्यंत आम्ही बेकायदेशीर बांधकामे तोडल्यानंतर नवीन कामे व्हायची थांबली म्हणजे आता त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन परत बेकायदेशीर होउ द्या असा विचार आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, माझे म्हणणे जरा नीट ऐकून घ्या. आपल्याकडे धोकादायक इमारतींची संख्या मोठी आहे. मी जे स्ट्रक्चरल इंजीनिअरचे बोललो होतो. ते तुम्ही अपॉईंट का करत नाही. जर तुमच्याकडे नाहीत आर्कीटेक्ट पॅनलवर आहे ना? मी हे याच्याकरीता सांगतो की, एखाद्या बिल्डींगचा सांगाडा जर कमजोर असेल तर एखादा अपघात होउन एखादी इमारत रस्त्यावर पडण्याची शक्यता आहे. दोन उदाहरणे मी तुम्हाला दिली. हा विषय गेल्या मिटींगला पण झाला आणि हा अर्धवट राहिला लोक रस्त्यावर मरतात. मेन रोडची बिल्डींग सांगितली. ती मेन रोडला कोसळली आहे. श्री. शशिकांत शहा यांची जी बिल्डींग कोसळली ती मेन रोडला कोसळली आहे. याकरीता आपल्या इकडे आपला जो आर्कीटेक्ट आपण पॅनलवर नेमला आहे. तो काय करतो मी तुम्हाला पुढची न्यायालयीन प्रक्रिया विचारली नाही. मा आयुक्त साहेब, प्रशासनाकडून मला एक उत्तर पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

स्ट्रक्चरल इंजिनिअर नेमून त्यांनी धोकादायक इमारतींची तपासणी सुरू केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे हे उत्तर पाहिजे. दुसरी गोष्ट अशी आहे की, उपायुक्तांना कामावरुन कमी करण्याचा ठराव पास झाला आहे.

**मा. आयुक्त :-**

४५ इमारती तपासून घ्यायला त्यांची नेमणूक केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आता पुढे उपायुक्तांचे बोला. जरा उपायुक्तांचा खुलासा करा.

**मा. आयुक्त :-**

ते महाराष्ट्र शासनाचे आहेत. त्यांनी काय चूक केली तर निलंबन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यांनी काय चूक केली हे गर्व्हमेंटला कळवायचे असते.

**मिलन म्हात्रे :-**

कमी करण्याचा ठराव झालेला आहे.

**मा. आयुक्त :-**

महापालिका त्यांच्यावर दोषारोप करुन दोष काय काय आहेत हे दाखवून शासनाला कळवायचे असते. शासन त्यांच्यावर ॲक्शन घेते. इथे निलंबन म्हटल्यानंतर निलंबन होत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

पण ते कळवले का? ठराव खंडीत करायला पाठवला का? एवढी महत्वाची कारवाई चालू असताना उपायुक्त गैरहजर का असतात? मा. आयुक्त साहेब, तुम्ही तो खुलासा केलेला नाही.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त श्री. नाईक साहेबांनी या विषयाबद्दल जे कार्य केलेले आहे ते प्रशंसनीय आहे. साहेब, या शहरामध्ये लॉजींग बोर्डींग बद्दल बरीच चर्चा चालु आहे. नेहमीच सभागृहामध्ये याची चर्चा होते.

**मा. महापौर :-**

आता आपण बसा. सचिव साहेब, पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४ :-**

दि. ०६/०४/२००९ रोजी मौजे-नवघर स.नं. २१८ (जुना), १९४ (नवीन) हि.नं. ९, भाईंदर (पूर्व) येथे तोडत असलेल्या इमारतीत झालेल्या अपघातात निधन झालेल्या व्यक्तिंच्या कुटूंबियांना आर्थिक सहाय्य मिळणेबाबत.

**ठराव क्र. ०६ :-**

**मौजे नवघर, स.नं. २१८ (जुना), १९४(नविन) हि.नं. ९ भाईंदर (पु.) (इंद्रलोक भागात)** मिरा-भाईंदर मनपाच्या सांडपाणी वाहुन नेणाऱ्या मुख्य नाल्यावर श्री. सतिश तुकाराम कदम, रा. शितलनगर, मिरारोड (पु.) यांनी तळ अ ३ मजले अनधिकृत इमारत उभी केली होती.

कायदेशीर तरतुदी पुर्ण करुन दि. ३१/०३/२००९ रोजी अभियोक्ता सौ. अनुराधा आपटे व विधी अधिकारी यांनी दिलेल्या कायदेशीर अभिप्रायानुसार दि. ०६/०४/२००९ रोजी मिरारोड पोलिस स्टेशन येथुन योग्य तो पोलिस बंदोबस्त घेवुन मनपाचे अधिकारी व कर्मचारी तसेच बांधकाम पाडण्यासाठी मे. आशापुरा कंस्ट्रक्शन कंपनी कडुन तीन जे.सी.बी. १) एम.एच. -०४.५२४२ २)एम.एच.-०४.डी.टी.४३२ ३)एम.एच.-०४. व्हि.५१५० निविदेच्या करारनामा व दि. ३१/०३/२००९ च्या कार्यादेश प्रमाणे मागविण्यांत आलेले होते. सदर जे.सी.बी. मशिन ड्रायव्हर १) श्री. प्रदिप हरिभाऊ जाधव, रा. काशिमिरा २) श्री. सरवण उर्फ बबलु अशोक यादव रा. काशिमिरा व ३) श्री. शानु पुंडलिक नाईकवाडी, रा. काशिमिरा असे होते.

सदर इमारत पुर्व सुचना मिळण्यापुर्वीच स. ११.३० वाजताचे सुमारास सदर इमारत अचानक क्षणार्धात कोसळल्याने दुर्घटना घडली त्यात जे.सी.बी. ड्रायव्हर म्हणुन काम करीत असलेले १) एम.एच. -०४.५२४२ २)एम.एच.-०४.डी.टी.४३२, श्री. प्रदिप हरिभाऊ जाधव, श्री. सरवण उर्फ बबलु अशोक यादव रा. काशिमिरा रा. काशिमिरा हे ढिगाऱ्याखाली अडकल्याने जागीच मयत झाले आहे. सदर प्रकरणी प्रत्येक मृतांच्या नातेवाईक यांना २ लाख रु. महानगरपालिका व ठेकेदाराकडून २ लाख रु. महानगरपालिकेने घेवून सदर आर्थिक सहाय्य त्यांच्या मुलांच्या नावाने मुदत ठेवीमध्ये सज्ञान होईपर्यंत ठेवावे असा मी ठराव मांडत आहे.

तसेच मा. महासभेत मा. पत्रकार श्री. अनिल खेडेकर यांना रु ५० हजार., श्री. बाबुराय श्रीसंपत राजभर यांना रु. १ लाख व मा. पत्रकार श्री. श्यामसुंदर मालपानी यांच्या मागणीनुसार रु. १ लाख मंजुर करण्यात येत आहेत.

**सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे अनुमोदक :- श्री. हरिश्चंद्र म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५, महानगरपालिकेतील विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेकामी प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, ते गैरहजर का असतात. त्याच्याबद्दल खुलासा केलेला नाही. ते गैरहजर कोणाच्या आदेशाने असतात? आम्हाला दरवेळेला केबीन बंद मिहते. त्याच्यावर काय कारवाई केली? श्री. दिवटे यांची गोष्ट करतो. तुम्हाला सगळे माहिती आहे.

**मा. आयुक्त :-**

ते रजेवर होते.

**मिलन म्हात्रे :-**

किती महिने? एखाद्या माणसाला रजा देण्याचा काही कालावधी आहे की नाही? बघावे तेव्हा रजेवर. सहा-सात महिने झाले. त्यांचे मस्टर सभागृहात मागवा.

**मा. आयुक्त :-**

केबिनमध्ये या रजेचा अर्ज दाखवतो.

**मिलन म्हात्रे :-**

अर्ज असू द्या. आज तुम्हाला पावसाळ्याच्या अगोदर सर्व अतिक्रमणे तोडायची आहेत.

**मा. आयुक्त :-**

मी रजेचा अर्ज मिटींगमध्ये घेउन येउ का?

**मिलन म्हात्रे :-**

बाकीच्यांच्या रजा तुम्ही रद्द केलेल्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

रजा किती ते किती घेतली तो रजेचा अर्ज मी इथे घेउन येउ?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला तेच बोलतो. एखादा अधिकारी गैरहजर राहायचे प्रमाण किती? तुम्ही उद्या सहा महिने गैरहजर राहिलात तर महापालिका कशी चालणार?

**मा. आयुक्त :-**

साहेब, रजेवर आहेत. रजेचा अर्ज तुम्हाला दाखवतो.

**मिलन म्हात्रे :-**

रजा मंजूर करण्याचे काही प्रमाण आहे की नाही?

**मा. आयुक्त :-**

माझाच अधिकार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या सगळ्या माहितीच्या अधिकारांचे अपील त्यांच्याकडे पेन्डीग आहेत. तुम्ही त्यांच्या खुलासा मागवा.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही बेकायदेशीर बांधकाम असे केले, तसे केले म्हणून खच्चीकरण करु नका.

**मिलन म्हात्रे :-**

मी असे बोललो नाही.

**मा. आयुक्त :-**

बांधकामे तोडल्यानंतर आता नवीन व्हायची मोठ्या प्रमाणात कमी झाली आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मी फक्त एवढेच बोलतो की, उपायुक्त गैरहजर का असतात?

**जयंत पाटील :-**

मा.आयुक्त साहेब, महापालिकेतील विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेकामी प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देणे याची अगोदर काही माहिति आपल्याला विचारायची आहे. मी अनभिज्ञ आहे. मला यातले काही नॉलेज नाही. आपल्या महापालिकेमध्ये मा. आयुक्त साहेबांना मारुती बलेनो मा. उपायुक्तांना गाडी. मा. उपायुक्त (अतिक्रमण) यांना गाडी. कर संचालक वगैरे वगैरे ह्यांना गाड्या आहेत. मला एका गोष्टीची माहिति पाहिजे की, आपल्याला घरभाडे दिले जाते. आज महापालिकेचे बरेचसे अधिकारी शहरामध्ये राहात नाहीत. ते शहराच्या बाहेर राहतात. आणि त्यांना आणायला त्यांच्या घरापर्यंत गाडी जाते. एका अधिकाऱ्याला आणायला एक गाडी जाते. मला कळत नाही की, त्या गाडीतून चार अधिकारी येउ शकत नाहीत का?

**मिलन म्हात्रे :-**

मिनी बस ठेवा. ठाण्याला सगळ्यांना कॅसल नाक्यावर सोडायचे.

**जयंत पाटील :-**

मला ही माहिती द्या की, आपल्याला जर घरभाडे मिळते तर आपले अधिकारी शहरामध्ये येउन का राहत नाहीत? आपला मा. आयुक्तांचा स्वतःचा बंगला आहे.

**मा. आयुक्त :-**

मी येणार आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही येणार तेव्हा येणार. तुम्हाला तिकडे भिती वाटते का?

**मा. आयुक्त :-**

भिती वाटत नाही. पण जरा गचाळ झाले होते ते दुरुस्त करायला घेतले. मी दहा-पंधरा दिवसात येणार आहे.

**जयंत पाटील :-**

तुमचा प्रश्न मिटला. बाकीच्या अधिकाऱ्यांचे काय? जर त्यांना घरभाडे मिळते. घरभाडे देण्याचा उद्देशच तो आहे की, तुम्ही या शहरामध्ये येउन राहा. तुम्हाला शहरात महापालिकेच्या कामासाठी गाड्या मिळतील. मंत्रालयात जाउ शकता. वाटेल तिथे जाउ शकता तुम्ही गाडी घेउन जा, पण महापालिकेच्या कामासाठी. तुम्हांला आणायला जेव्हा तुमच्या घराकडे गाडी जाते. त्या गाडीचा काय उपयोग होते हे मला माहित नाही. मी बऱ्याच वेळा माहिति काढली की, कुठे मार्केटला भाजी आणायला वगैरे गाडी जाते. या अधिकाऱ्यांना किती जणांना गाड्या दिल्या आहेत आणि किती जण बाहेर आहेत हे जरा सांगा. मला ती माहिती द्या की, शहरात न राहणारे अधिकारी किती आहेत? आणि जे घरभाडे घेतात.

**मा. महापौर :-**

श्री. पाटील साहेब, याच्यावर आपले म्हणणे काय आहे?

**मा. आयुक्त :-**

तुमची सुचना मान्य करायला पाहिजे. जर सगळे ठाण्याला जात असतील तर येताना आणि जाताना एकाच गाडीतून यावे म्हणजे पेट्राल वाचेल.

**जयंत पाटील :-**

गाडी वाचेल, ड्रायव्हर वाचेल.

**मा. आयुक्त :-**

तुमचे हे म्हणणे मान्य करायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण जाणकार आहात. आस्थापनेचा खर्च वाढतो हे आपलेच म्हणणे आहे आणि म्हणून त्यांना हे आमचे म्हणणे.....

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्त साहेब, एका मारुती व्हॅनमध्ये पाच लोक जातात.

**जयंत पाटील :-**

सन्मा. नगरसेवक श्री. मिलन म्हात्रे यांनी सांगितले की, मिनी बस घ्या.

**राजेंद्र जैन :-**

अगर मा. आयुक्त साहबने यह मान लिया है की, चार जण एक आयेंगे तो जो संगणक चालक और कार ड्रायव्हर की भरती कर रहे है उसमे कमी कर सकते है?

**जयंत पाटील :-**

याच्यामुळे आस्थापनेचा बराचसा खर्च कमी होईल.

**मा. महापौर :-**

हे आर्थिक प्रशासकीय आहे. एक्झॅक्ट फिगरमध्ये पण कमी करणार आहोत.

**जयंत पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालकिची एकुण ८० वाहने असुन सदर वाहने आवश्यकतेनुसार विविध विभागात उदा.अग्नीशमन, पाणीपुरवठा, आरोग्य, रुग्णवाहिका, शववाहिनी, फिरता दवाखाना, इ. वाहनांवर स्थायी वाहनचालक याची संख्या अपुरी असल्याने ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे आवश्यक आहे. अत्यावश्यक सेवेतील वाहने दोन ते तीन पाळीत चालु असतात. सदर वाहनावर मनपाकडुन आवश्यकतेनुसार वार्षिक ठेका पध्दतीने वाहनचालक /ऑपरेटर यांचा पुरवठा करण्यात येतो.

सन २००९-१० या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकिय तरतुदीत वाहन चालक पुरवठा करणे कामी खालील प्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | लेखाशिर्ष | सन २००९-१० करीता उपलब्ध तरतुद |
|---|---|---|
| १ | अस्थायी अस्थापना ठेका वाहनचालक (सा.प्र/कर/अग्नीशमन,आरोग्य व इतर) | ४५,००,०००/- |

महानगरपालिकेकडे सध्या उपलब्ध असलेले एकुण ५४ इतके वाहन चालक आहेत. तसेच ठेका पध्दततीने गरजेनुसार वेळोवेळी लागणारे वाहन चालक मागविणे आवश्यक आहे. वार्षिक ठेकापध्दतीने वाहन चालक गरजेनुसार पुरवठा करणे कामी सन २००९-१० या वर्षात अंदाजित रु.४३,००,००० इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी मनपाच्या वाहनांवर अत्यावश्यक सेवा व इतर विभागात आवश्यकतेनुसार कंत्राटी (ठेका) पद्धतीवरील वाहनचालक/ऑपरेटर पुरवठा करणेकामी प्रसिध्द वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करून संबंधितांकडुन सिलबंद निविदा मागविणेच्या व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, एक सुचना अशी आहे की, महितीच्या अधिकारामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेची एक ॲम्बेसिटर गाडी ५१० कि.मी. एक दिवसात उत्तन ते भाईंदर चाललेली आहे. माझ्याकडे तसे उत्तर आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, दुसरा विषय घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

जरा घाई करु नका. तुम्ही पिठासीन अधिकारी आहात. विषय लवकर सुरु करा. एखादी व्यक्ती बोलते म्हणून त्यांनी दोन दोन तास बोलायचे का? आम्हालाही बोलता येते. मी तुम्हांला सभागृहामध्येच सांगतो. या अगोदर मा. आयुक्त जे उत्तर देउन गेले. याच सभागृहाने श्री. मिलींद वाणी आणि श्री. बनसोडे यांचा ठराव पास केला होता. त्यांना तुम्ही कामावरुन काढले की नाही? मग ह्या व्यक्तीचे का होत नाही. तुमचे स्वतःचे ठराव आहेत. त्याला इकडे मानसन्मान मिळत नाही. तुमच्या बरोबर आमचाही अपमान होतो. ते जर अधिकारी महाराष्ट्र शासनाचे असतील आणि जर त्यांच्या बदल्या होत असतील, तर मग या अधिका-यांमध्ये काय विशेष? हे लोक सोन्याचे मुकुट घालून आले आहेत काय? याचे उत्तर मा. आयुक्तांनी का द्यायचे नाही? म्हणजे प्रशासन आपल्याला फरफटत घेउन जाते आणि आम्ही नगरसेवक अर्धा अर्धा दिवस भांडत राहतो आणि आपला वेळ फुकट जातो. महत्वाच्या विषयावर चर्चा होत नाही. ही जी वाहने घ्याल, त्याला लॉगबुक ठेवा. गाड्या कधी येतात? किती किलोमीटर चालतात? कुठे कुठे चालतात? मिरा भाईंदर महापालिकेतील लॉज समोर, बिअर बार समोर आपल्या गाड्या लागलेल्या दिसतात. मड आयँडच्या बिचवर मी तुमच्या गाड्या बघितल्या आहेत. तुम्ही सांगाल तर फोटो देतो. ऑन ड्युटी मिरा भाईंदर म्युनिसिपल कॉर्पोरेशन तिकडे आपली महानगरपालिका काय करत होती तेच मला कळत नाही. आमच्या देवीचे तिथे देउळ आहे. त्या देवीच्या दर्शनाला मी गेलो होतो. तेव्हा आपली गाडी बघितली. तिकडे कुठची व्हिजीट करायला गेले होते ते मला माहित नाही.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, पुढचा विषय घ्या.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आता जो ड्रायव्हर लोकांचा ठराव वाचला गेला त्या सगळ्या ड्रायव्हरना उद्या तुमच्या केबिनमध्ये बोलवा. तेवढे ड्रायव्हर आहेत का ते पहिले विचारा.

**मा. महापौर :-**

माहिती घेतो.

**प्रकरण क्र. ५ :-**

महानगरपालिकेतील विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेकामी प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ०७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालकिची एकुण ८० वाहने असुन सदर वाहने आवश्यकतेनुसार विविध विभागात उदा.अग्नीशमन, पाणीपुरवठा, आरोग्य, रुग्णवाहिका, शववाहिनी, फिरता दवाखाना, इ. वाहनांवर स्थायी वाहनचालक याची संख्या अपुरी असल्याने ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे आवश्यक आहे. अत्यावश्यक सेवेतील वाहने दोन ते तीन पाळीत चालु असतात. सदर वाहनावर मनपाकडुन आवश्यकतेनुसार वार्षिक ठेका पध्दतीने वाहनचालक /ऑपरेटर यांचा पुरवठा करण्यात येतो.

सन २००९-१० या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकिय तरतुदीत वाहन चालक पुरवठा करणे कामी खालील प्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | लेखाशिर्ष | सन २००९-१० करीता उपलब्ध तरतुद |
|---|---|---|
| १ | अस्थायी अस्थापना ठेका वाहनचालक (सा.प्र/कर/अग्नीशमन,आरोग्य व इतर) | ४५,००,०००/- |

महानगरपालिकेकडे सध्या उपलब्ध असलेले एकुण ५४ इतके वाहन चालक आहेत. तसेच ठेका पध्दतीने गरजेनुसार वेळोवेळी लागणारे वाहन चालक मागविणे आवश्यक आहे. वार्षिक ठेकापध्दतीने वाहन चालक गरजेनुसार पुरवठा करणे कामी सन २००९-१० या वर्षात अंदाजित रु.४३,००,००० इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी मनपाच्या वाहनांवर अत्यावश्यक सेवा व इतर विभागात आवश्यकतेनुसार कंत्राटी (ठेका) पद्धतीवरील वाहनचालक/ऑपरेटर पुरवठा करणेकामी प्रसिध्द वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करून संबंधितांकडुन सिलबंद निविदा मागविणेच्या व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६, विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या ॲमिनिटी ओपन स्पेस (नागरी सुविधा क्षेत्र) या जागेत सार्वजनिक सोई उपलब्ध करणेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

**जयंत पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मंजूर केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार प्राप्त होणा-या ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेत सार्वजनिक सोयी उपलब्ध करण्याबाबत मा. आयुक्त यांना संपूर्ण अधिकार आहेत. तथापी सदर जागेत करावयाच्या सार्वजनिक सोयीकरीता मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सर्व गटनेत्यांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ नुसार समिती गठीत करण्यात येऊन सदर समिती मार्फत ॲमिनिटी ओपन स्पेस मध्ये करावयाच्या सार्वजनिक सोयीबाबत व सदर सोयी कोणत्या पध्दतीने कराव्यात याबाबत अंतिम निर्णय घेण्यात यावा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, माझी एक महत्वाची सुचना आहे की, पेणकर पाडा, महाजनवाडी, नवघर म्हणजे अनुक्रमांक २,३,४,५,६ मा. आयुक्त साहेब, या २ ते ६ क्रमांकापर्यंत फायर ब्रिगेडकरीता किमानपक्षी एक एकर एवढे फायर स्टेशन आपण ठेवावे. आणि त्याची निर्मिती आपण करावी. कारण तीन विषयांमध्ये दिलेले आहे की, मा. महासभा ठरवेल तसे. या एरियामध्ये कुठेही फायर स्टेशन नाही. नवघर शाळेला फायर स्टेशनचा प्रस्ताव गेल्या तीन वर्षापासून प्रलंबित आहे.

**जयंत पाटील :-**

श्री. मिलन म्हात्रे साहेब, आपण जरा दोन मिनिट ऐका. मग आपले मत मांडा.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचा ठराव झाल्यानंतरची माझी सुचना आहे. तुम्ही ठराव ठेवता तर आम्ही सुचना ठेवू शकतो. ठराव झाला, तुम्ही ठराव ठेवला. त्याला आमची सुचना संलग्न करुन घ्या.

**मा. महापौर :-**

आपली सुचना काय आहे?

**मिलन म्हात्रे :-**

माझी सुचना अशी आहे की, अनुक्रमांक २ ते ६ या जागांमध्ये किमानपक्षी दोन फायरस्टेशन त्या बिल्डरकडून बनवून घ्या. बिल्डर लोकांनी महापौर निवास बनवला. मा. आयुक्तांचा बंगला बनवला. पण अतिशय महत्वाचे म्हणजे, फायर ब्रिगेड. त्याची कुठेच सोय नाही आणि आपल्याकडे .......

**जयंत पाटील :-**

त्या कमिटीमध्ये आपणसुध्दा असणार आहात.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे. माझी सुचना इन्क्ल्युड करा.

**जयंत पाटील :-**

मुळात ही टिप्पणी लिहिताना चूक झालेली आहे. दहा हजार चौरस मीटरपेक्षा जास्त. ही सुधारणा करुन घ्या, दोन हेक्टर. आता आणखीन अशी एक गोष्ट आहे की, एक नंबर नवघर सर्वे नंबर वगैरे दिलेला आहे. या शहरात राहणा-या या मा. महासभेमध्ये असणा-या कुठल्याही नगरसेवकाला नंबर माहित नाहीत. इव्हन मीसुध्दा की, हे नंबर कुठे आहेत? काय होणार आहे? याच्यामध्ये काय बनवायचे आहे? आपल्या शेजारी असतील पण कोणाला त्याची माहिती नाही. म्हणून मी समिती गठित केलेली आहे. ते प्रत्यक्ष जागेवर जाउन बघतील. आणि मग निर्णय घेतील. त्यात श्री. मिलन म्हात्रे साहेबसुध्दा आहेत. आता दुसरा प्रश्न असा आहे की, इतर गोष्टीत काय करावे हे तुम्ही दिले. पण शेवटच्या ज्या ४,५,६ मध्ये तीन गोष्टी आहेत. याच्यात ४५३ मध्ये सदर जागेत करावयाच्या सार्वजनिक सोयी बांधणे मा. महासभेने प्रस्तावित कराव्या. पुढच्या मा. महासभेने हे तुम्ही दिलेले नाही. या तीन फक्त मा. महासभेने कराव्यात. याच्यानंतर आम्ही काल प्रत्यक्ष या तीनही जागेवर गेलो. मी आणि आमचे गटनेते श्री. भगवती शर्मा हे तीनही सर्व्हे नंबरवर गेलो. त्याच्यामध्ये, ॲक्च्युअली हा १२६४ दिलेला आहे. पण हा ३२०० काहीतरी आहे. ही पण तुमची फिगर चुकलेली आहे. आणि ही ४ नंबर जागा व्हॅकेंन्ट नाही. तुम्ही इकडे विषय आणलेला आहे. पण त्या जागेवर एसटीपी बनलेला आहे. हे कोणालाही माहित नाही. कुणाचा आहे ते फोटो दाखवतो. मग कोणाचा आहे ते बघा. या एसटीपी चा फोटो काढलेला आहे. आमच्यासमोर इकडे विषय आणले आणि तिकडे.......

**मिलन म्हात्रे :-**

मी अनुक्रमांक २ ते ६ बद्दल बोलतो. ऑप्शनल भरपूर आहे. जागा तिकडे धंदा आलाच.

**जयंत पाटील :-**

म्हणून मी समिती गठित करुन त्यांनी जागेवर प्रत्यक्ष पहावे आणि आपली परवानगी न घेता त्यांनी एसटीपी बांधले कसे? मा. आयुक्त साहेब, महापालिकेला ५ टक्के जागा द्यायला पाहिजे. त्या जागेत आपल्या परवानगी शिवाय ती झालीच कशी? लेआउट मध्ये त्यांनी एसटीपी दाखवलेला आहे का?

**मा. महापौर :-**

ज्यावेळेला आपले बैठकीत ठरले की, आपण सकाळी जायचे. एक दिवस ठरले होते की, आपण सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रत्येक जागा पाहणी करायला जायचे. त्यावेळी श्री. मॉरस रॉड्रीक्स माझ्या बरोबर होते आणि एसटीपी प्लान्टचे काम चालू होते. त्याचवेळी आपण त्यांना नोटीस द्यायला सांगितले होते की, त्या बिल्डींगचे जे काम चालू असेल ते त्यांना इमिजिएटली बंद करायला लावा. पहिले आमची जागा आम्हाला व्हॅकेंट करुन ताब्यात द्या. श्री. जाधव साहेबांनी हे सांगितले आणि माझ्या माहिती प्रमाणे नोटीसपण दिली होती की, आम्हाला ती जागा व्हॅकेंट करुन ताबडतोब पाहिजे. तुम्हाला एसटीपी बांधायचे असेल तर तुमच्या आरजी मध्ये किंवा इतर जागेत बांधा. आम्हाला ती जागा व्हॅकेंट करुन पाहिजे. सहा महिन्या अगोदर ज्यावेळी आपण जाणार होतो. तुमची तब्येत ठिक नव्हती की, काहीतरी कार्यक्रम होता म्हणून तुम्ही आले नव्हते. त्याचवेळी आपण त्यांना नोटीसपण दिलेली आहे की, आम्हाला ही जागा व्हॅकेंट करुन पाहिजे. तुमच्या एसटीपीची सोय तुम्ही स्वतः करावी.

**जयंत पाटील :-**

मुळातच आपण जेएनएनआरयूएम च्या माध्यमातून अंडर ग्राउंड गटार योजना करणार आहोत. आपल्याला एसटीपी ची गरज पडणार नाही. जी पडणार ती आपल्या ठिकाणाप्रमाणे पडणार आहे. आपल्या स्पॉटवर होणार आहे.

**मा. महापौर :-**

आपल्याला एसटीपी ची गरज पडेल पण आपल्याला जागाही पाहिजे.

**जयंत पाटील :-**

आपल्याला जागाच पाहिजे. तिकडे काय करायचे हे आमच्यावर आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मी तुमच्या परवानगीने बोलते. मी सकाळीपण उठलेली. पण मला तुम्ही सांगितले होते की, जागेचा विषय आल्यावरच तुम्ही बोला. म्हणून मी खाली बसली. तुम्ही कातकऱ्यांचा विषय......

**मा. महापौर :-**

तुम्ही जे बोलता त्याचे उत्तर तेच राहणार आहे.

**नयना म्हात्रे :-**

पहिले मला बोलू द्या. तुम्ही नंतर बोला. तुम्ही मला सहा महिन्यापासून सांगता की, मी विषयपत्रिकेवर विषय घेतो. तुम्ही त्यांचा विषय का घेत नाही. ते मला सांगा. आज ते दोन रस्त्यामध्ये राहतात. पावसाळा येईल. तुम्ही त्यांना बाहेर कसे काढणार ते सांगा. टेम्बाच्या लोकांना तुम्ही भाड्यावर ठेवले. तुम्ही त्यांना भाड्यावर का ठेवत नाहीत?

**मा. महापौर :-**

प्रशासनाकडून विषय मागितलेला, पण प्रशासनाकडून विषय आलेला नाही. आपल्याला त्यांना जे ॲकोमोडेट करायचे आहे. त्यासाठी आपल्याकडे जागा उपलब्ध नाही. ज्या दोन जागा व्हॅकेंट आहेत. त्यामध्ये मी त्यांना सांगितले की, जर नियमाप्रमाणे बसत असेल तर त्यांना तिकडे आपण बांधून देउ. आपल्याकडे ॲमिनिटी स्पेस आहेत.

**नयना म्हात्रे :-**

तुम्हाला आम्ही गुरुचरणाची जागा दाखवतो. तुम्ही त्या कातकरी लोकांना तिकडे रुम बांधून द्या. गुरुचरणाचा एक तुकडा आहे.

**मा. महापौर :-**

गुरुचरणाची जागा महापालिकेची नाही.

**नयना म्हात्रे :-**

ती कलेक्टरची जागा आहे. तुम्ही कलेक्टरला फक्त तुमचा प्रस्ताव पाठवा.

**मा. महापौर :-**

ते करु या.

**नयना म्हात्रे :-**

पण ते कधी करु या. ते कातकरी बिचारी वेड्यासारखे बाहेर बसतात. आपल्याला रहायला मोठे मोठे फ्लॅट आहेत, ए.सी. आहेत. ते कसे राहतात, त्यांच्याकडे बघा. जरा त्यांची चौकशी करा. सहा-सहा महिन्यापासून हे काय चालले आहे? आम्हाला वेड लागले. मा. आयुक्त साहेब, तुम्ही जरा सांगा.

**मा. आयुक्त :-**

ती गुरुचरणाची जागा आपण मागवू.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, तुम्हाला पण माहिती आहे की, या इमारतीच्या खाली कातकरीच रहायचे.

**मा. आयुक्त :-**

मला काळजी आहे. जागा मागवू.

**नयना म्हात्रे :-**

किती दिवस लागतील ते मला सांगा. आता मी स्वतः कंटाळले.

**मा. आयुक्त :-**

मी फक्त जागा मागणी करणार आणि कलेक्टर गर्व्हमेंटकडे प्रस्ताव पाठवणार. गर्व्हमेंट मंजूर करणार.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, पावसाळ्यात तुम्ही त्यांचे काय करणार ते मला सांगा. तोपर्यंत जसे टेंम्बाच्या लोकांना भाड्याने रुम दिले आहेत. तसे त्यांना भाड्याने रुम द्या.

**मा. आयुक्त :-**

आता ते रस्त्यामध्ये राहतातच ना?

**नयना म्हात्रे :-**

राहतात. पण पावसाळ्यामध्ये त्यांचे किती हाल खराब होईल ते बघा. साहेब, कातकरी कुटूंब फक्त २५-२६ आहेत. त्यांच्या मागे लागून किती लोक रोडवर राहतात बघा. आणि तिकडे गाडी आणताना आपल्या नाकीनउ येते. साहेब, जसे आपण टेंबाच्या लोकांना भाड्याने दिले तसे आपण त्या लोकांना पण भाड्याने देउ. कलेक्टरचा विषय नंतर झाला. पण जसे आपण टेंबाच्या लोकांना भाड्याने दिले तसे त्या लोकांना द्यायला आपल्याला काय अडचण आहे. त्यांनादेखील भाड्याने द्या. जेव्हा आपल्याला कलेक्टर जागा देईल, जेव्हा ते रुम बांधतील तेव्हा तुम्ही त्यांना परत तिकडे आणा. आम्ही नाही बोलत नाही. पण तोपर्यंत काय? साहेब, किती वर्षे झाली ते लोक......

**मा. आयुक्त :-**

कलेक्टर साहेबांशी चर्चा करु आणि लवकर देतो म्हटले तर करुन घेउ.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, आपल्याला त्यांना भाड्याने रुम द्यायचे आहेत. तर कलेक्टर साहेब सांगणार आहेत की, तुम्ही देउ नका?

**मा. आयुक्त :-**

कुठले रुम?

**नयना म्हात्रे :-**

जसे आपण टेंबाच्या लोकांना दिले. मग त्यांना पण भाड्यानेच द्या.

**मा. आयुक्त :-**

पुढच्या मा. महासभेमध्ये प्रस्ताव देतो.

**नयना म्हात्रे :-**

पुढच्या महासभेपर्यंत जोरदार पाउस पडेल. साहेब, तेव्हा आचारसंहिता लागेल आणि मिटींग होणारच नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. महासभा लवकर लावू.

**नयना म्हात्रे :-**

मा. महासभा होणार नाही.

**मा. महापौर :-**

आताच तारीख नक्की करु या.

**नयना म्हात्रे :-**

मला पुढच्या मिटींगचे काही पडलेले नाही. मला हे उत्तर द्या.

**मा. महापौर :-**

प्रशासनाने प्रस्ताव दिला नव्हता. आता मा. आयुक्त साहेबांनी कबुल केले की, प्रस्ताव देतो.

**नयना म्हात्रे :-**

कबुल केले हे मला मान्य आहे. पण जसे टेंबाच्या लोकांना तुम्ही तिकडे बसवले, भाड्याने दिले तसे त्यांनापण भाड्याने द्या.

**मा. महापौर :-**

विषय येउ द्या.

**नयना म्हात्रे :-**

काय विषय येउ द्या. म्हणजे तुम्ही प्रत्येक वेळेला विषय घेणार नाही. आणि मला सांगणार की, पुढच्या महिन्यात घेणार. तुमचे हे काय चालले आहे? मी नगरपालिकेच्या बाहेर उपोषणाला बसेन.

**मा. महापौर :-**

प्रशासनाने प्रस्ताव द्यायला पाहिजे की नाही?

**नयना म्हात्रे :-**

मला ते माहित नाही. मला आजच्या आज निर्णय द्या. तुम्ही विषय कधी घेणार? त्या कातकऱ्यांच्या जागेवर आपण मिटींग घेतो. त्यांना तुम्ही बाहेर ठेवले.

**मा. महापौर :-**

प्रशासनाकडून प्रस्ताव आल्यावर ते ताबडतोब घेण्यात येईल. आता मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की, पुढच्या मिटींगला घेतो. ते येईल.

**नयना म्हात्रे :-**

मला पुढचे मागचे सांगु नका. मला एवढे सांगा जसे टेंबाच्या लोकांना भाड्याने ठेवले.......

**मा. महापौर :-**

त्यासाठी पुढच्या मा. महासभेत प्रस्ताव देणार आहेत.

**नयना म्हात्रे :-**

पुढचा महिना कोणी बघितला? उद्या जर मी मेली तर? मला तुम्ही आजच काय ते सांगा. मा. आयुक्त साहेब, त्या आंबेडकर नगर किती झोपड्या तुटल्या त्याचा माझ्याशी वाद नाही. मी फक्त त्या कातकरी लोकांपुरतेच बोलते. मला त्यांचे उत्तर द्या. त्यांची तात्पुरती सोय कुठे करणार ते सांगा. साहेब आपण त्यांना जर तिकडून काढले तर तो अख्खा रस्ता मोकळा होईल.

**मा. महापौर :-**

आपण ज्यावेळी सांगितले की, त्यांना आपल्याला परत हाउसिंग फॉर डिस हाउसिंग मध्ये अकोमोडेट करायचे आहे. प्रशासनाकडून ऑलरेडी प्रस्ताव मागितलेला पण आता नव्हता. आता मा. आयुक्त साहेबांनी कबुल केले की, पुढच्या मा. महासभेला देतो. विषय आल्यावर आपण निर्णय घेउ.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, त्यांचे जे म्हणणे आहे की, आपण विषयपटलावर विषय घेणार आहोत. परंतु, पावसाळा येणार आहे, सुरु झाला नाही. तत्पूर्वी त्यांना तात्पुरती सोय करुन द्या. काही जागा आहेत ना? मा. सभागृह नेते साहेब, आपण जेव्हा विषयपटलावर विषय घेणार तेव्हा घेणार. परंतु, त्यांची तात्पुरती सोय करावी.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, तो अतिशय सेन्सेटीव्ह विषय आहे. सन्मा. नगरसेविका जीव तोडून बोलत आहेत आणि ते कातकरी समाज या आपल्या जागेत होते, जिथे आपण आता आहोत त्या जागेत होते. त्यांचे व्हेरिफिकेशन झालेले आहे. संपूर्ण फाईल तयार आहे. ते जर कातकरी नसतील तर तुम्ही देउ नका. व्हेरिफिकेशन झालेले आहे आणि त्यांना देणे गरजेचे आहे. ते हाउस फॉर डिस हाउसमध्ये बसतील, त्यांना आपण या जागेतून उचललेले आहे.

**मा. महापौर :-**

आपण तो विषय आणू या. तात्पुरते मा. आयुक्त साहेबांनी त्यांना हाससिंग फॉर डिस हाससिंगमध्ये भाड्याने शिफ्ट करावे. श्री. पाटील साहेब, आपण प्रस्ताव आणल्यानंतर जे काही मंजूर होईल ते.

**जयंत पाटील :-**

त्यांना किती केले?

**दिपक खांबित :-**

शंभर रुपये.

**जयत पाटील :-**

शंभर रुपये करा.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, हा आता जो मोकळ्या जागांचा विष्य चालु आहे. विषय क्र. ६ मोकळ्या जागा त्यामध्ये १ ते ३ ला प्रशासनाने गोषवारा दिलेला आहे. आणि त्यांनी सांगीतलेले आहे की, त्या मोकळ्या जागा कशासाठी वापरायच्या त्या जर सभागृहाला मंजुर असतील तर त्यांना मंजुरी द्या आणि उर्वरीतसाठी कमीटी नेमा वरच्या तीन जागांसाठी प्रशासनाचा गोषवारा आलेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, त्यांच्या चाव्या कधी देणार,

**प्रशांत पालांडे :-**

सन्मा. श्री. जयंत पाटील, यांना ज्या सहा मोकळ्या जागा आहेत त्याच्यात तीन मध्ये प्रशासनाने गोषवरा दिलेला आहे. बाकी तीथे काय करायचे ते जर सभागृहाला मान्य असेल तर त्याला मंजुरी द्या आणि उरलेले तीन साठी कमीटी नेमा.

**प्रभात पाटील :-**

त्या जागा नेमल्या कुठे आहेत? त्यांचा ठावठिकाणा काय आहे? हे सभागृहाला, निदान मला तरी माहिती मिळाली पाहीजे. तुमच्या त्या आरक्षण क्रमांकाने किंवा सर्वे नंबरने आम्हाला त्या जागा कळत नाहीत. त्याची पुर्ण माहिती द्या आणि मगच विषय आणा.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांनी ताबडतोब चार दिवसात गटनेत्यांची बैठक लावावी आणि आपण त्या जागेवर जाऊ या आणि पुर्ण सभागृहाला माहिती देतो आपण जे लोढा एक्वा, ठाकुर कॉम्पलेक्सच्या समोर आहे तीकडे आपली सात हजार मिटर जागा आहे म्हणजे आपल्याला साधारण ऐंशी हजार फुट बांधकाम करता येईल. तिकडे आपण एक छोटा, एक मोठा असे दोन ड्रामा थिएटर ठरवलेले आहेत. ही जागा ड्रामा थिएटरची जागा आहे. तीकडे कोर्टाचा वाद चालु आहे. ज्यावेळी येईल तेही भविष्यात डेव्हलप करता येईल एक ती जागा होती. दुसरी जागा जी आपण सुचविलेली आहे शांती धाम आपल्या सृष्टीच्या इकडे त्या ठिकाणी आपण सिनिअर सीटीजनसाठी एक हॉल मंगल कार्यालय आणि इनडोअर स्पोर्ट्स कॉम्पलेक्स.....

**जयंत पाटील :-**

आपली कमीटी ठरवेल ना ? तुम्ही आता निर्णय देऊ नका.

**आसिफ शेख :-**

मा. महासभेने काय ठराव केला आहे ?

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, याला एक टाईम फ्रेम द्या की एवढ्या वेळात ते झाले पाहिजे नाहीतर आपण ठराव करु आणि दोन वर्षे त्या गोष्टीकडे परत बघणार नाही. मा. आयुक्त साहेब, कमीत कमी कधी पर्यत ही कमिटी गठीत करायची त्याला टाईम फ्रेस द्या.

**मा. महापौर :-**

गटनेत्यांच्या बैठकीमध्ये जे काही ठरेल त्यानंतर मा. आयुक्तांनी डिसीजन घ्यायचा की, परत विषय....

**जयंत पाटील :-**

मा. महासभेत तुम्हाला आणावेच लागणार नाहीतर तुम्ही खास सभा लावा.

**मा. महापौर :-**

माझे म्हणणे आहे की, पाहिजे तर आपण दोनदा गटनेत्यांची बैठक लावू. एकदा सगळ्यांनी समजुन घ्या.

**जयंत पाटील :-**

त्यांच्यामध्ये तुम्हीपण नाही आणि मी पण नाही गटनेटे आणि मा. आयुक्त.

**मा. महापौर :-**

पदाधीकारी राहतील

**जुबेर इनामदार :-**

समितीचा अहवाल मा. महासभेमध्ये येऊ द्या मा. महासभेमध्ये चर्चा होईल.

**मा. महापौर :-**

प्रत्येक पक्षाचे गटनेता असतील पाहिजे तर दोनदा बैठक लावू एका मिटींग मध्ये घेणार नाही.

**नर्मदा वैती :-**

मग आमच्या वॉर्डमध्ये रस्त्यावर राहतात त्यांना पण राहायला घरे नाहीत ते पण रस्त्यावर राहतात.

**मा. आयुक्त :-**

आपल्या जागेत कातकरी राहत होते म्हणून त्यांना होकार दिला.

**नर्मदा वैती :-**

मग त्यांना पण भाड्यावर घ्या ना. ते पण रस्त्यावर उघड्यावर राहतात.

**मा. आयुक्त :-**

कोण ?

**नर्मदा वैती :-**

आमच्या बंदरवाडीची झोपडपट्टी आहे ते कचरापट्टीवर राहतात ते पण उघड्यावर राहतात ना?

**मा. आयुक्त :-**

झोपडपट्टीवाले आणि ऑफीसच्या जागेत राहत होते आणि कातकरी होते तो फरक आहे.

**नर्मदा वैती :-**

ती महापालिकेने तोडलेली झोपडपट्टी आहे त्यांना पण भाड्यावर द्या.

**मा. आयुक्त :-**

सर्व गटनेत्यांनी मिटींग घेऊन ते ठरवायचे आहे की, कुठल्या जागेत काय बांधायचे आणि गटनेत्यांना माहिती झाले की त्यांच्या सभासदांना ते सांगु शकतात की या जागेत हे घेतले आहे. पुढच्या मिटींगला प्लान एस्टीमेटचे काही यायचे नाही मा. महासभेमध्ये प्रशासकिय मान्यता आणि प्लान अप्रुव्हलसह आले तर बरे पडेल ना ?

**मा. महापौर :-**

आपण ते बिल्डर कडुन बांधुन घेतो ना ?

**मा. आयुक्त :-**

जेवढे बांधुन देणार तेवढे एफ.एस.आय त्यांना द्यायचे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, आता जो २६ कातक-यांचा प्रश्न....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेवढी एफ.एस.आय त्याने कॉस्ट होईल तेवढीच जागा त्यांना द्यायची असे कुढल्या नियमामध्ये आहे? आठ रुमचे कोणी सांगणार पाच लाख रुपये, पाच लाख रुपये तक कीस जगह का एफ.एस.आय देनेका ?

**मा. आयुक्त :-**

जेवढ्या स्क्वेअर फुटचे बांधकाम करुन दिले तेवढ्याच स्क्वेअर फुटचे एफ.एस.आय त्याला द्यायचे

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्या रक्कमेचा एफ.एस.आय द्यायचा जी रक्कम त्या बांधकाम मध्ये घेणार आहे.

**मा. महापौर :-**

तर त्याच्यामध्ये पाच लाखाचे काम केले तर दहा लाख द्यावे लागेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

का ?

**मा. महापौर :-**

कारण टि.डी.आर कॉस्ट ६०० रुपये असतील आणि कन्स्ट्रक्शन हजार रुपये असतील मग तुम्हाला डबल द्यावे लागेल.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, त्याला एक टाईम फ्रेम द्या मा. आयुक्त साहेब ते कधी पर्यंत करणार ?

**मा. महापौर :-**

टि.डी.आर एक एफ.एस.आय देता येते चार दिवसाच्या आत जास्तीत जास्त पुढच्या आठवड्यात घेऊ.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, २७ तारखेनंतर साहेब, चार नंबर मध्ये तुम्ही १२६४ क्षेत्रफळ दिले तिकडे १४०५ आहे. मला पहिले पत्र दिले त्याच्यामध्ये १४०५ चौरस मिटर आहे.

**मा. महापौर :-**

ते सुधारुन घेऊ

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एक ॲमीनीटी स्पेस यामध्ये दिलेला नाही.

**मा. महापौर :-**

ते गटनेता बैठकीमध्ये नक्की करु या आपण त्यामध्ये सदस्य आहातच आपल्ल्या ॲड करता येईल.

**प्रकरण क्र. ०६ :-**

विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या ॲमिनिटी ओपन स्पेस (नागरी सुविधा क्षेत्र) या जागेत सार्वजनिक सोई उपलब्ध करणेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ०८:-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मंजूर केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार प्राप्त होणाऱ्या ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेत सार्वजनिक सोयी उपलब्ध करण्याबाबत मा. आयुक्त यांना संपूर्ण अधिकार आहेत. तथापी सदर जागेत करावयाच्या सार्वजनिक सोयीकरीता मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सर्व गटनेत्यांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ नुसार समिती गठीत करण्यात येऊन सदर समिती मार्फत ॲमिनिटी ओपन स्पेस मध्ये करावयाच्या सार्वजनिक सोयीबाबत व सदर सोयी कोणत्या पध्दतीने कराव्यात याबाबत अंतिम निर्णय घेण्यात यावा.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. अनिल दिवाकर सावंत**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०७, भाईंदर (पुर्व) येथे स्काय वॉक बांधणे कामातील जैसलपार्क जैन मंदीर पर्यंत स्काय वॉक बांधणे कामाबाबत फेर विचार करुन निर्णय घेणे.

**शानु गोहील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरा रोड, भाईंदर (पश्चिम) व भाईंदर (पूर्व) येथे स्काय वॉक बांधण्याची कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित करण्यात आलेली असून सदर कामाबांबत मा. महासभा दि. १८/०९/२००८ ठराव क्र.३७ अन्वये मा. महासभेने मा. सदस्यांच्या सुचनेसंह पारीत केलेला ठराव प्राधिकरणाकडे पुढील कार्यवाही करीता पाठविण्यात आलेला आहे. भाईंदर (प.) व मिरा रोड येथे स्काय वॉक बांधण्याची कामे प्रगती पथावर असून भाईंदर (प.) रेल्वे समांतर बांधावयाच्या स्काय वॉकच्या कॉलम मुळे नाल्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण होणार असल्याने सदर काम सुरू करण्यात आलेले नाही. तसेच भाईंदर (पूर्व) येथे रेल्वे स्टेशन ते केबिन रोड पर्यंतच्या स्काय वॉकचे कॉलम रेल्वेच्या जागेतून घ्यावयाचे असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला अजून पर्यंत रेल्वे प्रशासनाने परवानगी दिली नसल्याने सदर काम सुरू करण्यात आलेले नाही.

भाईंदर (पूर्व) येथे जैसलपार्क जैन मंदिर ते रेल्वे स्टेशन पर्यंत स्कॉय वॉकचे काम देखिल प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तथापी जैसलपार्क येथे सबवेचे काम प्रस्तावित असून जैसलपार्क जैन मंदिर ते रेल्वे ट्रॅक पर्यंत सबवेच्या रस्त्याकरीता रस्ता खोदून उतारानुसार खाली करावयाचा असल्याने सद्यस्थितीत सदर स्काय वॉक च्या कॉलमना अडथळा निर्माण होणार असल्याने सदर स्काय वॉकचे काम रद्द करण्यात यावे. सदर स्काय वॉक ऐवजी रेल्वे स्टेशन ते शिवसेना ऑफिस व पुढे शौचालयावरून रेल्वे समांतर स्काय वॉक बांधण्यात यावा. तसेच केबिन रोड वरील स्काय वॉक रावळनगर पर्यंत पुढे बांधण्यात यावा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मेरा अनुमोदन है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, भाईंदर वेस्टला जो स्कायवॉक चालु है रेल्वे समांतर नाले के कारण भाईंदर का जो प्लान है मा. आयुक्त साहेब, त्याला पण कमी जास्त केलेले आहे. भाईंदर वेस्ट मे जो काम अब चालु हे उसका भी जो आगे तक या उसको आगे बिच मे ही रद्द कर दिया है। भाईंदर वेस्टला जे स्कायवॉक चालु आहे ते मलयकापर्यत म्हणजे बालाजी नगर पर्यंत होते. त्याला मध्येच शिवसेना ऑफीसच्या पुढे बंद केले त्याचे कारण काय? उसको पचास फुट कम करने का कारण क्या है ?

**मा. महापौर :-**

मी सर्वांना विनंती करतो की, स्कायवॉल्कचे जे काही चेंजेस झाले त्याबाबत आपण मा. आयुक्ताच्या दालनात बसुन मिटींग घेऊन ते निर्णय करावा कारण वेळ संपलेला आहे आणि एक शेवटचा महत्वाचा विषय इथे घ्यायचा आहे तर जे काहि चेंजेस झाले आहेत तर ठरावामध्ये आपल्याला काही बदल करायचा नाही. आपण मा.आयुक्तांबरोबर चर्चा करुन..........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते श्री. खांबित साहेबांना माहित आहे ना ?

**मा. महापौर :-**

मेरी बात सुनिए, एम.एम.आर.डी.ए के लोग मा. आयुक्त साहब और हम बैठकर डिसीजन कर सकते है।

**प्रफुल्ल पाटील :-**

स्कायवाल्कच्या संदर्भात जैन मंदिरासमोरचा जो बदल आहे तो बदल कुढल्या कारणामुळे आहे ? तर सब वे मुळे आहे पण सबवे ची परिस्थिती अशी आहे की तो सबवे होणारच नाही दहा वर्षे सबवेचे नाटक चालले आहे काय कारण आहे ते सांगाल का?

**मा. महापौर :-**

आता त्याव विषयाच्या 'ज' खाली प्रस्ताव आहे सबवेचे टेक्नीकल प्रॉब्लेम असे होते की, रेल्वेने जे काही एस्टीमेट केले होते त्यामध्ये काहीतरी आयटम घेतलेले नव्हते म्हणून ज्यावेळी आपण निवीदा मागीवली त्यावेळेला कोणी आपल्याकडे यायचे नाही. त्यावेळी त्यांना प्रत्यक्ष बोलावून घेतलेले होते. काही आयटमचे

आपण रिएस्टीमेट करुन त्याला अर्थिक प्रशासकीय मंजुरी देऊ असे सभागृहाने ठरवले तर ते काम चालु होईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

आयटमच्या रिएस्टीमेशनसाठी थांबले आहे की, तुम्ही एक अट टाकली आहे की, त्याच्यामध्ये ज्याने रेल्वेचे सबवे केले आहेत फक्त तोच येऊ शकतो.

**मा. महापौर :-**

ती अट आपण काढली, तीनदा निविदा काढली तीनदा आपण अट कमी करत गेलो की, कोणीतरी यावे, पण आता त्याच्यामध्ये मेन प्रॉब्लेम आहे की, काही आयटम एस्टीमेटची राहीली होती. श्री. खांबित साहेब माहिती देतील.

**प्रकरण क्र. ०७,**

भाईंदर (पुर्व) येथे स्काय वॉक बांधणे कामातील जैसलपार्क जैन मंदीर पर्यंत स्काय वॉक बांधणे कामाबाबत फेर विचार करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ०९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरा रोड, भाईंदर (पश्चिम) व भाईंदर (पूर्व) येथे स्काय वॉक बांधण्याची कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित करण्यात आलेली असून सदर कामाबांबत मा. महासभा दि. १८/०९/२००८ ठराव क्र.३७ अन्वये मा. महासभेने मा. सदस्यांच्या सुचनेसंह पारीत केलेला ठराव प्राधिकरणाकडे पुढील कार्यवाही करीता पाठविण्यात आलेला आहे. भाईंदर (प.) व मिरा रोड येथे स्काय वॉक बांधण्याची कामे प्रगती पथावर असून भाईंदर (प.) रेल्वे समांतर बांधावयाच्या स्काय वॉकच्या कॉलम मुळे नाल्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण होणार असल्याने सदर काम सुरू करण्यात आलेले नाही. तसेच भाईंदर (पूर्व) येथे रेल्वे स्टेशन ते केबिन रोड पर्यंतच्या स्काय वॉकचे कॉलम रेल्वेच्या जागेतून घ्यावयाचे असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला अजून पर्यंत रेल्वे प्रशासनाने परवानगी दिली नसल्याने सदर काम सुरू करण्यात आलेले नाही.

भाईंदर (पूर्व) येथे जैसलपार्क जैन मंदिर ते रेल्वे स्टेशन पर्यंत स्कॉय वॉकचे काम देखिल प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तथापी जैसलपार्क येथे सबवेचे काम प्रस्तावित असून जैसलपार्क जैन मंदिर ते रेल्वे ट्रॅक पर्यंत सबवेच्या रस्त्याकरीता रस्ता खोदून उतारानुसार खाली करावयाचा असल्याने सद्यस्थितीत सदर स्काय वॉक च्या कॉलमना अडथळा निर्माण होणार असल्याने सदर स्काय वॉकचे काम रद्द करण्यात यावे. सदर स्काय वॉक ऐवजी रेल्वे स्टेशन ते शिवसेना ऑफिस व पुढे शौचालयावरून रेल्वे समांतर स्काय वॉक बांधण्यात यावा. तसेच केबिन रोड वरील स्काय वॉक रावळनगर पर्यंत पुढे बांधण्यात यावा.

**सुचक :- सौ. शानु गोहिल** **अनुमोदक :- श्री. मदन उदितनारायण सिंह**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव** :-

प्रकरण क्र. ०८, मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय दप्तर, बूट व मोजे मोफत पुरवठा करणेबाबत.

**मर्लिन डिसा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षा मंडळाच्या एकूण ३४ शाळा असुन शाळेत अंदाजे एकूण ९९१० विद्यार्थी शिकत आहेत. मिरा-भाईंदर महानगरपालिका शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गोर-गरीब व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असल्याने मोफत गणवेशा सोबत त्यांना मोफत शालेय दप्तर, बुट, मोजे व वह्या उपलब्ध करून दिल्यास मनपाच्या शाळेतील मुलांचा एक प्रकारे ड्रेसकोड तयार होवून मुले निटनेटकी तसेच सुंदर दिसुन शाळेचा दर्जा उंचवण्यास त्यामुळे मदत होणार आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाकरीता सन २००९-१० या वर्षात **"लेखाशिर्ष ड-१, प्राथमिक/माध्यमिक शिक्षण (४) शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, गणवेश, बॅच मोफत"** यामध्ये रू. २४,००,०००/- (अक्षरी रू. चोवीस लाख मात्र ) शिल्लक आहेत. सदर तुरतुदीतून मुलांसाठी शालेय दप्तर, बुट, मोजे व वह्या इत्यादींच्या निविदा मागवुन खरेदी करणे करिता मा. महासभा प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देत आहे.

**नयना म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे. मा. महापौर साहेब आणि मा. आयुक्त साहेब, आपण शाळेतील मुलांना एक-एक ड्रेस दिलेला आहे पण गेल्यावर्षी पण आपण मुलांना कपडे वैगरे दिलेले नव्हते, साहेब, पावसाळ्याचे दिवस आहेत तर माझे असे म्हणणे आहे की, मुलांना अजुन एक-एक ड्रेस दिला तर बर होईल.

**मा. महापौर :-**

आता जेवढे आहेत तेवढे आपण त्यांना ड्रेस देऊ.

**नयना म्हात्रे :-**

माझ्या वॉर्डमध्ये एकच वाटला.

**मा. महापौर-**

आता दोन ड्रेस देणार.

**प्रकरण क्र. ०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय दप्तर, बूट व मोजे मोफत पुरवठा करणेबाबत.

**ठराव क्र. १० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षा मंडळाच्या एकूण ३४ शाळा असुन शाळेत अंदाजे एकूण ९९१० विद्यार्थी शिकत आहेत. मिरा-भाईंदर महानगरपालिका शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गोर-गरीब व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असल्याने मोफत गणवेशा सोबत त्यांना मोफत शालेय दप्तर, बुट, मोजे व वह्या उपलब्ध करून दिल्यास मनपाच्या शाळेतील मुलांचा एक प्रकारे ड्रेसकोड तयार होवून मुले निटनेटकी तसेच सुंदर दिसुन शाळेचा दर्जा उंचवण्यास त्यामुळे मदत होणार आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाकरीता सन २००९-१० या वर्षात **"लेखाशिर्ष ड-१, प्राथमिक/माध्यमिक शिक्षण (४) शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, गणवेश, बॅच मोफत"** यामध्ये रू. २४,००,०००/- (अक्षरी रू. चोवीस लाख मात्र ) शिल्लक आहेत. सदर तुरतुदीतून मुलांसाठी शालेय दप्तर, बुट, मोजे व वह्या इत्यादींच्या निविदा मागवुन खरेदी करणे करिता मा. महासभा प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. मर्लिन डिसा** **अनुमोदक :- श्रीम. नयना म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, सन्मा. सदस्य श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे यांचे दिनांक १०/०६/२००९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.--- सब वे बांधणे व रेल्वे खालील कल्वर्ट बांधणे कामाबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकने ठराव क्र. ४३, दि. १०/१०/२००८ अन्वये भाईंदर पूर्व व पश्चिम येथे सब वे बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास मंजूरी दिली आहे. सदर कामाकरीता आतापर्यंत सहा वेळा निविदा मागवून देखील ठेकेदारांनी निविदा भरलेल्या नाहीत. याबाबत मा. खासदार श्री. आनंद परांजपे साहेबा सोबत रेल्वे प्रशासन व महानगरपालिकेकडे विचारणा केली असता सब वे च्या जागे ठिकाणी असलेली माती व पाण्याची पातळी यामुळे सब वे कामास अडथळा येणार असल्याने व महानगरपालिका व रेल्वेने तयार केलेल्या रु. ९.५९ कोटीच्या अंदाजपत्रकापेक्षा मोठ्या प्रमाणावर खर्च अपेक्षित असल्याने निविदा भरत नसल्याबाबत समजले.

त्याचप्रमाणे भाईंदर व मिरा रोड रेल्वे स्थानका दरम्यान कल्वर्ट बांधणे कामी देखील मा. नगरसेवक व लोकप्रतिनिधी यांच्या अथक प्रयत्नानंतर रेल्वेने दोन ठिकाणी Micro-Tunnelling पध्दतीने कल्वर्ट बांधण्यास मंजूरी दिली आहे. सदर कामाकरीता रु. ११.०० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

वरील दोन्ही कामे त्वरीत सुरु करणे आवश्यक असल्याने सदर दोन्ही कामांच्या अंदाजपत्रकात रेल्वे प्रशासनाच्या मंजूरी नुसार व अपेक्षित खर्चानुसार त्वरीत निविदा बाबतची प्रक्रिया करण्याकरीता सदर प्रस्ताव चर्चेकरीता येत्या मा. महासभेपुढे ठेवण्यास विनंती आहे.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

भाईंदर पुर्व-पश्चिम यांना जोडणारा रेल्वे खालील सबवे बांधणे कामी विलंब होत आहे.

**प्रशांत पालांडे :-**

ठराव कुठे मांडता? ‘ज’ च्या प्रस्तावाखाली ठराव होत नाही पण ते अगोदर मंजुर झाले त्याला ठराव काय ?

**अनिल सावंत :-**

‘ज’ च्या प्रस्तावाखाली ठराव मांडतात काय ?

**मा. महापौर :-**

फेर एस्टीमेटला

**प्रफुल्ल पाटील :-**

फेर एस्टीमेटला ‘ज’ प्रस्तावाखाली मान्यता कशी येईल? तो आर्थिक विषय आहे.

**अनिल सावंत :-**

रितसर विषय पटलावर विषय घेऊन या.

**प्रफुल्ल पाटील :-**

पहीली महत्वाची बाब अशी आहे की, तो सबवे का झाला नाही ? आम्हाला काही कारणे सांगतच नाहीत.

**मा. आयुक्त :-**

सहा वेळा टेंडर प्रसिध्द केले सहा वेळा एकही टेंडर आले नाही. परवा प्रसिध्द केल्यानंतर एक टेंडर आले आहे ते सहा कोटीचे एस्टीमेट असलेले टेंडर एकोणचाळीस कोटीला आलेले आहे.

**दिपक खांबित :-**

ब्लॉक पुशिंग सिस्टम आहे ती तिकडे पॉसीबल होत नाही असे त्याचे म्हणणे आहे म्हणून त्यांना तीकडे मायक्रो टॅनलींग म्हणून अल्टरनेटीव्ह टेक्नॉलॉजी प्रस्तावीत केले आहे.

**अनिल सावंत :-**

पण ‘ज’ च्या प्रस्तावाखाली आर्थिक मंजुरी घेते येते का ?

**दिपक खांबित :-**

आपण याची आर्थिक मंजुरी घ्यायची नाही आम्ही पुन्हा टेंडर मागवतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे तुम्ही एक जाचक अट अशी टाकलेली आहे ज्याची काही गरज नाही तुम्ही असे टाकले आहे की त्या ठेकेदाराने रेल्वेचा सबवे केलेला असला पाहिजे ही अट काढा बघा तुम्हाला किती ठेकेदार येतात कशाला रिएस्टिमेट करता ?

**दिपक खांबित :-**

काढली.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग टेंडर करा तुम्ही रिएस्टिमेट करुन सहा कोटीचे पन्नास कोटीवर न्यायचे काय ?

**दिपक खांबित :-**

साहेब, जे कल्वर्ट आहेत ते रेल्वेने आपल्याला दोन ठिकाणी कल्वर्ट बांधायला मंजुरी दिलेली आहे पण त्यालापण अठरा कोटी एक्यान्नव लाख रुपये खर्च आहे. त्याला महासभेची मंजुरी घ्यावी लागेल नंतर परत टेंडर काढावे लागेल.

**जुबेर इनामदार :-**

रितसर विषयपटलावर विषय आणा.

**प्रफुल्ल पाटील :-**

कल्वर्टच्या विषयाच्या एस्टीमेटचा विषय अधी आला नव्हता तो नवीन विषय आणा पण हा सबवे च्या ज्या पुर्वी पासुनच्या अटी टाकल्या आहेत त्यात ही एक अट शिथिल करा की, फक्त रेल्वेचेच सबवे बांधले पाहीजे असे काही नाही. तो हायवेचा पण सबवे चालेल.

**दिपक खांबित :-**

साहेब, कल्वर्टची आपल्याकडे २००१ ची मंजुरी आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

कल्वर्टला आम्ही मंजुरी देऊ तुम्ही विषय आणा.

**दिपक खांबित :-**

२५/०६/२००१ च्या सर्वसाधारण सभेत......

**प्रफुल्ल पाटील :-**

असु द्या तुम्ही नवीन विषय आणा.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, कल्वर्टचा अगोदर आणा.

**अनिल सावंत :-**

विषयपत्रीकेवर विषय घेऊन या.

**मदन उदितनारायण सिंह :-**

श्री. खांबित साहब, कल्वर्ट का जल्दी लाईए। बारीश मे ईस्ट मे पुरा पाणी भरेगा।

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

मा. महापौर साहब, यह कल्वर्ट शहर के लीए आवश्यक विषय है।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०, सन्मा. सदस्या श्रीम. प्रभात प्रकाश पाटील यांचे दिनांक १२/०६/२००९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- मिभामनपा क्षेत्रात पालिका शाळांतील इ.८ वीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी माध्यमिक विभाग इ.८ वी ते १० सुरु करणेबाबत.

मिभामनपा क्षेत्रात पालिका शिक्षण मंडळाच्या एकूण ३४ इतक्या शाळा असून, त्यात मराठी, हिंदी, गुजराती माध्यमातून विद्यार्थी शिक्षण घेतात. ह्या शाळांमधून प्रतिवर्षी इ.७ वी तून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या साधारणतः १०९३ इतकी असते. ह्या मुलांना खाजगी शाळेत प्रवेश घेण्यापलिकडे दुसरा पर्याय नसतो. खाजगी शाळा भरमसाठ डोनेशन मागतात. ह्याला त्यांचाही काही दोष नाही, कारण त्यांना त्यांचेही खर्च आहेतच. पण पालिका शाळांतील मुलेही आर्थिक दृष्ट्या मागसलेली असतात. त्यांचे पालक हे डोनेशन फी भरु शकत नाहीत. पर्यायाने ही मुले शाळा सोडून घरी बसतात. त्यांची शैक्षणिक प्रगती खुंटते. प्राथमिक शिक्षण जरी आपले कर्तव्य असेल तरी पालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगती साधणे हे सुध्दा आपले कर्तव्य आहे. त्या करीता मनपाची इ.१० वी पर्यंत शाळा असणे गरजेचे आहे. त्यासाठी मनपा क्षेत्रात मराठी, हिंदी, गुजराती विभागाच्या दोन तुकड्यांच्या शाळांना मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे त्वरीत मंजूरीसाठी पाठवावा अशी विनंती आहे.

**प्रभात पाटील :**

मा. महापौर साहेब, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये यावर्षी आपल्या शाळेतुन बाहेर पडलेल्या विद्यार्थांची संख्या १०९३ आहे आणि ह्या बाहेर पडलेल्या विद्यार्थांमध्ये मराठी माध्यमाची ५६४ मुले, हिंदी ३०७, गुजराथी १११ आणी ऊर्दु ११८ हे विद्यार्थी जेव्हा खाजगी शाळांमध्ये प्रवेशाला जातात खाजगी शाळेचे मालक संचालक इथे आहेत मला कोणावर आक्षेप घ्यायचा नाही परंतू ह्यांच्याकडे ऑलरेडी यांचा विद्यार्थी वर्ग असल्यामुळे यांना त्या विद्यार्थांसाठी सर्व काही सोयी उपलब्ध करुन द्याव्या लागतात.

**प्रभात पाटील :-**

या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य खराब होउ नये म्हणून आपण चार माध्यमांचे किमान दोन-दोन वर्ग महापालिकेकडून माध्यमिक शाळा सुरु करण्यांत याव्या. त्या बी.एम.सी. कडून वगैरे, ठाणे महानगरपालिकेकडे चालु आहेत. आपण ही प्रोसीजर आजपासून चालु करा. निदान आपल्या पुढल्या वर्षी तरी याचा इफेक्ट देता येईल आणि म्हणून माझी विनंती आहे की, आपल्या महानगरपालिकेच्या दहावी पर्यंतच्या माध्यमिक शाळा चार माध्यमांच्या दोन-दोन वर्गाच्या सुरु करण्यात याव्या असा मी ठराव मांडत आहे.

**मा. आयुक्त :-**

फक्त प्रायमरी आहे. हायस्कुल चालविण्याचे आपले काम नाही.

**प्रभात पाटील :-**

प्राथमिक शिक्षण आपली मेन जबाबदारी आहे.

**मा. आयुक्त :-**

प्राथमिक शिक्षण आपले आहे. जर १०० टक्के ग्रॅन्ड शासन देणार असेल तर चालवू.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही प्रोसीजरला लागावे म्हणून मी हा विषय आणला आहे.

**मा. आयुक्त :-**

सुरु करु.

**प्रभात पाटील :-**

मी तेच म्हंटले आहे की, आपण प्रोसीजर सुरु करावे.

**मा. आयुक्त :-**

शासनाकडे मंजूरीसाठी पाठवू.

**प्रभात पाटील :-**

मी असे म्हणत नाही की, उद्या चालु करा.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. सचिव साहेब, पुढचा विषय घ्या.

**जयंत पाटील :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी विनंती करतो की, एक अतिशय महत्वाचा विषय आहे.

**मा. आयुक्त :-**

सर्वांचे मत असे असेल तर मा. महापौरांच्या परवानगीने पाणी पुरवठ्याचे जे.एन.एन.यु.आर.एम. खाली श्री. अजितदादा पवार यांनी जे १०० एमएलडी सुर्या प्रकल्पातून मंजूर केले आणि एमएमआरडीए ने १०० एमएलडी दिलेले आहेत. असा २०० एमएलडी चा प्रस्ताव केंद्र शासनाकडे आणि महाराष्ट्र शासनाकडे आचारसंहिता लागण्यापूर्वी पाठवणे गरजेचे आहे म्हणून डीपीआर बनवून पाठविण्यासाठी आपली मंजूरी पाहिजे आहे. तुमचे सर्वांचे मत असेल तर.....

**मा. महापौर :-**

विषयाचे वाचन करा.

**जयंत पाटील :-**

मिरा भाईंदर शहरासाठी नवीन पाणी पुरवठा योजनेस मंजूरी मिळणेबाबत.

**प्रफुल्ल पाटील :-**

पहिल्यांदा तुम्ही मा. महापौरांना विनंती करा की, मला ‘‘क’’ खाली प्रस्ताव आणायचा आहे. मग सर्व सभागृह मंजूरी देतील. प्रोसीडींगला ते आले पाहिजे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, परवानगी आहे का?

**मा. महापौर :-**

परवानगी आहे.

**जयंत पाटील :-**

मिरा-भाईंदर शहराची वाढत्या लोकसंख्येचा विचार करीता सध्याची पाणी टंचाई व भविष्यात शहराला होणारा पाणीपुरवठा कमी पडु नये म्हणुन शहराची पाणी पुरवठा व्यवस्था सुधारण्यासाठी विविध योजना राबविणे प्रस्तावित आहे.

मिरा-भाईंदर शहराच्या विकास आराखडयानुसार शहराची लोकसंख्या ८ लाखाच्या आसपास असुन ती २०४१ साली २८ लाखापर्यत जावू शकते. तसेच पाण्याची आवश्यकता ४३० दशलक्ष लिटर प्रतिदिन पर्यत जाईल असे अपेक्षित आहे. सदयस्थितीत शहरास केवळ ९१ दशलक्ष लिटर प्रतिदीन इतकाच पाणीपुरवठा होत आहे. पाण्याची तीव्र टंचाई लक्षात घेवुन महानगरपालिकेने विविध जलस्त्रोतांचा शोध घेवुन प्रकल्प अहवाल तयार करणे या कामाकरिता सल्लागाराची नेमणुक केली होती. सल्लागाराने प्रस्तावित केलेल्या विविध योजनांपैकी महानगरपालिकेस सुर्या प्रकल्पातुन १०० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने दि.०४/०६/२००९ रोजीच्या पत्रानुसार मंजूर केला आहे व मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या कोटयातून १०० द.ल.लि. पाणी देण्याचे एम.एम.आर.डी.ए. ने तत्वतः मान्य केलेले आहे. असे एकूण २०० द.ल.लि. पाण्याचे आरक्षण सुर्या धरणातून मंजूर केले आहे. महानगरपालिकेच्या सल्लागाराने सदर योजनेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला असुन संपुर्ण योजनेचा खर्च रु. ७१८.०० कोटी इतका अपेक्षित आहे.

तसेच शहरासाठी मंजुर झालेले एम.आय.डी.सी. कोटयातील ३० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी व सुर्या प्रकल्पाचे प्रतिदीन २०० दशलक्ष पाणी याकरिता व शहरात विकसीत होणाऱ्या भुभागकरिता अंतर्गत पाणी वितरण व्यवस्थेत समग्र सुधारणा आवश्यक आहे. या कामासाठी महानगरपालिकेने सल्लागांराकडुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. या अहवालात जलवितरण व्यवस्था शहरात विविध क्षमतेचे जलकुंभ उभारणे तसेच जलकुंभाच्या जोडणीसाठी पाणी वितरण व्यवस्था या प्रमुख प्रकल्प घटकाचा समावेश आहे. या सर्व प्रकल्पाचा अंदाजे खर्च रु.३७५.०० कोटी इतका अपेक्षित आहे.

तसेच देशातील सदयस्थितीतील पाणीपुरवठा व्यवस्था व भविष्यात उपलब्ध होणारे पाणी व नव्याने निर्माण होणाऱ्या पाणीपुरवठा व्यवस्थांचे प्रभावी व्यवस्थापन करणे, पाण्याचा दाब सर्व ठिकाणी समान ठेवणे, यंत्रणेची देखभाल, दुरुस्ती करणे, ठराविक काळाने यंत्रणेचे ऑडीट करणे, नागरिकांना बिल भरणा सुविधा उपलब्ध करणे, तक्रार निवारण कक्ष व यंत्रणा उभारणे याकरिता आवश्यकतेनुसार खाजगी क्षेत्राचा सहभाग व भागीदारी महानगरपालिकेस अपेक्षित आहे. जेणेकरुन वरील सुविधा पुरविण्याच्या गुणवत्तेत वाढ होवुन महानगरपालिकेच्या यंत्रणेवरील ताण कमी होईल.

मिरा - भाईंदर शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये समग्रीत सुधारणा कार्यक्रम राबविण्यासाठी खालील कार्यवाही करण्यास आवश्यक ती अधिकार प्रदान करीत आहे.

१ :- महाराष्ट्र सरकारच्या जलसंपदा विभागाने व इतर सरकारी संस्थांनी परवानगी दिलेल्या / मंजुर केलेल्या जलस्त्रोताचा व शहराच्या भविष्याच्या दुष्टीने आवश्यक अशा इतर जलस्त्रोतांचा विकास व इतर अनुषांगिक काम करुन घेण्याकरिता प्रशासकीय व आर्थिक मान्यता / मंजुरी देत आहे.

२ :- महाराष्ट्र सरकार व इतर सरकारी संस्थांनी मंजुर केलेल्या जलस्त्रोताचा व भविष्यात मंजुर होणाऱ्या

जलस्त्रोताचा विकास व योजना राबविण्याकरिता भागीदारीतुन प्रकल्प योजना पुर्णतः राबविणे अथवा आंशिक सहभाग घेणे तसेच प्रकल्पाची देखभाल करणे याकरिता विविध सरकारी संस्थांना तसेच प्राधिकरणांना (उदा.एम.एम.आर.डी.ए., एम.आय.डी.सी) अधिकार प्रदान करणे याकरिता ही महासभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

३ :- महाराष्ट्र सरकारच्या जलसंपदा विभागाने सुर्या प्रकल्पातुन मंजुर केलेल्या २०० द.ल.लि. कोटयातील पाणी उपसा करणे, शुद्धीकरण करणे, पाणी शहरापर्यत आणण्यासाठी वाहीनी टाकणे व इतर आवश्यक यंत्रणा उभारणे याकरिता रु.७१८ कोटी (रु. सातशे अठरा कोटी रूपये) इतक्या रकमेचा प्रकल्प अहवालास त्यातील तपशीलास व प्रकल्प घटकाला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

४ :- सुर्या प्रकल्पातुन तसेच भविष्यात उपलब्ध होणाऱ्या जलस्त्रोताच्या अनुषंगाने तसेच शहराच्या भविष्यातील विस्तार आराखडयाच्या अनुषंगाने शहरातील अंतर्गत पाणी वितरण व्यवस्थेत समग्र सुधारणा करणे याकरिता रु.३७५ कोटी (रु.तीनशे पंचाहत्तर कोटी रूपये) इतक्या रकमेच्या प्रकल्प अहवालास त्यातील तपशीलासह प्रकल्प घटक व प्रकल्प सल्लागार नेमण्यास ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

५ :- वरील सर्व प्रकल्प योजना राबविणे व अनुषांगिक कामे याकरिता आवश्यक आर्थिक पाठबळ, अनुदान मदतनिधी व आवश्यक असल्यास कर्ज रुपाने उभारण्यास ही महासभा मान्यता देत आहे.

६ :- वरील सर्व प्रकल्प योजना व अनुषांगिक कामे राबविण्याकरिता आवश्यक तरतुदी व वित्तीय व्यवस्थापन या वर्षाच्या (२००९-१०) सुधारीत अंदाजपत्रकात तसेच भविष्यातील प्रत्येक वर्षाच्या आर्थिक अंदाजपत्रकात करण्यासाठी ही महासभा मान्यता देत आहे.

७ :- सदर काम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दरसुचीनुसार करण्यात यावे.

८ :- तसेच वरील सर्व प्रकल्प योजना आवश्यकतेनुसार ई.पी.सी. अथवा पी.पी.पी. तत्वावर व माध्यमातुन राबविणे व विकसीत करणे याकरिता ही महासभा मंजुरी देत आहे.

९ :- शहरातील जल व्यवस्थापन आवश्यकतेनुसार खाजगी क्षेत्राच्या सहभागातुन सुधारणे व देखभाल करणे याकरीता एजन्सीच्या नेमणुकीस ही महासभा मान्यता देत आहे.

१० :- शहरातील प्रकल्प आवश्यकतेनुसार पी.पी.पी त/त्वावर तसेच खाजगी क्षेत्राच्या माध्यमातुन राबविण्यास आवश्यक आकृतीबंधास व प्रारुप मसुदयास त्यातील समाविष्ट अटीसह मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६(४१अ) व कलम ६६ अ अन्वये ही सभा अधिकार प्रदान करीत आहे. त्याच प्रमाणे ही महासभा आवश्यकतेनुसार खालील कार्यवाही करिता आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना ही सभा आवश्यक ती अधिकार प्रदान करीत आहे.

१) शासनाच्या परवानगीच्या अधीन राहुन विशेष हेतु यंत्रणेची निर्मिती करणे.
२) शासनाच्या परवागीच्या अधीन राहुन विशेष हेतु यंत्रणेच्या भागभांडवलामध्ये खर्च न करता घ्यावयाचा सहभाग अथवा खर्च अथवा अनुदानाद्वारे सहभाग घेणे.
३) महापालिकेचे प्रतिनीधी म्हणुन विशेष हेतु यंत्रणेच्या संचालक मंडळात संचालक म्हणुन महापौर व आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांची नियुक्ती करण्यासाठी
४) सदर विशेष हेतु यंत्रणेस निविदा / करारपत्रातील शर्तीनुसार उपलब्ध शासकीय अनुदान / अर्थसहाय्य पुरवणे
५) पाणीपुरवठा व्यवस्था सुलभरित्या कार्यवाहित राहणेसाठी आवश्यक बैठका घेणे, जनजागृती करणे
६) सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने शासनाकडे / अन्य वित्तीय संस्थांकडे शासकीय अनुदान / कर्ज प्रस्ताव याकरिता करावयाचे सादरीकरण.
७) महापालिकेच्या मालकीच्या पाणीपुरवठा केंद्राच्या मालमत्तेचे योजना व्यवस्थापनाकरिता शासनाच्या परवानगीने करावयाचे हस्तांतरण
८) शासन / मुख्य वित्त पुरवठादार यांच्या आवश्यकतेनुसार व शासन परवानगीने प्रकल्पाच्या व करारपत्राच्या अटी व शर्ती मध्ये करावे लागणारे आवश्यक फेरबदल करणे.

९) प्रकल्प कामाच्या उभारणीसाठी व सुलभीकरणासाठी आवश्यक भुसंपादन प्रस्ताव तयार करणे व भुसंपादनाकरिता आवश्यक पत्र व्यवहार करणे.

१०) वरील सर्व मुद्यांसह इतर अनुषांगिक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना ही सभा देत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ११ :-**

प्रकरण २ नियम के अन्वये प्रस्ताव ११ – मिरा भाईंदर शहरासाठी नविन पाणी पुरवठा योजनेस मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ११ :-**

मिरा-भाईंदर शहराची वाढत्या लोकसंख्येचा विचार करीता सध्याची पाणी टंचाई व भविष्यात शहराला होणारा पाणीपुरवठा कमी पडु नये म्हणुन शहराची पाणी पुरवठा व्यवस्था सुधारण्यासाठी विविध योजना राबविणे प्रस्तावित आहे.

मिरा-भाईंदर शहराच्या विकास आराखडयानुसार शहराची लोकसंख्या ८ लाखाच्या आसपास असुन ती २०४१ साली २८ लाखापर्यत जावू शकते. तसेच पाण्याची आवश्यकता ४३० दशलक्ष लिटर प्रतिदिन पर्यत जाईल असे अपेक्षित आहे. सदयस्थितीत शहरास केवळ ९१ दशलक्ष लिटर प्रतिदीन इतकाच पाणीपुरवठा होत आहे. पाण्याची तीव्र टंचाई लक्षात घेवुन महानगरपालिकेने विविध जलस्त्रोतांचा शोध घेवुन प्रकल्प अहवाल तयार करणे या कामाकरिता सल्लागाराची नेमणुक केली होती. सल्लागाराने प्रस्तावित केलेल्या विविध योजनांपैकी महानगरपालिकेस सुर्या प्रकल्पातुन १०० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने दि.०४/०६/२००९ रोजीच्या पत्रानुसार मंजूर केला आहे व मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या कोटयातून १०० द.ल.लि. पाणी देण्याचे एम.एम.आर.डी.ए. ने तत्वतः मान्य केलेले आहे. असे एकूण २०० द.ल.लि. पाण्याचे आरक्षण सुर्या धरणातून मंजूर केले आहे. महानगरपालिकेच्या सल्लागाराने सदर योजनेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला असुन संपुर्ण योजनेचा खर्च रु. ७१८.०० कोटी इतका अपेक्षित आहे.

तसेच शहरासाठी मंजुर झालेले एम.आय.डी.सी. कोटयातील ३० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी व सुर्या प्रकल्पाचे प्रतिदीन २०० दशलक्ष पाणी याकरिता व शहरात विकसीत होणा-या भुभागकरिता अंतर्गत पाणी वितरण व्यवस्थेत समग्र सुधारणा आवश्यक आहे. या कामासाठी महानगरपालिकेने सल्लागांराकडुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. या अहवालात जलवितरण व्यवस्था शहरात विविध क्षमतेचे जलकुंभ उभारणे तसेच जलकुंभाच्या जोडणीसाठी पाणी वितरण व्यवस्था या प्रमुख प्रकल्प घटकाचा समावेश आहे. या सर्व प्रकल्पाचा अंदाजे खर्च रु.३७५.०० कोटी इतका अपेक्षित आहे.

तसेच देशातील सदयस्थितीतील पाणीपुरवठा व्यवस्था व भविष्यात उपलब्ध होणारे पाणी व नव्याने निर्माण होणा-या पाणीपुरवठा व्यवस्थांचे प्रभावी व्यवस्थापन करणे, पाण्याचा दाब सर्व ठिकाणी समान ठेवणे, यंत्रणेची देखभाल, दुरुस्ती करणे, ठराविक काळाने यंत्रणेचे ऑडीट करणे, नागरिकांना बिल भरणा सुविधा उपलब्ध करणे, तक्रार निवारण कक्ष व यंत्रणा उभारणे याकरिता आवश्यकतेनुसार खाजगी क्षेत्राचा सहभाग व भागीदारी महानगरपालिकेस अपेक्षित आहे. जेणेकरुन वरील सुविधा पुरविण्याच्या गुणवत्तेत वाढ होवुन महानगरपालिकेच्या यंत्रणेवरील ताण कमी होईल.

मिरा - भाईंदर शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये समग्रीत सुधारणा कार्यक्रम राबविण्यासाठी खालील कार्यवाही करण्यास आवश्यक ती अधिकार प्रदान करीत आहे.

१ :- महाराष्ट्र सरकारच्या जलसंपदा विभागाने व इतर सरकारी संस्थांनी परवानगी दिलेल्या / मंजुर केलेल्या जलस्त्रोताचा व शहराच्या भविष्याच्या दुष्टीने आवश्यक अशा इतर जलस्त्रोतांचा विकास व इतर अनुषांगिक काम करुन घेण्याकरिता प्रशासकीय व आर्थिक मान्यता / मंजुरी देत आहे.

२ :- महाराष्ट्र सरकार व इतर सरकारी संस्थांनी मंजुर केलेल्या जलस्त्रोताचा व भविष्यात मंजुर होणा-या जलस्त्रोताचा विकास व योजना राबविण्याकरिता भागीदारीतुन प्रकल्प योजना पुर्णतः राबविणे अथवा आंशिक सहभाग घेणे तसेच प्रकल्पाची देखभाल करणे याकरिता विविध सरकारी संस्थांना तसेच प्राधिकरणांना (उदा.एम.एम.आर.डी.ए., एम.आय.डी.सी) अधिकार प्रदान करणे याकरिता ही महासभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

३ :- महाराष्ट्र सरकारच्या जलसंपदा विभागाने सुर्या प्रकल्पातुन मंजुर केलेल्या २०० द.ल.लि. कोटयातील पाणी उपसा करणे, शुद्धीकरण करणे, पाणी शहरापर्यत आणण्यासाठी वाहीनी टाकणे व इतर आवश्यक यंत्रणा उभारणे याकरिता रु.७१८ कोटी (रु. सातशे अठरा कोटी रूपये) इतक्या रकमेचा प्रकल्प

अहवालास त्यातील तपशीलास व प्रकल्प घटकाला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

४ :- सुर्या प्रकल्पातुन तसेच भविष्यात उपलब्ध होणाऱ्या जलस्त्रोताच्या अनुषंगाने तसेच शहराच्या भविष्यातील विस्तार आराखडयाच्या अनुषंगाने शहरातील अंतर्गत पाणी वितरण व्यवस्थेत समग्र सुधारणा करणे याकरिता रु.३७५ कोटी (रु.तीनशे पंचाहत्तर कोटी रूपये) इतक्या रकमेच्या प्रकल्प अहवालास त्यातील तपशीलासह प्रकल्प घटक व प्रकल्प सल्लागार नेमण्यास ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

५ :- वरील सर्व प्रकल्प योजना राबविणे व अनुषांगिक कामे याकरिता आवश्यक आर्थिक पाठबळ, अनुदान मदतनिधी व आवश्यक असल्यास कर्ज रुपाने उभारण्यास ही महासभा मान्यता देत आहे.

६ :- वरील सर्व प्रकल्प योजना व अनुषांगिक कामे राबविण्याकरिता आवश्यक तरतुदी व वित्तीय व्यवस्थापन या वर्षाच्या (२००९-१०) सुधारीत अंदाजपत्रकात तसेच भविष्यातील प्रत्येक वर्षाच्या आर्थिक अंदाजपत्रकात करण्यासाठी ही महासभा मान्यता देत आहे.

७ :- सदर काम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दरसुचीनुसार करण्यात यावे.

८ :- तसेच वरील सर्व प्रकल्प योजना आवश्यकतेनुसार ई.पी.सी. अथवा पी.पी.पी. तत्वावर व माध्यमातुन राबविणे व विकसीत करणे याकरिता ही महासभा मंजुरी देत आहे.

९ :- शहरातील जल व्यवस्थापन आवश्यकतेनुसार खाजगी क्षेत्राच्या सहभागातुन सुधारणे व देखभाल करणे याकरीता एजन्सीच्या नेमणुकीस ही महासभा मान्यता देत आहे.

१० :- शहरातील प्रकल्प आवश्यकतेनुसार पी.पी.पी त/त्वावर तसेच खाजगी क्षेत्राच्या माध्यमातुन राबविण्यास आवश्यक आकृतीबंधास व प्रारुप मसुदयास त्यातील समाविष्ट अटीसह मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६(४१अ) व कलम ६६ अ अन्वये ही सभा अधिकार प्रदान करीत आहे. त्याच प्रमाणे ही महासभा आवश्यकतेनुसार खालील कार्यवाही करिता आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना ही सभा आवश्यक ती अधिकार प्रदान करीत आहे.

११) शासनाच्या परवानगीच्या अधीन राहुन विशेष हेतु यंत्रणेची निर्मिती करणे.

१२) शासनाच्या परवागीच्या अधीन राहुन विशेष हेतु यंत्रणेच्या भागभांडवलामध्ये खर्च न करता घ्यावयाचा सहभाग अथवा खर्च अथवा अनुदानाद्वारे सहभाग घेणे.

१३) महापालिकेचे प्रतिनीधी म्हणुन विशेष हेतु यंत्रणेच्या संचालक मंडळात संचालक म्हणुन महापौर व आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांची नियुक्ती करण्यासाठी

१४) सदर विशेष हेतु यंत्रणेस निविदा / करारपत्रातील शर्तीनुसार उपलब्ध शासकीय अनुदान / अर्थसहाय्य पुरवणे

१५) पाणीपुरवठा व्यवस्था सुलभरित्या कार्यवाहित राहणेसाठी आवश्यक बैठका घेणे, जनजागृती करणे

१६) सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने शासनाकडे / अन्य वित्तीय संस्थांकडे शासकीय अनुदान / कर्ज प्रस्ताव याकरिता करावयाचे सादरीकरण.

१७) महापालिकेच्या मालकीच्या पाणीपुरवठा केंद्राच्या मालमत्तेचे योजना व्यवस्थापनाकरिता शासनाच्या परवानगीने करावयाचे हस्तांतरण

१८) शासन / मुख्य वित्त पुरवठादार यांच्या आवश्यकतेनुसार व शासन परवानगीने प्रकल्पाच्या व करारपत्राच्या अटी व शर्ती मध्ये करावे लागणारे आवश्यक फेरबदल करणे.

१९) प्रकल्प कामाच्या उभारणीसाठी व सुलभीकरणासाठी आवश्यक भुसंपादन प्रस्ताव तयार करणे व भुसंपादनाकरिता आवश्यक पत्र व्यवहार करणे.

२०) वरील सर्व मुद्यांसह इतर अनुषांगिक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना ही सभा देत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रफुल्ल पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, एक महत्वाचा विषय आहे. एक अधिकारी आहेत, श्री. अजित पाटील त्यांनी या महापालिकेची बरीचशी सेवा केलेली आहे. बरेचसे डिपार्टमेंट सांभाळलेले आहेत. सध्या त्यांच्याकडे आरोग्य विभागाची जबाबदारी आहे आणि ३१ जुलैला ते रिटायर होत आहेत. तर पुढच्या मा. महासभेत त्यांन विशेष मुदतवाढ देवून कार्यरत करावे असा विषय आणावा.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, जसे अनुसूची प्रकरण २(क) प्रमाणे श्री. जयंत पाटील यांनी जो प्रस्ताव घेतला आहे. त्याप्रमाणे कातकरी समाजाची जी २६ कुटूंबे आहेत त्यांना आपण जे तात्पुरत्या स्वरुपाचे रुम देणार आहोत तो ही ठराव करुन घ्या. मी त्यांचा ठराव मांडतो.......

**मा. महापौर :-**

श्री. प्रशांत पालांडेजी, शेवटची पाच मिनिटे आहेत. तो काय विषय आहे ते बोलून घ्या.

**शशिकांत भोईर :-**

आमचा ठराव घेणार ना?

**मा. महापौर :-**

होय.

**नयना म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत पालांडे :-**

१० जूनला मा. आयुक्त साहेबांनी एक आदेश काढलेला. डबल टॅक्सचा विषय होता. त्याबद्दल प्रशासनाचे थोडे स्पष्टीकरण हवे आहे.

**मा. आयुक्त :-**

डबल टॅक्स लावायचा जो विषय आहे तर अनधिकृतला आपण डबल टॅक्स लावतोच आहे. परंतु, ज्यांनी प्लानप्रमाणे बांधकाम केले पण भोगवटा दाखला घ्यायला येत नाहीत त्यांच्याकडे एक-एकाकडे दोन लाख, अडीच लाख, तीन लाख, बाल्कनी कवर केलेले छप्पर बांधलेले हे येणे आहे. म्हणून ते टॅक्स आकारणी केली की, भोगवटा घ्यायचे बंद करतात.

**जयंत पाटील :-**

पण जनतेला याच्यामुळे त्रास होत आहे.

**मा. आयुक्त :-**

जनतेला कुठे त्रास दिला? अजूनही त्याने विकलेले नाही.

**एस. ए. खान :-**

त्या बिल्डरचे दुसऱ्या ठिकाणी काम चालू आहे ते बंद करा.

**मा. आयुक्त :-**

नागरीकांची मागणी नाही. बिल्डरची मागणी आहे की, एक पट आकरणी करुन द्या. म्हणजे त्याचे बाल्कनीचे आणि याचे पैसे वाचतील.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, विकासकामावर लावायला विरोध नाही.

**एस. ए. खान :-**

तुम्ही बिल्डरला नोटीस काढा.

**मा. महापौर :-**

विषय जरा समजून घ्या. ज्यावेळी एखादा माणूस फ्लॅट घेतो. तो महापालिकेला विचारतो की, बिल्डींग ॲज पर प्लॅन आहे का? त्याने फ्लॅट घेतल्यानंतर ओ.सी. घेतली नाही म्हणून तीन पट आकारणे चुकीचे ठरेल. दुसरी गोष्ट अशी आहे, साहेब बोलतात की, बिल्डरकडून घ्या. आपण ज्यावेळी कर आकारणी करतो. बिल्डरने एखाद्या फ्लॅटवाल्याला पावतीच दाखवली नाही आणि मग त्याला कायमस्वरुपी तीन पट भरावे लागेल. तेही एक चुकीचे टेन्शनवाले काम होईल. मा. आयुक्त साहेबांना विनंती आहे की, त्या बिल्डरची त्या बिल्डींगवर आपली काही थकबाकी असेल, बाल्कनी कव्हर वगैरे, ते पैसे आकारा आणि सिंगल टॅक्स लावा, बिल्डींग ॲज पर प्लान असेल तर.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, विकासकाकडून घ्यायला विरोध नाही.

**मा. महापौर :-**

ओ.सी. नसेल तर लावू नका.

**जुबेर इनामदार :-**

आधीच्या इमारतींनी ओ.सी. घेतली नाही, त्याचे काय? आधी ज्या इमारती तयार केल्या. ज्याच्यामध्ये लोक राहतात आणि बिल्डर जागेवर नाही त्याचे काय?

**अनंत पाटील :-**

ग्रामीण भागामध्ये जी बांधकाम चालू होती, त्याच्यावरसुध्दा शास्ती लावलेली आहे. मी अर्थसंकल्पाच्या वेळी सुचना केली होती. श्री. अजित पाटील यांनीसुध्दा सांगितले होते की, आम्ही ती शास्ती कमी करु. त्याच्याविषयी खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

कुठली बांधकामे?

**अनंत पाटील :-**

गावठाणामधील बांधकामे. राई गावातील किंवा अन्य, मिरा भाईंदरमधील प्रत्येक गावठाणामध्ये जी बांधकामे झालेली आहेत. त्याच्यावर शास्ती लावण्यात आलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

सी.आर.झेड. मध्ये चाळी बांधल्या होत्या तेच ना?

**अनंत पाटील :-**

मी त्या म्हणत नाही, गावठण म्हणतो.

**मा. आयुक्त :-**

बिगर परवाना असेल तर होणार. जुनी बांधकामे तीन पट होणार नाहीत. नवीन बांधले असतील तर तीन पट होणार.

**अनंत पाटील :-**

गावठणामधील जुनीच बांधकामे आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, त्या आदेशाप्रमाणे बदल करायला सांगा.

**मा. महापौर :-**

साहेब, ओ.सी. ला लावू नका. छत बाकी असेल ती ओ.सी. काढून घ्या.

**प्रशांत पालांडे :-**

विकासकांकडून वसूल करा. नागरीकांकडून करु नका.

**प्रकरण क्र. ११अ :-**

प्रकरण २ नियम के अन्वये प्रस्ताव ११अ – कातकरी (आदिम जमात) व अनु. जाती कुटूबांना घरे देण्याबाबत.

**ठराव क्र. १२ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारत बांधकाम करतेवेळी फादरी तलाव भाईंदर या जागेतून २५ कातकरी (आदिम जमात) व ३ अनु.जाती कुटुंबांना (सोबतच्या यादीप्रमाणे) हटविण्यात आले होते. तद्नंतर सदर कुटुंबाना महानगरपालिकेने वेळोवेळी महानगरपालिकेच्या जागेमधून हटविलेले आहे. सद्यस्थितीत सदर कुटुंबे डॉ. आंबेडकर नगर, नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान समोरील रस्ता दुभाजकात राहत असून सदर कुटुंबाना तात्पुरत्या स्वरूपात टेंभा हॉस्पीटल मधील रहिवाशांप्रमाणे भाडे तत्वावर करारनामा करून **“बेघरांना घरे”** या आरक्षणात बांधलेल्या व महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या सदनिका देण्यात याव्यात व सदर रस्ता दुभाजकातील अन्य झोपडया तातडीने काढून सदर जागा विकसित करण्यात यावी .

**भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदाना समोरील रस्त्यातील दुभाजकात राहणा-या कातकरी (आदिम जमात) व अनु. जाती कुटूंबाची यादी**

| अ.क्र. | नावे |
|---|---|
| १. | श्रीम. मथुराबाई शिमग्या वाघे<br>नरू किसन वाघे |
| २. | प्रकाश सुरे वाघे<br>श्रीम. शकुंतला प्रकाश वाघे |
| ३. | राजु चैत्या वाघे<br>श्रीम. गुलाब राजु वाघे |
| ४. | लहु शंकर मुकणे |

श्रीम. अनु लहु मुकणे
५. विष्णु शंकर मुकणे
श्रीम. पुष्पा विष्णू मुकणे
६. श्रीम. बनु गु-या मुकणे
७. काळू गोपीनाथ मुकणे
श्रीम. लाडकु काळू मुकणे
८. सुरेश नवश्या वाघे
श्रीम. लाडकी सुरेश वाघे
९. सुरेश सिताराम वाघे
श्रीम. बेबी सुरेश वाघे
१०. सुनिल सुरेश वाघे
श्रीमती लक्ष्मी सुनिल वाघे
११. मारूती विठ्ठल वाघे
श्रीमती उपासना मारूती वाघे
१२. रमेश तुकाराम निंबाळकर
श्रीम. वनिता रमेश निंबाळकर
१३. लक्ष्मण जान्या वाघे
श्रीम. गिता लक्ष्मण वाघे
१४. श्रीम सविता गोपिनाथ मुकणे उर्फ सविता बाबू मसदकर
बाबू हेमराज मसदकर
१५. बबन शंकर वाघे
श्रीम. बेबी बबन वाघे
१६. श्रीम. रेखा मधू पवार
१७. श्रीम. देवकीबाई वालक्या वाघे
१८. दिपक पांडू वाघे
श्रीम. अनिता दिपक वाघे
१९. मदन बाबू मुकणे
श्रीम. बुदाबाई मदन मुकणे
२०. रवि/काळू/नागेश शिवा वाघे
२१. गणेश रमेश निंबाळकर
श्रीम. सोना गणेश निंबाळकर
२२. श्रीम. यशोदा वालक्या वाघे उर्फ जया दूर्वा गायकवाड
दुर्वा अनंता गायकवाड
२३. श्रीम. अनिता राजेश वाघे उर्फ अनिता प्रकाश परेरा
प्रकाश जॉन परेरा
२४. सुकूर कूशा म्हसकर
श्रीम. संगिता सुकूर म्हसकर
२५. सुरेश गोविंद मुकणे

१. श्री. बळवंत त्रिंबक मोहोड
सौ. छाया बळवंत मोहोड
२. ज्ञानेश्वर हेमराज मसदकर
संतोष हेमराज मसदकर (अंध)
३. श्रीमती भारती करण मसदकर

**एकूण** **२८**

**सुचक :- सौ. नयना गजानन म्हात्रे** **अनुमोदन :- श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**पिठासन अधिकारी**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**भगवती शर्मा :-**

शोकप्रस्ताव है। पिछले दिनो के अंदर पुर्व नगरसेवक श्री. योगेश शर्मा इनका देहांत हुआ। उसी प्रकार सन्मा. नगरसेवक श्री. प्रशांत पालांडे इनकी माताजी का देहांत हुआ। मै इस सभा मे उनके लिए शोकप्रस्ताव मांडता हू।

**वंदना चक्रे :-**

सन्मा. सभागृहाला मी विनंती करतो करते की, आपले सन्मा. सदस्य श्री. प्रशांत पालांडे यांच्या मातोश्रींचे निधन झालेले आहे. आपण लेट झालेले आहोत. सकाळीच करायला पाहिजे होते.

**शशिकांत भोईर :-**

एक श्रध्दांजलीचा प्रस्ताव आहे. खारीगावातील रहिवासी श्री. बाळकृष्ण महादेव पाटील यांचे दि. १५/०५/२००९ रोजी निधन झालेले आहे. तसेच आपल्या मिरा भाईंदरचे कर्मचारी श्री. तुकाराम हरिश्चंद्र पाटील यांच्या पत्नी सौ. शांतीबाई तुकाराम पाटील यांचेही दि. १६/०६/२००९ रोजी निधन झाले त्याचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**भगवती शर्मा :-**

महापालिकेचे कॉन्ट्रॅक्टर श्री. जगदेव इनके पिताजी का निधन हुआ, उस का भी शोकप्रस्ताव।

**आसिफ शेख :-**

माजी नगरसेवक श्री. योगेश शर्मा यांचेही दुःखद निधन झाले आहे.

**दुःखवठा ठराव १३ :-**

माजी नगरसेवक श्री. योगेश शर्मा यांचे निधन झालेले आहे. तसेच महानगरपालिकेचे कॉन्ट्रॅक्टर श्री. जगदेव यांच्या वडीलांचे निधन झालेले आहे. तसेच सन्मा. सदस्य श्री. प्रशांत पालांडे यांच्या मातोश्रींचे निधन झालेले आहे. तसेच खारी गावातील रहिवासी श्री. बाळकृष्ण महादेव पाटील यांचे दि. १५/०५/२००९ रोजी निधन झालेले आहे. तसेच आपल्या मिरा भाईंदरचे कर्मचारी श्री. तुकाराम हरिश्चंद्र पाटील यांच्या पत्नी सौ. शांतीबाई तुकाराम पाटील यांचेही दि. १६/०६/२००९ रोजी निधन झाले त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

सर्वांनी दोन मिनिटे जागेवर उभे राहून हुतात्म्यांना श्रध्दांजली वाहायची आहे.

**मा. महापौर :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ०७.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**